ISSN 0973 - 8452

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक


# अर्थसंवाद

भारतीय सौर पौष - चैत्र १९३०
जानेवारी - मार्च २००९ / खंड ३२ अंक ४





- हवामान बदलाचे भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणाम
- ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या दारिद्र्याची समस्या
- महाराष्ट्रातील अंदाजपत्रकीय बदलातील कल
- झुंज नव-श्रीमंतांशी



लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये ।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः ।।
मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

# अर्थसंवाद

जानेवारी-मार्च 2009/खंड 32,अंक 4

## । अ नु क्र म णि का ।

* हवामान बदलाचे भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणाम
वि.भ.भिसे . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 291

* ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या दारिद्र्याची समस्या
जयवंत इंगळे . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 316

* महाराष्ट्रातील अंदाजपत्रकीय बदतालील कल
प्रकाश कांबळे, बंडू जयसिंग कदम . . . . . . . . . . . . 351

* पीएच्. डी प्रबंधाचा सारांश
प्रशांत काटोले . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 360

* बत्तिसावे वार्षिक अधिवेशन : अहवाल
संतोष दास्ताने, सुर्यकांत जगदाळे, मधुकर शिंदे, अनिल सुर्यवंशी, विनायक देशपांडे . . . . . . . . 368

* तेहत्तिसावे वार्षिक अधिवेशन : विषयांची रूपरेषा
दि.व्यं.जहागिरदार, मधुकर शिंदे, के.जी.पठाण . . . . . . 387

* एक आवाहन
ज.फा.पाटील . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 401

* झुंज नव-श्रीमंतांशी
शि.ना.माने . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 406

* ग्रंथ परीक्षण
संतोष यादव . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 413

**प्रमुख संपादक**
जगन्नाथ शामराव पाटील

**सहायक संपादक**
संतोषकुमार बबनराव यादव

**सल्लागार मंडळ**
(2006-09)
अवधूत नाडकर्णी
अ.ब.देवगिरीकर
किशोर वाघमारे
जयश्री देवदत्त खांबेटे

**संपादकीय पत्रव्यवहार**
जगन्नाथ शामराव पाटील
शांती प्लाझा, बी–9,
880/881,शनिवार पेठ.
सातारा. 415 002
मो.9423261796
फोन:(02162)233152

INJAIN

मराठी अर्थशास्त्र परिषद

कार्यकारी मंडळ(2008-09)

. . . . . . . . . . . . . . . . .

अध्यक्ष

विनायक भगवानराव भिसे (औरंगाबाद)

. . . . . . . . . . . . . . . . .

कार्याध्यक्ष

ज. फा पाटील(कोल्हापूर)

. . . . . . . . . . . . . . . . .

कार्यवाह-खजिनदार

अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)

. . . . . . . . . . . . . . . . .

प्रमुख संपादक अर्थसंवाद

जगन्नाथ शामराव पाटील (सातारा)

. . . . . . . . . . . . . . . . .

सदस्य

1) हिरालाल चव्हाण(जळगाव)
2) प्रशांत काटोले (अमरावती)
3) अविनाश निकम (शहादा)
4) कृष्णराव पाटील (नागपूर)
5) सुभाष टकले (हिंगोली)
6) माधव गायकवाड (औरंगाबाद)
7) तानाजी गिते (पुणे)
8) बाळासो पाटील (सांगली)
9) बबनराव खामकर (सिंधुदुर्ग)
10) अंभोरे एस.एस. (औरंगाबाद)
11) मोहन चौधरी (पुणे)
12) आत्माराम पोळ (कडेगांव)

. . . . . . . . . . . . . . . . .

**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार :**

1) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली

2) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

(टीप : म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.)

कार्यालयीन पत्रव्यवहार

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)

अनिल बाबुराव सूर्यवंशी

कार्यवाह - खजिनदार - मराठी अर्थशास्त्र परिषद,

"गोदाई" शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,

बार्शी 413 411. जि.सोलापूर

दूरध्वनी (02184) 224294 मो.9011339906

परिषदेचे प्रमुख कार्यालय :

मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा / सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन.रॉय ह्युमन डेव्हलपमेंट कँपस प्लॉट क्र.6 एफ. ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सहकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर, बांद्रे (पूर्व) मुंबई 400051

**वर्गणी :**

**अ) परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य (एकरकमी) | : रू.1500 |
| साधारण सदस्य | : रू.300 (वार्षिक) |
| **आ) संस्था सदस्य** | |
| शैक्षणिक संस्था | : रू.250 (वार्षिक) |
| व्यावसायिक संस्था | : रू.250 (वार्षिक) |
| **इ) अर्थसंवाद वर्गणीदार** | |
| ग्रंथालये | : रू.250 (वार्षिक) |
| **ई) वर्षगणना** | 1 एप्रिल ते 31 मार्च |

. . . . . . . . . . . . . . . . .

*** संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.**

*** कृपया आजीव सदस्य वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी.**

*** अर्थसंवादची वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने प्रमुख संपादकांकडे पाठवावी.**

# हवामान बदलाचे भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणाम

**वि.भ.भिसे**
प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय,कडेगांव,जि.सांगली येथे संपन्न झालेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 32 व्या वार्षिक अधिवेशनात दि.7 नोव्हेंबर,2008 रोजी केलेले अध्यक्षीय भाषण**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 32 व्या वार्षिक अधिवेशनाचे उद्घाटन मा. ना. श्री. पतंगरावजी कदम, सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. माणिकराव साळुंखे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष मा. विश्वजीत कदम, कार्यवाह, भारती विद्यापीठ, पुणे मा. शांताराम (बापू ) कदम, अध्यक्ष, सागरेश्वर सहकारी सुतगिरणी, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे उपस्थित सर्व भूतपुर्व अध्यक्ष, परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. ज. फा. पाटील, कार्यवाह डॉ. अनिल सूर्यवंशी, कार्यकारिणी सदस्य, उपस्थित मान्यवर प्रतिनिधी, या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, पत्रकार आणि सर्व बंधुभगिनींनो..

बार्शी येथील श्री. शिवाजी महाविद्यालयात आयोजित 31व्या अधिवेशनात मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 32 व्या अधिवेशनासाठी अध्यक्ष म्हणून आपण माझी बहुमताने निवड केली. कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या कर्मभूमीत झालेली ही निवड माझ्यासाठी अतिशय मोलाची असल्याचे मी मानतो. आपण माझ्यावर जो विश्वास व्यक्त केला त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे, हे माझे नैतिक कर्तव्य आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सर्व मान्यवर सदस्य व परिषदेचे सर्व कार्यकारिणी सदस्य यांचा मी मनापासून ऋणी आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे हे अधिवेशन महाराष्ट्रात सहकारी व शिक्षण क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावलेल्या मा. ना. श्री. पतंगरावजी कदम यांच्या मातोश्री श्रीमती बयाबाई श्रीपतराव कदम यांचे नांव असलेल्या कडेगांव येथील कन्या महाविद्यालयात होत आहे ही सर्वांसाठीच आनंददायी अशी घटना आहे. या अधिवेशनाच्या आयोजनाचे सर्व श्रेय भारती विद्यापीठाचे प्रमुख,

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कणसे आणि त्यांचे सहकारी यांना आहे. ज्या परिस्थितीत व ज्या उत्साहाने आपण अधिवेशनाचे आयोजन केले व तशाच उत्साहात आम्हा सर्वांचे आदरातिथ्य केले त्याबद्दल या सर्व मान्यवरांना आणि स्थानिक संयोजन समितीच्या सर्व सदस्यांना मी मन:पूर्वक धन्यवाद देतो.

मित्रहो, हवामान बदलाची चाहूल जरी अलिकडच्या काळात लागलेली दिसत असली तरी म्हणजेच ''Global Warming'' हा शब्द अगदी ताजा वाटत असला तरी त्याचा इतिहास मात्र 100 वर्षापेक्षा अधिक जुना आहे. स्विडनमधील रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्कार प्राप्त Svante Arrhensius यांनी 1896 मध्ये वातावरणातील कार्बनचे प्रमाण दुप्पट वा तिप्पट झाले असता त्याचे होणारे परिणाम शोधले होते. त्यांचे निष्कर्ष सध्याच्या तापमानवाढी संबंधीच्या निष्कर्षाच्या अगदी जवळ होते. 1950 च्या दरम्यान Roger Revelle आणि इतर वैज्ञानिकांनी वातावरणातील कार्बनच्या थरांचे व्यवस्थित मोजमाप केले आणि तापमान वाढीच्या धोक्याची घंटा वाजविली.[1]

जागतिक हवामानशास्त्र संघटना आणि संयुक्त राष्ट्र संघाचा पर्यावरण कार्यक्रम यांनी 1988 मध्ये आंतरशासकीय हवामान बदल मंडळाची (IPCC)स्थापना केली. या मंडळाकडे हवामान बदल, त्याचे संभाव्य परिणाम , अनुकूल व उपशमन करण्यासाठीचे पर्याय समजून घेण्यासाठी वैज्ञानिक, तांत्रिक, आर्थिक व सामाजिक माहितीचे परीक्षण करण्याचे काम सोपविले आहे. यामध्ये तीन कार्यगट व एक कृती गट असून ते हवामान बदलासंबंधीचे वैज्ञानिक व तांत्रिक वाङ्मय तपासून पहाणे आणि हवामान परिस्थिती संबंधी रितसर अहवाल देण्याची जबाबदारी पार पाडीत आहे. जगभरातील 2500 पेक्षा अधिक वैज्ञानिक या मंडळाशी संबंधित आहेत.

हवामान बदल म्हणजे तापमान वाढ असा सध्या तरी अर्थ लावला जात आहे. जागतिक तापमान वाढीचा मुद्दा नव्वदीच्या दशकाच्या सुरूवातीस आंतरराष्ट्रीय पर्यावरण धोरणाच्या केंद्रस्थानी आला. या मुद्याचे आंतरराष्ट्रीय धोरण व राजकारणातील महत्वाचे स्थान ओळखूनच इ. स. 2007 चा नोबल शांती पुरस्कार हवामान बदल मंडळाशी संबंधित असलेले अमेरिकेचे भूतपुर्व उपाध्यक्ष श्री. अल गोर आणि भारताचे डॉ. राजेंद्र पचौरी यांना देण्यात आला होता.[2]

सध्या तापमान वाढीस प्रामुख्याने जबाबदार असलेल्या हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करण्यासंदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राधान्यक्रमाने विचारविनिमय होत आहे. जागतिक व्यापार संघटनेतील वाटाघाटी सारखेच स्वरूप त्यास प्राप्त झाले आहे. क्वेटो मसुद्यावर आधारित विकसित व विकसनशील देशांचे वेगवेगळे गट निर्माण झाले आहेत. तापमान वाढ ही प्रामुख्याने विकसित देशांनी निर्माण केलेली समस्या असून त्यामुळे विकसनशील व गरीब देशांची असुरक्षितता वाढणार अशी भावना जनमानसात निर्माण झाली आहे. तसेच विकसित देश आपला विकासदर कमी होण्याच्या भितीने हरितगृह वायूंच्या उत्सर्जनात कपात करण्यासबंधी मोठी आश्वासने देतांना दिसत नाहीत. मात्र त्याचवेळी भारत व चीन यांसारख्या देशांकडून या संदर्भात ठोस आश्वासने व कृतीची अपेक्षा ठेवून आहेत.अधिक लोकसंख्या, दारिद्रयाचे अधिक प्रमाण,अनुकूलनासाठी कमी आर्थिक कुवत असलेल्या देशांना हवामान बदलामुळे मोठी किंमत मोजावी लागणार, ही बाब मात्र नाकारून चालणार

नाही.

भारतात आजही जवळपास 60 टक्के लोकांची उपजिविका कृषीवर अवलंबून आहे. म्हणून हवामान साक्षरता, हवामान बदलाची जाणीव ह्या गोष्टी आजच्या संदर्भात अत्यंत महत्वाच्या झालेल्या आहेत. तसेच भारताच्या हवामानातील संभाव्य बदलाचे अधिक लोक अवलंबून असलेल्या कृषीक्षेत्रावर होणारे परिणाम आणि त्यासाठीच्या अनुकूलन व उपशमन योजना नीटपणे समजून घेणे आज निकडीची गरज झाली आहे. म्हणून मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या व्यासपीठावरून मी आज जाणीवपूर्वक 'हवामान बदलाचे भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणाम' या विषयावर आपणाशी संवाद साधणार आहे.

## 1. हवामान बदल म्हणजे काय?

सूर्यप्रकाश व इतर अदृश्य सौर किरणे पृथ्वीच्या सभोवताल असलेल्या वातावरणातून पृथ्वीच्या पृष्ठभागापर्यंत पोहोचतात. या सौर किरणांपैकी काही मोठ्या प्रमाणात पुन्हा वातावरणात परावर्तीत होतात, उरलेली सौर किरणे पृथ्वीच्या पृष्ठभागाकडून शोषली जातात व त्यामुळे पृथ्वीचा पृष्ठभाग तापतो. यानंतर पृथ्वीच्या पृष्ठभागाकडून वातावरणाच्या माध्यमातून अवरक्त प्रारणांच्या रूपाने उष्णतेचे उत्सर्जन होते.

वातावरणातील काही विशिष्ट वायूंच्या अस्तित्वामुळे अवरक्त प्रारणांचे उत्सर्जन पृथ्वीच्या पृष्ठभागावरून अवकाशात होण्यास प्रतिबंध होतो, या प्रक्रियेस हरितगृह परिणाम (Green house effect) असे म्हटले जाते. यामुळे पृथ्वी सभोवताली असलेल्या वातावरणाच्या तापमानात वाढ घडून येते. जे वायू अवरक्त प्रारणे शोषून घेतात त्यांना हरितगृह वायू असे म्हणतात.

काही हरितगृह वायू जे निसर्गत: अस्तित्वात असतात ते म्हणजे कार्बन डाय ऑक्साईड व कमी प्रमाणात असणारे मिथेन होय. याचाच अर्थ असा की, हरितगृह परिणाम जर अस्तित्वात नसता तर पृथ्वीचे सरासरी तापमान आजच्यापेक्षा 30°C ने कमी राहिले असते, म्हणजेच पृथ्वीवर जीवन जवळपास अशक्य झाले असते. पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या सरासरी तापमानात हळूहळू पण सततची होणारी वाढ, जी काही प्रमाणात वातावरणातील हरितगृह वायूंच्या एकूण प्रमाणात होणाऱ्या वाढीमुळे होते, यालाच 'वैश्विक तापमान वाढ' म्हणजेच 'हवामान बदल' असे म्हणतात[3].

आंतरशासकीय हवामान बदल मंडळ ज्या सहा हरितगृह वायूंचे उत्सर्जन लक्षात घेते त्यापैकी काहींचे वातावरणातील सरासरी आयुष्य दहा वर्षे तर काहींचे 150 वर्षांपर्यंत असते. म्हणूनच त्यांचे वातावरणातील थर वाढत जातात.

## 2. हवामान बदलासंबंधीचे अंदाज :

तापमान वाढीस साधारणत: औद्योगिक क्रांतीकाळापासून (1750) सुरूवात झालेली आहे. जागतिक तापमान वाढीत विकसित देशांनी मागील दोन शतकांपासून मोठी भर घातली आहे. आजही जवळपास तसेच चित्र आहे. मागच्या शतकाच्या नव्वदीच्या दशकापासून कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन करणारा भारत हा जगातील पाचवा मोठा देश राहिला आहे. अमेरिका, चीन, रशिया व जपान नंतर भारताचा क्रमांक लागत असे (तक्ता 1 पहा). परंतु परवाच वॉशिंग्टन येथील सेंटर फॉर ग्लोबल डेव्हलपमेंटने नव्याने जारी केलेल्या आकडेवारीनुसार सर्वाधिक कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जित करणारा

भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा देश बनला आहे. अमेरिका व चीन नंतर भारताचाच क्रमांक आहे.[4] म्हणजेच वार्षिक कार्बन उत्सर्जना संदर्भात भारताने रशिया व जपान या देशांना फार थोड्या फरकाने मागे टाकले आहे. परंतु दरडोई कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जनासंदर्भात विकसित देश भारताच्या खूप पुढे आहेत. कार्बनचे उत्सर्जन वाढतच आहे. मागील दोनशे वर्षाच्या काळात हरितगृह वायूंचे वातावरणातील प्रमाण 31 टक्यांनी वाढले आहे.[5] तापमान वाढींची समस्या निर्माण होण्यास विकसित देश अधिक जबाबदार आहेत असेच या संदर्भातील आकडेवारी सांगते. परंतु त्याचे प्रतिकूल परिणाम मात्र अधिक लोकसंख्या व दारिद्र्य असलेल्या आणि अनुकूलन व उपशमनासाठी कमी आर्थिक कुवत असलेल्या विकसनशील व गरीब देशावर होणार आहेत असेच सर्वांचे अनुमान आहे.[6]

आंतरशासकीय हवामान बदल मंडळाच्या हवामान बदलासंबंधी अंदाज देणाऱ्या पहिल्या कार्यगटाचा चौथा अहवाल मार्च 2007 मध्ये बाहेर आला असून त्यात हवामानात झालेल्या काही महत्वपूर्ण बदलांची ग्वाही दिली आहे. औद्योगिक क्रांतीपासून वैश्विक वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईड, मिथेन व नायट्रोअस ऑक्साईड इ.च्या प्रमाणात लक्षणीय वाढ झालेली आहे. फॉसिल इंधन वापर, जमीन वापरातील बदल इ. मुळे वैश्विक वातावरणातील कार्बनचे आणि कृषीमुळे मिथेन व नायट्रोअस ऑक्साईडचे प्रमाण वाढले आहे. वैश्विक तापमान वाढ ही स्पष्ट बाब आहे असे अहवालात म्हटले आहे. तसेच पुढील दोन दशकात दर दशकामागे 0.2°C इतकी तापमान वाढ होईल असे म्हटले आहे. ज्या हवामानातील बदलांना पुर्वी लाखो वर्षे लागली. ते बदल अवघ्या काही दशकांच्या कालावधीत घडून येत आहेत. असे पण म्हटले आहे. वैश्विक पृष्ठभागीय सरासरी तापमान इ.स.2100 पर्यंत 2°C ते 4.5°C ने वाढेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे[7]. आणखी एका अंदाजानुसार मागच्या 100 वर्षाच्या काळात वैश्विक सरासरी तापमान 0.3°C ते 0.7 °C ने वाढ झाली आहे. तसेच पुढील 50 ते 100 वर्षात वैश्विक सरासरी तापमान 1.5°C ते 5.5°C ने वाढ होणार आहे[8]. तापमान वाढीचे सर्वात उत्तम अनुमान म्हणजे इ. स. 2100 पर्यंत वैश्विक तापमान 3°C ने वाढ आणि फार तर 2°C ते 4.5°C वाढ हे आहे[9]. हवामान बदल मंडळाच्या दुसऱ्या मूल्यमापन अहवालात मानवाचा हवामान बदलावरील प्रभाव दिसून आला आहे असे नमूद केले आहे.

आंतरशासकीय हवामान बदल मंडळाच्या 1998 मधील अहवालानुसार भारतातील सरासरी तापमान व पर्जन्यवृष्टीत वाढ होणार आहे. तापमानातील वाढ 2020 च्या दशकात 3.3°C ते 4.3°C इतकी राहील. तसेच सरासरी पर्जन्यवृष्टीतील वाढ वरील तीन दशकांत अनुक्रमे 1 ते 3 टक्के, 2 ते 4 टक्के आणि 4 ते 10 टक्के राहील असा अंदाज आहे. तापमान वाढ साधारणत: संपूर्ण देशभर असेल पण पर्जन्यवृष्टीतील वाढ उत्तर पश्चिम भारतात सर्वाधिक राहील. तसेच तापमान वाढ व पर्जन्यवृष्टीतील बदल हे खरीप व रब्बी हंगामात भिन्न भिन्न असतील (तक्ता 2 पहा)

आंतरराष्ट्रीय हवामान बदल मंडळाच्या भारतासंबंधीच्या ताज्या अहवालानुसार भारतात मान्सून पर्जन्य पश्चिम किनारपट्टी, उत्तर आंध्रप्रदेश, उत्तर-पश्चिम भागात वाढेल तर पूर्व मध्यप्रदेश व सभोवतालचा भाग, उत्तर-पूर्व भारत, केरळ व गुजरातच्या काही भागात मागील शंभर वर्षाच्या

सरासरीच्या तुलनेत 2100 मध्ये पर्जन्यात 6 ते 8 टक्के घट होईल असा अंदाज केला आहे. तसेच पश्चिम किनारपट्टी, मध्य भारत, मध्य व्दिपकल्पात आणि उत्तर-पूर्व भारतात तापमानात वाढ होईल असा अंदाज दिला आहे. हेच नकाशा 1 व नकाशा 2 मध्ये दाखविले आहे. 21 व्या शतकाच्या अखेरपर्यंत भारतातील पर्जन्यात 15 ते 40 टक्के वाढ होईल. उत्तर भारतात तापमानात अधिक वाढ होईल असा पण ताजा अंदाज आहे.

**तक्ता 2 : भारतासाठी हवामान बदल दृष्टीक्षेप**

| वर्ष | हंगाम | तापमानातील वाढ ($^0$C) | | पर्जन्यवृष्टीतील बदल (%) | |
|---|---|---|---|---|---|
| | | न्यूनतम | अधिकतम | न्यूनतम | अधिकतम |
| 2020 चे दशक | खरीप | 1.08 | 1.54 | -1.95 | 4.36 |
| | रब्बी | 0.87 | 1.12 | 1.81 | 5.10 |
| 2050 चे दशक | खरीप | 2.54 | 3.18 | -9.22 | 3.82 |
| | रब्बी | 1.81 | 2.37 | 7.18 | 10.52 |
| 2080 चे दशक | खरीप | 4.14 | 6.31 | -24.83 | -4.50 |
| | रब्बी | 2.91 | 4.62 | 10.10 | 15.18 |

**Source :-**

Aggarwal P.K; Climate Change and Agriculture : Informaiton Needs and Research priorities,Indian Agricultural Research Institute, New Delhi, 2002.

पुणे येथील इंडियन इन्स्टिटयूट ऑफ ट्रॉपीकल मीटिअरॉलजी संस्थेतील डॉ. कृष्णकुमार यांच्या ताज्या अभ्यासात इ.स. 2050 नंतर भारतातील तापमान आजच्यापेक्षा 3 ते 4 डिग्री सेल्सिअसने अधिक असेल आणि पर्जन्यवृष्टी अधिक जोरदार पण अनियमीत होईल असे म्हटले आहे[10]. तापमानातील वाढ समुद्रीकाठच्या परिसरापेक्षा उत्तर भारतात अधिक राहील. देशातील पर्जन्यवृष्टी जोरदार पण पर्जन्य दिवसांची संख्या कमी होईल. मान्सूनची सुरूवात व प्रगतीची रचना बदलेल, मान्सूनचा क्रियाशील काळ व खंड यात बदल होईल व या सर्वांचे दूरगामी परिणाम भारतीय कृषीवर होतील असे पण या अभ्यासात म्हटले आहे.

### 3. हवामान बदल आणि कृषीक्षेत्र :

हवामान बदल आणि कृषीक्षेत्र यांमध्ये जवळचा संबंध असतो. तापमान वाढीचा कृषीक्षेत्रावर पर्जन्यवृष्टीतील बदल, कार्बनचे वाढते प्रमाण आणि आत्यंतिक नैसर्गिक घटनांच्या वारंवारीतेतील वाढ या तीन मार्गांनी परिणाम होत असतो[11]. तापमान वाढीमुळे पर्जन्यवृष्टीत वाढ अथवा घट होणे अपेक्षित असते. पर्जन्यवृष्टीतील वाढीचा पीक घेण्याची वेळ, पिकाच्या वाढीचा काळ, पिकाचा हंगाम आणि पिकाचे क्षेत्र यांवर परिणाम होत असतो. पर्जन्यवृष्टीत घट झाली तर पृष्ठभागीय व भूगर्भातील जलसंसाधनावर ताण येतो, बाष्पीभवनात वाढ होते व त्यामुळे दुष्काळाची तीव्रता वाढते.

वातावरणातील कार्बनच्या वाढत्या प्रमाणाचा पिकांच्या विकासावर धन परिणाम अपेक्षित असतो. कारण रोपट्यांची वाढ ही सर्वज्ञात असलेल्या प्रकाश संश्लेषण प्रक्रियेद्वारे होत असते, ज्यात सूर्य प्रकाशाचा उपयोग जमिनीतील पाणी व हवेतील कार्बनचे रूपांतर अन्न तयार करण्यात होत असतो. हवेतील वाढत्या कार्बनचा गहु, मका, सोयाबीन, ज्वारवर्गीय पिके यांवर महत्वूपर्ण असा अनुकूल परिणाम होऊ शकतो. हवामान बदला संबंधीच्या वाङ्मयात यास 'कार्बन फर्टिलाइझेशन' परिणाम म्हणून संबोधिले जाते.

दुष्काळ, अतिवृष्टी, पूर, चक्रीवादळ यासारख्या नैसर्गिक घटनांची वारंवारिता हवामान बदलामुळे वाढणार असून त्यामुळे मुख्यत: जमिनीचा कस कमी होतो व पिकांची नासाडी होते. हवामान बदलाचे कृषीवरील परिणाम धन अथवा ऋण असणे हे पर्जन्यवृष्टी व पीक घेण्याचा कालखंड यांच्या लांबीवर अवलंबून असतात. तसेच हवामान बदलाचे सखल, उंचीवरील प्रदेश, कोरडवाहू प्रदेशात भिन्न भिन्न परिणाम होत असतात.

### 4. हवामान बदलाचे कृषी क्षेत्रावरील परिणाम अभ्यासण्याच्या पध्दती :

हवामान बदलासबंधीच्या वाङ्मयाचा अभ्यास केला असता त्याचे कृषीवरील परिणाम अभ्यासण्यासाठी प्रामुख्याने 'उत्पादन फल दृष्टिकोन' आणि 'रिकार्डीयन दृष्टिकोन' या दोन पध्दतींचा उपयोग करण्यात आला आहे असे दिसून येते. उत्पादन फल दृष्टिकोनाचे विविध प्रकार कृषी विद्या शास्त्रज्ञांनी व पीक शास्त्रज्ञांनी विकसित केले आहेत. या गटातील प्रतिमाने इतर अनेक नावांनी पण ओळखली जातात (उदा. कृषीविद्या- आर्थिक, प्रायोगिक व स्तरछेदी प्रतिसाद फले.) विकसित व विकसनशील देशांसाठीचे सुरूवातीस झालेले अभ्यास याच दृष्टिकोनावर आधारलेले आहेत. या दृष्टिकोनानुसार संबंधित उत्पादन फल घेऊन पिकाच्या दर हेक्टरी उत्पादनावर विविध पर्यावरणीय चलांमधील बदलांचा परिणाम मोजला जातो. हा भौतिक स्वरूपातील परिणाम नंतर आर्थिक प्रतिमानात अंतर्भूत करून हवामान बदलाचे कृषीच्या निव्वळ उत्पन्नावरील परिणाम शोधले जातात. हवामान बदलाशी केलेले अनुकूलन ही प्रतिमाने लक्षात घेत नाहीत, म्हणून त्या आधारे काढलेले निष्कर्ष हे अतिअनुमानीत असतात हे आपण ध्यानात घ्यावे. उत्पादन फल दृष्टिकोन नव्वदीच्या दशकात वापरण्यात आला. पिकांच्या दर हेक्टरी उत्पादनांची संभाव्य रचना ओळखण्यासाठी हा दृष्टिकोन अधिक चांगला आहे. परंतु बदलते हवामान व आत्यंतिक नैसर्गिक घटनांशी जुळवून घेण्यासाठी शेतकऱ्यांकडून होणारे संभाव्य प्रयत्न लक्षात घेण्या संदर्भात हा दृष्टिकोन कमकुवत आहे.

रिकार्डीयन दृष्टिकोन मात्र हवामानाशी केलेले अनुकूलन (उदा. पीक रचना, उत्पादन तंत्र, पीक लागवड व कापणीच्या तारखा, सिंचन वेळापत्रक इ. मधील बदल) लक्षात घेतो. कारण या दृष्टिकोनात राज्य वा जिल्हा स्तरावरील हवामान व इतर चलांवरील आकडेवारी घेऊन भूमीच्या किंमतीचे हवामान चले व इतर चलांवर प्रतिपगमन करण्यात येत असते. भूमीच्या बाजारपेठा पूर्णत: कार्यरत असतील तर भूमीचे मूल्य अथवा किंमती ह्या जवळपास कृषीपासूनच्या निव्वळ उत्पन्ना (नफ्या) समान असतात असे मानले जाते. या पध्दतीचे यश सर्व हवामान घटक लक्षात घेऊ शकण्यावर अवलंबून असते. कारण कांही हवामान

घटक वगळले असता चिन्ह व आकाराच्या दृष्टीने असुसंगत निष्कर्ष प्राप्त होत असतात. परंतु हवामानातील लहान-लहान बदलांचे परिणाम मोजण्यासाठी ही पध्दती अधिक विश्वसनीय आहे, हे ही तितकेच खरे आहे. हवेतील वाढत्या कार्बनचा पिकांच्या विकासावरील धन परिणाम ही पध्दती पकडू शकत नाही, ही या पध्दतीची मर्यादा होय. तसेच सर्व निष्कर्ष हे पिकांच्या सापेक्ष किंमती स्थिर मानून मिळालेले असतात हे ही या संदर्भात लक्षात घ्यावे.

**5. हवामान बदलाचा कृषीक्षेत्रावरील परिणाम:**

21 व्या शतकात तापमान वाढ व पर्जन्यवृष्टीतील बदल या रूपाने हवामानात अधिक बदल घडून येण्याचा संभव आहे. कृषी उत्पादनात हवामान हे प्रत्यक्ष निविष्टी असल्या कारणाने हवामान बदलाचे कृषीक्षेत्रावरील परिणाम मोजण्यासंबंधी अधिक संशोधन झाले आहे आणि होत आहे. सुरूवातीला मुख्यत: अमेरिकेतील कृषीच्या संदर्भात असे संशोधन झाले. परंतु विकसनशील देशांची हवामान बदलाशी असलेली अधिक अरक्षितता लक्षात आल्यानंतर विकसनशील देशांच्या संदर्भात पण असे संशोधन करण्यात आले आहे. सुरूवातीस भारत सोडून इतर देशांमधून झालेल्या आणि उत्पादन फल व रिकार्डीयन दृष्टिकोनावर आधारलेल्या काही मान्यताप्राप्त निवडक अभ्यासांच्या निष्कर्षावरून हवामान बदलाचे कृषीवरील परिणाम समजून घेऊ. सुरूवातीस उत्पादन फल दृष्टिकोनावर आधारलेल्या अभ्यासांचे निष्कर्ष आपणासमोर मांडतो आहे.

उत्पादन फल दृष्टिकोनाचा अवलंब करून हवामान बदलाच्या कृषीवरील परिणामासंबंधीचे अभ्यास मुख्यत: आफ्रिका, अमेरिका व कॅनडा, आशिया व युरोपातील कांही देशांसाठी झालेले आहेत. या अभ्यासातून प्रामुख्याने मका, गहू, बाजरी, सोयाबीन, भात, ज्वार वर्गीय पिके, भुईमूग इत्यादी पिकांवरील हवामान बदलांचा परिणाम मोजण्यात आला आहे.

तापमानात दर एक डिग्री सेल्सीअस वाढीबरोबर अमेरिकेतील धान्य उत्पादनाचा पट्टा उत्तरपुर्वेकडे सरकत जाईल[12]. उंचीवरील प्रदेश पीक उत्पादनास फायदेशीर होतील असे दिसून आले आहे[13]. तसेच हवामान बदलामुळे अमेरिका व कॅनडा या दोन्ही देशातील गहू उत्पादनात वाढ होईल. मात्र अमेरिकेत गहू उत्पादनात प्रादेशिक बदल होण्याचा संभव आहे.

आफ्रिकेच्या संदर्भात झालेल्या अभ्यासानुसार तापमान व पर्जन्यवृष्टीत बदल होतील. तापमान वाढ सुरूच राहील व बहुतेक ठिकाणी वेग घेईल. येत्या 100 वर्षात आफ्रिका खंड 2 °C ते 6 °C इतकी तापमानवाढ अनुभवेल असे अनुमान आहे[14]. दक्षिण आफ्रिकेतील मका पिकाच्या संदर्भात तापमान वाढ आणि कमी पर्जन्याचे होणारे ऋण परिणाम कार्बनच्या वाढीमुळे पाणी वापर कार्यक्षमता वाढून आणि अधिक योग्य प्रकाश संश्लेषणाद्वारे भरून निघतात असे दिसून आले. तसेच पिकाचा लागवडीचा कालखंड वाढतो व त्याचा धन स्वरूपाचा परिणाम होतो असे स्पष्ट झाले आहे[15]. नायजर देशातील बाजरी पिकाच्या संदर्भात पर्जन्य रचनेत बदल होऊन पीक वाढीचा कालखंड 5 ते 20 दिवसांनी कमी होईल असे दिसून आले. तसेच पीक उत्पादनात अधिक जोखीम निर्माण होईल हे स्पष्ट झाले[16]. अधिक तापमान आणि पर्जन्यामुळे अन्न पिकांचे उत्पादन वाढेल. परंतु अर्धरूक्ष प्रदेशात मात्र कमी पर्जन्यामुळे पिकांचे दर

हेक्टरी उत्पादन कमी होईल. तापमानातील वाढीसोबत पर्जन्यवृष्टीत वाढ झाली नाही तर कृषी उत्पादनात मोठी घट संभवते[17]. झिम्बाब्वे देशातील कोरड्या प्रदेशात मक्याच्या दर हेक्टरी उत्पादनात 17 टक्क्यांपर्यंत घट तर पीक उत्पादनात 11 ते १७ टक्के घट होईल असे दिसून आले आहे[18]. नैसर्गिक साधन सामुग्रीवर अधिक अवलंबून असलेल्या देशांची हवामान बदलामुळे अरक्षितता वाढते असे इजिप्तसाठीच्या अभ्यासातून दिसून आले आहे[19]. वरील सर्व अभ्यासांमधून हवामान बदलाशी शेतकऱ्यांनी केलेले समायोजन लक्षात घेतले नव्हते आणि उत्पादन फल दृष्टिकोनाचा उपयोग केला होता याची पुन्हा आठवण करून देतो आहे.

उत्पादन फल दृष्टिकोनाचा अवलंब करून आणि शेतकऱ्यांचे हवामान बदलाशी जुळवून घेण्याचे प्रयत्न लक्षात घेऊन काही अभ्यास झाले आहेत. त्यातून मिळालेले निष्कर्ष पुढे देत आहे.

अमेरिकेच्या संदर्भात झालेल्या अभ्यासातून सिंचीत लागवड क्षेत्रात वाढ होईल असे दिसून आले. हवामान बदलाचा पिकांच्या उत्पादनावरील परिणाम -4.8 ते + 5.8 अब्ज डॉलर्स इतका असेल. चराऊ क्षेत्रात 0.7 ते 7 टक्के वाढ होईल. हवामान बदल हा गहू उत्पादनास अनुकूल असेल आणि इतर धान्ये, तेलबिया (सोयाबीन वगळून), डाळी, तंतूपिके, भाजीपाला आणि फळांच्या उत्पादनात लक्षणीय वाढ होईल असे दिसून आले[20]. अमेरिकेतील पाच राज्यामधील गहू पिका संदर्भातील अभ्यास असे स्पष्ट करतो की, मध्य व उत्तर पुर्वेकडील राज्यांत सिमांत जमिनीवरील गव्हाच्या दर हेक्टरी उत्पादनात 60 ते 100 टक्के वाढ होईल. मात्र दक्षिणेकडील राज्यातील गहू उत्पादनावर हवामान बदलाचा गंभीर प्रतिकूल परिणाम होईल[21]. हवामान बदलामुळे धान्य पिकांच्या वाढीच्या काळात अतिवृष्टीमुळे दरवर्षी तीन अब्ज डॉलर्स इतके नुकसान होईल. तसेच धान्य व सोयाबीन पिकांच्या वाढीच्या काळात तापमानात एक डिग्री सेल्सीअस वाढीमुळे दर हेक्टरी उत्पादन 17 टक्यांनी कमी होते असे दिसून आले[23].

झिम्बाब्वे देशातील मका पिकाच्या संदर्भात तापमानात 2°C वाढ झाली असता फारच कमी दर हेक्टरी उत्पादन मिळेल असे दिसून आले[24]. नायजर देशात ज्वार वर्गीय पिकांच्या संदर्भात तापमान वाढ व पीक वाढीच्या काळातील पर्जन्य कमी होण्यामुळे इ.स. 2025 पर्यंत उत्पादनात 13 टक्के घट होईल असे स्पष्ट झाले[25]. भुईमूगाचे उत्पादन 11 ते 25 टक्क्यांनी कमी होईल असे पण दिसून आले[26].

ग्रीस मध्ये मका पिकांच्या लवकर पेरणीच्या समायोजनामुळे 10 टक्के अधिक दर हेक्टरी उत्पादन मिळू शकते असे दिसून आले. तसेच मक्याच्या नवीन वाणांचा उपयोग हवामान बदलाचा परिणाम कमी करण्यासाठी होऊ शकतो असे सिध्द झाले आहे[27]. स्पेन देशातील गहू व मका पिकांच्या संदर्भातील अभ्यासात संकरीत बियाणांचा वापर, पेरणीच्या दिवसात बदल, दुहेरी पीक, कमी कालावधीत येणाऱ्या मक्याच्या वाणांचा दुहेरी पीक म्हणून उपयोग केला असता दर हेक्टरी उत्पादन वाढते असे दिसून आले. दक्षिणेकडील आणि उत्तरेकडील प्रदेशांत अनुक्रमे 1 ते 10 टक्के आणि 40 ते 80 टक्क्यांनी पाणी व जमीन वापराची कार्यक्षमता वाढते असे पण दिसून आले आहे[28]. पोलंडच्या संदर्भात हवामान बदलाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केला असता कृषी उत्पादनात –5 ते +5 टक्के बदल होईल. मात्र समायोजन केले नाही तर उत्पादनात –5 ते +25 टक्के घट होईल

असा निष्कर्ष मिळाला आहे[29]. बल्गेरियात तापमान वाढीमुळे व पर्जन्यवृष्टी कमी होण्यामुळे गहू व मका पिकांचा हंगाम काळ कमी होईल व त्यामुळे या पिकांच्या दर हेक्टरी उत्पादनात घट होईल असा निष्कर्ष मिळाला आहे[30].

आशिया खंडातील भात पिकाच्या अभ्यासात तापमानातील एक डिग्री सेल्सीअस वाढीमुळे उत्पादनात 7.4 टक्के घट होईल असे दिसून आले. भूमीच्या संरोधामुळे सिमांत जमीनीवर पीक लागवड होईल व त्यामुळे चिरस्थायी उत्पादनास धोका निर्माण होईल असे दिसून आले[31]. जावा बेटावरील अल निनो आणि ला निनो घटनांचा भात पिकाच्या लागवडीच्या वेळेवर परिणाम होऊन उत्पादनात चढ उतार निर्माण होतात असे दिसून आले[32]. फिलीपाईन्समध्ये भात पिकाच्या एकूण नुकसानीपैकी 82.4 टक्के नुकसान केवळ चक्रीवादळ, पूर व दुष्काळ या तीन नैसर्गिक आपत्तीमुळे होते असे दिसून आले आहे[33].

रिकार्डीयन दृष्टिकोनाचा आधार घेऊन अमेरिकेसाठी केलेल्या अभ्यासात हवामान बदलाचा कृषीवरील परिणाम -5.8 ते +36.6 अब्ज डॉलर्स इतका दिसून आला होता[34]. तापमान वाढीशी जुळवून घेण्यात कृषीला सिंचन हा घटक बरीच मदत करू शकतो असे दिसून आले. तापमान वाढीसोबत सिंचनाखालील भूमीचे मूल्य वाढत जाते, परंतु पर्जन्यवृष्टीस भूमीचे मुल्य संवेदनशील नाही, असे पण दिसून आले[35]. इंग्लडच्या संदर्भातील अभ्यासातून हवामान, जमीनीची प्रत आणि समुद्रसपाटी पासूनची उंची हे शेतजमीनीच्या किंमतीचे महत्वपूर्ण निर्धारक घटक आहेत असे स्पष्ट झाले होते[37]. कॅमेरूनच्या अभ्यासात पीक वाढीच्या काळातील पर्जन्यवृष्टी, पीक कसण्याची पध्दती, पीक-पाळी पध्दती, लागवड व कापणी दिवसातील बदल इ.चा कृषीपासूनच्या निव्वळ उत्पन्नावर महत्वपूर्ण असा धन परिणाम होतो असे दिसून आले आहे. टयुनिशियाच्या अभ्यासात कार्बनचे प्रमाण दुप्पट, तापमानात 1.5 °C वाढ आणि पर्जन्यात 7 टक्के वाढ झाली तर कृषी उत्पन्नात 7 ते 22 टक्के घट होईल आणि किनारपट्टीवर नसलेल्या प्रदेशांना पण कृषी उत्पन्नात घट होण्याचा अनुभव येवू शकतो असा निष्कर्ष मिळाला आहे[38]. ब्राझीलच्या संदर्भात हवामान बदलाचा कृषीवरील निव्वळ परिणाम ऋण राहील असे दिसून आले. तसेच मध्यपूर्वेकडील प्रदेशात मोठे नुकसान तर दक्षिणेकडील प्रदेशांना मध्यम फायदा होईल असे अनुमान आहे. इ.स. 2100 पर्यंत तापमानात 2 °C वाढ व पर्जन्यवृष्टीत 8 टक्के वाढ झाली तर या देशातील कृषी पासूनच्या अपेक्षित निव्वळ उत्पन्नात 20 टक्के घट होईल असा धक्कादायक निष्कर्ष हाताशी आला आहे. तापमान वाढीचा प्रतिकूल परिणाम होतो. मात्र पर्जन्यवृष्टीतील वाढ फायदेशीर असते असे दिसून आले[39].

अमेरिकेसाठी सुरूवातीस झालेल्या अभ्यासातून हवामान बदलाचे तेथील कृषीवर मोठे ऋण परिणाम दर्शविण्यात आले. दर हेक्टरी उत्पादनात घट, सुपीक जमीनीचे नुकसान, उत्पादन खर्चात वाढ होईल असे सांगण्यात आले. परंतु अलीकडच्या काळात झालेल्या अभ्यासातून जास्तीत जास्त हवामान घटक व संभाव्य अनुकूलन लक्षात घेऊन काढलेला निष्कर्ष म्हणजे अमेरिकन कृषीक्षेत्रास हवामान बदल सुसह्य आहे हा होय. इतर शीत व समशीतोष्ण प्रदेशातील विकसित देशांची पण जवळपास अशीच परिस्थिती असण्याची खात्री आहे. अमेरिकेसारखे विकसित देश हवामान

बदलाशी अनुकूलन करण्यास समर्थ आहेत हे निश्चितच खरे आहे.

## 6. हवामान बदलाचे भारतीय कृषीक्षेत्रावरील परिणाम :

दक्षिण आशियातील देशांच्या कृषीक्षेत्रावरील हवामान बदलाचा 2100 मधील अंदाजित परिणाम तक्ता 3 मध्ये दिलेला आहे. त्यात सध्याचे तापमान 23.7⁰C व मासिक पर्जन्य 15.2 मी.मी. घेतले आहे. तापमानात 4.4 ⁰C वाढ आणि मासिक पर्जन्यात 1.6 मि.मी. घट असा हवामान बदलाचा मोठा दृष्टिक्षेप असून त्यानुसार दक्षिण आशियातील सर्व देशांच्या कृषी पासूनच्या निव्वळ उत्पन्नात मोठी घट होईल असा निष्कर्ष मिळाला आहे. हवामान बदलाचा मध्यम दृष्टिक्षेप म्हणजे तापमानात 3.7⁰C वाढ आणि मासिक पर्जन्यात 1.2 मि.मी. वाढ हा होय. ह्याचा कृषीवरील परिणाम बहुतेक देशांतून नगण्य पण ऋण स्वरूपाचा दिसून आला आहे. हवामान बदलाचा सौम्य दृष्टिकोन म्हणजे तापमानात 2.2⁰C वाढ आणि मासिक पर्जन्यात 2.9 मि.मी. वाढ असा आहे. यानुसार दक्षिण आशियातील बहुतेक देशांना किंचितसा लाभ होईल असा निष्कर्ष आहे. भारत व चीन या देशांतील कृषी क्षेत्र मोठे असल्याकारणाने तेथील कृषीवर मोठा परिणाम होईल असे दिसून आले आहे. चीन व भारताचा दक्षिण आशियातील कृषीवरील एकूण परिणामातील वाटा निम्मा ते तीन–चतुर्थांश इतका दिसून आला आहे[40].

भारतीय कृषी क्षेत्र हवामानाच्या लहरीपणास व त्यातही पर्जन्यातील फेरबदलास अधिक संवेदनशील आहे. भारतीय उपखंडातील एकूण पर्जन्यापैकी जवळपास 80 टक्के पर्जन्य जुन ते सप्टेंबर या काळात मिळत असते. भारतात दुष्काळ हा नेहमीचाच प्रश्न असून काही प्रदेशांत पुरामुळे कृषीचे मोठे नुकसान पण होत असते. हवामान बदलाचे महत्वपूर्ण असे सामाजिक व आर्थिक परिणाम भारतात दिसून येऊ शकतात, कारण तीन–चतुर्थांश लोकसंख्या ही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या उदरनिर्वाह व रोजगारासाठी कृषीवर अवलंबून आहे[41].हवेतील हरितगृह वायूंचे थर वाढल्यामुळे तापमान, पर्जन्य व इतर हवामान चलांची रचना बदलेल व त्यामुळे त्याच्या परिणामांची तीव्रता दीर्घकाळात वाढण्याचा संभव आहे. हवामान बदलापासून भारतातील कृषी उत्पादन आणि 70 कोटी लोकांच्या जीवनास गंभीर धोका आहे.

हवामान बदलाचे भारताच्या कृषी क्षेत्रावरील संभाव्य परिणामांचे अध्ययन दोन्हीही प्रकारच्या दृष्टिकोनांचा आधार घेऊन अनेकांनी केले आहे. त्यातील निवडक अभ्यासाचे निष्कर्ष आपण समजून घेवूया. सुरूवातीस उत्पादन फल दृष्टिकोनावर आधारलेल्या अभ्यासाचे निष्कर्ष पुढे देत आहे. (तक्ता 4 पहा).

लाल व अन्य अभ्यासक[42] यांच्या उत्तर–पश्चिम भारतातील गहू व भात पिकांच्या संदर्भातील अभ्यासातून तापमानात 2⁰C वाढ आणि कार्बनचे प्रमाण दुप्पट झाले तरी भात पिकाच्या दर हेक्टरी उत्पादनात फारसा बदल होत नाही असे दिसून आले. म्हणजेच तापमानवाढीचा प्रतिकूल परिणाम हा कार्बनचा भात पिकाच्या वाढीवर होणारा धन परिणाम भरून काढतो. मात्र पीक वाढीच्या काळात पाण्याची कमतरता भासली तर भाताच्या दर हेक्टरी उत्पादनात लक्षणीय म्हणजे जवळपास 20 टक्के घट होऊ शकते. गहू पिकाच्या संदर्भात तापमानात 3 ⁰C वाढ झाली आणि कार्बनचे प्रमाण दुप्पट झाले तर त्याचा पिकाच्या दर हेक्टरी उत्पादनावर

परिणाम होत नाही असे दिसून आले.

लाल व इतर अन्य अभ्यासक [43] यांच्या मध्यप्रदेशातील सोयाबीन पिकाच्या अभ्यासात तापमानात 3°C वाढ, कार्बनचे प्रमाण दुप्पट व दैनिक पर्जन्यात 10 टक्के घट झाली असता सोयाबीनचे दर हेक्टरी उत्पादनात जास्तीत जास्त 4 टक्क्यांपर्यंत घट होऊ शकते हे स्पष्ट झाले.

सासीन्द्रन व इतर[44] यांना केरळ राज्यातील भात पिकाच्या अभ्यासात असे निदर्शनास आले की, तापमानात 1.5 °C वाढ झाली असता पिकाचे दर हेक्टरी उत्पादन 6 टक्क्यांनी घटते. मात्र तापमानातील वाढ तेवढीच असेल आणि दैनिक पर्जन्यात 2 मि.मी. वाढ झाली असता भाताचे दरहेक्टरी उत्पादन 12 टक्यांनी वाढते. यावरून तापमानातील वाढीबरोबर पर्जन्यवृष्टीत पण वाढ होणे कसे महत्त्वाचे आहे हे आपणास समजून येते.

अग्रवाल आणि माल[45] यांनी भारताच्या विविध भागांतील भात पिकावरील हवामान बदलाचा परिणाम अभ्यासला आहे. त्यासाठी हवामान बदल मंडळाचे आशावादी व नैराश्यवादी असे दोन दृष्टिक्षेप समोर ठेवले होते. या अभ्यासात आशावादी दृष्टिक्षेपासंदर्भात 2010 पर्यंत भात पिकाच्या दर हेक्टरी उत्पादनात 5.1 ते 7.4 टक्के वाढ तर 2070 मध्ये 16.6 ते 25.7 टक्के वाढ होईल असे दिसून आले. परंतु नैराश्यवादी दृष्टिक्षेपासंदर्भात भात पिकाच्या दर हेक्टरी उत्पादनात इ.स. 2010 मध्ये 2.5 ते 4.1 टक्के वाढ तर इ. स. 2070 मध्ये 6.1 ते 16.8 टक्के वाढ होईल असा निष्कर्ष मिळाला आहे. यावरून असे दिसते की, तापमान वाढीचा भात पिकास फायदा होतो. परंतु अधिक तापमान वाढ असेल तर मिळणारा उत्पादन वाढीचा फायदा तुलनेने कमी असतो.

कालरा आणि अन्य अभ्यासक[46] यांनी भारतातील भात, मका व ज्वारी पिकांवरील हवामान बदलाचा परिणाम नुकताच अभ्यासला आहे. त्यानुसार कार्बनचे प्रमाण कायम असतांना तापमानात 1°C वाढ झाली तर भाताचे दर हेक्टरी उत्पादन 5 ते 8 टक्क्यांनी कमी होते. तापमानात 2 °C वाढ झाली तर भाताच्या दर हेक्टरी उत्पादनात त्याहूनही अधिक म्हणजे 10 ते 16 टक्के घट होऊ शकते. त्यापुढेही तापमानात वाढ झाली तर भाताच्या दर हेक्टरी उत्पादनात मोठी घट होऊ शकते. त्याचप्रमाणे तापमानात 1°C वाढ झाली तर ज्वारीच्या दर हेक्टरी उत्पादनात 7 टक्के घट आणि तापमानात 2 °C वाढ झाली असता 12 टक्के एवढी घट होते असा निष्कर्ष मिळाला आहे. यावरून केवळ तापमान वाढ ही भात, ज्वारी, मका इ. पिकांसाठी नुकसानकारक ठरणार आहे, हे निश्चित दिसते.

जागतिक बँकेच्या[43] एका अभ्यासात हवामान बदलाचे दोन दृष्टिक्षेप वापरून भात, भूईमूग, मका, ज्वारी व सूर्यफूल या पिकांवरील परिणाम अभ्यासले आहेत. पहिला दृष्टिक्षेप म्हणजे न्यूनतम तापमानात 4 °C वाढ, महत्तम तापमानात 2 °C वाढ, वार्षिक पर्जन्य दिवसांमध्ये 5 टक्के घट असा होता. दुसऱ्या दृष्टीकोनात वरील सर्व गोष्टीसोबतच जून ते सप्टेंबर या मान्सून काळातील संचयी पर्जन्यात 10 टक्के घट ही एक बाब लक्षात घेतली होती. पहिल्या दृष्टिक्षेपासंदर्भात भात पीक वगळता इतर चारही पिकांच्या दर हेक्टरी उत्पादनात (भूईमूग 2 टक्के, ज्वारी 13 टक्के, सूर्यफूल 10 टक्के व मका 3 टक्के) वाढ दिसून आली. दुसऱ्या दृष्टिक्षेपासंदर्भात भूईमूग, ज्वारी व मका पिकांच्या दर हेक्टरी उत्पादनात बदल होत नाही, भाताच्या दर हेक्टरी उत्पादनात जवळपास तेवढीच (8 टक्के) घट होते

आणि सूर्यफूलाच्या दर हेक्टरी उत्पादनात जवळपास तेवढीच (8 टक्के) घट होते, असे आढळून आले आहे.

उत्पादन फल दृष्टिकोनाआधारे मिळालेल्या वरील सर्व निष्कर्षावरून असे म्हणता येईल की, पिकांचे दर हेक्टरी उत्पादन तीन हवामान घटकांच्या परस्पर क्रियेकडून प्रभावीत होते. ते म्हणजे कार्बनचे प्रमाण, तापमानातील बदल आणि पर्जन्यवृष्टीची पातळी व वितरण होय. बहुसंख्य पिकांच्या संदर्भात असे दिसते की, कार्बनचे वाढलेले प्रमाण आणि अधिक पर्जन्यवृष्टी पिकाची वाढ होण्यास चालना देतात. परंतु सध्याचे भारताच्या विविध भागातील तापमान अधिक असल्याकारणाने तापमानात पुढे वाढ झाली तर वरील सर्व लाभ नाहीसे होऊ शकतात.

हवामान बदलाचे भारतातील पिकांवरील परिणाम अध्ययनासाठी अधिक विश्वसनीय असलेल्या रिकार्डीयन पध्दतीचा अवलंब काही अभ्यासकांनी केला आहे. त्या अभ्यासांमधून मिळालेल्या निष्कर्षांची चर्चा करणे आवश्यक आहे. अशा तीन अभ्यासांचे निष्कर्ष विचारात घेऊया. संधी आणि इतर[48] यांचा 1998 मधील अभ्यास, कुमार व पारीख[49] यांचे 1998 आणि 2001 मधील अभ्यास असे हे तीन अभ्यास होत. या तीनही अभ्यासातून हवामान बदलाचा भूमीच्या किंमती वा मूल्यांवरील परिणाम अभ्यासण्याऐवजी कृषीपासूनच्या निव्वळ उत्पन्नावरील (नफ्यावरील) परिणाम अभ्यासण्यात आला. कारण भारतात भूमीच्या किंमती संदर्भातील आकडेवारी उपलब्ध नाही. म्हणून त्यांनी वापरलेली अध्ययन पध्दती ही निम्न-रिकार्डीयन पध्दती ठरते. या सर्व अभ्यासातून तापमान वाढीचा कृषीपासूनच्या निव्वळ उत्पन्नावर ऋण परिणाम होतो, असाच निष्कर्ष मिळाला होता. एवढेच की, कुमार व पारीख यांचा 2001 मधील अभ्यास तापमान वाढीचा कृषीच्या निव्वळ उत्पन्नावर फार मोठा ऋण परिणाम होणार असल्याचे दर्शवितो (तक्ता 5 पहा) .

**तक्ता 5 तापमान वाढीचे भारतीय कृषीक्षेत्रावरील परिणाम**

(निम्न-रिकार्डीयन दृष्टिकोनाचे निष्कर्ष)

| तापमान बदल | दर हेक्टरी निव्वळ कृषी उत्पन्नातील टक्केवारी बदल | स्त्रोत |
|---|---|---|
| +2 $^0$C | - 3 ते - 6 | संधी व इतर, 1998 |
| +2 $^0$C | -7 ते -9 | कुमार व पारीख, 1998 |
| +3.5 $^0$C | -20 ते -26 | कुमार व पारीख, 2001 |
| +3.5 $^0$C | -3 ते -8 | संधी व इतर, 1998 |

संधी व इतर यांच्या अभ्यासात तापमान वाढ व पर्जन्यवृष्टीतील वाढीचा कृषीपासूनच्या निव्वळ उत्पन्नावरील परिणाम अभ्यासला आहे. त्यानुसार भारतात तापमान वाढ व पर्जन्यवृष्टीतील वाढीचा कृषी पासूनच्या निव्वळ उत्पन्नावर ऋण परिणाम होईल. म्हणजेच कृषीपासूनचे निव्वळ उत्पन्न कमी होईल असा निष्कर्ष आहे (तक्ता 6 पहा). तापमान वाढीसोबत पर्जन्यवृष्टीतील वाढ ही ऋण परिणाम काहीसा कमी करण्यात मदत करते असे दिसून आले.

### तक्ता 6 :- तापमान वाढीचे भारतीय कृषीक्षेत्रावरील परिणाम

(टक्केवारीत)

| पर्जन्यबदल (%) | तापमान बदल | | | |
|---|---|---|---|---|
| | 0.0 $^0$C | +1 $^0$C | +2 $^0$C | +3.5$^0$C |
| 0 | 0 | -8.76 | -16.03 | -21.0 |
| +7 | 1.07 | -6.36 | -12.30 | -15.78 |
| +14 | 2.23 | -3.86 | -8.51 | -10.33 |

नोट: आकडे निव्वळ कृषी उत्पन्नातील टक्केवारी बदल दर्शवितात.

Source : Sanghi, Mendelson and Dihnar, 1998

पॅनेल डेटा दृष्टिकोन वापरून भारतासाठी केलेल्या एका ताज्या अभ्यासातून हवामान बदलाचे मध्यम कालखंडातील परिणाम ऋण आणि सांख्यिकीयदृष्ट्या महत्वपूर्ण दिसून आले आहेत[50]. या अभ्यासात जुलै ते सप्टेंबर काळातील तापमानात 0.5$^0$C वाढ आणि पर्जन्यवृष्टीत 4 टक्के वाढ गृहीत धरली होती. इ.स. 2010 ते 2039 या काळातील अंदाजित हवामान बदलामुळे भारतातील प्रमुख पिकांचे दर हेक्टरी उत्पादन 4.5 ते 9 टक्क्यांनी कमी होईल असा या अभ्यासाचा निष्कर्ष आहे.

### 7. महाराष्ट्रातील कृषीक्षेत्रावरील परिणाम :

हवामान बदलाचा महाराष्ट्रातील कृषीवर होणारा संभाव्य परिणाम समजून घेण्यासाठी जागतिक बँकेच्या दोन अभ्यासांचा आधार घेणे क्रमप्राप्त ठरते. त्यातील एक अभ्यास दीनार व इतर [51] यांचा 1998 मधील असून दुसरा जागतिक बँक आणि वन व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार[52] यांचा जून 2008 मधील आहे.

दीनार व इतर यांचा अभ्यास व्यापक स्वरूपाचा म्हणजे देशातील 13 राज्ये व 271 जिल्हयांचा होता. त्या अभ्यासात महाराष्ट्रातील 25 जिल्ह्यांचा अंतर्भाव होता. निम्न-रिकार्डीयन दृष्टिकोन वापरून केलेला हा अभ्यास होता. म्हणून त्याचे निष्कर्ष अधिक विश्वसनीय मानायला काहीच हरकत नाही. या अभ्यासातून हवामान बदलाचा महाराष्ट्रातील कृषी पासूनच्या निव्वळ उत्पन्नावर ऋण स्वरूपाचा परिणाम दिसून आलेला होता. यासाठी अन्न व कृषी संघटनेची आकडेवारी वापरली होती.

तापमानात 2$^0$C वाढ आणि पर्जन्यवृष्टीत 7 टक्के वाढ झाली असता महाराष्ट्र राज्यातील 13 जिल्ह्यांत (अकोला, अमरावती, औरंगाबाद, बुलढाणा, बीड, भंडारा, चंद्रपूर, धुळे, जळगांव, नाशिक, उस्मानाबाद व पुणे) दर हेक्टरी निव्वळ उत्पन्न वाढेल असा निष्कर्ष होता. नांदेड व रायगड जिल्ह्यांसाठी हवामान बदलाचा परिणाम अनुकूल वा प्रतिकूल दिसून आला नाही. अभ्यासातील उर्वरीत जिल्ह्यात हवामान बदलाचा दर हेक्टरी निव्वळ उत्पन्नावरील परिणाम ऋण स्वरूपाचा होता.

जागतिक बँक व भारताचे वन व पर्यावरण मंत्रालय यांचा अभ्यास अहमदनगर व नाशिक जिल्हयांचा आहे. या अभ्यासात ज्वारी, बाजरी व

ऊस पिकांचा विचार केला होता. उत्पादन फल दृष्टिकोनाआधारे असे दिसून आले की, तापमान व पर्जन्यवृष्टीतील वाढीमुळे बाजरी पिकाच्या दर हेक्टरी उत्पादनात अहमदनगर जिल्ह्यात मोठी वाढ तर नाशिक जिल्ह्यात नगण्य ते मध्यम वाढ होईल. परंतु ऊसाच्या दर हेक्टरी उत्पादनात महत्वपूर्ण म्हणजे जवळपास 30 टक्के घट होईल असे अनुमान काढले होते. असा परिणाम तापमान वाढीचा ओलीवर ताण आणि कार्बनच्या वाढत्या प्रमाणास ऊसाचा कमी प्रतिसाद यामुळे होईल असे अभ्यासात म्हटले आहे. ज्वारी व बाजरी पिकांपासूनचा नफा अनुक्रमे 15 टक्के व 8 टक्क्यांनी वाढेल,पण ऊसापासून नफा 25 ते 30 टक्क्यांनी घटेल असा निष्कर्ष आहे. असे असूनही बाजरी व ज्वारी पिके ऊस पिकाशी स्पर्धा करू शकणार नाहीत असे दिसून आले आहे.

लहान व मोठी शेती, उच्च व निम्न क्षमता असलेल्या प्रदेशांतील शेती, आणि नगदी व अन्न पिकांची शेती यावरील हवामान बदलाचे संभाव्य परिणाम अशातच पुढे येत आहेत[53]. परंतु या पुराव्यांचा आधार अजूनही कमकुवत, प्रादेशिकदृष्ट्या अपुरा आहे. लहान शेतकऱ्यासंबंधी भिन्न मतप्रवाह आहेत. एक म्हणजे लहान शेतकरी हवामान बदलास पुरेसा लवचिक व अनुकूलनक्षम आहे. दुसरा म्हणजे लहान शेतकरी अल्पकाळात अनुकूलनक्षम आहे, परंतु दीर्घकाळात अनुकूलनक्षम होण्यासाठी त्यास सरकारी व खाजगी मदत लागेल (उदा. विमा, कर्ज, नवीन तंत्रज्ञान, बाजार माहिती इ.) शेतजमिनीचा लहान आकार, कमी तंत्रज्ञान, कमी भांडवलीकरण इ. मुळे लहान शेतकऱ्यांची हवामान बदलाशी अरक्षितता अधिक असणे स्वाभाविक आहे. हवामान बदलास मोठा शेतकरी अनुकूलनक्षम आहे असेच पुरावे सध्यातरी पुढे आलेले आहेत. नगदी पिकांच्या संदर्भात अजून फारसे अभ्यास झालेले नाहीत. चहा व कॉफीसारख्या बारमाही पिकांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना तापमान व पर्जन्यवृष्टीच्या रचनेतील बदलांशी जुळवून घेणे कठीण होईल.

हवामान बदलाचा कृषी तंत्रज्ञानाचा विकास व प्रसार यावर परिणाम होतो.हवामान बदलाचा कृषीच्या उत्पादकतेवर होणाऱ्या परिणामावर तंत्रज्ञान विकास व प्रसार यांचा परिणाम होत असतो[54]. तंत्रज्ञान व हवामान ह्यात आंतरक्रिया होत असते व त्याचा कृषीच्या निव्वळ उत्पन्नावर परिणाम होतो. परंतु भारताच्या संदर्भात हवामानातील बदल हा तंत्रज्ञान विकास व प्रसार यावर महत्वपूर्ण परिणाम करण्याचा कमी संभव दिसून आला आहे. तापमान वाढीमुळे तंत्रज्ञान व पायाभूत सुविधा मधील गुंतवणूक थोडीशीच फायदेशीर होईल. पर्जन्यवृष्टीतील वाढीमुळे सिंचनातील गुंतवणूक सुध्दा थोडीशीच फायदेशीर होईल. बियाणांचे वाण विकसित करण्यावरील गुंतवणुकीपासूनची मिळकत थोडीशी कमी होईल. पण हे सर्व अनुमान अजून ठामपणे स्थापित झालेले नाहीत, हे आपण लक्षात घ्यावे अन्यथा कृषीसंबंधीचे तंत्रज्ञान विकासक, सिंचन विकासक व बियाणे विकासकांकडे चुकीचा संदेश जाईल.

हवामान बदलाचे कृषीक्षेत्रावरील संभाव्य परिणाम हे साधारणत: चार घटकावर अवलंबून असतात परिणाम मोजण्यासाठी निवडलेले प्रतिमान, कृषी क्षेत्राचाआकार, सुरूवातीचे तापमान व पर्जन्यवृष्टी आणि हवामान बदल दृष्टिक्षेप हे ते चार घटक होत. मोठे कृषीक्षेत्र असलेल्या देशांवर अधिक परिणाम दिसून येत असतो. हवामान बदलाचे सौम्य

दृष्टिक्षेप हे फायदा दर्शवितात तर आत्यंतिक दृष्टिकोन मोठी हानी दर्शवितात. वरील सर्व हवामान बदलाचे कृषीवरील परिणाम अर्थातच या चार बाबींच्या संदर्भात समजून घेणे आवश्यक आहे.

हवामान बदलाचा कृषीवरील परिणाम परगणा अथवा जिल्हा स्तरावर अभ्यासला गेला आहे. परंतु त्यापेक्षा सूक्ष्म पातळीवर हवामान बदलाचे कृषीवरील परिणाम अजूनतरी निर्णायक स्वरूपात स्थापित होऊ शकलेले नाहीत, हे आवर्जून नमूद करावेसे वाटते. हवामान बदलाचा कृषीवर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी प्रतिमान बांधणी, चलांचा अंतर्भाव, प्राक्कलन, अर्थबोधन आणि हवामान बदलासंबंधी भाकीते ह्याची पूर्ण समज संशोधकाला असणे आवश्यक आहे, हे आवर्जून नमूद करावेसे वाटते.

## 8. अनुकूलन आणि उपशमन :

हवामान बदलाची समस्या ही श्रीमंत देशांनी आणि प्रत्येक देशातील श्रीमंत लोकांनी निर्माण केलेली समस्या असली तरी ह्या समस्येचे परिणाम टाळण्यासाठी अथवा तीव्रता कमी करण्यासाठी सर्व पातळ्यांवर प्रयत्न होणे अगत्याचे आहे. हवामान बदलाची चाहूल लागल्याबरोबर त्यावर उपशमन करण्यासंदर्भात आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न सुरू झाले. 1992 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण व विकास या संबंधीच्या परिषदेत संयुक्त राष्ट्रे हवामान बदल अधिसंधी आराखडा (United Nations Framework Convention on Climate Change) स्विकारण्यात आला. या अधिसंधी आराखड्याचा मुख्य हेतू म्हणजे कार्बनचे वातावरणातील प्रमाण एका विशिष्ट पातळीवर कायम ठेवण्यासाठी प्रयत्न करणे, जेणे करून त्याचे हवामान व्यवस्थेवर घातक परिणाम होणार नाहीत, अन्न सुरक्षेला धोका पोहोचणार नाही आणि चिरस्थायी आर्थिक विकास शक्य होईल, असा आहे. तसेच हवामान बदलाशी अधिक अरक्षितता असलेल्या देशांमध्ये अनुकूलन क्षमता निर्माण करणे हा पण उद्देश आहे. त्यासाठी वातावरणातील हरितगृह वायूंचे प्रमाण एका विशिष्ट पातळीवर स्थिर ठेवणे हे या संदर्भातील आंतरराष्ट्रीय प्रयत्नांचे उद्दिष्ट आहे. परंतु ही पातळी अजून निश्चित होत नाही. जागतिक सरासरी तापमानात औद्योगिक क्रांतीपूर्व काळाच्या तुलनेत 2 $^{0}$C पेक्षा अधिक वाढ सहन होण्यापलीकडे आहे असे युरोपियन संघ व इतर काही देशांचे म्हणणे आहे. म्हणजेच औद्योगिक क्रांतीपूर्व काळाच्या पातळीपेक्षा 60 ते 80 टक्के अधिक पातळीवर (म्हणजेच 450 PPM)हरितगृह वायूंचे प्रमाण स्थिर करावे असे हे मत आहे.परंतु क्वेटो मसुद्यातील आश्वासने यास पुरेशी ठरणार नाहीत. म्हणून साधारणत: 550PPM ही पातळी मान्य होण्यासारखी आहे.

हवामान बदलासंबंधीच्या संयुक्त राष्ट्रे अधिसंधी आराखड्यात औद्योगिकदृष्ट्या प्रगत व अर्थव्यवस्था मोठ्या परिवर्तनाच्या उंबरठ्यावर असलेल्या देशांचा परिशिष्ट एक मध्ये समावेश केला आहे. दुसऱ्या परिशिष्टात केवळ औद्योगिकदृष्ट्या प्रगत देशांचा समावेश आहे. शेवटी परिशिष्टात नसलेल्या देशांची एक यादी आहे; ज्यात भारताचा अंतर्भाव आहे. सदरील परिषदेच्या जपान मधील क्वेटो येथे 1997 मध्ये झालेल्या बैठकीत क्वेटो मसुदा स्विकारला आहे. क्वेटो मसुद्यात हरितगृह वायूंच्या एकूण उत्सर्जनात 1990 च्या पातळीपेक्षा 5.2 टक्के कपात करण्याचे ठरले आहे. कॅनडा, क्रोएशिया, हंगेरी, जपान, पोलंड, अमेरिका,

युरोपीयन संघ यांनी अशा प्रकारची आश्वासने दिलेली आहेत. परंतु ऑस्ट्रेलिया, आइसलँड, नॉर्वे या देशांना वेगळी वागणूक म्हणजे 1990 पेक्षा थोडीसी अधिक हरितगृह वायूंची उत्सर्जन मर्यादा ठरवून दिली आहे. युक्रेन व रशियन संघ यांनी 1990 च्या पातळीवर उत्सर्जन आणण्याचे आश्वासन दिले आहे(तक्ता 7 पहा). तसेच औद्योगिकदृष्ट्या प्रगत देशांनी आपल्या कार्बन उत्सर्जनात 1990 च्या तुलनेत करावयाची कपात ही 2008-12 ह्या पहिल्या आश्वासन काळात करावी असे ठरले आहे.

हरितगृह वायूंचे उत्सर्जन कपातीचे लक्ष्य निश्चित करतांना विकसित देशांना येणारा खर्च न्यूनतम करण्यावर अधिक भर दिला जातो आणि विकसनशील देशांच्या जोखीमा न्यूनतम करण्याकडे सतत दुर्लक्ष करण्यात येत आहे असा आरोप होत आहे. असे होणे विकसनशील देशांच्या दृष्टीने अन्यायकारकच आहे. कारण चक्रीवादळ, समुद्राच्या पातळीत वाढ यासारख्या हवामान घटनांना तोंड देण्याची कुवत विकसित देशांकडे आहे, परंतु विकसनशील देशांकडे नक्कीच नाही. पुढे 2005 मध्ये मॉंट्रीयल येथील बैठकीत कार्बन उत्सर्जन कपातीचा व्यापार हा कार्बन उत्सर्जन कपातीचे इष्टांक ठरवून दिलेल्या देशांना करता येण्याची सुविधा निर्माण केली आहे. त्यसाठी संयुक्त अंमलबजावणी, कार्बन उत्सर्जनाचा व्यापार आणि स्वच्छ विकास यंत्रणा हे मार्ग उपलब्ध करून दिलेले आहेत. हे सर्व मार्ग क्वेटो मसुद्यात अंतर्भूत केले आहेत[55]. परंतु यामुळे विकसित देश कार्बन उत्सर्जन कपातीसाठी ह्या मार्गाचा अवलंब करून घरगुती कृतीकडे दुर्लक्ष करू शकतात, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. हेच अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कोळसा व तेल उत्पादक राष्ट्रांच्या आजपर्यंतच्या भूमिकेवरून लक्षात येते. अमेरिका, ऑस्ट्रेलिया यासारखे देश आर्थिक वृध्दीच्या अपेक्षेने पर्यावरणाच्या मुद्यास कमी महत्त्व देत आहेत. असे चित्र आजतरी दिसते आहे. कोळसा उत्पादन करणारे कोलंबिया सारखे देश ही समस्या समजून घेण्यासच तयार नाहीत. तेल उत्पादक ओपेक देशांचा सुरूवातीचा सूर धमकी सारखाच होता. नंतर काहीसे कार्बन उत्सर्जन कमी करणाऱ्या तंत्रज्ञाना संबंधीच्या संशोधनासाठी प्रयत्न करीत आहेत. भारत, चीन यासारख्या देशांकडून कार्बन उत्सर्जन कपातीसाठी आश्वासनांची अपेक्षा ठेवली जात आहे. भारताची भूमिका सुध्दा आर्थिक वृध्दीस प्राधान्य व पर्यावरणाकडे दुर्लक्ष अशीच असलेली दिसून येते. केवळ इंग्लंड व काही युरोपीयन देश घरगुती उपाययोजना करून या समस्येकडे गांभीर्याने पहात आहेत. इंग्लंड सरकारने नेमलेल्या स्टर्न समितीच्या निष्कर्ष व शिफारशी प्रमाणे तेथील सरकार पावले उचलीत आहे, असे वाटते. अमेरिका, ऑस्ट्रेलिया यांनी कार्बन उत्सर्जना संदर्भात अधिक आश्वासने दिली तर इंग्लंड देश सुध्दा त्यास तयार असल्याचे दिसून येते. भारत व चीन यांच्याकडून सुध्दा इंग्लंड देशाची अशीच अपेक्षा आहे. क्वेटो मसुद्यातून विकसनशील देशांना सवलत दिली आहे. परंतु हरितगृह वायूंचे हवेतील थर एका विशिष्ट पातळीवर स्थिर ठेवावयाचे असतील तर ही सवलत चिरस्थायी होऊ शकत नाही असे औद्योगिक देशांचे म्हणणे आहे आणि ते खरे आहे. क्वेटो मसुदा काळात हरितगृह वायूंचे उत्सर्जन वेगाने होणार नाही; परंतु त्यात वाढ होत राहील हे निश्चित. कारण भविष्यात विकसनशील देशांकडून हरितगृह वायूंचे अधिक उत्सर्जन होणार आहे. म्हणून अशा देशाकडून पण हरितगृह वायूंच्या उत्सर्जन कपातीची आश्वासने

आवश्यक आहेत, असे मला वाटते. औद्योगिकदृष्ट्या प्रगत आणि विकसनशील देशांनी हरितगृह वायूंचे वातावरणातील प्रमाण एका विशिष्ट पातळीवर स्थिर ठेवण्यासाठी कमी कार्बन विकास पथ (Low-carbon development path) स्विकारावा असा विचार पण मांडला जात आहे. पण यास विकसित देशांचा फारसा प्रतिसाद मिळतांना दिसत नाही. विकसनशील देशांतील गरिबी लक्षात घेता असा विचार त्यांना परवडणारा नाही, असे माझे मत आहे.

भारतासारख्या देशाने हवामान बदलाची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. कारण हवामान घटकास अधिक संवेदनशील असलेल्या भारतात कृषी क्षेत्रावर मोठी लोकसंख्या अवलंबून आहे. पर्जन्यवृष्टीतील घटीमुळे दुष्काळाची तीव्रता वाढते आणि अतिवृष्टीमुळे पूर येतात व त्याचे देशाची अन्न सुरक्षितता व जीवनमान यावर प्रतिकूल परिणाम होतात. तसेच पायाभूत सुविधांची कमतरता, कमकुवत संस्थीय व्यवस्था, आर्थिक साधन सामुग्रीचा अभाव आणि प्रचंड प्रादेशिक विषमता यामुळे देशाची हवामान बदलाशी जुळवून घेण्याची अनुकूलन क्षमताही कमी आहे.

भारत सरकारने हवामान बदलावर 30 जून 2008 रोजी 'राष्ट्रीय कृती योजना' जाहीर केली आहे. यामध्ये हवामान बदलापासून बचाव करण्यासाठी आठ मोहिमा आखल्या आहेत. त्यातील प्रमुख म्हणजे सौरउर्जा वापर व ऊर्जा कार्यक्षमता वाढविणे, पाणी व्यवस्थापन सुधारणे, हवामान बदलाशी कृषीला लवचिक करणे, हवामान बदलासंबंधी माहिती व संशोधन ह्या होत. परंतु हे सर्व कसे साध्य करणार ह्याचे फारसे स्पष्टीकरण त्यात दिसत नाही[56]. राष्ट्रीय कृती योजनेत हरितगृह वायूंच्या उत्सर्जनात कपात करण्याचा इष्टांक ठरविला नाही, परंतु स्वच्छ तंत्रज्ञानाआधारे चिरस्थायी विकास साध्य करणे आणि वृध्दीची गुणवत्ता सुधारणे हे लक्ष्य ठेवले आहे. तसेच हवामान बदलासंबंधीच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील वाटाघाटीत धोरणात्मक विधायक भूमिका घेण्याचे भारताने ठरविल्याचे दिसून येते. परिणामकारक, सहकार्यावर आधारीत व समन्यायी वैश्विक दृष्टिकोन निर्माण करण्याची गरज त्यात प्रतिपादन केली आहे. हरितगृह वायू उत्सर्जन कपाती संदर्भातील आंतरराष्ट्रीय प्रयत्नांचे यश हे विकसित देशांकडून जास्तीची आर्थिक साधन सामुग्री व हवामानाशी मैत्रीपूर्ण असलेले तंत्रज्ञान विकसनशील देशांकडे कितपत हस्तांतरीत होते, यावर अवलंबून राहील असे कृती योजनेत म्हटले आहे. परंतु अमेरिका व इतर औद्योगिकदृष्या प्रगत देशांवर हरितगृह वायु उत्सर्जन कपातीसाठी घरगुती प्रयत्न वाढविण्यासाठी दबाव वाढविण्याचा भारताचा रोख दिसत नाही.

भारतातून होणाऱ्या हरितगृह वायूंच्या एकूण उत्सर्जनात कृषी क्षेत्राचा वाटा 28 टक्के एवढा आहे. कृषीच्या संदर्भात हरितगृह वायू उत्सर्जनाचे किन्वन (59टक्के), भात पीक (23 टक्के) आणि भूमी (12टक्के) हे प्रमुख स्त्रोत आहेत. हवामान बदलावर उपशमन करण्यासाठी भात पीक तंत्रज्ञानात बदल, पीक विविधीकरण, पशुधनाच्या व्यवस्थापनात सुधारणा, सेंद्रिय खत वापर, कमीत कमी नांगरणी व वखरणी, पीक अवशेषांचे व्यवस्थापन, कृषीत ऊर्जा वापराची कार्यक्षमता वाढविणे व त्यासाठी उत्तम यंत्राचा वापर, जैविक इंधन पिकांचे क्षेत्र वाढविणे व वनीकरणासाठी जमीन वापर बदलणे इत्यादींचा अंतर्भाव असू शकतो[57].

हवामान बदलाचे कृषीवरील प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी अनुकूलनाची पण

आवश्यकता आहे. शेती पातळीवर करावयाच्या अनुकूलनामध्ये पिकांचे नवीन वाण, पीक विविधीकरण, काही पिकांवर भर, पीक-पाळ्या बदलणे, लवकर पेरणी, शेतीवरील कामाच्या वेळा बदलणे, भूमीतील ओलावा टिकविण्यासाठी योग्य मशागत पध्दती अवलंबिणे, सिंचन कार्यक्षमता वाढविणे, अधिक तापमानात व दुष्काळी परिस्थितीत येणाऱ्या पिकांचे नवीन वाण शोधणे इत्यादीचा अंतर्भाव आहे[57]. काही बाजार आधारित अनुकूलन पर्याय जसे की, पीक व पूर विमा, कर्ज योजना, उत्पन्न विविधीकरण योजनांमध्ये गुंतवणूक ह्याची पण गरज आहे. हवामान बदलाशी अनुकूलनासाठी काही संस्थीय बदल जसे की, किंमत धोरण, कृषी धोरण, कृषी वस्तूंचा प्रादेशिक व्यापार हे सुध्दा महत्वाचे आहेत. शेती पातळीवरील अनुकूलन हे शेतकऱ्यांच्या क्षमतेवर अवलंबून असते. ही क्षमता शेती कसण्याची पध्दती, कूळ पध्दती, आर्थिक सामुग्री मिळविण्याची कुवत, कुशलता, विस्तार आधार व बाजार परिस्थिती यावर अवलंबून असते. आर्थिक, संस्थीय, राजकीय व सामाजिक घटकांची हवामान बदलाशी अनुकूलन करण्यात महत्वपूर्ण भुमिका असते. अनुकूलनामध्ये वेगळ्या पिकाकडे जाण्यापासून ते समुद्री किनारपट्टीवरील जमिनीवरचा अधिकार सोडण्यापर्यंतच्या बाबी समाविष्ट असू शकतात. अनुकूलनाचे पर्याय खूप असले तरी ते स्थळ, प्रांत व परिस्थितीसापेक्ष असावे लागतात. हळूवार होणाऱ्या सरासरी बदलास लोक अधिक अनुकूलक असतात, परंतु आत्यंतिक नैसर्गिक घटना सारख्या बदलत्या परिस्थितीशी ते कमी अनुकूलक असतात[59].

अनुकूलन व उपशमन हे हवामान बदलाच्या जोखीमा महत्वपूर्णरित्या कमी करतात आणि ते एकमेकांना पूरक आहेत. खर्चीक स्वरूपाच्या अनुकूलन व उपशमन योजनांची सध्या गरज नाही असे अमेरिकेच्या बाबतीत दिसून आले आहे. अमेरिकेसंदर्भात जलसंवर्धन, पीक विमा, आपत्ती व्यवस्थापन इ. उपाय योजना पूरेशा आहेत. परंतु भारताने मात्र हवामान बदलासंदर्भात अनुकूलन व उपशमन यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची नितांत आवश्यकता आहे, असे मला प्रस्तुत ठिकाणी नमूद करावेसे वाटते.

आपण मला संधी दिलीत याबद्दल आपले ऋण व्यक्त करून थांबतो. **धन्यवाद !**

**तक्ता 1 : कार्बन उत्सर्जन करणारे जगातील 20 मोठे देश**

| देश | जगातील एकूण कार्बन उत्सर्जनातील टक्केवारी हिस्सा | दरडोई उत्सर्जन (टनांत) | दरडोई उत्सर्जनानुसार क्रमांक |
|---|---|---|---|
| अमेरिका | 23.8 | 5.43 | 1 |
| चीन | 13.6 | 0.68 | 18 |
| रशियन संघ | 6.3 | 2.66 | 6 |
| जपान | 5.0 | 2.45 | 9 |
| भारत | 4.6 | 0.29 | 20 |
| जर्मनी | 3.6 | 2.75 | 5 |
| इंग्लंड | 2.4 | 2.51 | 8 |
| कॅनडा | 2.0 | 4.17 | 3 |
| इटली | 1.8 | 1.97 | 12 |
| मेक्सिको | 1.6 | 1.07 | 17 |
| फ्रान्स | 1.6 | 1.72 | 14 |
| कोरिया प्रजासत्ताक | 1.6 | 2.64 | 7 |
| युक्रेन | 1.5 | 1.90 | 13 |
| दक्षिण आफ्रिका | 1.5 | 2.38 | 10 |
| ऑस्ट्रेलिया | 1.4 | 4.88 | 2 |
| पोलंड | 1.4 | 2.27 | 11 |
| ब्राझील | 1.3 | 0.49 | 19 |
| इराण | 1.3 | 1.2 | 16 |
| सौदी अरेबिया | 1.2 | 3.83 | 4 |
| स्पेन | 1.1 | 1.7 | 15 |
| **एकूण /सरासरी** | **78.7** | **2.35** | |

**Source :** Marland, G.T.A. Buten and R.J. Andres (2001) : Global, Regional, and National Co2 Emissions, Trends : A Compendium of Data on Global Change, Oak Ridge National Laboratry, US Department of Energy, Carbon Dioxide Information Analysis Centre.

**तक्ता 3 : दक्षिणपूर्व आशियातील कृषी क्षेत्रावरील 2100 मधील अंदाजित परिणाम (आकडे अब्ज अमेरिकन डॉलर्स मध्ये)**

| देश | मोठा दृष्टिक्षेप : +4.4 $^{0}$C, मासिक पर्जन्यात 1.6 मि.मी.घट | | मध्यम दृष्टिक्षेप : +3.7 $^{0}$C, मासिक पर्जन्यात 1.2 मि.मी.वाढ | | सौम्य दृष्टिक्षेप : +2.2 $^{0}$C, मासिक पर्जन्यात 2.9 मि.मी.वाढ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | स्तरछेदी दृष्टिकोन | प्रायोगिक दृष्टिकोन | स्तरछेदी दृष्टिकोन | प्रायोगिक दृष्टिकोन | स्तरछेदी दृष्टिकोन | प्रायोगिक दृष्टिकोन |
| बांगला देश | -0.1 | -9.4 | -0.1 | -3.7 | -0.1 | -0.5 |
| कंबोडीया | 0.0 | -0.2 | 0.0 | -0.2 | 0.0 | 1.1 |
| चीन | -5.6 | -32.2 | -2.0 | 7.0 | 7.6 | 30.5 |
| भारत | -1.1 | -86.7 | -1.5 | -47.8 | 0.5 | -4.6 |
| इंडोनेशिया | -0.3 | -25.5 | -0.2 | 3.3 | -0.1 | -4.3 |
| लाओस | 0.0 | -0.2 | 0.0 | -0.2 | 0.0 | 0.2 |
| मलेशिया | -0.4 | -5.9 | 0.1 | -0.4 | 0.3 | 4.2 |
| म्यानमार | -0.2 | -1.1 | -0.2 | -2.7 | 0.0 | 1.3 |
| नेपाळ | 0.0 | -0.5 | 0.0 | -0.5 | 0.0 | 0.3 |
| पाकिस्तान | -0.2 | -15.8 | -0.2 | 0.5 | 0.5 | 1.8 |
| फिलीपाईन्स | -0.5 | -8.8 | -0.1 | -2.7 | 0.4 | 1.0 |
| श्रीलंका | 0.0 | -1.8 | 0.0 | -0.6 | 0.0 | 0.4 |
| तैवान | 0.0 | -0.1 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| थायलंड | -1.5 | -19.6 | -1.6 | -11.1 | -0.3 | 3.7 |
| व्हियतनाम | -0.1 | -4.0 | -0.1 | -2.2 | 0.1 | 0.7 |
| एकूण | **-9.9** | **-218.8** | **-5.9** | **-61.6** | **9.0** | **35.8** |

**Soruce :** Robert Mendelson (2005), Climate Change Impacts on Southeast Asian Agriculture, Yale University, November 24

**तक्ता 4 : हवामान बदलाचे भारतीय कृषीक्षेत्रावरील परिणामांचे कृषी-आर्थिक परिक्षण**

| पीक | दर हेक्टरी उत्पादनातील टक्केवारी बदल | हवामान बदलाचा दृष्टिक्षेप |
|---|---|---|
| **लाल व इतर, 1998 : उत्तर-पश्चिम भारत** | | |
| भात | 0 | $+2^0C, Co_2$, दुप्पट |
| भात | -20 | $+2^0C, Co_2$ दुप्पट, पाण्याची कमतरता |
| गहू | 0 | $+3^0C, Co_2$ दुप्पट |
| **लाल व इतर, 1999 : मध्यप्रदेश** | | |
| सोयाबीन | -4 ते 0 | $+3^0C, Co_2$, दुप्पट, दैनिक पर्जन्यात – १०% बदल |
| **सासीन्द्रन व इतर, 2002 : केरळ** | | |
| भात | L-6 | $+1.5^0C$ |
| भात | 12 | $+1.5^0C$, 2 मिमी दैनिक पर्जन्यात वाढ |
| **अग्रवाल आणि माल, 2002 : दक्षिण, उत्तर-पश्चिम व पूर्व भारतातील काही भाग** | | |
| भात | | हवामान बदल मंडळाचा आशावादी दृष्टिकोन |
| | 5.1 ते 7.4 (2010) | $+0.1^0C$, 416 PPM $Co_2$ |
| भात | 16.6 ते 25.7 (2070) | $+0.4^0C$, 755 PPM $Co_2$ |
| भात | | हवामान बदल मंडळाचा नैराश्यवादी दृष्टिकोन |
| | 2.5 ते +4.1 (2010) | $+0.3^0C$, 397 PPM $Co_2$ |
| भात | 6.1 ते 16.8 (2070) | $+2^0C$, 605 PPM $Co_2$ |
| **कालरा व इतर 2007** | | |
| भात | -5 ते -8 | $+1^0C$, $C0_2$ बदलत नाही |
| भात | -10 ते -16 | $+2^0C$, $C0_2$ बदलत नाही |
| भात | -21 ते -30 | $+4^0C$ |
| मका | -10 ते -30 | $+1^0C$ ते $4^0C$, 350 PPM $Co_2$ |
| ज्वारी | -7 | $+1^0 C$ |
| ज्वारी | -12 | $+2^0 C$ |

तक्ता 4 : (पुढे चालू)

| पीक | दर हेक्टरी उत्पादनातील टक्केवारी बदल | हवामान बदलाचा दृष्टिक्षेप |
|---|---|---|
| **जागतिक बँकेचा अभ्यास 2006 :** | | |
| भात | -9 | महत्तम तापमान +2⁰C |
| भुईमूग | 2 | न्यूनतम तापमान +4⁰C |
| ज्वारी | 3 | वार्षिक पर्जन्य दिवस -5% |
| सूर्यफूल | 10 | 550 PPM $Co_2$ |
| मका | 3 | |
| भात | -8 | महत्तम तापमान +2⁰C |
| भुईमूग | 0 | न्युनतम तापमान +4⁰C |
| ज्वारी | 0 | वार्षिक पर्जन्य दिवस -5% |
| सूर्यफूल | 9 | 550 PPM $Co_2$ |
| मका | 0 | संचयी मान्सून पर्जन्य - 10% |

**Source :** World Bank Report NO 43946 - IN, June 1, 2008.

**तक्ता 7 : क्वेटो मसुद्यानुसार औद्योगिक देशांनी उत्सर्जन कपातीची दिलेली आश्वासने**

| देश | मोजणी योग्य उत्सर्जन मर्यादा (आधार वर्षाशी टक्केवारी) |
|---|---|
| ऑस्ट्रेलिया | 108 |
| कॅनडा | 94 |
| क्रोएशिया | 95 |
| हंगेरी | 94 |
| आईसलँड | 110 |
| जपान | 94 |
| न्युझीलंड | 100 |
| नॉर्वे | 101 |
| पोलंड | 94 |
| रशियन संघ | 100 |
| युक्रेन | 100 |
| अमेरिका | 93 |
| युरोपियन संघ | 92 |

**Source :** Adam Rose (1998), Burden - Sharing and Climate Change Policy Beyond Kyoto : Implications for Developing Countries, Environment and Development Economics, 3, Cambridge University Press.

**References:**

1. Joan Martinez - Alier and Leah Temper (2007), Oil and Climate Change : Voices from the South, EPW, December 15.
2. Philippe Cullet (2008), The Global Warming Regime after 2012 : Towards a New Focus, EPW, July12.
3. Gautam Dutt and Fabian Gaioli, Coping With Climate Change, EPW, October 20.
4. The Times of India, September 1, 2008.
5. IPCC (2001), Climate Change 2001 : Impacts, Adaptation and Vulnerability, Technical Summary, IPCC Publication.
6. Mendelson Robert, Ariel Dinar and Larry Williams (2006), The Distributional Impact of Climate Change on Rich and Poor Countries, Environment and Development Economics, vol.11.
7. Longern, S.,(1998), Climate Warming in India, in A. Dinar et.al (eds.), Measuring the Impact of Climate Change on Indian Agriculture, World Bank, Washington, D.C.
8. Parry, M.L., ed.(2000), Assessment of Potential Effects and Adaptations for Climate Change in Europe, University of East Anglia, U.K.
9. Clive L. Spash (2007), Climate Change: Need for New Economic Thought, EPW, February 10.
10. The Times of India, August 14, 2008.
11. P. Kurukulasmiya and Shane Rosenthal (2003), Climate Change and Agriculture - A Review of Impacts and Adaptations, The World Bank Environment Department, June.
12 Newman, J.E. (1980), Climate Change impacts on the growing season of the North American Corn Belt; International Journal of Biometeorology, 24, December.
13 Eswaran, Hari, E. Van den Berg and P. Reich (1993), Organic Carbon in soils of the world, Soil Science Society of America Journal, 57
14 Hulme, M. Ruth Doherty, Tood Nagara, Mark New Devid Lister (1999), African Climate Change : 1900-2100, Climate Research
15 Hulme, Mike, ed. (1996), Climate Change and Southern Africa, Climate Research Unit, University of East Anglia, U.K.
16 Siva Kumar, M.V.K. (1992), Climate change and implications for agriculture in Niger, Climate Change, 20
17. Downing, T.E. (1992), Climate Change and Vulnerable Places : Global Food Security and Country Studies in Zimbabwe, Kenya, Senegal, and Chile, Research Paper 1, Environmental Change Unit, Oxford University, UK.
18. Makadho, J.M. (1996), Potential effects of climate change on corn Production in Zimbabwe, Climate Research, 6.
19. Yates D.N., and Strzepek, K.M. (1998), Modeling the Nile Basin under climate change, Journal of Hydrologic Engineering, Vol 3, No. 2.
20. Darwin, Roy, Marinos Tsigas, Jan Lewand rowski, and Anton Ranesas (1995), World Agriculture and Climate Change: Economic Adaptations, Agricultural Economic Report 703, Economic Research Service, Washington, D.C.
21. Sourthworth, J.R.A. Pfeifer, M. Habeck, J.C. Randolph, O.C. Doering, and D.G. Rao (2002), Sensitivity of winter wheat yields in the midwestern United States to future changes in climate, climate variability, and $Co_2$ fertilization, Climate, Research, Vol. 22, No.1.
22. Rosenzweig, C; F.N. Tubiello, R. Goldberg, E. Mills, and J. Bloomfield (2002), Increased Crop Damage in the US from Excess Precipitation under Climate Change, Global Environmental Change : Human Dimensions and Policy, Vol 12,

No.3.
23. Lobell, David B; and Gregory P. Asner (2003), Climate and Management Contributions to Recent Trends in U.S. Agricultural yields, Science, 14 February.
24. Muchena, P. (1994),Implications of Climate Change for Maize Yields in Zimbabwe, in C. Rosenzweig and A. Iglesias, eds; Implications of Climate Change for International Agriculture: Crop Modeling Study, U.S. Environmental Protection Agency, Washington, D.C.
25. Mohamed, A. Ben, N. VanDuivenbooden, and S. Abdoussallam (2002), Impact of Climate Change on Agricultural Production in the Sahel-Part-I, Methodological Approach and Case Study for Millet in Niger, Climate Change, Vol. 54, No.3.
26. Van Duivenbooden, N.S. Abdoussallam, and A. Ben Mohamed (2002), Impact of Climate Change on agricultural production in the sahel-Part-2, case study for groundnut and cowpea in Niger, Climate Change, Vol. 54, No.3.
27. Kapetanaki, Georgia, and C. Rosenzweig (1997), Impact of climate change on maize yield in central and nothern Greece: A Simulation Study with CERES-Maize, Mitigation and Adaptation strategies for Global Change, 28. Iglesius.Ana, and M. I. Minguez(1997), Modeling Crop-Climate Interactions in Spain : Vulnerability and Adaptation of Different Agricultural Systems to Climate Change, Mitigation and Adaptation strategies for Global Change, 1.
29. Stuczyinski, T., G. Demidowicz, T. Deputal, T. Gorski, S. Krazowicz, and J. Kus (2000), Adaptation scenarios of Agriculture in Poland to Future Climate Changes, Environmental Monitoring and Assessment, 61
30. Alexzandrov, V.A.; and Gerrit Hoogen boom (2000), The impact of climate variability and change on crop yield in Bulgaria, Agricultural and Forest Methodology, 104.
31. Murdiyarso, Daniel (2000), Adaptation to Climate Variability and Change; Asian perspectives on agricultural and food security, Environmental Monitoring and Assessment, Vol.61, No.1.
32. Naylor, R.L.; W.P. Falcon, D. Rochberg, and N. Wada (2001), Using E1 Nino Southern oscillation climate data to predict rice production in Indonesia, Climate Change, Vol.50, No.3.
33. Lansigan, F.P; W.L. delos Santos, and J.O. Coladilla (2000), Agronomic Impacts of climate Variability on Rice Production in the Philippines, Agriculture, Ecosystems and Environment, Vol. 82, No.1-3.
34. Mendelson, Robert, William D. Nordhaus, and Daigee Shaw (1994), The Impact of Global Warming on Agriculture: A Ricardian Analysis, American Economic Review, vol.84, No.4.
35. Mendelson, Robert and J.E. Neumann, eds; (1999), The Economic Impact of Climate Change on the Economy of the United States, Cambridge University Press.
36. Maddison, David (2000), A Hedonic Analysis of Agricultural Land Prices in England and Wales, European Review of Agricultural Economics, Vol.27, No.4.
37. Molua, Ernest L. (2002), Climate Variability, Vulnerability and Effectiveness of Farm Level Adaptation Options: The Challenges and Implications for Food Security in Southwestern Cameroon, Environment and Development Economics, vol.7, No.3.
38. Etsia, Nabil- Balti, Slim Zekri and Alberto Etsia (2002), Economic Impacts of Climate Change on the Tunisian Agriculture Sector.

Paper presented at the workshop on Regional Climate, Water Agriculture : Impacts on and Adaptations of the Agro-ecological systems in Africa, Cape Town, South Africa.

39.Sanghi, Apurva, Robert Mendelson, and Ariel Dinar (1998), The Climate Sensitivity of Indian Agriculture, in 'Measuring the Impact of Climate Change on Indian Agriculture1, World Bank Technical Paper 402, Washington, D.C.

40. Robert Mendelson (2005), Climate Change Impacts on Southeast Asian Agriculture, Yale University, November 24.

41. Economic Survey 2001-02, Ministry of Finance, Government of India, New Delhi.

42.Lal, M; K. K. Singh, L.S. Rathore, G. Srinivasan, and S. A. Saseendran (1998), Vulnerability of Rice and Wheat Yields in NW India to Future Changes in Climate, Agricultural and Forest Meteorology, Vol.89.

43. Lal, M; K. K. Singh, L S. Rathore, D. Naidu, and C. N. Tripathi (1999), Growth and Yield Responses of Soyabean in Madhya Pradesh, India to Climate Variability and Change, Agriculture and Forest Meteorology, Vol.93.

44.Saseendran, S. A., K. K. Singh, L. S. Rathore, S. V. Singh, and S. K. Sinha (2000), Effects of Climate Change on Rice Production in the Tropical Humid Climate of Kerela, India, Climate Change, vol.44.

45. Aggrawal, P. K. and R. K. Mall (2002), Climate Change and Rice Yields in Diverse Agro-Environments of India, Climate Change, Vol.52, No.3.

46. Kalra, Naveen, et.al. (2007), Impacts of Climate Change in India: Agricultural Impacts, Final Report, Joint Indo-UK Programme of Ministry of Environment and Forests, India, and Department of Environment, Food & Rural Affairs, U.K; New Delhi.

47. World Bank (2006), Overcoming Drought: Adaptation Strategies for Andhra Pradesh, India. Directions in Development; Environmental and Sustainable Development, Washington, D.C.

48. Sanghi, Apurva, Robert Mendelson, and Ariel Dinar (1998), Op.cit.

49. Kumar K. S. Kavi and Jyoti Parikh (2001), Indian Agriculture and Climate Sensitivity, Global Environmental Change, 11.

50. Raymond Guiteras (2007), The Impact of Climate Change on Indian Agriculture, Department of Economics, MIT, December.

51. Dinar et al. (1998), Op.cit.

52. World Bank (2006), Op.cit.

53. Rachel Slater, Martin Prowse, Nanki Kaur-Mann and Leo Peskett (2007), Climate Change, Agricultural Growth and Poverty Reduction, Overseas Development Institute, May.

54.Mckinsey J.W. (1999), Technology - Climate Interactions in the Green Revolution in India, Economic Growth Center, Yale University, Discussion paper No. 805, August.

55. Anwar Sadat (2008), Some Unanswered Questions in the Climate Change Regime, EPW, April 28.

56. Editorial (2008), Climate Change : Not Vision, Not Plan, EPW, July 12.

57. Aggrawal, P.K. (2007), Climate Change: Implications for Indian Agriculture, Jalvigyan , Sameeksha, Vol.22.

58. Guro Aandahl and Karen O' Brien, Vulnerability to Climate Changes in Indian Agriculture, Center for Climate and Environmental Research, Oslo.

59. IPCC (2001), Op.cit.

# ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या दारिद्र्याची समस्या

**जयवंत इंगळे**

असोसिएट प्रोफेसर आणि व्यावसायिक अर्थशास्त्र विभागप्रमुख , अ.आ. कॉलेज , मंचर (पुणे) मो. ९७६७५२०४८२

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातील चर्चासत्रासाठी सादर केल्या जाणाऱ्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधासाठी कै. ग. प्र. पिंपरकर आणि कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक दिले जाते. कडेगांव (जि. सांगली) येथे संपन्न झालेल्या बत्तीसाव्या राष्ट्रीय पातळीवरील अधिवेशनातील पारितोषिक प्राप्त शोधनिबंध

## 1.0 प्रास्ताविक :

नागरी समुदायापासून दूर अंतरावर, जंगल व डोंगराळ भागात राहणाऱ्या आणि ज्यांची संस्कृती अथवा परंपरा किंवा चालीरिती नागरी समाजापेक्षा बऱ्याच बाबतीत वेगळया आहेत अशा लोकांना आदिवासी लोक असे म्हणतात. भारतात आजमितीस सुमारे 425 इतक्या; तर महाराष्ट्रात 48 आदिवासी जमाती आहेत. सन 2001 च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या 10286.10 हजार इतकी आहे. तर आदिवासींची लोकसंख्या 843.26 हजार इतकी आहे. आदिवासी लोकसंख्येचे देशाच्या एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण 8.20 इतके आहे. सन 2001 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या 968.79 हजार इतकी आहे; तर आदिवासींची लोकसंख्या 85.77 हजार इतकी आहे. राज्यातील आदिवासी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण 8.85 इतके आहे.(1)

## 2.0 अभ्यासपद्धती :-

अभ्यास क्षेत्रातील आदिवासींच्या दारिद्र्याचे मोजमाप करणे, दारिद्र्याची कारणे शोधणे आणि दारिद्र्य निर्मूलनासाठी उपाय सुचवणे हे अभ्यास विषयाचे प्रमुख उद्देश आहेत. हा शोधनिबंध प्राथमिक आणि दुय्यम साधन सामग्रीवर बेतला आहे. दारिद्र्याचा अभ्यास करण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील 420 आदिवासी कुटुंबांची निवड यादृच्छिक पद्धतीने केली. मोखाडा तालुक्यात महादेव कोळी, ढोर कोळी, कातकरी, वारली, कोकणा, म ठाकूर आणि क ठाकूर अशा विविध सात जमाती असून

या प्रत्येक जमातीतील 60 कुटुंबांची निवड करून मुलाखत पत्रकांच्या सहाय्याने माहिती गोळा केली. आदिवासी भागात काही दिवस वास्तव्य करून आदिवासी जीवनाचे निरीक्षण केले. अशा प्रकारे सहभागी निरीक्षण, चर्चा पद्धती, मुलाखती इत्यादी संशोधन पद्धतींचा अवलंब करून संशोधन विषयाचा म्हणजेच आदिवासींच्या दारिद्रयाच्या प्रश्नाचा अभ्यास केला.

### 3.0 दारिद्रयाचा अर्थ:-

''दारिद्रय म्हणजे काय ते समजून येण्यासाठी दारिद्रयाच्या काही सर्वसाधारण व्याख्या खालीलप्रमाणे दिल्या आहेत.''

**1.जागतिक विकास अहवाल 2000-2001** (2)

''सुस्थितीपासून संपूर्णपणे वंचित असणे म्हणजे दारिद्रय होय.''

**2.प्रा. अमर्त्य सेन**(3)

''एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मूल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्रय होय.''

**3.किमान गरजा आणि प्रभावी मागणीच्या अंदाजासाठी नेमलेला तज्ज्ञ गट** (1980-85) (4)

''ग्रामीण भागासाठी दररोज प्रती व्यक्ती किमान 2400 कॅलरीज आणि शहरी भागासाठी किमान 2100 कॅलरीज मिळण्यासाठी लागणारे अन्न मिळविण्यासाठीची असमर्थता म्हणजे दारिद्रय होय.''

**4.जागतिक बँक**(5)

''माणशी दर दिवशी एक डॉलर पेक्षा कमी उत्पन्न मिळविणाऱ्या व्यक्ती म्हणजे दारिद्रय रेषेखालील व्यक्ती होय.''

**5. जे .एस.इंगळे**(6)

''ज्यांना वर्षातील काही दिवस उपासमार सोसावी लागते, उपजीविकेसाठी काही महिने परगावी स्थलांतर करावे लागते, कर्ज काढल्याशिवाय उदरनिर्वाह करता येत नाही, ज्यांच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत मजुरी आहे, ज्यांना वर्षातील जास्तीत जास्त काळ बेरोजगार रहावे लागते, ज्यांच्या घराचा दर्जा अत्यंत निकृष्ट आहे, घराला हातभार लागावा यासाठी ज्यांना आपल्या मुलाबाळांचे शिक्षण अर्ध्यावर बंद करावे लागते आणि ज्यांचे संपूर्ण जगणे सरकारच्या स्वस्त धान्य दुकानावर अवलंबून आहे. परंतु पैशाअभावी पुरेसे धान्य विकत घेता येत नाही ते आदिवासी लोक म्हणजे दारिद्रय रेषेखालील लोक होय.''

जे लोक जीवनमानाची किंवा राहणीमानाची किमान पातळी गाठू शकत नाहीत ते दरिद्री किंवा गरीब होय.ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न 20,000 रूपये किंवा त्यापेक्षा कमी आहे ती कुटुंबे म्हणजे दारिद्रय रेषेखालील कुटुंबे अशी भारत सरकारने दारिद्रयाची व्याख्या केली आहे. सध्या ही उत्पन्नाची मर्यादा 24,000 रूपयापर्यंत वाढविण्यात आली आहे.(अ) उत्पन्न दारिद्रय अथवा वस्तू वंचितता (ब) आरोग्य आणि शिक्षण यापासूनची वंचितता (क) धोक्याच्या आणि असुरक्षिततेच्या वातावरणातील वावर (ड)मूक सोशिकपणा आणि दौर्बल्यता हे दारिद्र्याचे चार पैलू किंवा परिमाणे आहेत.(7)

### 4.0 दारिद्रयाचे प्रमाण

खालील विविध तक्त्यात भारतातील, महाराष्ट्रातील आणि आदिवासी समाजातील दारिद्रयाचे प्रमाण दर्शविले आहे.

### 4.1 भारतातील दारिद्रय

योजना आयोग , बी. एस्. मिन्हास आणि

वैद्यनाथन, प्रा.दांडेकर आणि डॉ.रथ इ. तज्ज्ञांनी भारतातील दारिद्र्याचा अभ्यास केला आहे. दांडेकर आणि रथ यांच्या उपभोग खर्च निकषानुसार 1960-61 मध्ये भारतातील ग्रामीण भागातील 40.00 टक्के आणि शहरी भागातील 50.00 टक्के लोक दारिद्रय रेषेखाली होते[8] खालील तक्त्यात सन 1973 पासूनचे भारतातील दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ४.१**

**भारतातील दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण**

| अ. क्र. | वर्ष | भारतातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण (%) | भारतातील शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण (%) | भारतातील दारिद्रय रेषे खालील लोकांचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| 1 | 1973 | 56.40 | 49.00 | 54.90 |
| 2 | 1977 | 53.10 | 45.20 | 51.30 |
| 3 | 1983 | 45.70 | 40.80 | 44.50 |
| 4 | 1987 | 39.10 | 38.20 | 38.90 |
| 5 | 1993 | 37.30 | 32.30 | 36.00 |
| 6 | 2000 | 27.10 | 23.60 | 26.10 |
| 7 | 2004 | 28.30 | 25.70 | 27.50 |
| 8 | 2007 | 21.10 | 15.10 | 19.30 |

संदर्भ:-आर्थिक सर्वेक्षण 2000-2001 आणि दहावी पंचवार्षिक योजना

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सन 1973 च्या तुलनेत सन 2007 मध्ये भारतातील दारिद्रय रेषेखालील लोकांच्या प्रमाणात खूपच घट झाली आहे. सन 1973 मध्ये भारतातील दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण 54.90 टक्के होते. तर 2007 मध्ये हे प्रमाण 19.30 टक्के होते. भारतात शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात दारिद्र्याचे प्रमाण जास्त असल्याचे वरील तक्त्यावरून स्पष्ट होते. उदाहरणार्थ सन 2007 मध्ये भारतातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण 21.10 टक्के होते; तर शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण 15.10 टक्के होते. सन 1973 पासून सन 2007 पर्यंत भारतातील दारिद्र्याच्या प्रमाणात घट झालेली वरील तक्त्यात दिसत असली तरी सन 1973 पासून देशाच्या लोकसंख्येतही सतत वाढ घडून आली आहे. आज भारताची लोकसंख्या 110 कोटी गृहीत धरली तर 20 ते 22 कोटी लोकसंख्या दारिद्रय रेषेखालील भयावह जीवन जगत असल्याचे लक्षात येते.

### 4.2 महाराष्ट्रातील दारिद्रय:-

या विभागात महाराष्ट्रतील सर्वसाधारण लोकसंख्येतील दारिद्र्याचे प्रमाण, महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासीमधील दारिद्र्याचे प्रमाण आणि महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या कुटुंबांची उत्पन्न मर्यादेनुसार वर्गवारी इत्यादी बाबतची माहिती दिली आहे.

### 4.2.1 महाराष्ट्रातील सर्वसाधारण लोकसंख्येतील दारिद्रयाचे प्रमाण :

खालील तक्त्यात विविध वर्षातील महाराष्ट्रातील दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक 4.2.1**

**महाराष्ट्रातील दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण**

| अ. क्र. | वर्ष | भारतातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण (%) | भारतातील शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण (%) | महाराष्ट्रातील एकूण दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| 1 | 1973-74 | 57.71 | 43.87 | 53.24 |
| 2 | 1977-78 | 62.97 | 40.09 | 55.88 |
| 3 | 1983-84 | 45.23 | 40.26 | 43.44 |
| 4 | 1987-88 | 40.78 | 39.78 | 40.41 |
| 5 | 1993-94 | 37.93 | 35.15 | 36.86 |
| 6 | 1999-2000 | 23.72 | 26.81 | 25.02 |

संदर्भ:- आर्थिक सर्व्हेक्षण , 2000-2001, नियोजन मंडळ(भारत सरकार)

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सन 1999-2000 चा अपवाद वगळता 1973-74 पासून 1993-94 पर्यंत शहरी भागातील दारिद्रयापेक्षा ग्रामीण भागात दारिद्रयाचे प्रमाण जास्त होते. सन 1999-2000 मध्ये महाराष्ट्रातील शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण 26.81 टक्के होते, तर ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण 23.72 टक्के इतके होते. 1973-74 पासून महाराष्ट्रातील सरासरी दारिद्रयाच्या प्रमाणात घट होत गेल्याचे वरील तक्त्यावरून दिसून येते. उदाहरणार्थ 1973-74 मध्ये महाराष्ट्रातील दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण 53.24 टक्के होते. तर 1999-2000 मध्ये ते 25.02 टक्क्यापर्यंत कमी झाले.

### 4.2.2 महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील आदिवासी कुटुंबांचे प्रमाण (बेंच मार्क सर्व्हेक्षण ,1996-97)

खालील तक्त्यात महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील आदिवासी कुटुंबांचे प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक : 4.2.2**

**महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुटुंबांचे प्रमाण (बेंच मार्क सर्व्हेक्षण,1996-97)**

| अ.क्र. | एकात्मिक विकास प्रकल्प | एकूण आदिवासी कुटुंबे | दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुटुंबे | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | ठाणे (डहाणू) | 66447 | 59595 | 89.69 |
| 2 | ठाणे (जव्हार) | 46556 | 40939 | 87.93 |
| 3 | ठाणे (शहापूर) | 22260 | 19743 | 88.69 |
| 4 | रायगड (पेण) | 9929 | 9396 | 94.63 |
| 5 | नाशिक (कळवण) | 40446 | 36717 | 90.78 |
| 6 | नाशिक (त्र्यंबक) | 58019 | 52776 | 90.96 |
| 7 | धुळे (तळोदा) | 69622 | 66305 | 95.24 |
| 8 | धुळे (नंदुरबार) | 91588 | 83496 | 91.16 |
| 9 | जळगाव (यावल) | 5935 | 5479 | 92.32 |
| 10 | अहमदनगर (राजूर) | 13208 | 11486 | 86.96 |
| 11 | पुणे (घोडेगाव) | 14340 | 12042 | 83.97 |
| 12 | नांदेड (किनवट) | 20288 | 17837 | 87.92 |
| 13 | अमरावती (अकोला) | 9378 | 8692 | 92.69 |
| 14 | अमरावती (धारणी) | 27326 | 23977 | 87.74 |
| 15 | नागपूर (रामटेक) | 15110 | 13718 | 90.79 |
| 16 | गोंदिया (देवरी) | 20090 | 18396 | 91.57 |
| 17 | यवतमाळ (पांढरकवडा) | 36561 | 33562 | 91.79 |
| 18 | चंद्रपूर (राजूरा) | 28682 | 26287 | 91.65 |
| 19 | चंद्रपूर (चिमूर) | 11091 | 10165 | 91.65 |
| 20 | गडचिरोली(एटापल्ली) | 12445 | 11772 | 94.59 |
| 21 | गडचिरोली (धानोरा) | 5413 | 4921 | 90.91 |
| 22 | भामरागड | 11846 | 10835 | 91.47 |
| | एकूण | 634580 | 578136 | 91.11 |

**संदर्भः-** वार्षिक आदिवासी उपयोजना, 2008-09, महाराष्ट्र शासन,आदिवासी विकास विभाग,पृष्ठ क्रमांक 484.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील आदिवासी कुटुंबांचे प्रमाण 91.11 टक्के एवढे मोठे आहे. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण धुळे (तळोदा) विभागात असून ते 95.24 टक्के आहे. त्या खालोखाल हे प्रमाण रायगड (पेण) आणि गडचिरोली (एटापल्ली) या विभागात असून ते अनुक्रमे 94.63 टक्के आणि 94.59 टक्के इतके आहे.ठाणे (डहाणू) विभागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण 89.69 टक्के, ठाणे (जव्हार) विभागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण 87.93 टक्के तर ठाणे (शहापूर) विभागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण 88.69 टक्के इतके आहे.

### 4.2.3 आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या कुटुंबांची त्यांच्या उत्पन्न मर्यादेनुसार वर्गवारी (बेंचमार्क सर्व्हेक्षण 1996-97)

खालील तक्त्यात महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या कुटुंबांची त्यांच्या उत्पन्न मर्यादेनुसार वर्गवारी दर्शविली आहे.

**तक्ता क्रमांक : 4.2.3**

**आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या कुटुंबांची त्यांच्या उत्पन्न मर्यादेनुसार वर्गवारी**

| अ.क्र. | उत्पन्न मर्यादा (रूपये) | अनुसूचित जमातीच्या कुटुंबांची संख्या | उत्पन्न मर्यादेनुसार अनुसूचित जमातीच्या कुटुंबांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | रू. 2000/- पर्यंत | 26944 | 4.25 |
| 2 | रू. 2001 ते 3600/- | 92510 | 14.58 |
| 3 | रू. 3601 ते 5000/- | 178116 | 28.07 |
| 4 | रू. 5001 ते 7000/- | 144192 | 22.72 |
| 5 | रू.7001 ते 11000/- | 136374 | 21.49 |
| 6 | रू. 11001 ते 20000/- | 37893 | 5.97 |
| 7 | रू.20001आणि त्यावरील | 18551 | 2.92 |
| | एकूण | 634580 | 100.00 |

**संदर्भ:-** वार्षिक आदिवासी उपयोजना, 2008-2009, महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, पृ.क्र.486.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या 634580 कुटुंबापैकी 616029 कुटुंबे (97.08 टक्के) दारिद्रय रेषेखाली आहेत. कारण या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न रू. 20000 पर्यंत आहे. अशा प्रकारे महाराष्ट्र राज्यातील दारिद्रय रेषेखालील आदिवासी कुटुंबांचे प्रमाण खूप मोठे असल्याचे दिसून येते.

## 5.0 दारिद्रयाचे निकष :

जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती दिवसेंदिवस वाढत असल्याने दारिद्रयाचे मोजमाप करण्यासाठी केवळ पैशातील उत्पन्न हा निकष विचारात घेणे प्रस्तुत अभ्यासकाला अयोग्य किंवा चुकीचे वाटले. म्हणून आदिवासी मधील दारिद्रयाचे प्रमाण पाहण्यासाठी अभ्यासकाने उत्पन्न निकषाबरोबरच अन्नाचा तुटवडा, स्थलांतर इत्यादी विविध 14 निकष विचारात घेऊन त्यानुसार दारिद्रयाचे प्रमाण काढले आहे. दारिद्रयाचे विविध 14 निकष आणि त्यानुसार प्राप्त झालेले अभ्यासक्षेत्रातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबांचे प्रमाण खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

### 5.1 उत्पन्न निकष:-

खालील तक्त्यात ज्या आदिवासी कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न 20000 रुपये किंवा त्यापेक्षा कमी आहे त्या कुटुंबांचे प्रमाण जमातीनुसार दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक : 5.1**

**वार्षिक 20000 रूपयापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नांव | वार्षिक २०००० रू.पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबाची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 29 | 60 | 48.33 |
| 2 | ढोर कोळी | 38 | 60 | 63.34 |
| 3 | कातकरी | 19 | 60 | 31.67 |
| 4 | वारली | 28 | 60 | 46.66 |
| 5 | कोकणा | 27 | 60 | 45.00 |
| 6 | म ठाकूर | 27 | 60 | 45.00 |
| 7 | क ठाकूर | 37 | 60 | 61.67 |
| | एकूण | 205 | 420 | 48.80 |

**संदर्भ:-प्राथमिक सर्व्हेक्षण:-**

ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न 20,000 रूपये किंवा त्यापेक्षा कमी आहे ती कुटुंबे दारिद्रय रेषेखालील कुटुंबे होत अशी दारिद्रयाची व्याख्या भारत सरकारने केली आहे. या व्याख्येनुसार अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी 48.80 टक्के कुटुंबे दारिद्रय रेषेखाली आहेत. कारण या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न 20,000 रूपये पर्यंत आहे. उत्पन्न निकषानुसार ढोर कोळी आणि क ठाकूर या जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण जास्त आहे. कारण ढोर कोळी जमातीतील 63.34 टक्के तर क ठाकूर जमातीतील 61.67 टक्के कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न 20,000 रूपयापेक्षा कमी आहे. उत्पन्न निकषानुसार दारिद्रयाचे सर्वात कमी प्रमाण कातकरी

या जमातीत आहे. या जमातीतील सर्व्हेक्षित 60 कुटुंबांपैकी 19 कुटुंबांचे (31.67 टक्के) वार्षिक उत्पन्न 20000 रूपयापेक्षा कमी आहे.

### 5.2 उपासमार निकषः-

उपासमारीस जबाबदार असणारा महत्वाचा घटक म्हणजे दारिद्रय होय. दारिद्रयामुळे व्यक्तीला उपासमारीच्या किंवा भुकेच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागते. म्हणून दारिद्रयाचे मापन करण्यासाठी उपासमार हा निकष विचारात घेतला आहे. खालील तक्त्यात वर्षातील एक ते चार महिने उपासमारीच्या किंवा अन्न टंचाईच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण जमातीनुसार दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक : 5.2**

**उपासमार भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नांव | उपासमार भेडसाणाऱ्या कुटुंबाची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 35 | 60 | 58.34 |
| 2 | ढोर कोळी | 49 | 60 | 81.67 |
| 3 | कातकरी | 57 | 60 | 95.00 |
| 4 | वारली | 52 | 60 | 86.67 |
| 5 | कोकणा | 32 | 60 | 53.34 |
| 6 | म ठाकूर | 42 | 60 | 70.00 |
| 7 | क ठाकूर | 49 | 60 | 81.67 |
| | एकूण | 316 | 420 | 75.24 |

संदर्भः-प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी ३१६ कुटुंबांना म्हणजे 75.24 टक्के कुटुंबांना दरवर्षी अन्नाचा तुटवडा जाणवतो. वर्षातील काही दिवस या कुटुंबांना अन्नाअभावी कडू कंदाचे गड्डे उकडून खावे लागतात. तसेच विविध वेलींचा व झुडपांचा पाला शिजवून खावा लागतो. दारिद्रयाच्या उपासमार निकषानुसार मोखाडा तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील आदिवासी कुटुंबांचे प्रमाण 75.24 टक्के इतके पडते. उपासमार निकषानुसार कातकरी जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण सर्वात जास्त आहे (95.00 टक्के). या जमातीतील सर्व्हेक्षित 60 कुटुंबांपैकी 57 कुटुंबांची म्हणजे 95.00 टक्के कुटुंबांची उपासमार होते. कातकरी जमाती खालोखाल वारली (86.67 टक्के), ढोर कोळी (81.67 टक्के) आणि क ठाकूर (81.67 टक्के) या जमातीत भुकेचा प्रश्न भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण जास्त आहे. म्हणून या जमातीत दारिद्रयाचे प्रमाण जास्त आहे. उपासमार निकषानुसार दारिद्रयाचे सर्वात कमी प्रमाण महादेव कोळी या जमातीत आहे (58.34

टक्के). कारण या जमातीत उपासमारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण 58.34 टक्के इतके म्हणजे इतर जमातींच्या तुलनेत कमी आहे.

### 5.3 स्थलांतर निकष:-

दारिद्रय आणि स्थलांतर यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. दारिद्रयामुळे व्यक्तीला वर्षातील काही महिने परगावी स्थलांतर करावे लागते. म्हणून दारिद्रयाचे मोजमाप करण्यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने स्थलांतर हा निकष विचारात घेतला आहे. खालील तक्त्यात सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी किती कुटुंबांनी उपजीविकेच्या हेतूने सर्व्हेक्षणाच्या वर्षात म्हणजे सन 2004 मध्ये स्थलांतर केले होते याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक : 5.3**

**स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नांव | स्थलांतर केलेल्या कुटुंबाची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 26 | 60 | 43.33 |
| 2 | ढोर कोळी | 35 | 60 | 58.33 |
| 3 | कातकरी | 57 | 60 | 95.00 |
| 4 | वारली | 46 | 60 | 76.66 |
| 5 | कोकणा | 31 | 60 | 51.66 |
| 6 | म ठाकूर | 34 | 60 | 56.67 |
| 7 | क ठाकूर | 41 | 60 | 68.34 |
| | एकूण | 270 | 420 | 64.28 |

संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी 270 कुटुंबांनी म्हणजे 64.28 टक्के कुटुंबांनी सर्व्हेक्षणाच्या वर्षात म्हणजे सन 2004 मध्ये पोट भरण्यासाठी परगावी स्थलांतर केले होते. हे स्थलांतर उपजीविकेच्या हेतूने करण्यात आले असल्याने स्थलांतर केलेली कुटुंबे दारिद्रय रेषेखालील ठरतात.म्हणून दारिद्रयाच्या स्थलांतर निकषानुसार मोखाडा तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील आदिवासी कुटुंबांचे प्रमाण 64.28 टक्के पडते. इतर जमातींच्या तुलनेत कातकरी जमातीत स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे प्रमाण खूप मोठे आहे (95.00 टक्के). म्हणून या जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण मोठे आहे. कातकरी जमाती खालोखाल वारली जमातीत स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे प्रमाण मोठे आहे (76.66 टक्के.) स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे सर्वात कमी प्रमाण महादेव कोळी या जमातीत आहे(43.33 टक्के). म्हणून दारिद्रयाच्या स्थलांतर निकषानुसार

महादेव कोळी जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण कमी आहे (43.33 टक्के).

**5.4 उपभोग कर्ज निकष:–**

अभ्यासात असे आढळले की, गरीबीमुळे आदिवासींना दरवर्षी उपभोगासाठी कर्ज काढावे लागते. उपभोगाचे कर्ज म्हणजे अन्नधान्य ,मीठ,मिरची व खाद्यतेल यासाठी घेतलेले कर्ज होय. उपभोगाचे कर्ज आदिवासींना पैशाच्या किंवा वस्तूंच्या अथवा दोन्ही स्वरूपात मिळते. गरीबीमुळेच उपभोगाचे कर्ज घ्यावे लागत असल्याने दारिद्रयाचे मोजमाप करण्यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने 'उपभोग कर्ज' हा निकष सुद्धा विचारात घेतला आहे. खालील तक्त्यात सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबापैकी किती कुटुंबांनी उपभोगाचे कर्ज काढले आहे याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक : 5.4**

**उपभोग कर्ज काढलेल्या कुटुंबांचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नांव | उपभोग कर्ज काढलेल्या कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 44 | 60 | 73.33 |
| 2 | ढोर कोळी | 52 | 60 | 86.66 |
| 3 | कातकरी | 58 | 60 | 96.66 |
| 4 | वारली | 53 | 60 | 88.33 |
| 5 | कोकणा | 38 | 60 | 63.33 |
| 6 | म ठाकूर | 44 | 60 | 73.33 |
| 7 | क ठाकूर | 50 | 60 | 83.33 |
| | एकूण | 339 | 420 | 80.71 |

संदर्भ:– प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबापैकी 339 कुटुंबांनी म्हणजे 80.71 टक्के कुटुंबांनी उपभोगाचे कर्ज काढले आहे. हे कर्ज उपजीविकेसाठी काढण्यात आले असल्याने हे कर्ज काढलेली कुटुंबे दारिद्रय रेषेखालील कुटुंबे मानली आहेत. म्हणून दारिद्रयाच्या उपभोग कर्ज निकषानुसार मोखाडा तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील आदिवासी कुटुंबांचे प्रमाण 80.71 टक्के पडते. उपभोगाचे कर्ज काढलेल्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी जमातीत असून ते 96.66 टक्के इतके आहे. म्हणून या जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण मोठे आहे. कातकरी जमाती खालोखाल वारली (88.33 टक्के), ढोर कोळी (86.66 टक्के) आणि क ठाकूर (83.33 टक्के) या जमातीत उपभोगासाठी कर्ज काढलेल्या कुटुंबांचे प्रमाण मोठे आहे. म्हणून

या जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण मोठे आहे. इतर जमातींच्या तुलनेत कोकणा जमातीत उपभोगाचे कर्ज काढलेल्या कुटुंबांचे प्रमाण कमी आहे.(63.33 टक्के).म्हणून या जमातीत दारिद्र्याचे प्रमाणही कमी आहे.

### 5.5 उत्पन्न –खर्च तूट निकष:–

दारिद्रयाचे मोजमाप करण्यासाठी 'उत्पन्न–खर्च तूट हा निकषसुद्धा विचारात घेतला आहे.' खालील तक्त्यात सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी किती कुटुंबांचा उपभोग खर्च हा त्यांच्या उत्पन्नापेक्षा जास्त आहे याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक : 5.5**

**उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नांव | उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असणाऱ्या कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 46 | 60 | 76.66 |
| 2 | ढोर कोळी | 54 | 60 | 90.00 |
| 3 | कातकरी | 58 | 60 | 96.66 |
| 4 | वारली | 53 | 60 | 88.33 |
| 5 | कोकणा | 43 | 60 | 71.66 |
| 6 | म ठाकूर | 48 | 60 | 80.00 |
| 7 | क ठाकूर | 49 | 60 | 81.66 |
| | एकूण | 351 | 420 | 83.57 |

संदर्भ:– प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी 351 कुटुंबांचा (83.57 टक्के) वार्षिक सरासरी उपभोग खर्च हा त्यांच्या उत्पन्नापेक्षा जास्त आहे. म्हणून दारिद्र्याच्या उत्पन्न–खर्च निकषानुसार अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण 83.57 टक्के पडते. उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण सर्वात जास्त कातकरी जमातीत असून ते 96.66 टक्के एवढे आहे. म्हणून या जमातीत दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे. कातकरी जमाती खालोखाल ढोर कोळी (90.00 टक्के), वारली (88.33 टक्के), क ठाकूर (81.66 टक्के), म ठाकूर (80.00 टक्के), महादेव कोळी (76.66 टक्के)या जमातीत उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे आहे. इतर जमातींच्या तुलनेत कोकणा जमातीत उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण कमी आहे (71.66 टक्के). म्हणून या जमातीत दारिद्र्याचे प्रमाणही कमी आहे.

### 5.6 मजुरी निकष:–

गरीबीमुळे व्यक्तींना शेतमजूरी करावी लागते. तसेच सरकारच्या रोजगार हमी योजनेसारख्या विविध योजनांवर आणि खाजगी

ठेकेदाराकडे मजुरीची कामे करावी लागतात. त्यांना मिळणारी मजुरीसुद्धा तुटपुंजी असते. मजुरीच्या उत्पन्नातून कुटुंबाच्या प्राथमिक गरजा सुद्धा भागत नाहीत. त्यामुळे दारिद्र्य संपत नाही. म्हणून दारिद्र्याचे मापन करण्यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने मजुरी निकष विचारात घेतला आहे. खालील तक्त्यात सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी किती कुटुंबे उपजीविकेसाठी मजुरीवर अवलंबून आहेत ते दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक : 5.6**

**उपजीविकेसाठी मजुरीवर अवलंबून असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नांव | मजुरी करणाऱ्या कुटुंबाची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 52 | 60 | 86.66 |
| 2 | ढोर कोळी | 58 | 60 | 96.66 |
| 3 | कातकरी | 60 | 60 | 100.00 |
| 4 | वारली | 57 | 60 | 95.00 |
| 5 | कोकणा | 54 | 60 | 90.00 |
| 6 | म ठाकूर | 56 | 60 | 96.33 |
| 7 | क ठाकूर | 49 | 60 | 81.66 |
| | एकूण | 386 | 420 | 91.90 |

संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी 386 कुटुंबे (91.90 टक्के) उपजीविकेसाठी मजुरी व्यवसायावर अवलंबून आहेत. म्हणून दारिद्र्याच्या मजुरी निकषानुसार अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण 91.90 टक्के एवढे मोठे पडते. उपजीविकेसाठी मजुरी व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी या जमातीत आहे (100 टक्के). म्हणून या जमातीत दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे. कातकरी जमाती खालोखाल ढोर कोळी (96.66 टक्के), वारली (95.00 टक्के), म ठाकूर (93.33 टक्के). कोकणा (90.00 टक्के)या जमातीत मजुरीवर उपजीविकेसाठी अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. म्हणून या जमातीत दारिद्र्याचे प्रमाणही मोठे आहे . इतर जमातींच्या तुलनेत क ठाकूर जमातीत मजुरीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे (81.66 टक्के). म्हणून या जमातीत दारिद्र्याचे प्रमाणही कमी आहे.

### 5.7 घराचा दर्जा निकष:-

गरीबीमुळे किंवा दारिद्र्यामुळे व्यक्तीला चांगले व सुखसोयीनीयुक्त घर बांधता येत नाही.कौलारू व कुडाचे घर आणि घरातील जमीन

मातीची किंवा शेणाची असेल तर त्या घराचा दर्जा निकृष्ट मानता येईल. अशा घरात राहणाऱ्या व्यक्ती दारिद्र्य रेषेखालीलच ठरतात. म्हणून दारिद्र्याचे मापन करण्यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने 'घराचा दर्जा' हा निकष विचारात घेतला आहे. खालील तक्त्यात सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी किती कुटुंबांच्या घराचा दर्जा निकृष्ट आहे याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक : 5.7**

**घराचा दर्जा निकृष्ट असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नांव | घराचा दर्जा निकृष्ट असणाऱ्या कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 41 | 60 | 68.33 |
| 2 | ढोर कोळी | 55 | 60 | 91.66 |
| 3 | कातकरी | 57 | 60 | 95.00 |
| 4 | वारली | 49 | 60 | 81.66 |
| 5 | कोकणा | 55 | 60 | 91.66 |
| 6 | म ठाकूर | 54 | 60 | 90.00 |
| 7 | क ठाकूर | 50 | 60 | 83.33 |
| | एकूण | 361 | 420 | 85.95 |

संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी 361 कुटुंबांच्या (85.95 टक्के) घराचा दर्जा निकृष्ट आहे. म्हणजे ही आदिवासी कुटुंबे (1) साध्या कुडाच्या छपरात राहतात व (2) कौलारू व कुडाच्या घरात राहतात. अशा दोन प्रकारच्या निकृष्ट घरात राहणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण 85.95 टक्के आहे. म्हणून अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण 85.95 टक्के पडते. घराचा दर्जा निकृष्ट असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी या जमातीत आहे (95.00 टक्के). म्हणून या जमातीत दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे. कातकरी जमाती खालोखाल ढोर कोळी (91.66 टक्के), कोकणा (91.66 टक्के),म ठाकूर (90.00 टक्के), क ठाकूर (83.33 टक्के) वारली (81.66 टक्के) या जमातीत घराचा दर्जा निकृष्ट असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे आहे. म्हणून या जमातीत दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे. इतर जमातींच्या तुलनेत महादेव कोळी या जमातीत घराचा दर्जा निकृष्ट असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण कमी आहे (68.33 टक्के). म्हणून या जमातीत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाणही कमी आहे.

**5.8 शिक्षण निकष:-**

मुलाबाळांच्या शिक्षणाचा आणि कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीचा जवळचा संबंध असतो. मुलांना शाळेत दाखल न करण्याचे आणि शिक्षण अर्ध्यावर सोडण्याचे प्रमुख कारण कुटुंबाचे दारिद्रय हेच आहे. घर व लहान भावंड सांभाळणे, घरातील व रानातील कामे करणे, जंगलातील उत्पादने गोळा करणे, जनावरे राखणे इत्यादी विविध कामासाठी आदिवासी आपल्या मुला-मुलींना शाळेत घालत नाहीत. तसेच या विविध कारणामुळे ते आपल्या मुला-मुलींना शिक्षण अर्ध्यावर सोडावयास लावतात. अशा प्रकारे दारिद्रय व शिक्षण यांचा जवळचा संबंध असल्याने दारिद्रयाचे मोजमाप करण्यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने 'शिक्षण' हा निकष विचारात घेतला आहे. खालील तक्त्यात शाळेत जाण्याचे वय उलटून गेले तरी मुला-बाळांना शाळेत दाखल न केलेल्या आणि ज्या कुटुंबातील मुला-मुलींनी शिक्षण अर्ध्यावर सोडले आहे त्याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक : 5.8**

**मुलांना शाळेत दाखल न केलेल्या आणि शिक्षण अर्ध्यावर सोडलेल्या कुटुंबांचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नांव | मुलांना शाळेत दाखल न केलेल्या, शिक्षण अर्ध्यावर सोडलेल्या कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 33 | 60 | 55.00 |
| 2 | ढोर कोळी | 34 | 60 | 56.66 |
| 3 | कातकरी | 33 | 60 | 55.00 |
| 4 | वारली | 27 | 60 | 45.00 |
| 5 | कोकणा | 39 | 60 | 65.00 |
| 6 | म ठाकूर | 25 | 60 | 41.66 |
| 7 | क ठाकूर | 24 | 60 | 40.00 |
| | एकूण | 215 | 420 | 51.19 |

संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी 215 कुटुंबातील (51.19 टक्के) मुलांनी शिक्षण अर्ध्यावर सोडले आहे. तसेच या कुटुंबांनी शाळेचे वय उलटून गेले तरी आपल्या मुलांना शाळेत दाखल केलेले नाही. त्यामुळे दारिद्र्याच्या शिक्षण निकषानुसार मोखाडा तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण 51.19 टक्के इतके पडते. मुलांना शाळेत दाखल न केलेल्या आणि शिक्षण अर्ध्यावर सोडलेल्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कोकणा या जमातीत आहे (65.00 टक्के). म्हणून शिक्षण निकषानुसार या जमातीत दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे. मुलांना शाळेत दाखल न केलेल्या व शिक्षण अर्ध्यावर सोडलेल्या कुटुंबांचे सर्वात कमी प्रमाण क ठाकूर (40.00 टक्के)

आणि म ठाकूर (41.66 टक्के) या जमातीत आहे. म्हणून शिक्षण निकषानुसार इतर जमातींच्या तुलनेत या दोन जमातीत दारिद्र्याचे प्रमाण कमी आहे.

### 5.9 बेरोजगारी निकष:-

बेरोजगारी आणि दारिद्र्य यांचा जवळचा संबंध आहे. कारण बेकारी हे दारिद्र्याचे महत्वाचे कारण आहे. म्हणून आदिवासीमधील दारिद्र्याचे प्रमाण मोजण्यासाठी बेराजगारी हा निकष विचारात घेतला आहे. अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींना वर्षातील सरासरी 133 दिवस रोजगार मिळतो. उर्वरित काळ बेकारीच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागते. बेकारीचा काळ खूप मोठा असल्याने आदिवासींच्या दारिद्र्याची तीव्रताही मोठी असल्याचे दिसून आले. खालील तक्त्यात वर्षातील 200 पेक्षा जास्त दिवस बेकारीच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण जमातीनुसार दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक :- 5.9**

**बेकारीच्या प्रश्नास तोंड द्यावे लागणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नांव | बेकारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या कुटुंबाची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 51 | 60 | 85.00 |
| 2 | ढोर कोळी | 57 | 60 | 95.00 |
| 3 | कातकरी | 59 | 60 | 98.33 |
| 4 | वारली | 57 | 60 | 95.00 |
| 5 | कोकणा | 56 | 60 | 93.33 |
| 6 | म ठाकूर | 55 | 60 | 91.66 |
| 7 | क ठाकूर | 52 | 60 | 86.66 |
| | एकूण | 387 | 420 | 92.14 |

संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी 387 कुटुंबांना (92.14 टक्के) वर्षातील जास्तीत जास्त काळ बेकारीच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागते. म्हणून बेकारीच्या निकषानुसार अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुटुंबांचे प्रमाण 92.14 टक्के एवढे मोठे आहे. बेकारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण कातकरी या जमातीत खूप मोठे आहे (98.33 टक्के). म्हणून बेकारीच्या निकषानुसार कातकरी जमातीत दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे. कातकरी जमाती खालोखाल ढोर कोळी (95.00 टक्के), वारली (95.00 टक्के) कोकणा (93.33 टक्के), म ठाकूर (91.66 टक्के) या जमातीत बेकारीचा प्रश्न

भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे आहे. म्हणून बेकारीच्या निकषानुसार कातकरी जमातीखालोखाल या जमातीत दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे. इतर जमातींच्या तुलनेत महादेव कोळी जमातीत आणि क ठाकूर या जमातीत बेकारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण कमी आहे (अनुक्रमे 85.00 टक्के आणि 86.66 टक्के). म्हणून बेकारीच्या निकषानुसार या जमातीत इतर जमातींच्या तुलनेत दारिद्र्याचे प्रमाणही कमी आहे.

### 5.10 सुखसुविधा निकष:-

एखादे कुटुंब दारिद्र्य रेषेखाली आहे की नाही ते ठरविण्यासाठी 'घरातील सुखसुविधा' हा निकष विचारात घेतला आहे.कारण ज्या कुटुंबांची आर्थिक स्थिती चांगली असते तीच कुटुंबे पंखा,रेडिओ अशा विविध वस्तू विकत घेऊन त्याचा लाभ घेऊ शकतात. परंतु गरीब किंवा दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे विविध सुखसुविधांचा लाभ घेऊ शकत नाहीत. म्हणून दारिद्र्याचे मोजमाप करण्यासाठी सुखसुविधांची उपलब्धता हा निकष महत्वाचा मानला आहे. सुख-सुविधा देणाऱ्या वस्तूंमध्ये स्वयंपाकाचा गॅस, स्वयंचलित वाहन, पंखा, टी.व्ही, टेपरेकॉर्डर,प्रेशर कुकर, रेडिओ,लोखंडी तिजोरी इत्यादी वस्तूंचा समावेश केला असून खालील तक्त्यात विविध आदिवासी जमातीतील किती कुटुंबांकडे सुखसुविधा देणाऱ्या वस्तू नाहीत याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक : 5.10**

**सुखसुविधा देणाऱ्या वस्तू नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नांव | सुखसुविधा देणाऱ्या वस्तू नसलेल्या कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 47 | 60 | 78.33 |
| 2 | ढोर कोळी | 56 | 60 | 93.33 |
| 3 | कातकरी | 57 | 60 | 95.00 |
| 4 | वारली | 57 | 60 | 95.00 |
| 5 | कोकणा | 49 | 60 | 81.66 |
| 6 | म ठाकूर | 50 | 60 | 83.33 |
| 7 | क ठाकूर | 45 | 60 | 75.00 |
| | एकूण | 361 | 420 | 85.96 |

संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी 361 कुटुंबांकडे म्हणजे 85.96 टक्के कुटुंबांकडे सुखसुविधा देणाऱ्या वस्तू नाहीत. म्हणून दारिद्र्याच्या सुखसुविधा निकषानुसार अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील

कुटुंबांचे प्रमाण 85.96 टक्के पडते. हे प्रमाण खूप मोठे असल्याचे दिसून येते. इतर जमातींच्या तुलनेत कातकरी आणि वारली जमातीत सुखसुविधा देणाऱ्या वस्तू नसलेल्या कुटुबांचे प्रमाण मोठे आहे (प्रत्येकी 95.00 टक्के). या जमातीतील केवळ प्रत्येकी 5.00 टक्के कुटुंबांजवळ सुख सुविधा देणाऱ्या वस्तू आहेत. म्हणून दारिद्रयाच्या सुखसुविधा निकषानुसार या दोन जमातीत दारिद्रयाचे प्रमाण मोठे आहे. कातकरी आणि वारली या जमाती खालोखाल ढोर कोळी या जमातीत सुखसुविधा देणाऱ्या वस्तू नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे आहे (93.33 टक्के). म ठाकूर या जमातीत हे प्रमाण 83.33 टक्के तर कोकणा जमातीत 81.66 टक्के आहे. इतर जमातींच्या तुलनेत क ठाकूर जमातीत सुखसुविधा देणाऱ्या वस्तू नसलेल्या कुटुंबांचे प्रमाण कमी आहे (75.00 टक्के). म्हणून दारिद्रयाच्या सुखसुविधा निकषानुसार क ठाकूर या जमातीत दारिद्रयाचे प्रमाण कमी आहे.

### 5.11 शेतजमीन निकष:-

भूमिहीनता आणि तुटपुंजी, निकृष्ट शेती हे दारिद्रयास जबाबदार असणारे प्रमुख घटक आहेत. म्हणून दारिद्रयाचे मोजमाप करण्यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने 'शेतजमीन' निकष विचारात घेतला आहे. खालील तक्त्यात भूमिहीन आदिवासी कुटुंबांची संख्या आणि ज्या आदिवासी कुटुंबांकडे सहा एकर किंवा त्यापेक्षा कमी कोरडवाहू जमीन आहे, त्या कुटुंबांची संख्या एकत्रितपणे दर्शविली आहे. तसेच सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या आणि शेकडा प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक : ५.११**

**भूमिहीन आणि सहा एकरपेक्षा कमी निकृष्ट शेती असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण:**

| अ.क्र. | जमातीचे नांव | भूमिहीन व सहा एकर पेक्षा कमी जमीन असणाऱ्या कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 52 | 60 | 86.66 |
| 2 | ढोर कोळी | 56 | 60 | 93.33 |
| 3 | कातकरी | 58 | 60 | 96.66 |
| 4 | वारली | 56 | 60 | 93.33 |
| 5 | कोकणा | 45 | 60 | 75.00 |
| 6 | म ठाकूर | 53 | 60 | 88.33 |
| 7 | क ठाकूर | 54 | 60 | 90.00 |
| | एकूण | 374 | 420 | 89.04 |

संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी 374 कुटुंबे (89.04 टक्के) भूमिहीन व सहा एकरापेक्षा कमी जमीन असणारी आहेत. म्हणून दारिद्र्याच्या शेत जमीन निकषानुसार अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण 89.04 टक्के पडते. भूमीहीन आणि सहा एकरापेक्षा कमी शेत जमीन असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी या जमातीत असून ते 96.66 टक्के आहे. म्हणून इतर जमातींच्या तुलनेत कातकरी जमातीत दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे. कातकरी जमाती खालोखाल ढोर कोळी (93.33 टक्के), वारली (93.33 टक्के),क ठाकूर (90.00 टक्के), म ठाकूर (88.33 टक्के) आणि महादेव कोळी (86.66 टक्के) या जमातीत भूमिहीन व सहा एकरापेक्षा कमी शेत जमीन असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे आहे. इतर जमातींच्या तुलनेत कोकणा जमातीत हे प्रमाण कमी आहे(75.00 टक्के).म्हणून या जमातीत दारिद्र्याचे प्रमाण कमी आहे.

### 5.12 वस्त्र निकष:-

दारिद्र्यामुळे किंवा अपुऱ्या उत्पन्नामुळेच व्यक्तीला पुरेशा किंवा अंगभर वस्त्रांचा उपभोग घेता येत नाही. म्हणून दारिद्र्याचे मोजमाप करण्यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने 'वस्त्र' निकष सुद्धा विचारात घेतला आहे. अंगावरची कपडे, अंथरूण, पांघरूण (चादरी,गोधडी इत्यादी) यांचा समावेश वस्त्रात केला आहे. खालील तक्त्यात ज्या आदिवासी कुटुंबांना आपल्या उत्पन्नातून पुरेशी वस्त्रे विकत घेता येत नाहीत किंवा ज्यांच्याकडे पुरेशी वस्त्रे आढळून आली नाहीत त्या कुटुंबांची संख्या व प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक : 5.12**

**पुरेशी वस्त्रे नसलेल्या कुटुंबांचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नांव | पुरेशी वस्त्रे नसलेल्या कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 53 | 60 | 88.33 |
| 2 | ढोर कोळी | 59 | 60 | 98.33 |
| 3 | कातकरी | 60 | 60 | 100.00 |
| 4 | वारली | 58 | 60 | 96.66 |
| 5 | कोकणा | 57 | 60 | 95.00 |
| 6 | म ठाकूर | 57 | 60 | 95.00 |
| 7 | क ठाकूर | 54 | 60 | 90.00 |
| | एकूण | 398 | 420 | 94.76 |

संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षण केलेल्या 420 आदिवासी कुटुंबांपैकी पुरेशी वस्त्रे नसलेल्या कुटुंबांचे प्रमाण 94.76 टक्के एवढे मोठे आहे. म्हणून दारिद्र्याच्या वस्त्र निकषानुसार अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुटुंबांचे प्रमाण 94.76 टक्के पडते. पुरेशी वस्त्रे नसलेल्या कुटुंबांचे प्रमाण कातकरी या जमातीत सर्वात जास्त असून ते 100 टक्के एवढे आहे. म्हणून या जमातीत दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे, असा निष्कर्ष निघतो. कातकरी जमाती खालोखाल ढोर कोळी (98.33 टक्के), वारली (96.66 टक्के), कोकणा (95.00 टक्के) म ठाकूर (95.00 टक्के), क ठाकूर (90.00 टक्के) आणि महादेव कोळी (88.33 टक्के) या जमातीत पुरेशी वस्त्रे नसलेल्या कुटुंबांचे प्रमाण मोठे आहे. वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित सर्वच जमातीत पुरेशी वस्त्रे नसलेल्या कुटुंबांचे प्रमाण 85.00 टक्केपेक्षा जास्त आहे. म्हणून दारिद्र्याच्या वस्त्र निकषानुसार सर्वच जमातीत दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे.

### 5.13 आरोग्य खर्च निकष:-

अन्न,वस्त्र,निवारा,आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत किंवा प्राथमिक गरजासुद्धा ज्यांना आपल्या उत्पन्नातून भागविता येत नाहीत. त्या कुटुंबांना दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे असे म्हणतात. अशी दारिद्र्याची सर्वसाधारण व्याख्या सांगितली जाते. म्हणून प्रस्तुत अभ्यासकाने अभ्यास क्षेत्रातील दारिद्र्याचे मोजमाप करण्यासाठी अन्न,वस्त्र, निवारा,आरोग्य आणि शिक्षण या निकषाबरोबरच 'आरोग्यावरील खर्च' हा निकष सुद्धा विचारात घेतला आहे. सरकारची प्राथमिक आरोग्य केंद्रे, कुटीर रूग्णालये इत्यादी ठिकाणी आदिवासींना बरीचशी औषधे मोफत मिळतात. परंतु तेथे काही औषधे आदिवासींना दिली जात नाहीत. काही औषधे त्यांना बाहेरून (खाजगी मेडिकल दुकानातून)विकत आणावयास सांगितले जाते. शिवाय गरीब, आडाणी आदिवासींना सरकारी आरोग्य यंत्रणेतील कर्मचाऱ्याकडून फारशी चांगली वागणूक दिली जात नाही. या कारणामुळे आदिवासी खाजगी दवाखाने,भगत यांच्याकडे औषधोपचार घेतात. सरकारी दवाखान्यातील डॉक्टरांनी खाजगी दुकानातून विकत आणावयास सांगितलेली औषधेही गरीबीमुळे पुरेशा प्रमाणात किंवा अजिबातच विकत आणू शकत नाहीत. तसेच ते खाजगी दवाखान्यावर पुरेसा खर्च करू शकत नाहीत असे सर्व्हेक्षणात आढळून आले. म्हणून जी आदिवासी कुटुंबे आवश्यकता असतानाही पुरेशा प्रमाणात औषध पाणी विकत घेऊन त्यांचा लाभ घेऊ शकत नाहीत त्यांचा समावेश दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांत केला पाहिजे. खालील तक्त्यात आरोग्यावर पुरेसा खर्च करू न शकणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक : 5.13**

**आरोग्यावर पुरेसा खर्च करू न शकणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नांव | आरोग्यावर पुरेसा खर्च करू न शकणाऱ्या कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 52 | 60 | 86.66 |
| 2 | ढोर कोळी | 58 | 60 | 96.66 |
| 3 | कातकरी | 60 | 60 | 100.00 |
| 4 | वारली | 57 | 60 | 95.00 |
| 5 | कोकणा | 54 | 60 | 90.00 |
| 6 | म ठाकूर | 56 | 60 | 93.33 |
| 7 | क ठाकूर | 49 | 60 | 81.66 |
| | एकूण | 386 | 420 | 91.90 |

संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी 386 कुटुंबे (91.90 टक्के) आरोग्यावर पुरेसा खर्च करू शकत नाहीत. म्हणून दारिद्र्याच्या आरोग्य खर्च निकषानुसार अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण 91.90 टक्के पडते.आरोग्यावर पुरेसा खर्च करू न शकणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी या जमातीत आहे(100 टक्के).म्हणून या जमातीत दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे. कातकरी जमाती खालोखाल ढोर कोळी (96.66 टक्के), महादेव कोळी (86.66 टक्के) आणि क ठाकूर (81.66 टक्के) या जमातीत आरोग्यावर पुरेसा खर्च करू न शकणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे आहे. वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्वच जमातीत आरोग्यावर पुरेसा खर्च करू न शकणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण 80.00 टक्केपेक्षा जास्त आहे. म्हणून दारिद्र्याच्या आरोग्य खर्च निकषानुसार सर्वच जमातीत दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे.

### 5.14 स्वस्त धान्य दुकान निकष:-

बऱ्यापैकी शेती असणारे किंवा ज्यांना आपल्या शेतीतून पुरेसे अन्नधान्य मिळते असे आदिवासी आणि नोकरदार आदिवासी सरकारच्या स्वस्त धान्य दुकानातून धान्य खरेदी करत नाहीत असे सर्व्हेक्षणात आढळून आले. म्हणून दारिद्र्याचे प्रमाण पाहण्यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने स्वस्त धान्य दुकानांचा लाभ घेणारी कुटुंबे हा निकष विचारात घेतला आहे. खालील तक्त्यात स्वस्त धान्य दुकानांचा लाभ घेणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक : 5.14

स्वस्त धान्य दुकानांचा लाभ घेणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण

| अ.क्र. | जमातीचे नांव | स्वस्त धान्य दुकानांचा लाभ घेणाऱ्या कुटुंबाची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 53 | 60 | 88.33 |
| 2 | ढोर कोळी | 59 | 60 | 98.33 |
| 3 | कातकरी | 60 | 60 | 100.00 |
| 4 | वारली | 58 | 60 | 96.66 |
| 5 | कोकणा | 57 | 60 | 95.00 |
| 6 | म ठाकूर | 57 | 60 | 95.00 |
| 7 | क ठाकूर | 54 | 60 | 90.00 |
| | एकूण | 398 | 420 | 94.76 |

संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी 398 कुटुंबे (94.76 टक्के) स्वस्त धान्य दुकानांचा लाभ घेणारी आहेत. म्हणून दारिद्रयाच्या या निकषानुसार अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण 94.76 टक्के एवढे पडते. स्वस्त धान्य दुकानातून धान्य खरेदी करणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी या जमातीत आहे. या जमातीतील सर्व्हेक्षित सर्व 60 कुटुंबे स्वस्त धान्य दुकानावर अवलंबून आहेत. म्हणून या जमातीत दारिद्रयाचे प्रमाण मोठे आहे असा निष्कर्ष निघतो. कातकरी जमाती खालोखाल ढोर कोळी (98.33 टक्के) वारली (96.66 टक्के), कोकणा (95.00 टक्के) म ठाकूर (95.00 टक्के), क ठाकूर (90.00 टक्के) आणि महादेव कोळी (88.33 टक्के) या जमातीत स्वस्त धान्य दुकानावर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्वच जमातीत स्वस्त धान्य दुकानावर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे (सरासरी 85.00 टक्केपेक्षा जास्त). म्हणून दारिद्रयाच्या स्वस्त धान्य दुकानावर अवलंबून असलेली कुटुंबे या निकषानुसार सर्वच जमातीत दारिद्रयाचे प्रमाण मोठे आहे .

### 6.0 दारिद्रयाचे प्रमाण :

या विभागात निकषानुसार दारिद्रयाचे प्रमाण,जमातीनुसार दारिद्रयाचे प्रमाण, अभ्यास क्षेत्रातील आदिवासींच्या अन्न व अन्नेतर खर्चाचे प्रमाण, आदिवासींचा आर्थिक दर्जा, सरकारच्या उपभोग खर्च निकषानुसार अभ्यासक्षेत्रातील आदिवासीमधील दारिद्रयाचे प्रमाण इत्यादी बाबींची माहिती थोडक्यात दिली आहे.

### 6.1 निकषानुसार दारिद्रयाचे प्रमाण

खालील तक्त्यात दारिद्रयाच्या विविध 14 निकषांचा एकत्रित विचार करून दारिद्रयाचे प्रमाण

काढले आहे.

**तक्ता क्रमांक : 6.1 अभ्यासक्षेत्रातील दारिद्रयाचे प्रमाण**

| अ.क्र. | दारिद्रयाचे निकष | निकषा नुसार कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | उत्पन्न | 205 | 420 | 48.80 |
| 2 | उपासमार | 316 | 420 | 75.24 |
| 3 | स्थलांतर | 270 | 420 | 64.28 |
| 4 | उपभोग कर्ज | 339 | 420 | 80.71 |
| 5 | उत्पन्न--खर्च तूट | 351 | 420 | 83.57 |
| 6 | मजुरी | 386 | 420 | 91.90 |
| 7 | घर | 361 | 420 | 85.95 |
| 8 | शिक्षण | 215 | 420 | 51.19 |
| 9 | बेकारी | 387 | 420 | 92.14 |
| 10 | सुखसुविधा | 361 | 420 | 85.96 |
| 11 | शेत जमीन | 374 | 420 | 89.04 |
| 12 | वस्त्र | 398 | 420 | 94.76 |
| 13 | आरोग्य | 386 | 420 | 91.90 |
| 14 | स्वस्त धान्य दुकान | 398 | 420 | 94.76 |
| | एकूण व सरासरी | 4747(339.07) | 5880 (420) | 80.73 |

१)संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण

२) टीप --कंसातील आकडे सरासरी दर्शवितात.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, दारिद्रयाच्या विविध 14 निकषानुसार अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील आदिवासी कुटुंबांचे प्रमाण 80.73 टक्के एवढे आहे.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, दारिद्रयाच्या विविध 14 निकषांपैकी 'वस्त्र निकष' आणि 'स्वस्त धान्य दुकान निकष' या दोन निकषानुसार दारिद्रयाचे प्रमाण जास्त आहे. हे प्रमाण प्रत्येकी 94.76 टक्के एवढे आहे. तर उत्पन्न निकषानुसार दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण अत्यंत कमी असून ते 48.80 टक्के एवढे आहे.उत्पन्न खर्च तूट, शेत जमीन, मजुरी आणि बेकारी हे निकष आणि दारिद्रय यामध्ये तुलनात्मकदृष्ट्या इतर घटकांपेक्षा जवळचे संबंध असल्याचे वरील कोष्टकावरून दिसून येते.

### 6.2 जमातीनुसार दारिद्रयाचे प्रमाण :

खालील तक्त्यात जमातीनुसार अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील किती कुटुंबे दारिद्रय रेषेखाली आहेत याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक : 6.2**

**जमातीनुसार दारिद्रयाचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नांव | दारिद्रयाच्या विविध 14 निकषांनुसार कुटुंबांची संख्या | दारिद्रयाच्या विविध निकषानुसार कुटुंबांची सरासरी संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची सरासरी संख्या | शेकडा प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 614 | 43.85 | 840 | 60 | 73.09 |
| 2 | ढोर कोळी | 720 | 51.42 | 840 | 60 | 85.71 |
| 3 | कातकरी | 753 | 53.78 | 840 | 60 | 89.64 |
| 4 | वारली | 708 | 50.57 | 840 | 60 | 84.28 |
| 5 | कोकणा | 637 | 54.50 | 840 | 60 | 75.83 |
| 6 | म ठाकूर | 658 | 47.00 | 840 | 60 | 78.33 |
| 7 | क ठाकूर | 657 | 46.92 | 840 | 60 | 78.21 |
| | एकूण व सरासरी | 4747 | 339.07 | 5880 | 420 | 80.73 |

संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, दारिद्रयाच्या विविध 14 निकषानुसार सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी 339.07 कुटुंबे दारिद्रय रेषेखाली असून दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे सर्व्हेक्षित 420 कुटुंबांशी शेकडा प्रमाण 80.73 एवढे मोठे आहे.

विविध जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की , दारिद्रयाच्या विविध 14 निकषानुसार दारिद्रयरषेखालील कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी या जमातीत असून ते 89.64 टक्के आहे. त्या खालोखाल हे प्रमाण ढोर कोळी (85.71 टक्के) आणि वारली (84.28 टक्के) या जमातीत आहे. दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण म ठाकूर या जमातीत 78.33 टक्के, क ठाकूर जमातीत 78.21 टक्के, कोकणा जमातीत 75.83 टक्के तर महादेव कोळी जमातीत ते 73.09 टक्के आहे.


### 6.3 दारिद्रयाच्या विविध 14 निकषांनुसार अभ्यास क्षेत्रातील जमातीनुसार दारिद्रयाचे प्रमाण

खालील तक्त्यात उत्पन्न,उपासमार, स्थलांतर इत्यादी विविध 14 निकषांनुसार अभ्यास क्षेत्रातील विविध जमातीतील आदिवासीमधील दारिद्रयाचे प्रमाण दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक : 6.3
## दारिद्र्याच्या विविध 14 निकषांनुसार अभ्यास क्षेत्रातील जमातीनुसार दारिद्र्याचे प्रमाण

| अ. क्र. | दारिद्र्याचे निकष | जमातीचे नांव व दारिद्र्याचे शेकडा प्रमाण | | | | | | | सरासरी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | म. कोळी | ढोर कोळी | कातकरी | वारली | कोकणा | म ठाकूर | क ठाकूर | |
| 1 | उत्पन्न | 48.33 | 63.34 | 31.67 | 46.66 | 45.00 | 45.00 | 61.67 | 48.80 |
| 2 | उपासमार | 58.34 | 81.67 | 95.00 | 89.67 | 53.34 | 70.00 | 81.67 | 75.24 |
| 3 | स्थलांतर | 43.33 | 58.33 | 95.00 | 76.66 | 51.66 | 56.67 | 68.38 | 64.28 |
| 4 | उपभोग कर्ज | 73.33 | 86.66 | 96.66 | 88.33 | 63.33 | 73.33 | 83.33 | 80.71 |
| 5 | उत्पन्न –खर्च तूट | 76.66 | 90.00 | 96.66 | 88.33 | 71.66 | 80.00 | 81.66 | 83.57 |
| 6 | मजूरी | 86.66 | 96.66 | 100.00 | 95.00 | 90.00 | 93.33 | 81.66 | 91.90 |
| 7 | घर | 68.33 | 91.66 | 95.00 | 81.66 | 91.66 | 90.00 | 83.33 | 85.95 |
| 8 | शिक्षण | 55.00 | 56.66 | 55.00 | 45.00 | 65.00 | 41.66 | 40.00 | 51.19 |
| 9 | बेकारी | 85.00 | 95.00 | 98.33 | 95.00 | 93.33 | 91.66 | 86.66 | 92.14 |
| 10 | सुख सुविधा | 78.33 | 93.33 | 95.00 | 95.00 | 81.66 | 83.33 | 75.00 | 85.96 |
| 11 | शेत जमीन | 86.66 | 93.33 | 96.66 | 93.33 | 75.00 | 88.33 | 90.00 | 89.04 |
| 12 | वस्त्र | 88.33 | 98.33 | 100.00 | 96.66 | 95.00 | 95.00 | 90.00 | 94.76 |
| 13 | आरोग्य | 86.66 | 96.66 | 100.00 | 95.00 | 90.00 | 93.33 | 81.66 | 91.90 |
| 14 | स्वस्त धान्य दुकान | 88.33 | 98.33 | 100.00 | 96.66 | 95.00 | 95.00 | 90.00 | 94.76 |
| | सरासरी | 73.09 | 85.71 | 89.64 | 84.28 | 75.83 | 78.33 | 78.21 | 80.73 |

**दारिद्र्य व इतर घटकातील सहसंबंध (Positive corelation)**



वर स्पष्ट केलेल्या दारिद्रयाच्या विविध 14 निकषांपैकी दारिद्रयावर सर्वात जास्त परिणाम करणाऱ्या नऊ घटकांपैकी कोणत्या घटकाचा दारिद्रयाशी जवळचा संबंध(Positive co-relation) आहे हे वरील आकृतीत आलेखाद्वारे (Graphical Method)दर्शविले आहे. दारिद्रयाच्या वक्राच्या दिशेने (Slope) ज्या घटकाच्या वक्रात बदल झाला आहे (moving in the same direction )आणि जो वक्र दारिद्रय वक्राच्या जवळ (closeness) पडलेला आहे. तो वक्र आणि दारिद्रयाचा वक्र यामध्ये धन सहसंबंध (positive corelation) असतात. या निकषावरून असे दिसून येते की, अनुक्रमे (1) उत्पन्न खर्च तूट (2) शेत जमीन (3)मजुरी आणि (4) बेकारी हे घटक आणि दारिद्रय यामध्ये तुलनात्मकदृष्ट्या इतर घटकापेक्षा जवळचे सहसंबंध आहेत. म्हणजे आदिवासींच्या दारिद्रयास हे घटक जास्त प्रमाणात कारणीभूत आहेत.

**तक्ता क्रमांक 6.3 चे स्पष्टीकरण**

वरील तक्त्यात सर्व्हेक्षण केलेल्या विविध सात जमातीतील दारिद्रयाच्या विविध निकषांनुसार दारिद्रयाचे प्रमाण दर्शविले आहे. वरील तक्त्याचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**1 महादेव कोळी:-**

वरील तक्त्यावरून असे दिसते की, दारिद्रयाच्या विविध 14 निकषांनुसार महादेव कोळी जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे शेकडा प्रमाण 73.09 इतके आहे. या जमातीत दारिद्रयाच्या 'वस्त्र' आणि 'स्वस्त धान्य दुकान' या निकषानुसार दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण सर्वात जास्त आहे (प्रत्येकी 88.33 टक्के). मजुरी, शेत जमीन आणि आरोग्य या निकषानुसार दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे शेकडा प्रमाण प्रत्येकी 86.66 इतके आहे. या जमातीत प्रतीवर्षी बेरोजगारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण 85.00 टक्के असल्याने दारिद्रयाच्या 'बेकारी' या निकषानुसार दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे शेकडा प्रमाण 85.00 इतके आहे. तर या जमातीत दारिद्रयाचे सर्वात कमी प्रमाण स्थलांतर या निकषानुसार असून ते 43.33 टक्के इतके आहे.

**2 ढोर कोळी:-**

वरील तक्त्यावरून असे दिसते की, दारिद्रयाच्या विविध 14 निकषांनुसार ढोर कोळी जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे शेकडा प्रमाण 85.71 इतके आहे. या जमातीत दारिद्रयाच्या वस्त्र आणि स्वस्त धान्य दुकान या निकषानुसार दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. (प्रत्येकी 98.33 टक्के). या जमातीत दारिद्रयाचे प्रमाण मजुरी आणि आरोग्य या निकषांनुसार प्रत्येकी 96.66 टक्के आहे. तर बेकारी निकषानुसार 95.00 टक्के आहे. ढोरकोळी जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे सर्वात कमी प्रमाण शिक्षण या निकषानुसार असून ते 56.66 टक्के आहे. तर स्थलांतर निकषानुसार दारिद्रयाचे प्रमाण 58.33 टक्के आहे.

**3. कातकरी:-**

वरील तक्त्यावरून असे दिसते की, दारिद्रयाच्या विविध 14 निकषानुसार कातकरी जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे शेकडा प्रमाण 89.64 इतके आहे. या जमातीत दारिद्रयाच्या मजुरी, वस्त्र, आरोग्य आणि स्वस्त धान्य दुकान या निकषानुसार दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण सर्वात जास्त असून ते प्रत्येकी 100 टक्के आहे. या

जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे सर्वात कमी प्रमाण उत्पन्न निकषानुसार असून ते 31.67 टक्के आहे.

## 4. वारली:-

वरील तक्त्यावरून असे दिसते की, दारिद्रयाच्या विविध 14 निकषानुसार वारली जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे शेकडा प्रमाण 84.28 इतके आहे. या जमातीत दारिद्रयाच्या वस्त्र आणि स्वस्त धान्य दुकान या दोन निकषांनुसार दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण सर्वात जास्त असून प्रत्येकी 96.66 टक्के आहे. या जमातीत दारिद्रय रेषेखाली कुटुंबांचे सर्वात कमी प्रमाण शिक्षण (54.00 टक्के) व उत्पन्न (46.66 टक्के) निकषांनुसार आहे.

## 5. कोकणा

वरील तक्त्यावरून असे दिसते की, दारिद्रयाच्या विविध निकषानुसार कोकणा जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण 75.83 टक्के एवढे आहे. या जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण 'वस्त्र' आणि 'स्वस्त धान्य दुकान' या निकषानुसार असून ते प्रत्येकी 95.00 टक्के आहे. तर 'बेकारी' निकषानुसार दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे शेकडा प्रमाण 93.33 इतके आहे. या जमातीत दारिद्रय रेषेखालील कटुंबांचे सर्वात कमी प्रमाण 'उत्पन्न' निकषानुसार असून ते 45.00 टक्के आहे.

## 6. म. ठाकूर

वरील तक्त्यावरून असे दिसते की, दारिद्रयाच्या विविध 14 निकषानुसार म ठाकूर जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण 78.33 टक्के आहे. या जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण 'वस्त्र' आणि 'स्वस्त' धान्य दुकान या निकषानुसार असून ते प्रत्येकी 95.00 टक्के आहे. तर 'मजूरी' आणि 'आरोग्य' निकषानुसार दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे शेकडा प्रमाण 93.33 इतके आहे. या जमातीत दारिद्रय रेषेखालील कटुंबांचे सर्वात कमी प्रमाण 'शिक्षण' निकषानुसार असून 41.66 टक्के आहे. तर उत्पन्न निकषानुसार दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण 45.00 टक्के एवढे आहे.

## 7 क ठाकूर

वरील तक्त्यावरून असे दिसते की, दारिद्रयाच्या विविध 14 निकषांनुसार क ठाकूर जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण 78.21 टक्के आहे. या जमातीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण शेत जमीन, वस्त्र आणि स्वस्त धान्य दुकान या निकषानुसार असून ते प्रत्येकी 90.00 टक्के आहे. तर बेकारी निकषानुसार दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे शेकडा प्रमाण 86.66 इतके आहे. तर उपभोग, कर्ज, आणि घर या निकषानुसार दारिद्रयाचे प्रमाण प्रत्येकी 83.33 टक्के आहे. या जमातीत प्रति कुटुंब वार्षिक सरासरी 20,000 रूपयापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांचे प्रमाण 61.67 टक्के एवढे आहे. म्हणून दारिद्रयाच्या उत्पन्न निकषानुसार दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण 61.67 टक्के एवढे येते. या जमातीत दारिद्रय रेषेखालील कटुंबांचे सर्वात कमी प्रमाण शिक्षण निकषानुसार असून ते 40.00 टक्के आहे.

## 6.4 अभ्यास क्षेत्रातील आदिवासींचा अन्न व अन्नेत्तर खर्च

अन्नेतर बाबींवरील खर्चापेक्षा अन्न बाबीवर खर्च जास्त असणे हे दारिद्रयाचे किंवा गरीबीचे लक्षण समजले जाते. म्हणून अभ्यास क्षेत्रातील आदिवासी कुटुंबांचे दारिद्रय समजून घेण्यासाठी त्यांच्या अन्न व अन्नेत्तर खर्चाची माहिती घेतली. ती खालील तक्त्यात दिली आहे.

**तक्ता क्रमांक : 6.4**

**अभ्यास क्षेत्रातील अदिवासींचा अन्न व अन्नेतर खर्च**

| अ.क्र. | जमातींचे नांव | अन्न खर्चाचे प्रमाण | अन्नेत्तर खर्चाचे प्रमाण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 58.22 | 41.78 | 100 |
| 2 | ढोर कोळी | 63.20 | 36.80 | 100 |
| 3 | कातकरी | 59.47 | 40.53 | 100 |
| 4 | वारली | 62.20 | 37.80 | 100 |
| 5 | कोकणा | 63.75 | 36.25 | 100 |
| 6 | म ठाकूर | 63.77 | 36.23 | 100 |
| 7 | क ठाकूर | 59.11 | 40.89 | 100 |
| | एकूण | 61.38 | 38.62 | 100 |

संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, विविध सात आदिवासी जमातींचा सरासरी अन्न खर्च हा अन्नेतर खर्चापेक्षा जास्त आहे. सरासरी अन्न खर्च 61.38 टक्के आहे. तर अन्नेतर खर्च हा 38.62 टक्के आहे. याचा अर्थ आदिवासी कुटुंबाचे 100 रूपयांपैकी 61.38 रूपये अन्न बाबीवर खर्च होतात तर 38.62 रूपये अन्नेतर बाबीवर खर्च होतात. अशा प्रकारे अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींचा अन्नेतर बाबींवरील खर्चापेक्षा अन्न बाबीवरील खर्च जास्त असल्याने अभ्यास क्षेत्रातील सर्वच जमातीत दारिद्रयाचा प्रश्न गंभीर आहे असा निष्कर्ष निघतो.

विविध सात जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्यावरून असे दिसते की, अन्नेतर बाबीपेक्षा अन्य बाबींवरील सर्वात ज्यास्त खर्च म ठाकूर या जमातीचा आहे. या जमातीत सरासरी अन्नेतर खर्च 36.23 टक्के आहे. तर अन्न खर्च 63.77 टक्के आहे. म ठाकूर जमाती खालोखाल कोकणा, ढोर कोळी आणि वारली या जमातीत अन्नेतर बाबीपेक्षा अन्न बाबींवरील सरासरी खर्च जास्त आहे. महादेव कोळी जमातीत सरासरी अन्न खर्चाचे प्रमाण 58.22 टक्के आहे. तर अन्नेतर खर्चाचे प्रमाण 41.78 टक्के आहे. वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्वच आदिवासी जमातीत अन्नेतर खर्चापेक्षा अन्नावरील खर्चाचे प्रमाण जास्त आहे.

## 6.5 अभ्यास क्षेत्रातील आदिवासींचा आर्थिक दर्जा

अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या दारिद्र्याचे स्वरूप पाहण्यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने 'आर्थिक दर्जा' (Economic Status ) हा एक निकष विचारात घेतला आहे. त्यासाठी सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांच्या मालकीच्या पशुधनाचे मूल्य (4669660 रूपये), शेतकी अवजारांचे मूल्य किंवा किंमत (751317 रूपये ) आणि घरगुती वस्तूंच्या किंमती किंवा मूल्य (1707740 रूपये) यांची बेरीज करून त्यावरून प्राप्त झालेल्या एकूण मूल्याची (total value)किंवा एकूण किंमतीचा विचार केलेला आहे. अदिवासींचा आर्थिक दर्जा पाहण्यासाठी खालील सूत्राचा आधार घेतला आहे.

$$\text{दरडोई मालकीच्या मालमत्तेचे मूल्य} = \frac{\text{एकूण धारण केलेल्या मालमत्तेचे मूल्य}}{\text{एकूण कुटुंबांची संख्या}}$$

खालील तक्त्यात सर्व्हेक्षित सात जमातींचा आर्थिक दर्जा दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक : 6.5**

**जमातीनुसार आर्थिक दर्जा /दरडोई मालकीच्या मालमत्तेचे मूल्य**

| अ.क्र. | जमातीचे नांव | सर्व्हेक्षित कुटुंबांची संख्या | जमातीची एकूण लोकसंख्या | धारण केलेल्या मालमत्तेचे एकूण मूल्य (रूपये) | आर्थिक दर्जा(रू)/ दरडोई मालकीच्या मालमत्तेचे मूल्य(रू) | आर्थिक दर्जा नुसार क्रम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 60 | 329 | 1447514 | 4400 | 2 |
| 2 | ढोर कोळी | 60 | 301 | 307211 | 1021 | 7 |
| 3 | कातकरी | 60 | 344 | 527501 | 1529 | 6 |
| 4 | वारली | 60 | 358 | 610139 | 1704 | 5 |
| 5 | कोकणा | 60 | 375 | 1494021 | 3984 | 3 |
| 6 | म ठाकूर | 60 | 357 | 1264649 | 3542 | 4 |
| 7 | क ठाकूर | 60 | 261 | 1477682 | 5662 | 1 |
| | एकूण | 420 | 2325 | 7128717 | 3066 | |

संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, विविध सात आदिवासी जमातीतील सरासरी दरडोई मालकीच्या मालमत्तेचे मूल्य 3066 रूपये एवढे अल्प आहे. यावरून आदिवासींचा आर्थिक दर्जा अत्यंत निकृष्ट/निम्न पातळीचा असल्याचे स्पष्ट होते. आर्थिक दर्जानुसार विविध सात जमातीत क ठाकूर जमातीचा प्रथम क्रमांक लागतो. या जमातीतील आदिवासींच्या दरडोई मालकीच्या मालमत्तेचे मूल्य 5662 रूपये एवढे आहे. तर आर्थिक दर्जानुसार सातवा किंवा शेवटचा क्रम ढोर कोळी या जमातीचा लागतो. या जमातीतील दरडोई मालकीच्या मालमत्तेचे मूल्य अत्यंत कमी म्हणजे 1021 रूपये

एवढे आहे. कातकरी जमातीचा आर्थिक दर्जानुसार सहावा क्रम आहे. या जमातीतील दरडोई मालकीच्या मालमत्तेचे मूल्य 1529 रूपये आहे. वारली जमातीचा आर्थिक दर्जानुसार पाचवा क्रम असून या जमातीत दरडोई मालकीच्या मालमत्तेचे मूल्य 1704 रूपये इतके अल्प आहे. वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित सर्वच जमातीत दरडोई मालकीच्या मालमत्तेचे मूल्य कमी असल्याने या जमाती आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या आहेत असा निष्कर्ष निघतो.

### 6.6 सरकारच्या उपभोग खर्च निकषानुसार अभ्यास क्षेत्रातील आदिवासीमधील दारिद्रयाचे प्रमाण

सरकारच्या सन 2004 च्या दारिद्रय रेषा निकषानुसार ग्रामीण भागातील ज्या व्यक्तींचा दरडोई मासिक खर्च हा 368 रूपयांपेक्षा कमी आहे आणि शहरी भागात राहणाऱ्या ज्या व्यक्तिंचा दरडोई मासिक खर्च हा 559 रूपयांपेक्षा कमी आहे. त्या व्यक्तींना दारिद्रय रेषेखालील लोक असे संबोधले आहे. सरकारच्या या उपभोग खर्चाच्या निकषानुसार सर्व्हेक्षण केलेल्या विविध सात जमातीपैकी किती जमाती दारिद्रयरेषेखाली येतात याची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

**तक्ता क्रमांक : 6.6**

**सरकारच्या उपभोग खर्च निकषानुसार अभ्यास क्षेत्रातील आदिवासीमधील दारिद्रयाचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नांव | सर्व्हेक्षित जमातींचा दरडोई मासिक उपभोग खर्च (रूपये) | भारत सरकारच्या सन 2004 च्या दारिद्रय रेषा निकषानुसार दरडोई मासिक सरासरी उपभोग खर्च (रूपये) |
|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 345 | |
| 2 | ढोर कोळी | 323 | |
| 3 | कातकरी | 406 | |
| 4 | वारली | 328 | |
| 5 | कोकणा | 305 | |
| 6 | म ठाकूर | 336 | |
| 7 | क ठाकूर | 391 | |
| | सरासरी | 348 | 368 |

संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षण केलेल्या सात जमातींचा सरासरी दरडोई मासिक उपभोग खर्च हा 348 रूपये इतका असून सरकारने दारिद्रय रेषा ठरविण्यासाठी जी 368 रूपयांची मर्यादा घातली आहे. त्यापेक्षा तो कमी आहे. यावरून अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील आदिवासी किती गरीब आहेत याची कल्पना येते. कातकरी जमातीचा दरडोई मासिक उपभोग खर्च हा 406 रूपये आहे. तर क ठाकूर जमातीचा तो 391 रूपये आहे. या दोन जमाती

वगळता महादेव कोळी (345 रूपये), ढोर कोळी (323 रूपये), वारली (328 रूपये), कोकणा (305 रूपये ), म ठाकूर (336 रूपये) या जमातींचा मासिक उपभोग खर्च हा सरकारच्या सन 2004 च्या दारिद्रयाच्या दरडोई मासिक खर्च 368 रूपयांच्या निकषापेक्षा कमी असल्याने या जमाती दारिद्रय रेषेखालील जमाती ठरतात.

### 7.0 दारिद्रयास कारणीभूत घटक

अभ्यास क्षेत्रातील ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील 80.73 टक्के आदिवासी कुटुंबे दारिद्रय रेषेखाली असून त्यांच्या दारिद्रयास विविध घटक जबाबदार असल्याचे आढळून आले. ते घटक असे आहेत.

1 आदिवासींच्या विकासाच्या शेकडो योजना आहेत. परंतु विविध कारणांमुळे बहुसंख्य आदिवासी योजनांना प्रतिसाद देत नाहीत. उदा. कित्येक गरीब आदिवासी सवलतीचे (कमी व्याज दर + अनुदान) कर्ज ही घेण्यास पुढे येत नाहीत. आपल्या हातून कर्जाची परतफेड झाली नाही तर घर व शेती जप्त होईल अशी भीती त्यांना वाटते. त्यामुळे ते कर्ज घेण्यास पुढे येत नाहीत. गरीब आदिवासी गरीबच राहण्याचे हे एक प्रमुख कारण आहे.

2 सर्वेक्षणात असे आढळले की, दुर्गम आणि अतिदुर्गम भागातील बहुसंख्य आदिवासींना सरकारच्या विकास योजनांची माहितीच नाही. तसेच आदिवासीपर्यंत या योजना पोचविण्याची ज्यांची जबाबदारी आहे ते शासकीय कर्मचारी , अधिकारी प्रामाणिकपणे काम करत नाहीत. त्यामुळे अदिवासींना योजनांचा लाभ घेता येत नाही.

3 अदिवासी भागातील काही कर्मचारी केवळ कामचुकार नाहीत तर लाचखोर सुद्धा आहेत. त्यामुळे आदिवासींच्या विकासाच्या 365 पेक्षा अधिक योजना असूनही या योजनांचा लाभ घेऊन उन्नती करावी असे आदिवासींना वाटत नाही. आदिवासींच्या दारिद्रयाचे हे एक प्रमुख कारण आहे.

4 सर्व्हेक्षणात कातकरी, ढोर कोळी या जमातीतील आदिवासींनी सांगितले की, शासनाच्या विकास योजनांचा लाभ महादेव कोळी, वारली इत्यादी सारख्या जमातीनाच होतो. या जमातीचे लोक आमच्यापर्यंत योजना पोहचू देत नाहीत. अशा प्रकारे सामाजिकदृष्ट्या कनिष्ठ किंवा अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या कातकरी, ढोर कोळी इत्यादी जमाती गरीब असण्याचे प्रमुख कारण म्हणजे आदिवासी समाजातील स्वत:ला श्रेष्ठ समजणाऱ्या जमातीचे लोक कातकरी, ढोर कोळी इत्यादी जमातीपर्यंत योजना पोहचू देत नाहीत.

5 उपजीविकेसाठी वर्षातील काही महिने परगावी करावे लागणारे स्थलांतर हे सुध्दा आदिवासींच्या दारिद्रयाचे एक कारण आहे. परगावी स्थलांतर केल्याने काही दिवसापुरता पोटापाण्याचा प्रश्न सुटतो. परंतु जे आदिवासी कुटुंबातील सर्व सदस्यासहित परगावी स्थलांतर करतात त्यांना गावी राबविल्या जात असलेल्या सरकारी योजनांचा लाभ मिळत नाही.

6 आदिवासींना मिळणारी कमी मजूरी हे सुध्दा आदिवासींच्या दारिद्रयाचे मुख्य कारण आहे. आदिवासींना त्यांच्या भागात शेती क्षेत्रात रोज सरासरी 35 रूपये मजुरी मिळते. ही मजूरी अत्यंत अल्प असून या उत्पन्नात कुटुंबाची जेमतेम उपजीविका होते. सरकारच्या रोजगार योजनेतील

कामावर आणि परगावी स्थलांतरच्या ठिकाणी थोडी अधिक मजुरी मिळत असली तरी कुटुंबाच्या अन्न, वस्त्र इत्यादी गरजा त्यातून भागू शकत नाहीत.

7 आदिवासींच्या दारिद्र्यास कारणीभूत असणारा महत्वाचा घटक म्हणजे पुरेशा रोजगाराचा अभाव हे होय. आदिवासींना वर्षातून जेमतेम 133 दिवस रोजगार मिळतो. वर्षातील उर्वरित काळ (232 दिवस) त्यांना बेकारीत घालवावा लागतो. वर्षातील बराच काळ कामाशिवाय बसून रहावे लागत असल्याने आर्थिक हालाखीत वाढ होते.

8 सधन आदिवासी शेतकरी इतरांना आपली जमीन करण्यासाठी बटईने किंवा खंडाने देतात. परंतु कातकरी, ढोर कोळी इ. अतिमागासलेल्या आदिवासींना ते बटईने जमीन देत नाहीत. दारूच्या व्यसनामुळे आणि अन्य कारणामुळे ते या जमातींना जमीन कसण्याच्या क्षमतेचे मानत नाहीत . तसेच ज्या आदिवासींकडे बैल, अवजारे इत्यादी शेतीची साधने नसतात त्यांनाही मोठ्या शेतकऱ्यांकडून कसण्यासाठी जमीनी मिळत नाहीत. त्यामुळे गरीब आदिवासी गरीबच राहतात.

9 कुटुंबाचा मोठा आकार अथवा कुटुंबात लहान मुलांचे प्रमाण जास्त असणे हे सुध्दा आदिवासींच्या दारिद्र्याचे प्रमुख कारण आहे. सर्व्हेक्षित 420 आदिवासी कुटुंबांपैकी?टक्के कुटुंबाचा आकार मोठा आहे. तसेच सर्व्हेक्षित सात जमातींची एकूण लोकसंख्या 2325 इतकी असून त्यामध्ये 0 ते 6 वयोगटातील बालकांचे प्रमाण.? टक्के एवढे आहे. अशा प्रकारे आदिवासी कुटुंबाचा आकार मोठा असल्याने अन्न, वस्त्र या गरजा भागू शकत नाहीत.

10 शेती कसण्याच्या जुनाट पद्धती हे सुध्दा आदिवासींच्या दारिद्र्याचे एक कारण आहे. शेतीत देशी किंवा घरी साठवून ठेवलेले बियाणे आदिवासी वापरतात. शेण खतांचाही वापर पुरेसा केला जात नाही. शेतात वापरली जाणारी बरीचशी अवजारेही हातांनी बनवलेली असतात. ती तितकीशी उपयुक्तत नसतात. त्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढत नाही.

11 निसर्गाची प्रतिकूलता हा घटक सुध्दा आदिवासींच्या दारिद्र्यास कारणीभूत आहे. उदाहरणार्थ अतिपावसाच्या काळात कामासाठी बाहेर पडता येत नाही. तसेच हिवाळा आणि उन्हाळा कडक असतो. या काळातही काही दिवस काम उपलब्ध असले तरी त्यापासून वंचित रहावे लागते.

12 अशक्तपणा किंवा कुपोषण आणि दारिद्र्य यांचाही जवळचा संबंध आहे. वर्षातील काही दिवस होणाऱ्या उपासमारीमुळे प्रौढ व्यक्तीही अशक्त किंवा कुपोषित होतात. त्यामुळे जेवढे दिवस काम उपलब्ध असते तेवढे दिवस काम करता येत नाही. अशा प्रकारे उपासमारीमुळे दारिद्र्य आणि दारिद्र्यामुळे उपासमारीचा प्रश्न निर्माण होतो (उपासमार-दारिद्र्य-उपासमार).

13 कर्जावरील व्याजाचा मोठा दर हे सुध्दा दारिद्र्याचे एक कारण आहे. आदिवासींना उपभोग कर्जावर दरसाल दर शेकडा 50 टक्के पासून 100 टक्के पर्यंत व्याज द्यावे लागते. मजूरीचे बरेचसे उत्पन्न कर्जफेडीतच खर्च होते. त्यामुळे आदिवासी दारिद्र्य रेषेच्या वर येऊ शकत नाहीत.

14 आदिवासींच्या दारिद्र्यास कारणीभूत असणारा महत्वाचा घटक म्हणजे कर्जावरील

व्याजदराबरोबर इतर जाचक अटींचे पालन करावे लागणे हे होय. ज्यांच्याकडून आदिवासींनी कर्ज घेतलेले असते त्यांच्या शेतात ते बोलावतील तेव्हा आदिवासींना कामास जावे लागते. त्यांचे काम संपेपर्यंत त्यांच्याकडे अल्प मजुरीत राबावे लागते. दुसरीकडे जास्त मजुरी मिळत असली तरी कर्ज देणारांच्या शेतात कमी मजुरीत आदिवासींना कामास रहावे लागते.

15 आदिवासींच्या दारिद्र्यास वरील घटकांखेरीज अन्यही काही घटक जबाबदार आहेत. उदाहरणार्थ भूमिहीनता, अपुरी आणि निकृष्ट शेत जमीन , पूरक व्यवसायास कमी वाव, व्यसनाधिनता, काही खर्चिक प्रथा किंवा पद्धती उदाहरणार्थ विवाहावरील मोठा खर्च इत्यादी.

अशा प्रकारे आदिवासींच्या दारिद्र्यास वरील विविध घटक कारणीभूत आहेत. वरील स्पष्टीकरणावरून लक्षात येते की, आदिवासींच्या दारिद्र्यास केवळ शासनच कारणीभूत नाही तर आदिवासीसुद्धा कारणीभूत आहेत. उदाहरणार्थ सधन आदिवासी शेतकरी गरीब आदिवासींना ज्यादा व्याज दराने कर्ज देतात. थोड्या कर्जाच्या बदल्यात कमी मजुरीत वाटेल तितके दिवस राबवून घेतात. खंडाने जमीन देतात; परंतु भरमसाठ खंड वसूल करतात. गरीब आदिवासींच्या दारिद्र्यास जसे सधन आदिवासी कारणीभूत आहेत तसे स्वत: गरीब आदिवासीही कारणीभूत आहेत. उदाहरणार्थ सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढे न येणे किंवा सरकारी कर्ज घेण्यास घाबरणे, मजुरीचे उत्पन्न दारू, तंबाखू, विवाह, इतर प्रथा-परंपराचे पालन करण्यासाठी खर्च करणे, जास्तीत जास्त अपत्यांना जन्मास घालणे इ. विविध कारणांमुळे गरीब आदिवासी कायमपणे गरीबच राहतात.

## 8.0 दारिद्र्याच्या निराकरणासाठी काही शिफारशी :

आदिवासी समाजातील दारिद्र्याच्या निराकरणासाठी प्रस्तुत अभ्यासकाने काही शिफारशी खालीलप्रमाणे सुचविल्या आहेत.

### 1 योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे

महाराष्ट्रात आदिवासींच्या विकासासाठी जवळजवळ 365 योजना राबविल्या जातात. तरीही आदिवासींचे दारिद्र्य हटत नाही, ही चिंतेची बाब आहे. म्हणून दारिद्र्य निर्मूलनासाठी विकासाच्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे व प्रामाणिकपणे झाली पाहिजे. सर्व्हेक्षणात बहुसंख्य आदिवासींना सरकारच्या योजनांची माहितीच नसल्याचे आढळून आले. म्हणून प्रत्येक आदिवासी कुटुंबापर्यंत योजना पोहोचतील याची काळजी सरकारने घेतली पाहीजे. केवळ योजना आखून चालणार नाही तर योजना प्रभावीपणे राबवणे आणि प्रत्येक गरजू आदिवासीला त्यात सहभागी करून घेणे अत्यंत महत्वाचे आहे.

### 2 आदिवासी भागात झुणका-भाकर योजना सुरू करणे

महाराष्ट्र शासनाने 1995 साली संपूर्ण महाराष्ट्रात झुणका-भाकर योजना सुरू केली होती. या योजनेअंतर्गत जनतेला एक रूपयात एक भाकरी आणि झुणका खाण्यास मिळत होता. ही योजना म्हणजे गरीब आदिवासींना मोठे वरदान होते. परंतु काही वर्षापासून ही योजना बंद झाली आहे. संपूर्ण राज्यासाठी शासनाने ही योजना सुरू करणे आवश्यक आहे. जरी संपूर्ण राज्यासाठी ही योजना सुरू करता येणे शक्य नसले तरी कायम दुष्काळी प्रदेश,

डोंगराळ तालुके आणि आदिवासी पट्ट्यात ही योजना सुरू केली पाहीजे.

### 3 आदिवासी भागात पुरेशा रोजगार संधी निर्माण करणे

दारिद्रयाच्या उच्चाटनासाठी आदिवासींना त्यांच्या भागात वर्षभर पुरेसा रोजगार मिळणे आणि पुरेसे वेतन किंवा मजूरी मिळणे आवश्यक आहे. शेती क्षेत्रात सरकारच्या रोजगार योजनावर आणि परगावी स्थलांतराच्या ठिकाणी मिळून आदिवासींना वर्षातून सरासरी 133 दिवसच रोजगार मिळतो. उर्वरित काळात आदिवासींना बसून खावे लागते. म्हणून आदिवासी भागात शेतीची कामे संपल्यावर पुढची शेतीची कामे होईपर्यंत सरकारने रोजगार संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

### 4 शेतीची उत्पादकता वाढवणे

शेतीची कमी उत्पाकता हे सुध्दा आदिवासींच्या दारिद्रयाचे एक प्रमुख कारण आहे. बहुसंख्य आदिवासी शेतीत खतांचा वापर करत नाहीत. तसेच संकरित बियाणाऐवजी गावठी किंवा देशी बियाणांचा वापर करतात. त्यामुळे आदिवासींच्या शेतीची उत्पादकता कमी आहे. संकरित बियाणे आणि रासायनिक खते याविषयी आदिवासीमध्ये गैरसमज आहेत. हे गैरसमज दूर केल्यास आदिवासी संकरित बियाणे आणि रासायनिक खते यांचा वापर शेतीत करतील. त्यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ होऊ शकेल. त्यामुळे अन्न टंचाईचा प्रश्नही सुटेल आणि अधिक उत्पन्न मिळून सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या दारिद्रयाचा प्रश्न संपुष्टात येऊ शकेल.

### 5 पूरक व्यवसायास मदत करणे

विविध कारणामुळे आदिवासी भागात पूरक व्यवसाय चालत नाहीत. त्यामुळे आदिवासींचे दारिद्रय नष्ट होत नाही. सरकारने आदिवासींना त्यांच्या आवडीचे व्यवसाय सुरू करण्यास मदत केली आणि तेथील उत्पादने खरेदी करण्याची हमी घेतली तर आदिवासींना उत्पन्नाचे निश्चित साधन मिळून त्यांची गरीबी दूर होऊ शकेल.

### 6 जुगाराचे अड्डे उध्वस्त करणे

आदिवासी विभागात विविध स्वरूपात मटक्यासारखा जुगार आढळतो. असे अड्डे उध्वस्त करण्याची आवश्यकता आहे. कारण अनेक गरीब आदिवासी आपले मजुरीचे उत्पन्न जुगारावर खर्च करतात. त्यामुळे त्यांच्या आर्थिक हालाखीत वाढच होते. म्हणून आदिवासी भागातील जुगाराचे अड्डे सरकरने नष्ट केले पाहिजेत.

### 7 आदिवासींनी आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक

आदिवासींचा विकास करण्याची जबाबदारी जशी शासनाची आहे तशी स्वत: आदिवासींची सुध्दा आहे. सरकारी योजनांचा लाभ घेण्यास स्वत:हून पुढे येणे, आपल्या समस्या सरकारपर्यंत पोहचवतील आणि भ्रष्टाचार करणाऱ्या व लाचखोर अधिकाऱ्यावर जरब ठेवतील असे लोकप्रतिनिधी निवडणे , सावकाराकडून भरमसाठ व्याजाने कर्ज घेण्याऐवजी राष्टीयकृत बँकाकडून कर्ज घेऊन विकास करणे , व्यसन मुक्त होणे इत्यादी अनेक बाबींचे पालन आदिवासींनी केले पाहिजे. शासनाबरोबर शिक्षित आदिवासी , सामाजिक कार्यकर्ते आणि सेवाभावी संस्था यांनी यासंदर्भात

आदिवासींचे प्रबोधन केले पाहिजे. आदिवासी जागरूक राहिले तर त्यांच्यामधील जुनाट दारिद्र्याचे निराकरण होण्यास मदत होईल.

### 8 इतर उपाय

दारिद्र्याच्या निर्मूलनासाठी वरील उपायाबरोबर इतरही उपाय सुचवता येतील. उदाहरणार्थ भूमिहीनांना जमीनीचे वाटप करणे, विवाहासारख्या खर्चिक पद्धतीपासून आदिवासींनी दूर रहावे यासाठी प्रयत्न करणे, लहान कुटुंबाचे महत्व आदिवासींना पटवून देणे , अंधश्रध्दा व इतर अनिष्ट प्रथा परंपरेचे उच्चाटन करणे , विकास योजनांचे फायदे सर्व जमातीतील गरजू व गरीबांनाच मिळतील याची काळजी घेणे, भूमिहीनांना नोकऱ्यात प्राधान्य देणे , गावठी दारूच्या निर्मितीवर पायबंद घालणे, दारिद्र्य निर्मूलन योजनावरील खर्चात वाढ करणे इत्यादी.

### 9.0 समारोप

महाराष्ट्रात आदिवासींच्या विकासासाठी सुमारे 365 योजना राबविल्या जातात. तरीही सन 2000 मध्ये महाराष्ट्रातील दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुटुंबाचे प्रमाण 90.89 टक्के होते; तर प्रस्तुत अभ्यासकाने सन 2004 मध्ये केलेल्या सर्व्हेक्षणानुसार अभ्यास क्षेत्रातील ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण 80.73 टक्के होते. सरकारच्या सन 2004 च्या आकडेवारीनुसार भारतात 23.60 टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली होते. तर अभ्यास क्षेत्रातील दरिद्री कुटुंबांचे प्रमाण 80.73 टक्के होते. यावरून सर्वसाधारण लोकसंख्येतील दारिद्र्यापेक्षा आदिवासीमध्ये दारिद्र्याचे प्रमाण खूप मोठे आहे हे स्पष्ट होते. आदिवासीमधील दारिद्र्य निश्चित करण्यासाठी सरकारने केवळ उत्पन्न हाच निकष विचारात न घेता प्रस्तुत अभ्यासकाने सुचविलेल्या 14 निकषांचा विचार करावा. केवळ उत्पन्न हाच निकष विचारात घेतल्यास अनेक दरिद्री लोकांना दारिद्र्य निर्मूलन योजनांचे लाभ मिळणार नाहीत. भारत सरकारने दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या उत्पन्नाची मर्यादा 20,000 रूपयावरून 24,000 रूपयापर्यंत वाढवली आहे.ही उत्पन्न मर्यादा शासनाने 50,000 रूपयापर्यंत वाढवली पाहीजे. कारण बहुसंख्य आदिवासी मजुरी व्यवसायावर अवलंबून आहेत. त्यांना कष्टाची कामे करावी लागतात व दिवसातून तीन वेळ जेवण घ्यावे लागते. तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती दिवसेंदिवस वाढत आहेत. सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानातील वस्तूही आदिवासींना महाग वाटतात . ग्रामीण आणि शहरी समुदायाप्रमाणे आदिवासी समाजाचाही भारताच्या आर्थिक विकासात महत्वाचा सहभाग आहे. आदिवासी लोकांची कार्यक्षमता आणि आदिवासी भागातील उत्पन्नाच्या साधनांची उत्पादकता वाढविल्यास त्यांच्यातील दारिद्र्याचे प्रमाणही कमी होईल आणि त्यांचा आर्थिक विकासातील सहभाग हळूहळू वाढून तो अधिक महत्वपूर्ण होईल.

### संदर्भ:


1) वार्षिक आदिवासी उपयोजना , 2008-2009, महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, पृष्ठ क्र.430 व 431
2) महाजन मुकुंद , 'भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास', निराली प्रकाशन , पुणे , 2008, पृष्ठ क्र. 18.

3) तत्रैव पृष्ठ क्र.18.
4) अर्थसंवाद , खंड 28 , अंक 4, जानेवारी-मार्च 2005, मराठी अर्थशास्त्र परिषद , पृष्ठ क्रमांक 335-336.
5) प्रबोधन प्रकाशन ज्योती, प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी , डिसेंबर 2008, पृष्ठ क्र. 36,
6) इंगळे जे. एस्., महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्ह्यातील आदिवासींची आर्थिक आणि सामाजिक स्थिती, अप्रकाशित प्रबंध, ऑगष्ट 2008
7) महाजन मुकुंद , 'भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास', निराली प्रकाशन , पुणे , 2008, पृष्ठ क्र.18
8) देसाई व भालेराव , 'भारतीय अर्थव्यवस्था' , निराली प्रकाशन, पुणे, 2002, पृष्ठ क्र.45

# ॥ श्रध्दांजली ॥

**मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य व महात्मा फुले कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पनवेल जि.रायगड येथील अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.एन.टी.गडदे यांचे दि.15 जून 2009 रोजी अकस्मिक निधन झाले. ते 48 वर्षांचे होते 2001 साली पनवेल येथे संपन्न झालेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या रौप्यमहोत्सवी अधिवेशनात डॉ.गडदे यांनी मोलाचे योगदान दिले होते. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने डॉ.एन.टी.गडदे यांना विनम्र श्रध्दांजली.**

**प्रमुख संपादक**
**अर्थसंवाद**

# महाराष्ट्रातील अंदाजपत्रकीय बदलातील कल

**प्रकाश कांबळे**
प्रपाठक,
अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.
**बंडू जयसिंग कदम**
संशोधक विद्यार्थी
अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

**प्रस्तावना :**

विसाव्या शतकात कल्याणकारी शासन प्रणाली संकल्पना जगभर मान्यता पावली. यानुसार समाजाच्या आर्थिक कल्याणात वाढ घडवून आणणारी कार्ये राज्यसत्त्येने करावीत. नागरिकांच्या किमान आवश्यक गरजांची पूर्तता करणे, आर्थिक सुरक्षितता प्रस्थापित करणे,राष्ट्रीय उत्पन्न व संपत्तीचे समान वाटप करणे , शिक्षणप्रसार, आरोग्य विषयक सुविधा, निवाराविषयक सुविधा, बेकारी दूर करणे, जलद आर्थिक विकास घडवून आणणे. त्यासाठी शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक सेवा व्यवसाय इत्यादी विकास करणे म्हणजे कल्याणकारी राज्याच्या कल्पनेची व्याप्ती वाढविणे.यामुळे विकसित आणि अविकसित देशाच्या आर्थिक धोरणाला दिशा मिळते. त्याचा प्रभाव राज्याच्या आर्थिक धोरणावर दिसून येतो.

राज्याचा अर्थसंकल्प हा त्यांच्या आर्थिक धोरणाचा आरसा असतो. अर्थसंकल्पामध्ये कर, खर्च, कर्जे इत्यादी गोष्टी पहावयास मिळतात. उत्पन्न आणि खर्च यांचा समावेश अर्थसंकल्पामध्ये असतो.सरकारचे आर्थिक धोरण कसे असावे याबाबतची भारतीय राज्यघटनेतील कलम 38, 39, 41, 45, 46 व 47 मार्गदर्शक ठरतात. यानुसार सरकारने अशाप्रकारे आर्थिक धोरण आखावे की, सर्वांना समान हक्क, शिक्षणाचा हक्क मिळेल, बेकारी कमी करणे, वृध्दत्व,आजारपण, अपंगत्वामध्ये मदत मिळेल. समाजाचा सर्वांगीण विकास होईल. लोकांचे राहणीमान वाढविणे ,आहार, आरोग्य इत्यादी घटकामध्ये सुधारणा घडून आणणे.

1929 च्या जागतिक आर्थिक महामंदीमुळे सरकारच्या राज्यवित्तीय धोरणावर मोठया प्रमाणात प्रभाव पडल्याचे दिसून येते. आर्थिक मंदीचे

उच्चाटन करण्यासाठी अर्थशास्त्रज्ञ केन्स जे. एम. यांनी सरकारी हस्तक्षेपाचा पुरस्कार केला. ॲडॅम स्मिथच्या निर्हस्तक्षेप धोरणावर टीका केली. रोजगार आणि उत्पादन यामध्ये वाढ करण्यासाठी सरकारने जास्तीत जास्त कार्ये करावीत असे केन्सने प्रतिपादन केले. त्यासाठी त्यांनी तुटीच्या अंदाजपत्रकाचा पुरस्कार केला म्हणजे सरकारने आपल्या उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करावा व समाजात जास्तीत जास्त सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. म्हणजे शासन संस्था कार्यक्षम व कल्याणकारी असते असे त्याचे मत होते. थोडक्यात तुटीच्या अर्थभरण्यासाठी सरकारने कर्जे काढावीत, नवीन चलननिर्मिती करावी आणि खर्च करावा; पण असा खर्च उत्पादक कार्यावरच करावा. केन्सच्या विचारावर जागतिक निती आधारलेली आहे.

सरकारी आर्थिक नीती म्हणजे सरकारचे करविषयक , सार्वजनिक खर्च विषयक, सार्वजनिक कर्जविषयक व अंदाजपत्रकीय धोरण होय. आर्थिक नीतीच्या साधनांचा वापर करून महत्तम उद्दिष्टचे साध्य करणे हा सरकारच्या अंदाजपत्रकीय धोरणाचा महत्वपूर्ण भाग असतो. सरकारचे अंदाजपत्रक म्हणजे उत्पन्न आणि खर्च यांचा ताळेबंद दर्शविणारे पत्रक होय. अंदाजपत्रकाचे प्रामुख्याने तीन प्रकार केले जातात.

1. समतोल अंदाजपत्रक – सरकारचे उत्पन्न = खर्च
2. शिलकी अंदाजपत्रक – सरकारचे उत्पन्न = खर्च
3. तुटीचे अंदाजपत्रक – सरकारचे उत्पन्न = खर्च

केन्सने तुटीच्या अंदाजपत्रकाचा पुरस्कार केला आहे. आजच्या काळातील सरकारची अंदाजपत्रके तुटीची आहेत. अंदाजपत्रक प्रमुख दोन भागामध्ये विभागलेले असते.

1. महसूली अंदाजपत्रक, यात कराद्वारे व करेत्तर मार्गांनी मिळणारे उत्पन्न व त्याचा खर्च दाखविला जातो.

2. भांडवली अंदाजपत्रक यात सरकारची कर्जे, अंतर्गत व बाहय कर्जे याद्वारे मिळणारे उत्पन्न आणि भांडवली मालमत्तेवर होणारा खर्च दाखविला जातो.

सरकारची आर्थिक नीती कशी असावी याबाबत डॉ. डाल्टन मसग्रेव्ह इत्यादींनी महत्तम सामाजिक लाभाचे तत्व सांगितले, या तत्वानुसार समाजाला मिळणारे लाभ जास्तीत जास्त असले पाहिजेत आणि करावा लागणारा त्याग कमीत कमी असावा.या सिध्दांतातील निकषावर महाराष्ट्राचा विचार करता येईल.

## अभ्यासपध्दती :

शोधनिबंध तयार करणेसाठी महाराष्ट्र शासनाची विविध प्रकाशने, पुस्तके, वर्तमान पत्रे इत्यादीमधून दुय्यम सामग्री गोळा केली. माहितीच्या आणि आकडेवारीच्या विश्लेषणासाठी गणिती पध्दती, शेकडेवारी, चक्रीय वाढीचा दर इत्यादी पध्दती वापरल्या आहेत. त्याचप्रमाणे 2000-01 ते 2008-09 या कालावधीतील अंदाजपत्रके अभ्यासली आहेत.

## अभ्यासाची उद्दिष्टे :

1. महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पातील प्रवृत्ती अभ्यासणे.
2. अभ्यास काळातील महसूली जमा व महसूली खर्च यांचा कल अभ्यासणे
3. महाराष्ट्र राज्याच्या स्वत:च्या करापासूनचा महसूलातील बदलाचा अभ्यास करणे.
4. त्याचप्रमाणे राज्याच्या कराव्यतिरिक्त महसूलातील बदलाचा अभ्यास करणे.
5. राज्याची अभ्यास काळातील एकूण कर्जस्थिती अभ्यासणे.

## राज्याच्या एकूण उत्पन्न आणि एकूण खर्चातील वाढीची प्रवृत्ती

**तक्ता क्रमांक – 1**

**एकूण उत्पन्न आणि एकूण खर्चातील वाढीची प्रवृत्ती**

(कोटी रूपये)

| वर्ष | एकूण जमा | एकूण खर्च | शिल्लक / तुट |
|---|---|---|---|
| 2000-01 | 48831 | 48160 | 671 |
| 2001-02 | 54330 | 54912 | (-) 582 |
| 2002-03 | 61211 | 61215 | (-) 4 |
| 2003-04 | 70167 | 70356 | (-) 189 |
| 2004-05 | 76329 | 76206 | 123 |
| 2005-06 | 72614 | 72362 | 252 |
| 2006-07 | 80032 | 80923 | (-) 891 |
| 2007-08 | 88544 | 85637 | 2907 |
| 2008-09 | 95056 | 93417 | 1639 |
| सी.जी.आर | 8.14% | 7.91% | - |

**स्त्रोत :** महाराष्ट्राची अंदाजपत्रके (2000 ते 2009)

तक्ता क्रमांक 1 वरून असे दिसून येते की, एकूण नऊ वर्षाच्या कालावधीपैकी पाच वेळा शिल्लक ठेवणे शक्य झाले आहे. ही बाब महाराष्ट्राच्या वित्तीय व्यवस्थापनाच्या दृष्टीने चांगली आहे. पण महसूल वाढविण्यासाठी आणखी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. एकूण जमेचा चक्रीय वाढीचा दर 8.14% इतका आहे. तर एकूण खर्चाचा चक्रीय वाढीचा दर 7.81% इतका आहे.

# राज्य सरकारचा महसूली जमा

तक्ता क्रमांक - 2

राज्य सरकारच्या एकूण जमेत महसूली जमा

| वर्ष | महसूली जमा | भांडवली जमा | एकूण महसूल |
|---|---|---|---|
| 2000-01 | 29567<br>(60.55) | 19264<br>(39.45) | 48831<br>(100) |
| 2001-02 | 30093<br>(55.39) | 24237<br>(44.61) | 54330<br>(100) |
| 2002-03 | 31104<br>(50.81) | 30107<br>(49.19) | 61211<br>(100) |
| 2003-04 | 34371<br>(48.99) | 35796<br>(51.01) | 70167<br>(100) |
| 2004-05 | 41013<br>(53.73) | 35316<br>(46.27) | 76329<br>(100) |
| 2005-06 | 48437<br>(66.70) | 24176<br>(33.29) | 72614<br>(100) |
| 2006-07 | 60267<br>(75.30) | 19765<br>(24.70) | 80032<br>(100) |
| 2007-08 | 68299<br>(77.14) | 20245<br>(22.86) | 88544<br>(100) |
| 2008-09 | 79911<br>(84.07) | 15145<br>(15.93) | 95056<br>(100) |
| सी.जी.आर | 14.45% | -4.45% | 8.14% |

**स्त्रोत :** तक्ता क्रमांक 1 प्रमाणे कंसातील आकडेवारी एकूण महसूलाशी शेकडेवारी दर्शविते.

वरील तक्ता क्रमांक २ वरून असे दिसून येते की, एकूण महसूलामध्ये वाढ झालेली आहे. महसूली जमा विशेषत: 14.45% वाढला आहे. भांडवली जमेमध्ये 4.45% घट झालेली आहे. विकासाच्या दृष्टीने भांडवली जमेमध्ये वाढ करणे अत्यंत आवश्यक आहे.

**राज्याचा स्वत:चा कर महसूल :**

राज्याच्या एकूण कर महसूलाचे दोन भाग आहेत. 1. राज्याचा स्वत:चा कर महसूल 2. कराव्यतिरिक्त महसूल. स्वत:च्या कर महसूलामध्ये विक्रीकर मुद्रांक नोंदणी, राज्य अबकारी कर, वीजेवरील कर, वाहनावरील कर, जमीन महसूल इत्यादींचा समावेश आहे.

**तक्ता क्रमांक – 3**

**राज्याचा स्वत:चा कर महसूल (कोटी रु)**

| वर्ष | विक्रीकर | मुद्रांक नोंदणी शुल्क | राज्य अबकारी कर | इतर सर्व कर | एकूण कर महसूल |
|---|---|---|---|---|---|
| 2000-01 | 12196 (54.21) | 2200 (9.78) | 1779 (7.91) | 6323 (28.10) | 22498 (100) |
| 2001-02 | 12131 (51.07) | 2442 (10.28) | 1787 (7.52) | 7396 (31.13) | 23756 (100) |
| 2002-03 | 13488 (53.78) | 2823 (11.26) | 1938 (7.73) | 6830 (27.23) | 25079 (100) |
| 2003-04 | 15325 (53.67) | 3354 (11.75) | 2324 (8.14) | 7548 (26.44) | 28551 (100) |
| 2004-05 | 18816 (55.02) | 4116 (12.04) | 2218 (6.48) | 9050 (26.46) | 34200 (100) |
| 2005-06 | 19676 (51.08) | 5265 (13.67) | 2823 (7.33) | 10758 (27.93) | 38522 (100) |
| 2006-07 | 22962 (49.54) | 6250 (13.49) | 3250 (7.01) | 13885 (29.96) | 46347 (100) |
| 2007-08 | 27465 (51.82) | 7200 (13.58) | 3500 (6.60) | 14837 (28.00) | 53002 (100) |
| सी.जी.आर | 12.92% | 19.65% | 11.05% | 13.53% | 13.68% |

**स्त्रोत :** तक्ता क्रमाक 1 प्रमाणे.

कंसातील आकडेवारी एकूण कर महसूलाशी शेकडेवारी दर्शविते.

वरील उपलब्ध माहिती नुसार राज्याच्या स्वत:च्या कर महसूलामध्ये वाढ होत गेलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने मुद्रांक नोंदणी शुल्कापासून मिळणाऱ्या उत्पन्न वाढीचा दर सर्वाधिक आहे (इतरांच्या तुलनेत). देशपातळीवर विचार केल्यास महाराष्ट्र राज्य हे कर महसूल घेण्यात प्रथम क्रमांकावर आहे.

**राज्याचा कराव्यतिरिक्त महसूल :**

कराव्यतिरिक्त महसूलाच्या चार बाबी आहेत 1. व्याजाच्या जमा रक्कमा 2. नफा व लाभांश 3. केंद्रीय अनुदाने 4. कराव्यतिरिक्त मिळणारे इतर उत्पन्न उदा. शुल्क, दंड इत्यादी.

**तक्ता क्रमांक - 4**

राज्याचा कराव्यतिरिक्त महसूल (कोटी रू)

| वर्ष | बिगर कर महसूल | केंद्राकडून मिळणारी अनुदाने | एकूण |
|---|---|---|---|
| 2000-01 | 5596 (79.29) | 1462 (20.71) | 7058 (100) |
| 2001-02 | 4655 (73.47) | 1681 (26.53) | 6336 (100) |
| 2002-03 | 4517 (75) | 1506 (25) | 6023 (100) |
| 2003-04 | 3584 (61.87) | 2209 (38.13) | 5793 (100) |
| 2004-05 | 4118 (60.46) | 2693 (39.54) | 6811 (100) |
| 2005-06 | 5935 (59.85) | 3981 (40.14) | 9916 (100) |
| 2006-07 | 5322 (38.24) | 8598 (40.14) | 13919 (100) |
| 2007-08 | 5744 (37.56) | 9549 (62.44) | 15293 (100) |
| सी.जी.आर | 2.17% | 33.72% | 31.68% |

**स्त्रोत :** तक्ता क्रमांक 1 प्रमाणे

कंसातील आकडेवारी एकूण कराव्यतिरिक्त महसूलाशी शेकडेवारी दर्शविते.

वरील तक्त्यामध्ये महाराष्ट्र राज्याचा कराव्यतिरिक्त मिळणारा महसूल दर्शविला आहे. करव्यतिरिक्त महसूलामध्ये चढ उतार पहावयास मिळतो. केंद्राकडून मिळणाऱ्या अनुदानाचा दर सर्वाधिक आहे. (बिगर करव्यतिरिक्त महसूलाच्या)

**राज्य सरकारचा एकूण खर्च :**

एकूण जमेप्रमाणे एकूण खर्च देखील अंदाजपत्रकामधील महत्वपूर्ण घटक आहे. राज्याच्या एकूण खर्चाच्या सर्वसाधारण प्रवृत्ती पुढील तक्त्यामध्ये.

**तक्ता क्रमांक – 5**

**राज्य सरकारच्या एकूण खर्चाची प्रवृत्ती (कोटी रू)**

| वर्ष | महसूली खर्च | भांडवली खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| 2000-01 | 37401 (77.66) | 10759 (22.34) | 48160 (100) |
| 2001-02 | 38282 (69.72) | 16630 (30.28) | 54912 (100) |
| 2002-03 | 40475 (66.12) | 20740 (33.88) | 61215 (100) |
| 2003-04 | 42680 (60.66) | 27676 (39.34) | 70356 (100) |
| 2004-05 | 51047 (66.99) | 25159 (33.01) | 76206 (100) |
| 2005-06 | 52280 (72.25) | 20082 (27.25) | 72365 (100) |
| 2006-07 | 63460 (78.42) | 17463 (21.58) | 80923 (100) |
| 2007-08 | 67788 (79.16) | 17849 (20.84) | 85637 (100) |
| 2008-09 | 78946 (84.51) | 14471 (15.49) | 93417 (100) |
| सी.जी.आर | 10.15% | 1.22% | 8.11% |

**स्त्रोत :** तक्ता क्रमांक १ प्रमाणे

कंसातील आकडेवारी एकूण खर्चाशी शेकडेवारी दर्शवितात.

वरील तक्त्यानुसार राज्याच्या एकूण खर्चामध्ये चढ उतार पहावयास मिळतात. भांडवली खर्चातील वाढीच्या दरापेक्षा महसूली खर्चातील वाढीचा दर जास्त आहे. पण भांडवली खर्चात वाढ करणे आवश्यक आहे. कारण विकासाच्या दृष्टीने भांडवली खर्च महत्वाचा आहे.

**महाराष्ट्र राज्याची ऋणस्थिती :**

उत्कृष्ट वित्तीय व्यवस्थापन असलेल्या आणि आर्थिकदृष्ट्या संपन्न असणाऱ्या राज्यापैकी महाराष्ट्र हे एक राज्य होते. परंतु सध्या आर्थिक तणाव वाढत असल्याने सध्या राजकोषीय तूट वाढत असल्याचे विदारक चित्र प्रत्ययास येत आहे.

**तक्ता क्र.6**

**महाराष्ट्र राज्याची ऋणस्थिती (रूपये कोटी)**

| वर्ष | सार्वजनिक कर्ज |
|---|---|
| 2000-01 | 50319 |
| 2001-02 | 71107 |
| 2002-03 | 82549 |
| 2003-04 | 97674 |
| 2004-05 | 109167 |
| 2005-06 | 124365 |
| 2006-07 | 134493 |
| 2007-08 | 144325 |
| सी.जी.आर | 15.22% |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक कर्जामध्ये सातत्याने वाढ होत आहे. ही बाब विकासाच्या दृष्टीने चांगली नाही.

**निष्कर्ष :**

1. महाराष्ट्र राज्य सरकारची सतत वाढत जाणारी महसूली आधिक्य ही चांगली बाब झाली आहे.
2. महाराष्ट्र राज्याची महसूली जमा वाढत आहे. महसूली जमेतील ही सुधारणा कराच्या दरातील सुसूत्रता कर वसुलीतील प्रशासकीय उपाय यामुळे झाली आहे.
3. 2000-01 ते 2008-09 या काळातील महसूली खर्च वाढत असून त्याचा विकासावर विपरीत परिणाम होत आहे.
4. राज्याचा स्वत:चा कर महसूल वाढत असून एकूण कर महसूलात राज्याच्या विक्री कराचा वाटा सर्वात मोठा आहे. तरीही मुद्रांक नोंदणी शुल्कापासून मिळणाऱ्या उत्पन्न वाढीचा दर जास्त आहे.
5. करा व्यतिरिक्त मिळणाऱ्या महसूलामध्ये

फारसा बदल नाही असे एकंदरीत आकडेवारीवरून दिसून येते.

6. महाराष्ट्र सरकारचे एकूण कर्ज वेगाने वाढत असून एकूण कर्जात केंद्र सरकारकडील कर्जाचे प्रमाण मोठे आहे.

## उपाययोजना :

1. राज्याच्या महसूली जमेच्या तुलनेत खर्चाचे प्रमाण कमी आहे ते वाढावयास पाहिजे.
2. राज्य सरकारच्या कर महसूलाची प्रमुख साधने म्हणजे विक्री कर, मुद्रांक नोंदणी फी व राज्य अबकारी कर होत. हे कर अमेरिका, इंग्लंड या देशाप्रमाणे मूल्यवर्धित पध्दतीनुसार आकारावेत. त्यामुळे सरकारचे उत्पन्न वाढण्यास बऱ्याच प्रमाणात मदत होईल.
3. कर महसूलातील जमीन महसूल आणि उत्पन्न व खर्चावरील इतर कराचे उत्पन्न प्रमाण का घटले आहे हे शोधून काढून उत्पन्न वाढविणेस बराच वाव आहे.
4. राज्याची एकूण ऋणस्थिती वाढत आहे. त्यामुळे आर्थिक असमतोल वाढला आहे. तो कमी केल्यास आर्थिक तणाव कमी होण्यास मदत होईल.
5. भांडवली जमा वाढविणे हे विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे.

## समारोप :

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्रातील अंदाजपत्रकीय प्रवृत्तीचा कल विशद केला आहे. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून अर्थ व्यवस्थेमध्ये सुयोग्य इच्छित बदल घडवून आणायचे असतील तर वित्तीय व्यवस्थापनात शिस्त आणणे गरजेचे आहे. आर्थिक झळ कोणाला, किती व कशी बसेल याचा विचार न करता कडक आर्थिक शिस्तीसाठी वेळप्रसंगी कटू निर्णय घेणे आवश्यक आहे.

## संदर्भ :


1. Bhatia H.L. Public Finance
2. Dalton - Public Finance
3. Simha S.L. Economic and Social Development
4. Sundhram Andley - Public Economics and Public Finance.
5. शिंदे एम.एन. महाराष्ट्राचा भावी अर्थसंकल्प.
6. महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका
7. महाराष्ट्राची अंदाजपत्रके (2001 ते 2009)

पीएच्.डी.प्रबंधाचा सारांश

# स्त्रियांच्या आर्थिक विकासात विविध योजनांचे योगदान: अमरावती जिल्ह्याचे संदर्भात विशेष अध्ययन

**श्री.प्रशांत काटोले**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय,
अमरावती.

**प्रास्ताविक :**

कोणत्याही समाजाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि धार्मिक इत्यादी विविध व्यवहारांमध्ये स्त्रियांचे स्थान कोणते होते व आहे आणि त्यात बदल होऊन स्त्रियांना समान संधी प्राप्त होण्याच्या दृष्टीने विविध उपायांची आवश्यकता असते. मात्र ही प्रक्रिया मंद असण्याची महिलांची आणि आपल्या देशाची शोकांतिका आहे. समाजाच्या दृष्टिकोनात बदल झाल्याशिवाय व राज्यसत्तेने त्यांच्यासाठी विशेष प्रयत्न केल्याशिवाय स्त्रियांना समान तत्वाने वा अमर्त्य सेन यांना अभिप्रेत असणाऱ्या अधिकारीता दृष्टिकोनाची अंमलबजावणी शक्य नसते. समाजाच्या विकासात एखाद्या स्त्रीचे महत्व मान्य करणे, तिचे कर्तृत्व ठळकपणे चित्रीत करणे पुरेसे नसते तर; ''स्त्रिया'' म्हणून समाजातील सर्व स्त्रियांच्या बाबत विचार झाला पाहिजे. भारतात त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात आले आहेत.

भारतात स्वातंत्र्यानंतरही भारतीय महिलांचे स्थान हे दुय्यमच होते. ही परिस्थिती बदलण्यासाठी भारतीय संविधानाने स्त्री पुरुष लिंगभेद कलम 14 व 16 द्वारे नष्ट केले. घटनेच्या कलम 19 नुसार स्त्रियांना मुलभूत अधिकार देखील बहाल करण्यात आले. भारतीय महिलांच्या आर्थिक विकासासाठी व त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी केंद्र सरकारने 1953 साली समाज कल्याण विभागाची स्थापना केली. या विभागामार्फत अनेक योजना महिला व बालविकासाच्या राबविण्यास सुरुवात केली. संयुक्त राष्ट्र संघटनेने 1975 हे वर्ष ''आंतरराष्ट्रीय महिला वर्ष'' म्हणून घोषित केले. भारतामध्ये देखील हे वर्ष साजरे करण्यात आले. भारत सरकारने 1990 साली ''राष्ट्रीय महिला आयोगाची'' स्थापना केली. भारतीय स्त्रियांची राजकीय सहभागामध्ये वृध्दी व्हावी म्हणून 1992 मध्ये 73 वी घटना दुरुस्ती करुन महिलांना 30 टक्के स्थानिक स्वराज्य संस्थेत आरक्षण देण्यात आले.

महाराष्ट्र राज्याने महिलांच्या विकासासाठी वर्ष 1993 मध्ये ''राज्य महिला आयोगाची'' स्थापना केली. समाजाच्या दुर्बल स्त्री घटकांच्या विशेष गरजांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ''महिला व बालविकास विभाग'' वर्ष 1993 मध्येच स्थापन केला. राज्यातील महिलांसाठी महाराष्ट्र राज्याने वर्ष 1994 मध्ये ''पहिले महिला धोरण''तयार केले. असे महिला धोरण तयार करणारे महाराष्ट्र राज्य हे भारतातील पहिले राज्य आहे. वर्ष 2001 मध्ये राज्य सरकारने नवीन महिला धोरण तयार केले. तसेच महाराष्ट्र शासनाने महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी अनेक निमशासकीय महामंडळांची स्थापना केली आणि या अनेक योजनांच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरण प्रक्रियेला गती दिली.

**अध्ययनाचे महत्त्व :**

भारतातील विकासाची प्रक्रिया विचारात घेतली तर असे लक्षात येते की, भारताच्या विकास प्रक्रियेत साधारणतः वर्ष 1970 नंतर बदल झाल्याचे दिसून येते. विकास कार्यात स्त्रियांचा विचार स्वतंत्रपणे करण्याची गरज किंवा आवश्यकता हाच तो बदल होय. त्यादृष्टीने गेल्या 35 वर्षात विकास प्रक्रियेत स्त्री सहभाग वाढावा यादृष्टीने विविध योजना सरकारतर्फे सुरु करुन अंमलात आणण्यात आल्या आहेत. या सर्व योजनांचा मुख्य उद्देश स्त्रियांचे सबलीकरण असा असला तरी स्त्रियांचा आर्थिक विकास हा या योजनांचा केंद्रबिंदू मानावयास हवा. या योजनांपैकी प्रामुख्याने अशा योजना की ज्या स्त्री रोजगार निर्माण करण्यासाठी किंवा वाढविण्यासाठी तसेच रोजगार बाजारात स्त्रियांना सहभागी होता यावे म्हणून त्यांना प्रशिक्षण देण्यावर भर देणारे आहेत. अशा महत्त्वपूर्ण योजनांचे स्वरुप स्पष्ट करणे, त्यांची कार्यपध्दती आणि त्या योजनांचा स्त्रियांच्या आर्थिक विकासावर झालेला परिणाम विचारात घेणे ही बाब स्त्रियांच्या आर्थिक विकास प्रक्रियेशी संबंधित आहे. ही बाब एका अर्थाने संपूर्ण समाजाच्या किंवा राष्ट्राच्या आर्थिक विकासाशी निगडीत आहे.

प्रस्तुत संशोधन कर्त्याने म्हणूनच स्त्रियांच्या आर्थिक विकासाकरिता ज्या योजना गेल्या अनेक वर्षापासून राबविल्या जात आहेत, त्यांचा सविस्तर अभ्यास करण्याचे ठरविले व त्यांची फलश्रृती अभ्यासण्यासाठी अमरावती जिल्हा हे परिक्षेत्र निवडले. त्यामुळे असे म्हणता येईल की, अमरावती जिल्ह्याच्या संदर्भात स्त्रियांच्या आर्थिक विकासात या विविध योजनांचे योगदान कोणते हे अभ्यासणे प्रस्तुत संशोधन कर्त्यास आवश्यक वाटते. या विषयाशी संबंधित जे अहवाल व लेख प्रसिध्द झाले; त्यामध्ये आर्थिक विकासात स्त्रियांचे योगदान पाहता त्यांना रोजगार उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे यावर भर दिला आहे. वर्ष 2002 मध्ये नॅशनल कमिशन ऑन लेबरच्या अंतर्गत स्त्रिया आणि बाल श्रमिक यांच्या अभ्यास गटाने जो अहवाल सादर केला; त्या गटाने हे मत स्पष्टपणे व्यक्त केले की, स्त्रियांच्या संदर्भातील आर्थिक धोरणाचा मध्यबिंदू हा रोजगारच असला पाहिजे. याही दृष्टीने पाहता अध्ययनासाठी निवडलेला विषय किती महत्वाचा आहे हे लाक्षात येते.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

प्रस्तुत अध्ययनाकरिता पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

1) अमरावती जिल्ह्यातील महिलांच्या विकासाच्या

शासकीय व निमशासकीय योजना अभ्यासणे.

2) अमरावती जिल्ह्यातील विविध योजनांमध्ये महिलांचा सहभाग अभ्यासणे.
3) विविध योजनांमुळे लाभार्थी महिलांच्या रोजगार वाढीत कसा बदल झाला याचा आढावा घेणे.
4) विविध योजनांद्वारे दिलेल्या प्रशिक्षणामुळे महिलांच्या रोजगार प्राप्तीच्या क्षमतेत कितपत वाढ होते हे अभ्यासणे.
5) विविध योजनांमधील लाभार्थी महिलांच्या नमुना पाहणीवरुन त्यांच्या जीवनात झालेल्या सर्व प्रकारच्या बदलांचा आढावा घेणे.
6) विविध प्रकारच्या योजनांद्वारे महिलांच्या विकासाकरिता जे प्रयत्न केले जातात.त्यातील समस्यांचे अध्ययन करणे.
7) स्त्री रोजगाराच्या वाढीबाबत उपरोक्त योजनांच्या धोरणांचा आढावा घेणे.

## संशोधनाची गृहीत कृत्ये :

प्रस्तुत संशोधन विषयाची गृहीत कृत्ये पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

1) महिलांच्या रोजगाराच्या संधी असंघटित, असुरक्षित आणि प्राथमिक क्षेत्रातच वाढत असल्यामुळे संघटित व सुरक्षित सेवाक्षेत्रात; तसेच दुय्यम क्षेत्रामध्ये महिलांना रोजगाराच्या संधी मिळत नाहीत.
2) महिलांच्या अल्पशिक्षणामुळे व साक्षरतेच्या अभावामुळे त्यांच्यात पूर्ण आर्थिक प्रेरणा विकसित न झाल्याने त्यांना विकासाच्या संधी कमी प्राप्त होतात.
3) महिलांच्या व्यावसायिक प्रशिक्षणातून उत्पादन कौशल्याचा विकास होऊन त्यांना रोजगार प्राप्त होतो आणि त्या व्यवसायात यशस्वी होतात.

## तथ्य संकलन :

प्रस्तुत अध्ययन कार्याकरिता तथ्य संकलनाच्या प्रामुख्याने दोन पध्दती अथवा स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे. त्या म्हणजे अ) प्राथमिक पध्दती/स्त्रोत ब)द्वितीयक पध्दती/स्त्रोत हे होय.

प्राथमिक पध्दतीत प्रश्नावली, मुलाखती, निरीक्षण इत्यादींचा समावेश होतो. प्रस्तुत अध्ययनाकरिता तीन प्रश्नावली तयार करण्यात आल्या आहेत.त्या पुढील प्रमाणे.

1) अमरावती जिल्ह्यातील विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या महिला लाभार्थीकरिता प्रश्नावली अनुसूची.
2) अमरावती जिल्ह्यातील प्रशिक्षण योजनांचा लाभ घेणाऱ्या महिला प्रशिक्षणार्थ्यांकरिता प्रश्नावली अनुसूची.
3) अमरावती जिल्ह्यातील विविध कार्यालयातील योजना राबविणारे अधिकारी आणि कर्मचारी करिता प्रश्नावली अनुसूची.

प्रस्तुत संशोधनाकरिता महिला लाभार्थीची मुलाखतीद्वारे प्रश्नावलीतून प्राप्त माहितीची उलटतपासणी केलेली आहे. महिला लाभार्थींनी सुरु केलेल्या व्यवसायाच्या माध्यमातून संबंधित माहितीची वस्तूनिष्ठता पडताळून पाहण्याच्या हेतूने तथ्य संकलनासाठी अनौपचारिक मुलाखत पध्दतीचा उपयोग संशोधनात केला आहे.

द्वितीयक पध्दतीत प्रकाशित व अप्रकाशित सार्वजनिक प्रलेखाच्या सहाय्याने तथ्ये संकलित करण्यात आली आहे ती पुढील प्रमाणे.

1) केंद्र सरकार, राज्य सरकार आणि विविध महामंडळाच्या रोजगार व प्रशिक्षण विषयक योजनांचे 1997-98 ते 2001-2002 या

काळातील वार्षिक अहवाल.

2) केंद्र सरकार व राज्य सरकारचे महिला धोरण पुस्तिका.

3) विविध महामंडळांच्या प्रकाशित स्मरणिका.

4) प्रस्तुत संशोधन विषयांशी संबंधित विविध लेखकांची पुस्तके.

5) प्रस्तुत संशोधन विषयांशी संबंधित मासिक, पाक्षिक, जर्नल्स मधील लेख.

6) वर्तमान पत्रातील लेख.

### तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन :

प्रस्तुत अध्ययनात संकलित सामुग्रीचे विश्लेषण करण्यासाठी प्रतिशत प्रमाण पध्दतीचा आणि Chi-Square Text चा उपयोग करण्यात आला आहे.

### नमुना निवड पध्दती :

प्रस्तुत अध्ययनाकरिता लाभार्थ्यांच्या नमुना निवडसाठी वर्षे 2001-2002 हे वर्ष निवडण्यात आले आहे. 2001-2002 ह्या वर्षात अमरावती जिल्ह्यातील विविध शासकीय विभाग आणि विविध महामंडळांकडून राबविल्या जाणाऱ्या रोजगार व प्रशिक्षण योजनांचा अभ्यास करण्यात आला आहे. अमरावती जिल्ह्यात वर्षे 2001-2002 मध्ये महिलांच्या रोजगार आणि प्रशिक्षणाच्या राबविल्या गेलेल्या 24 योजनांचा अभ्यास या ठिकाणी करण्यात आला आहे. या 24 योजनांमध्ये एकूण महिला लाभार्थींची संख्या 1309 इतकी आहे. या एकूण 1309 लाभार्थींपैकी किमान 10 टक्के म्हणजे 130 लाभार्थींची अध्ययनासाठी नमुना निवड करण्यात आली आहे.

अध्ययनातील नमुना निवडीतील एकुण 130 महिला लाभार्थींनी वेगवेगळ्या 24 योजनांचा लाभ घेऊन वेगवेगळे व्यवसाय सुरु केलेले आहेत. या लाभार्थींनी सुरु केलेल्या व्यवसायाचे व प्रशिक्षणाचे अध्ययनासाठी सहा गट पाडण्यात आलेले आहेत. ते पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1) व्यापार व सेवा उद्योग गट | – | 30 लाभार्थी |
| 2) महिलांना सेवा पुरविणारा उद्योग गट | – | 12 लाभार्थी |
| 3) तांत्रिक उद्योग गट | – | 19 लाभार्थी |
| 4) गृह व कुटीर उद्योग गट | – | 10 लाभार्थी |
| 5) पशुपालन व दुग्ध व्यवसाय उद्योग गट | – | 31 लाभार्थी |
| 6) प्रशिक्षण योजना गट | – | 28 लाभार्थी |
| एकुण उद्योग गट – 06 | एकुण लाभार्थी संख्या – | 130 |

अध्ययनातील 06 उद्योग गटामधील 130 लाभार्थींनी जे व्यवसाय सुरु केले आणि प्रशिक्षण घेतले आहे,त्यांचे उद्योग गटनिहाय व्यवसाय व प्रशिक्षण पुढील प्रमाणे.

| उद्योगगट | | | व्यवसाय |
|---|---|---|---|
| 1) | व्यापार व सेवा उद्योग गट | : | धान्य दुकान, किराणा दुकान, रेडिमेड कापड दुकान, भोजनालय, जनरल स्टोअर्स, स्टील भांडी दुकान, बिछायत केंद्र, हॉस्पिटल, रोपवाटिका. |
| 2) | महिलांना सेवा पुरविणारा उद्योग गट | : | बांगडी विक्री, शिवणकाम/टेलरिंग, ब्युटी पार्लर, साडी सेंटर, होजीअरी |
| 3) | तांत्रिक उद्योग गट | : | मसाला उद्योग, पिठाची चक्की, संगणक, मिरची दळण यंत्र, थ्रेशर |
| 4) | गृह व कुटीर उद्योग गट | : | सुप पाटी, झाडू, टोपली, बांबुकाम, चप्पल दुकान, पापड उद्योग, बुरड उद्योग. |
| 5) | पशुपालन व दुग्धव्यवसाय उद्योग गट | : | शेळीपालन, दुग्ध व्यवसाय,म्हशीपालन, कुक्कुटपालन. |
| 6) | प्रशिक्षण योजना गट | : | ब्युटी पार्लर प्रशिक्षण, लेदर पर्स प्रशिक्षण, डी.टी.पी. संगणक प्रशिक्षण, शिवणकाम प्रशिक्षण, भरतकाम प्रशिक्षण. |

## संशोधन कालावधी :

संशोधनात कालावधीला महत्त्वाचे स्थान आहे. प्रस्तुत विषयाच्या संशोधनाचा कालावधी हा वर्ष 1997-1998 ते वर्ष 2001-2002 असा पाच वर्षाचा घेण्यात आला आहे. या पाच वर्षाच्या कालावधीत अमरावती जिल्ह्यात राबविल्या गेलेल्या केंद्र सरकारच्या, राज्य सरकारच्या आणि विविध महामंडळांच्या रोजगार व प्रशिक्षण योजनांचा अभ्यास करण्यात आला आहे.

## सारांश आणि निष्कर्ष :

पहिले प्रकरण हे 'प्रास्ताविक' असून या प्रकरणामध्ये स्त्रियांचा आर्थिक विकास ही संकल्पना विशद केली आहे. तसेच स्त्रियांच्या आर्थिक विकासासाठी शासकीय योजनांचे योगदान आवश्यक आहे हे स्पष्ट करण्यात आले आहे. प्रस्तुत अध्ययनाकरिता अमरावती जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे.

प्रकरण दुसरे हे 'उपलब्ध साहित्याचा आढावा' घेणारे आहे. या दुसऱ्या प्रकरणात अध्ययनाकरिता निवड करण्यात आलेल्या विषयानुसार उपलब्ध साहित्याचा परामर्श ग्रंथ, संशोधन लेख व नियतकालिकांच्या माध्यमातून घेण्यात आला आहे.

'महिला धोरणांचा आढावा' या तिसऱ्या प्रकरणात धोरणाचा अर्थ विशद करण्यात आला आहे. तसेच स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील महिलांबाबतचा धोरणात्मक दृष्टिकोन विचारात घेण्यात आला आहे. तसेच या प्रकरणात केंद्र सरकारचे आणि राज्य सरकारचे महिलाधोरण वर्ष 2001 चा आढावा घेऊन मूल्यमापन करण्यात आले आहे.

'अमरावती जिल्हा : पार्श्वभूमी व विविध योजना' या चौथ्या प्रकरणामध्ये अमरावती जिल्ह्याची भौगोलिक रचना, अमरावती जिल्ह्याची राजकीय व प्रशासकीय संरचना, अमरावती जिल्ह्याची आर्थिक स्थिती यांचे विवेचन करण्यात आले आहे. तसेच या प्रकरणात अमरावती जिल्ह्यात राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती विशद करण्यात आली आहे.

'अमरावती जिल्ह्यातील योजनांची अंमलबजावणी' या पाचव्या प्रकरणामध्ये वर्ष 1997 ते 2002 या पाच वर्षांच्या काळात केंद्र सरकार,राज्य सरकार आणि विविध महामंडळाद्वारे राबविलेल्या योजनांची अंमलबजावणी कशी करण्यात आली याचा आढावा घेण्यात आला आहे. त्यामध्ये वर्ष निहाय योजनांचे स्त्री लाभार्थी, पुरुष लाभार्थी, योजनांवरील खर्च यांचे अध्ययन करण्यात आले आहे.

'प्रत्यक्ष लाभार्थ्यांचे अध्ययन' या सहाव्या प्रकरणात महिला लाभार्थ्यांचे वैयक्तिक, कौटुंबिक, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक दर्जाचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात आले आहे. नमुना लाभार्थी म्हणून निवडण्यात आलेल्या 130 लाभार्थ्यांकडून प्राप्त झालेली माहिती आणि योजना राबविणारे अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे निरीक्षण करण्यात येऊन त्याचे विवेचन करण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणातील अध्ययनावरुन निघणारे महत्त्वपूर्ण मुद्दे निष्कर्ष रुपाने पुढीलप्रमाणे मांडण्यात आलेले आहेत.

**निष्कर्ष :**

1) योजनांचा लाभ घेण्यापूर्वी लाभार्थ्यांची व्यावसायिक स्थिती लक्षात घेता व्यवसाय बदलाची आर्थिक प्रेरणा बेकारांमध्ये 56 टक्के, शेतमजूरांमध्ये 42 टक्के; तर शेती करणाऱ्यांमध्ये ती 2 टक्के दिसून आली. याचा अर्थ रोजगार नसणारा किंवा अस्थिर वर्ग शासकीय योजनांचा लाभ घेऊन व्यवसाय बदलासाठी अधिक प्रेरित दिसून येतो.
2) लाभार्थींच्या स्वतःच्या व्यवसायातील दैनिक सरासरी विक्रीतून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा विचार केला असता असे आढळून आले की, व्यवसायातून दैनिक 25 ते 50 रुपये उत्पन्न मिळविणारे 40 टक्के लाभार्थी, 50 ते 100 रुपये उत्पन्न मिळविणारे 24 टक्के लाभार्थी आणि 100 ते 200 रुपये उत्पन्न मिळविणारे 10 टक्के लाभार्थी आहेत. परंतु 25 रुपये पेक्षा कमी उत्पन्न मिळविणारे लाभार्थी हे 26 टक्के आहेत. म्हणजेच 26 टक्के लाभार्थींना किमान वेतनापेक्षाही कमी उत्पन्न प्राप्त होत आहे.
3) व्यवसायातील होणाऱ्या नफ्यातून कौटुंबिक खर्च भागविणारे 77 टक्के लाभार्थी आहेत;तर 23 टक्के लाभार्थी हे नफ्याची रक्कम व्यवसाय वाढीसाठी गुंतवितात. म्हणजेच 23 टक्के लाभार्थी व्यावसायिक तत्वावर उद्योग चालविण्यासाठी प्रयत्न करीत आहे असे म्हणता येईल.

4) अध्ययनातील वर्ष 2001 मध्ये सुरु केलेल्या व्यवसायामध्ये 33 व्यवसाय असे आहेत की, ज्यामध्ये वर्ष 2002 मध्ये 10 ते 20 टक्के वाढ झाली आहे; तर 06 व्यवसायामध्ये 20 ते 50 टक्के वाढ झाली आहे. उर्वरित व्यवसायांमध्ये वाढ झालेली दिसून येत नाही.
5) अध्ययनातील 60 टक्के लाभार्थी हे उधारीचे व्यवहार करीत आहेत; तर 40 टक्के लाभार्थी हे नगद व्यवहार करीत आहेत असे दिसून आले. परंतु उधारी वसुलीचे प्रमाण हे 55 टक्के आहे.
6) अध्ययनातील ज्या 102 लाभार्थ्यांनी व्यवसाय सुरु केले होते. त्यापैकी 72 लाभार्थ्यांचे व्यवसाय वर्ष 2005 पर्यंत पूर्णतः बंद झालेले आहेत. व्यवसाय बंद पडणाऱ्या कारणांचा विचार करता असे आढळून आले की, व्यवसायातील तोटयामुळे आणि कौटुंबिक कारणासाठी व्यवसायातील भांडवल खर्च झाले.या प्रमुख दोन कारणांमुळे व्यवसाय बंद पडले आहेत.
7) अध्ययनातील ज्या 102 लाभार्थ्यांनी व्यवसाय सुरु केले होते त्यापैकी 30 लाभार्थ्यांचे व्यवसाय अजूनही सुरु आहेत. व्यवसाय सुरु असणाऱ्यांमध्ये प्रथम क्रमांकावर पशुपालन व दुग्धव्यवसाय उद्योग गटाचे 10 लाभार्थी आहेत. दुसऱ्या क्रमांकावर व्यापार व सेवा उद्योग गटाचे 09 लाभार्थी आहेत. तिसऱ्या क्रमांकावर तांत्रिक उद्योग गटाचे 04 लाभार्थी आहेत; तर पाचव्या क्रमांकावर महिलांना सेवा पुरविणाऱ्या उद्योगगटाचा 01 लाभार्थी आहे.
8) कुटुंबातील आणि व्यवसायातील आर्थिक निर्णय घेण्याच्या संदर्भात विचार करता असे आढळून आले की, 25 टक्के लाभार्थ्यांना स्वतंत्ररित्या आर्थिक निर्णय घेण्यासाठी कुटुंबाने मान्यता दिली आहे. परंतु 75 टक्के लाभार्थ्यांना मान्यता मिळाली नाही. याचा अर्थ अजूनही महिलांना आर्थिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नाही.
9) अध्ययनातील प्रशिक्षण योजनांचा लाभ घेणाऱ्या 28 लाभार्थ्यांचा प्रशिक्षणा संदर्भात विचार करता असे दिसून आले की, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील प्रशिक्षणाला महिलांनी प्रथम पसंती दर्शविली आहे. त्यानंतर ब्युटी पार्लर प्रशिक्षणाला प्राधान्य दिले आहे.
10) प्रशिक्षण घेणाऱ्या 28 लाभार्थ्यांपैकी फक्त 06 लाभार्थ्यांनी स्वतःचे व्यवसाय सुरु केले आहेत; परंतु 22 लाभार्थ्यांनी प्रशिक्षण कौशल्याचा लाभ न घेता आपले श्रम गोठविले आहे.

**उपाययोजना :**

लाभार्थ्यांनी योजनांचा लाभ घेऊन व्यवसाय सुरु केल्यानंतर व्यवसाय व्यावसायिक तत्वावर चालू राहण्यासाठी व त्याचे व्यवस्थापन करतांना त्यांच्या समोर अनेक समस्या निर्माण झाल्या. या समस्या दूर केल्याशिवाय या योजनांना यश मिळू शकत नाही. त्यासंबंधी काही पुढील उपाययोजना सुचविलेल्या आहेत.

1) लाभार्थ्यांना व्यवसाय व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.
2) लाभार्थ्यांनी योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी केल्यानंतर त्यांच्या व्यवसायासंबंधीचे वस्तूनिष्ठ मूल्यमापन करुन त्यांना मार्गदर्शन करणारी यंत्रणा निर्माण करावी.
3) लाभार्थ्यांनी सुरु केलेले व्यवसाय कुटुंबाच्या सर्व गरजा भागवू शकत नाहीत त्यामुळे योजनेमार्फत पुरेसे भांडवल उपलब्ध करुन द्यावे आणि कुटुंबातील अन्य व्यक्तींना सामावून

घेणाऱ्या योजना सुरु कराव्या.

4) उद्योग सुरु करण्यासाठी उद्योजकांची जागेची अडचण लक्षात घेता त्यांना अल्प दरात भूखंड उपलब्ध करुन द्यावेत.

5) पशुपालन व दुग्ध व्यवसाय करणाऱ्यांना पशु आहार सवलतीच्या दरात उपलब्ध करुन द्यावा.

6) पशुपालन व दुग्ध व्यवसायासाठी दुधावर प्रक्रिया करणारे उद्योग, प्रशिक्षण आणि साहित्य उपलब्ध करुन द्यावे.

7) तांत्रिक उद्योग गटातील व्यवसायाची सर्वात मोठी समस्या ही लोडशेडिंगची आहे. या समस्येमुळे उद्योग व्यावसायिक तत्त्वावर चालविण्यासाठी अडचणी निर्माण होतात.तेव्हा शासकीय यंत्रणेकडून ऑईल इंजिन अनुदानावर देत असतांना या उद्योजकांना प्राधान्य द्यावे.

8) तांत्रिक उद्योग गटातील संगणक उद्योगासाठी शासकीय कार्यालयातील संगणक संबंधित काम आणि शासकीय कर्मचाऱ्यांना संगणक प्रशिक्षण देतांना या लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे किंवा शिफारस करण्यात यावी.

9) गृह व कुटीर उद्योग गटातील वस्तूंची मागणी स्थानिक स्वराज्य संस्थांनी व इतर कार्यालयांनी करावी व त्यांची खरेदी करतांना या लाभार्थ्यांना प्राधान्य द्यावे.

10) शिवणकाम करणाऱ्या लाभार्थ्यांना रेडिमेड कपडे बनविण्याकरिता प्रेरित करावे.

11) लाभार्थ्यांना योजनेद्वारे केला जाणारा भांडवल पुरवठा हा टप्प्याटप्प्याने होणे गरजेचे आहे.

12) लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी कागदपत्रांची पूर्तता करण्याच्या अटी सुलभ असाव्यात.

13) वित्तीय संस्थांना शासकीय योजना राबविण्यासाठी शासनाकडून प्रोत्साहित करुन त्यांना ठरवून दिलेल्या उद्दिष्टांची पूर्तता निर्धारित वेळेत कशी होऊ शकेल,यादृष्टीने विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे.

14) जिल्ह्याचे नियोजन व विकास आराखडा बनवित असतांना या योजनांचा निधी वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात यावा.

(सदर प्रबंधास संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने जानेवारी 2007 मध्ये पीएच.डी. प्रदान केली असून ह्या प्रबंधास डॉ. दि.व्यं. जहागिरदार यांचे मार्गदर्शन प्राप्त झाले आहे.)

---

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे 32 वे वार्षिक अधिवेशन
## सूत्रसंचालकांचे अहवाल
## चर्चासत्र पहिले
## सर्वसमावेशक वृध्दीचे सैध्दांन्तिक विवेचन

सूत्रसंचालक– संतोष दास्ताने

**समीक्षक–संजय इंगळे**

**गोषवारा :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे 32 वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन दि.7-9 नोव्हेंबर 2008 दरम्यान मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव जि.सांगली येथे पार पडले. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या संकेतानुसार विविध विषयांवर जे शोधनिबंध सादर केले जातात;त्यामध्ये एक विषय अर्थशास्त्रातील सैध्दान्तिक विवेचनावर आधारित असतो. त्यानुसार परिषदेने सर्वसमावेशक वृध्दीचे सैध्दान्तिक विवेचन या विषयावर शोधनिबंध मागविले होते.

या अधिवेशनात वरील विषयावर एकूण 12 शोधनिबंध प्राप्त झाले. 10 शोधनिबंध +2 शोधनिबंध आयत्यावेळी प्राप्त झाले. यामध्ये एकूण 14 शोधनिबंध लिहिणारे लेखक सहभागी होते. यापैकी 11 निबंध लेखक पश्चिम महाराष्ट्रातील तर 3 निबंध लेखक मराठवाड्यातील आहेत. मुंबई, कोकण,उत्तर महाराष्ट्र व विदर्भ इ.भागातून एकही शोधनिबंध या विषयावर प्राप्त झाला नाही. तसेच एकूण मराठी अर्थशास्त्र परिषदेची 1206 इतकी आजीव सदस्य संख्या(7 नोव्हेंबर 2008 पर्यंत )लक्षात घेता एकूण सदस्य संख्येच्या तुलनेत या विषयावर शोधनिबंध लिहिणाऱ्यांचे प्रमाण हे फक्त1.16% इतके अल्प आहे.तसेच एकूण 12 शोधनिबंधापैकी प्रत्यक्ष परिषदेमध्ये शोधनिबंधाचे वाचन करण्याकरिता उपस्थित शोधनिबंध लेखक संख्या ही फक्त 7 इतकी होती.

आर्थिक वृध्दीची संकल्पना विचारात घेत असताना संतुलित विकास दृष्टिकोन आणि असंतुलित विकास दृष्टिकोन या संकल्पनांचा विचार होणे गरजेचे ठरते.सर्वसमावेशक वृध्दीची संकल्पना स्पष्ट करीत असताना सर्वसमावेशक वृध्दी म्हणजे नेमके काय? ह्या बाबतीतील विचार प्रा.मंजूषा मुसमाडे, पुणे, डॉ.श्रीमती अनघा पाठक व डॉ.श्रीमती तेजस्विनी

मुडेकर,कोल्हापूर व डॉ.के.जी.पठाण व प्रा.सुरेंद्र डावरे, पुणे यांच्या शोधनिबंधात विचार केलेला दिसून येतो. असंतुलित विकासाचा दृष्टिकोन विचारात घेत असताना ''क्षेत्रिय असमतोल'' हा दृष्टिकोन विचारात घेऊन शोधनिबंधकांनी आपले विचार स्पष्ट केले व कळत नकळत शोधनिबंधाचा विषय व प्रत्यक्ष शोधनिबंधातील विचार यातील सुसंगती कमी झालेली दिसून येते.

प्रा.मंजूषा मुसमाडे यांच्या शोधनिबंधात कल्याणकारी राज्य व सर्वसमावेशक वृध्दी यांचा संबंध विचारात घेण्यात आलेला दिसून येतो. डॉ.अनघा पाठक व डॉ.तेजस्विनी मुडेकर यांनी आपल्या शोधनिबंधामध्ये असंतुलित विकास दृष्टिकोन विचारात घेत भारतातील आंतरक्षेत्रीय असमतोल विचारात घेताना (1) नियोजन काळातील वित्तीय गुंतवणूकीतील क्षेत्रनिहाय हिस्सा (2) स्थूल देशांतर्गत उत्पादनातील क्षेत्रनिहाय हिस्सा (3) क्षेत्र निहाय सरासरी वृध्दी ह्या निकषांचा आधार घेऊन भारतासारख्या कृषीप्रधान देशात सर्वसमावेशक विकासाकरिता प्राथमिक क्षेत्राकडे दुर्लक्ष करून चालणार नाही व क्षेत्र निहाय असमतोलामुळे आर्थिक विषमता वाढत आहे असा निष्कर्ष काढला. डॉ.आर.एस.गडगे, सांगली यांनी आपल्या शोधनिबंधात भारतातील क्षेत्रीय असमतोल व अन्नसुरक्षा ह्या विषयात अन्नधान्याच्या उत्पादनातील असमतोल व त्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक मजबूत करण्याचे धोरण यावर अधिक भर दिला.

प्रा.एस.आर.काकडे व डॉ. जे.जी.साबळे यांनी त्यांच्या 'सर्वसमावेशक वृध्दी आणि कृषी क्षेत्र' या शोधनिबंधात कृषी मजूरांचा घटता हिस्सा, कृषी क्षेत्रातील आदानांचा घटता वृध्दी दर; परिणामी एकूण उत्पादकता वृध्दीमध्ये होत असलेली घट, कृषी वृध्दी दर व व्यापारशर्ती यांचा संबंध स्पष्ट करून कृषी क्षेत्रातील विकासावर अधिक लक्ष केंद्रित करण्याची गरज स्पष्ट केली. प्रा.जे.एस.इंगळे, मंचर यांनी आपल्या शोधनिबंधात ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील 420 आदिवासी कुटुंबांची पाहणी करून सरकारच्या उत्पन्न निकषानुसार अभ्यास क्षेत्रातील आदिवासींमधील दारिद्रयाचे प्रमाण (48.80%) व अभ्यासकाच्या 14 निकषांनुसार दारिद्रयाचे प्रमाण (80.72%) यातील तफावत व त्यांची कारणे व उपाय स्पष्ट केले. कारणांचा विचार करताना कर्ज परतफेडीच्या पध्दती, पुरेशा रोजगार संधीचा अभाव, वर्षातून फक्त 132 दिवस काम, दिवसातून तीन वेळा आहार घेण्याचे प्रमाण, पुरक व्यवसाय संधींचा अभाव इ. मागोवा घेतला; तर उपायांमध्ये पूरक व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून देणे, उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे, मोफत धान्य पुरवठा, झुणका-भाकर योजना इ. उपाय सुचविले.

डॉ.संभाजी काळे, भेंडे बु. ।।, ता.नेवासा यांनी आपल्या ''शेती क्षेत्राचा असमतोल विकास आणि विषमता कमी करण्यासाठी उपाययोजना'' या शोधनिबंधाचे वाचन करताना असे स्पष्ट केले की, 1991 नंतर भारतीय शेतीसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. भारताच्या विविध प्रदेशांचा विचार करता शेती विकासात प्रादेशिक असमतोल निर्माण झालेला दिसून येत आहे. यातूनच आर्थिक विषमता निर्माण होत असून विषमता कमी करण्याकरिता भारतीय शेतीक्षेत्राच्या विकासातील असमतोल दूर करणे आवश्यक आहे व त्यादृष्टिने उपाययोजना अंमलात आणणे गरजेचे आहे. उदा.पाण्याचा काटकसरीने वापर, शेतीमाल प्रक्रिया

उद्योगाचा ग्रामीण भागात प्रसार, शेती बाजार व्यवस्था विकसित करणे, शेती क्षेत्रात शेतकऱ्यांनी काम केल्यानंतर रोजगाराची हमी उपलब्ध करून देणे इ. उपायांचा डॉ.संभाजी काळे यांनी विचार मांडला.

''कृषी विकासासाठी सर्वसमावेशक धोरणाची गरज'' या श्री.रमजान मुजावर, संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी आपल्या शोधनिबंधामध्ये कृषी विकासासाठी सर्वसमावेशक धोरणाची गरज स्पष्ट केली. त्यानुसार भारतीय शेतीचे बदलते स्वरूप, भारतीय शेती क्षेत्राच्या समस्या, उपाय योजना यांचा विचार केला. शेती क्षेत्राचा विकास 4% दराने झाला तर राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर 10% शक्य आहे. म्हणून हे दोन विकास दर अधिक सर्वसमावेशक करण्याकरिता शेती विकास घडवून आणणे गरजेचे आहे असे स्पष्ट केले.

डॉ.के.जी.पठाण व प्रा.सुरेंद्र डावरे, पुणे यांचा शोधनिबंध''दारिद्रय निवारण्यासाठी सर्वसमावेशक वृध्दीचे सामाजिक धोरण '' या विषयावर होता. डॉ.के.जी.पठाण यांनी सर्वसमावेशक वृध्दीची संकल्पना(मानवी) विकास या संकल्पनेवर अधिक भर दिला. त्यासाठी 11 व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत अभिप्रेत असलेली सामाजिक वंचित विकासाची संकल्पना स्पष्ट केली. या दृष्टिने दारिद्रय निवारणाच्या कार्यक्रमात गरीबांच्या शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, संरक्षण, मुलभूत गरजा, सेवा-सुविधा यांवर निधींचा अग्रक्रमाने वापर केला पाहिजे हे स्पष्ट केले.

प्रा.घूमटकर यांनी ''सर्वसमावेशक आर्थिक वृध्दी आणि रोजगार'' या शोधनिबंधामध्ये 11व्या पंचवार्षिक योजनेचा आढावा घेऊन रोजगार वृध्दीकरीताच्या उपायांचा विचार मांडला.

एकूण उपलब्ध शोधनिबंध लेखकांपैकी 8 शोधनिबंधकांनी शोधनिबंधांचे वाचन केले. त्यानंतर झालेल्या खुल्या चर्चेमध्ये 7 प्राध्यापकांनी सहभाग घेतला व या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. चर्चेत प्राध्यापक डॉ.जे.एफ.पाटील, डॉ.विनायक देशपांडे,डॉ.मुक्ता जहागिरदार, डॉ.आबासाहेब कल्याणकर, डॉ.दि.व्यं.जहागिरदार, डॉ.सुहास सहस्त्रबुध्दे, डॉ.सुभाष दगडे सहभागी झाले होते.

डॉ.जे.एफ.पाटील यांनी मनोगत व्यक्त करीत असताना असे स्पष्ट केले की, विकासाची नवीन प्रवृत्ती विषमता निर्माण करणारी असते, यासाठी उपलब्ध मालमत्तेचे अधिक समान वाटप करण्याची व्यवस्था केली पाहिजे. तसेच प्रत्येकाला उत्पन्न मिळविण्याची संधी (रोजगार) दिली जावी. डॉ.विनायक देशपांडे यांनी चर्चेत सहभाग घेताना असे स्पष्ट केले की, सर्वसमावेशक वृध्दीचा विचार करीत असताना, आर्थिक संधी सर्वांना उपलब्ध होणे आवश्यक आहे. क्षेत्रनिहाय वाटा बदलत आहे, वित्तीय क्षेत्राचा विकास घडून येणे, आधारभूत संरचना, श्रम बाजारात लवचिकता आणणे ह्या बाबींवर अधिक भर देणे गरजेचे ठरते.

डॉ.मुक्ता जहागिरदार यांनी संदर्भ ग्रंथांचे स्पष्टीकरणाबरोबरच सर्वसमावेशक वृध्दीचा नेमका अर्थ काय? याचे योग्य स्पष्टीकरण देता येत नाही. संसाधनांची समावेशकता, मानवी संसाधनांचा समावेश, संधींची उपलब्धता, क्षेत्रीय व प्रादेशिक समावेशकता, जीवनाच्या गुणवत्ता शक्यतेचा विकास इ. विचार या संकल्पनेत होणे गरजेचे आहे असे स्पष्ट केले. डॉ.दि.व्यं.जहागिरदार यांनी मत व्यक्त करीत असताना असे स्पष्ट केले की,

सर्वसमावेशक वृध्दी ही बहुआयामी संकल्पना आहे. विकासाबरोबरच विषमता येत असते. ही विषमता जातीमुळे, लिंगभेदामुळे, प्रादेशिक विषमता, एकाच विभागातील प्रादेशिक विषमता इ. विचार सर्वसमावेशक वृध्दी संकल्पनेत होणे गरजेचे आहे.

डॉ.सुहास सहस्त्रबुध्दे यांनी या संदर्भात मनोगत व्यक्त करीत असताना ईपीडब्ल्यु मधील डॉ.सुर्यनारायणा यांच्या लेखाचा संदर्भ दिला. अभ्यासकांनी, शोधनिबंधकांनी या संदर्भात अधिक सखोल वाचन करणे गरजेचे आहे असे स्पष्ट केले. डॉ.आबासाहेब कल्याणकर यांनी सर्वसमावेशक वृध्दी संकल्पना व आर्थिक विकास, कृषी विकास यांचा संदर्भ देत मनोगत व्यक्त केले. तर डॉ.सुभाष दगडे यांनी सर्वसमावेशक वृध्दी अंतर्गत आर्थिक विकासाचा विचार करीत असताना दुर्बल घटकांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही असे मत व्यक्त केले.

''सर्वसमावेशक वृध्दीचे सैध्दान्तिक विवेचन'' हा आर्थिक सिध्दांताशी संबंधित विषय ३२ व्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाकरिता दिला गेला होता. प्रस्तुत शोधनिबंधांचा एकत्रित विचार करता एक-दोन शोधनिबंध वगळता उर्वरित शोधनिबंधकांनी आपले लिखाण असंतुलित विकास दृष्टिकोन विचारात घेता 'क्षेत्रीय व प्रादेशिक असमतोल' हा दृष्टिकोन समोर ठेवून कृषी क्षेत्रातील असमतोल मानवी विकास असमतोल ह्या बाबींवर भर दिला.सर्वसमावेशक वृध्दीची संकल्पना फक्त तीन शोधनिबंधांमध्ये येऊ शकली. ''असंतुलित दृष्टिकोन म्हणजे असमतोल'' हा वेगळा संदर्भ घेतला गेला.अर्थात सर्वच शोधनिबंधकांच्या विचारांचा दर्जा हा अधिक आश्वासक आणि समाधानकारक आहे, असे मनापासून वाटते.

---

## निवेदन

**ग्रंथालयासाठी वर्गणीत खालील प्रमाणे बदल करण्यात आले आहेत.**

| | | |
|---|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | - | रू.250/- |
| **तीन वर्षासाठी वर्गणी** | - | रू.600/- |
| **पाच वर्षासाठी वर्गणी** | - | रू.1000/- |

**अनिल सुर्यवंशी**
**कार्यवाह-खजिनदार**

**2008-2009 या वर्षात इमारत निधी दिलेल्या सभासदांची नांवे**

| अ.क्र. | नांव | रक्कम |
|---|---|---|
| 1 | नसीम मुझफ्फर शेख - पुणे | 1000/- |
| 2 | जे. जी. जाधव - सातारा | 1000/- |

# चर्चासत्र दुसरे
# राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना स्वरूप, उपयुक्तता आणि भवितव्य

**सूत्रसंचालक-** सुर्यकांत एच.जगदाळे,
कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय,
वाशी, जि.उस्मानाबाद
माजी अध्यक्ष-मराठी अर्थशास्त्र परिषद

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे मूळ महाराष्ट्राच्या रोजगार हमी योजनेमध्ये आहे. महाराष्ट्राची रोजगार हमी योजना ही 1965 मध्ये पागे योजनेच्या स्वरूपात विसापूर खेड्यापासून सुरू झाली. या योजनेचे रूपांतर 1972 मध्ये रोजगार हमी योजनेत झाले. ग्रामीण भागातील बेकारी व दारिद्रय यावर उपाय म्हणून सरकारने मागेल त्या अकुशल कामगारास काम देण्याची भूमिका घेतली. यासंबंधी राज्य शासनाने 15 कलमी कार्यक्रमाचा भाग म्हणून राज्य स्तरावर रोजगार हमी योजना कायदा करून तो 26 जानेवारी, 1989 पासून अंमलात आला. महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत या योजनेतून 12,643 कोटी रूपये खर्च झालेला असून या योजनेतून पाटबंधारे, मृदसंधारण, वनीकरण व रस्ते इ. मिळून 5,85,576 कामे पूर्ण झालेली आहेत. तर या योजनेपासून 830.58 कोटी मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झाली. या योजनेचे भरीव यश पाहून केंद्र शासनाने 2005 मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा संमत केला. या कायद्यानुसार ग्रामीण कुटुंबातील एका व्यक्तीस वर्षातून 100 दिवस अकुशल स्वरूपाचा रोजगार देण्याची हमी आहे. यामुळे ग्रामीण भागातील मजूरांना रोजगार मिळविण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. तसेच या रोजगारातून उत्पादक स्वरूपाची कामे निर्माण व्हावीत ही अपेक्षा आहे.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे महत्त्व लक्षात घेऊन मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 32 व्या वार्षिक राष्ट्रीय अधिवेशनात सदरील विषय चर्चासत्रासाठी घेतलेला आहे. या विषयावर एकूण 35 शोधनिबंध संशोधकांनी सादर केलेले आहेत. या शोधनिबंधापैकी डॉ.ए.पी.कुंटे व प्राचार्य डॉ.एस.आर.टकले यांनी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची महाराष्ट्रातील

रोजगार हमी योजनेशी तुलना केली आहे. ही तुलना करताना त्यांनी निधीचा वापर, स्त्री मजूर, योजनेवरील इतर सुविधा इत्यादी निकष उपयोगात आणले आहेत.

प्रा.अनंतकवलस, प्रा.सुरवसे, प्रा.यादव यांनी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा सातारा जिल्ह्यातील स्थितीचा आढावा घेतलेला आहे. त्यांच्या मते ही योजना दारिद्रयावर मात करणारी प्रभावी योजना आहे. ही योजना यशस्वी होण्यासाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, ग्रामसभा व अधिकारी वर्ग यांनी कार्यक्षमतेने काम करून बेकार लोकांना योजनेचा लाभ मिळवून दिला पाहिजे.डॉ.तानाजी गिते यांनी आपल्या शोधनिबंधात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे स्वरूप व व्यवहारिकता स्पष्ट केली आहे. त्यांनी पहिल्या भागात रोजगार हमी योजनेची कार्यपध्दती स्पष्ट केली आहे. दुसऱ्या भागात योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी आवश्यक बाबी स्पष्ट केल्या आहेत. तर तिसऱ्या भागात योजनेचे भवितव्य स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते राजकीय इच्छाशक्ती असेल तरच योजनेची अंमलबजावणी परिणामकारक होऊ शकेल.डॉ. सुहास आव्हाड, प्रा.संदिप इरोले व विशाल पावसे यांनी रा.रो.ह.यो.-सिंहावलोकन या शोधनिबंधात राग्रारोहयो चे स्वरूप स्पष्ट करून योजनेची कार्यक्षमतेने अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना सुचविली आहे. प्रा.अशोक गाढवे यांनी राग्रारोहयो - दारिद्रय निर्मूलनासाठी एक वरदान या शोधनिबंधात योजनेचे अपेक्षित यश स्पष्ट केले आहे.प्रा.बाजीराव इंगवले यांच्या शोधनिबंधात राग्रारोहयोची महाराष्ट्रातील स्थिती स्पष्ट केली आहे. तसेच त्यांनी या योजनेचा देशपातळीवरील कार्याचा आढावा घेतला आहे. प्रा.अतुल साळुंखे यांनी राग्रारोहयोचे स्वरूप, उपयुक्तता व भवितव्य स्पष्ट करून योजनेच्या मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. डॉ.सौ.मंजुषा ठाकरे यांनी आपल्या शोधनिबंधात योजनेचे स्वरूप, उपयुक्तता व भवितव्य स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते योजनेची ग्रामीण भागात परिणामकारक अंमलबजावणी केली तर मनुष्यबळाचा विकास होऊ शकेल. डॉ.मोहन चौधरी यांनी भारतातील व महाराष्ट्रातील योजनेचा तुलनात्मक अभ्यास करून दोन्ही योजनांतील फरक स्पष्ट केला आहे. डॉ.जाधववर, डॉ. मिसाळ व डॉ.अवघडे यांनी आपल्या शोधनिबंधात दोन्ही योजनेचा तुलनात्मक अभ्यास करून केंद्रशासनाची वित्तीय जबाबदारी स्पष्ट केली आहे. डॉ.सौ.सुमित्रा पवार यांनी योजनेचे स्वरूप स्पष्ट करून कामगाराच्या सुविधा व इतर तरतूदींचा आढावा घेतला आहे. डॉ.अशोक पवार यांनी योजनेची वर्तमान स्थिती स्पष्ट केली आहे. डॉ.खेडकर यांनी योजनेचे धोरण काय ?आणि कसे ? हे स्पष्ट करून योजनेकडून अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. सौ.म्होपरे, डॉ.म्होपरे यांनी आपल्या निबंधात शासन निर्णयाला महत्व दिले आहे. प्रा.दिपा मुसळे, प्रा.लोंढे व प्रा.मेघना गोरे यांनी सोलापूर जिल्ह्यातील राहयो अंतर्गत फळबाग लागवड विकासाचा चिकित्सक अभ्यास केला आहे. शिकलगार आसिफ अकबर व बुरूटे प्रकाश यांनी राग्रारोहयोची ग्रामीण विकासातील भूमिका स्पष्ट केली आहे. डॉ.अरूणा सोनेगांवकर यांनी योजनेच्या यशापयशाची चर्चा केली आहे. अनिल इंगळे व अमोल देवताळे यांनी योजनेच्या अंमलबजावणीतील विविध स्तरावरील अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये यांचा आढावा घेतला आहे. राहूल म्होपरे यांनी अहमदनगर जिल्ह्यातील राग्रारोहयोचा ग्रामपंचायत

स्तर तालुका व जिल्हा स्तरावर अभ्यास केलेला आहे. संदीप अंबुरे व देशभूषण खोत यांनी योजनेचे स्वरूप व वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. डॉ.सुनिता शिनगारे यांनी योजनेचे स्वरूप स्पष्ट करून कार्याचा आढावा घेतला आहे. कोकरे साधू यांनी योजनेची संकल्पना व व्याप्ती स्पष्ट केली आहे. धनगर जगतराव यांनी राग्रारोहयोचे स्वरूप, भवितव्य स्पष्ट केले आहे. कल्पना भागवत यांनी रोहयोच्या कार्याचा धुळे जिल्ह्यातील आढावा घेतला आहे. प्रा.सौ.तिलोत्तमा चौधरी यांनी रोग्रारोहयो मुळे महाराष्ट्रास संजीवनी हा शोधनिबंध सादर केला आहे. चंद्रकांत माळी यांनी दोन्ही योजनेची तुलना करून स्वरूप व भवितव्य स्पष्ट केले आहे. डॉ.हिरालाल चव्हाण यांनी राग्रारोह्योच्या कायद्यावर दृष्टिक्षेप टाकून त्यातील त्रूटी स्पष्ट करून उपाय सुचविले आहेत. प्रा.श्रीराम कावळे यांनी योजनेचे स्वरूप व कार्यपध्दती गडचिरोली जिल्ह्यासंबंधी स्पष्ट केल्या आहेत. प्रा.वाघमारे कबीर व सुरेश पाटील यांनी दोन्ही योजनेचा चिकित्सक अभ्यास केला आहे. प्रा.पाठक व प्रा.जे.डी.सांगोडे यांनी बुलढाणा पंचायत समिती मधील योजनेचे कार्य स्पष्ट केले. प्रा.आर.बी. भांडवलकर व प्रा.आर.आर.धवाले यांनी योजनेचे परिणाम स्पष्ट केले आहेत. प्रा.पी.जे.कारोले व प्रा.सु.रा.जगताप यांनी दोन्ही योजनेचे स्वरूप, उपयुक्तता व भवितव्य स्पष्ट करून उपाय सुचविले आहेत. तर डॉ.बी.आर.सोनवणे, डॉ.कैलास ठोंबरे, डॉ.नंदकिशोर मुळे यांनी योजनेच्या कार्यपध्दतीवर दृष्टिक्षेप टाकलेला आहे.

सदरील विषयावर ३५ संशोधकांनी शोधनिबंध सादर केले आहेत. त्यातील बहुतेक शोधनिबंधाचा दर्जा चांगला असून संशोधनाच्या दृष्टीने ही बाब आश्वासक आहे. या चर्चासत्रात अनेक नवीन संशोधक विद्यार्थ्यांनी शोधनिबंध सादर केले असून मी त्यांच्या पुढील संशोधनास शुभेच्छा देतो.

राग्रारोहयो ही योजना अत्यंत चांगली असून तिच्या अंमलबजावणीस अनेक मर्यादा आहेत. त्यामध्ये शासकीय यंत्रणेची अंमलबजावणी संबंधीची अनास्था, कामाचे अयोग्य व अनुत्पादक स्वरूप, कामाचा अयोग्य दर्जा या योजनेचे अनास्थेचे उदाहरण म्हणजे योजनेचे दस्त ऐवज व्यवस्थित ठेवले जात नाहीत. तसेच प्रामाणिकपणे अंमलबजावणीतही अनेक अडचणी येत आहेत.

असे असले तरी ग्रामीण विकास, दारिद्रय निर्मूलन आणि रोजगार निर्मितीसाठी ही योजना निश्चितच उपयुक्त व फलदायी ठरणारी आहे. तसेच शिक्षण, आरोग्य व रोजगार यांचा मूलभूत हक्कामध्ये समावेश करण्याची आवश्यकता आहे. या योजनेने त्या दिशेने पहिले पाऊल टाकले आहे.

# चर्चासत्र तिसरे
# सन 1990 नंतरच्या महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाचे बदलते स्वरूप

**सुत्रसंचालक - मधुकर शिंदे,**
इस्लामपूर, जि.सांगली.
भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

## भाग - 1

**प्रस्तावना :**

राजसत्तेचा अर्थसंकल्प हा त्यांच्या आर्थिक धोरणाचा आरसा असतो. . सरकारच्या अर्थसंकल्पात सरकारने आकारलेले कर , खर्च , कर्जे इत्यादी बाबी प्रतिबिंबित झालेल्या असतात. अर्थसंकल्प हा सरकारच्या उत्पन्न व खर्चाचा ताळेबंद असतो. सरकारच्या आर्थिक धोरणानुसार सरकारचे अंदाजपत्रक दरवर्षी तयार केले जाते.भारतीय राज्यघटनेतील कलमे 38,39, 41,45 व 47 सरकारच्या आर्थिक धोरणाबाबत मार्गदर्शन करतात.भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वे सरकारच्या कार्याबाबत स्पष्टीकरण देतात. भारतीय राज्यघटनेतील कलम 112 व 202 नुसार सरकारला अंदाजपत्रक तयार करून कायदेमंडळात मांडण्याचा अधिकार आहे.

20 व्या शतकातील कल्याणकारी राज्याची कल्पना व सरकारची कार्ये आणि अंदाजपत्रक, सन 1929 च्या जागतिक आर्थिक मंदीनंतर केन्सचे आर्थिक विचार व त्यांचा सरकारच्या अंदाजपत्रकावर झालेला परिणाम; त्यातून तूटीच्या अंदाजपत्रकाचा स्वीकार, अंदाजपत्रकाचे प्रकार, अंदाजपत्रकाचे विविध भाग उदा. एकूण प्राप्ती व एकूण खर्च, महसूली जमा व खर्च, भांडवली जमा व खर्च राज्यांना मिळणारा केंद्रीय करातील वाटा,कर महसूल व करेत्तर महसूल, विकास व विकासेत्तर खर्च, केंद्र सरकारकडून राज्यांना मिळणारी अनुदाने व मदत; विविध प्रकारची सूट,महसूली तूट, अंदाजपत्रकीय तूट, प्राथमिक तूट व राजकोषीय तूट, योजना खर्च व बिगर योजना खर्च, सार्वजनिक कर्जे वगैरे घटकातील बदलांच्या कलाचा महाराष्ट्र सरकारच्या 1990-91 ते 2007-08 या वर्षातील अंदाजपत्रकातील बदलांचा आढावा व ऊहापोह डॉ.एम.एन.शिंदे यांनी आपल्या सूत्रसंचालकीय भाषणामध्ये केला व शेवटी महाराष्ट्र सरकारच्या जागतिकीकरण काळातील अंदाजपत्रकामध्ये तुलनेने शेती क्षेत्राकडे दुर्लक्ष झाले असल्याचे म्हटले.

भाग २

सन 1990 नंतर महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पाचे बदलते स्वरूप या विषयावर एकूण 12 शोधनिबंध सादर झाले. त्यामध्ये पुढील मुद्दे मांडण्यात आले.प्रा.दिलीप गजानन पाटील, सरूड,जिल्हा कोल्हापूर यांनी आपल्या शोधनिबंधात महाराष्ट्राच्या अंदाजपत्रकातील एकूण उत्पन्न व एकूण खर्च , महसूली जमा व भांडवली जमा, एकूण खर्चातील महसूली खर्च व भांडवली खर्चाचे प्रमाण, तूट व अंदाजपत्रकीय तूट, कर्जातील वाढ, विकास व विकासेत्तर खर्चातील बदलांचा परामर्श घेतला त्यांच्या मते, महाराष्ट्रावरील दरडोई कर्जाचा बोजा वाढत आहे अशी खंत व्यक्त केली. डॉ.व्ही.बी. खंदारे देवगांव (रं)जि.औरंगाबाद यांनी आपल्या शोधनिबंधात महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पातील महसूली जमा व खर्च, भांडवली जमा व खर्च, महसूली उत्पन्नाचे घटक, महसूली उत्पन्नाचे एकूण महसूलाशी प्रमाण, भांडवली उत्पन्नाचे स्त्रोत, त्यांचे एकूण उत्पन्नाशी प्रमाण, विकास व विकासेत्तर खर्च , त्यांचे एकूण खर्चाशी प्रमाण, यांचा आढावा घेतला. ऋण सेवा, निवृत्ती वेतन, संकीर्ण यासारख्या बिगर विकास खर्चात झालेल्या वाढीबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली आहे. डॉ.अंभोरे, औरंगाबाद यांनी आपल्या विवेचनात महाराष्ट्र राज्याच्या एकूण महसूलातील बदलत्या प्रवृत्ती, महाराष्ट्राचा कर महसूल विविध करांचे एकूण कर महसूलातील प्रमाण, चालू खात्यावरील शिलकेतील बदल, महसूली खर्च, भांडवली खर्च, योजना व योजनेत्तर खर्च, विकास व विकासेत्तर खर्चातील बदलांची चर्चा केली व सन 1993-94 ते 2002-03 या वर्षात विकास खर्च कमी झाला; तर बिगर विकास खर्चात वाढ झाल्याचे म्हटले. डॉ.कल्याणकर, औरंगाबाद यांनी आपल्या शोधनिबंधात एकत्रित लेख्याची रचना,महसूली व भांडवली जमेचे प्रमाण, महसूली जमेची रचना, त्याचे विविध घटक महाराष्ट्र राज्याचा स्वत:चा कर महसूल, विक्री कर, राज्य उत्पादन शुल्क, राज्याचे स्वत:चे इतर कर, त्यांचे एकूण कर, महसूलातील प्रमाण, राज्याच्या स्वत:च्या कर महसूलात अप्रत्यक्ष कराचे प्रमाण वाढले आहे. याची सरासरी वाटा 83% राहिल्याचे नमूद केले.

डॉ.प्रशांत लमकर,अमरावती यांनी आपल्या शोधनिबंधात महाराष्ट्र राज्याच्या अंदाजपत्रकात कृषी क्षेत्रातील विविध बाबींवर केलेल्या तरतूदींचा आढावा घेतला. महाराष्ट्र राज्याच्या 5 अंदाजपत्रकाचा ऊहापोह करून सरकारने कृषी क्षेत्रासाठी केलेल्या तरतूदी पुरेशा नाहीत, कृषी क्षेत्राच्या विकासासाठी राज्यनिहाय व्यूहरचना आवश्यक आहे असे त्यांनी म्हटले. प्राध्यापक बी.के.माने,इस्लामपूर, जि.सांगली आपल्या शोधनिबंधात सन 1990-91 ते 2007-08 या 18 वर्षातील महाराष्ट्र राज्याच्या अंदाजपत्रकातील राज्याचे एकूण उत्पन्न व खर्चातील वाढीचा कल स्पष्ट करतात, तसेच या कालावधीतील विविध सेवांवरील खर्चाचा अभ्यास करून शेती क्षेत्रावर महाराष्ट्र सरकारचा खर्च कमी राहिला असून त्यात वाढ झाली पाहिजे असे नमुद केले आहे. प्रा.बी.पी.पाटील,इस्लामपूर जि.सांगली यांनी आपल्या शोधनिबंधात महसूली जमा, कर व करेत्तर उत्पन्न, राज्याचे स्वत:चे कर, विक्री कर, अबकारी कर,इतर कर,महसूली तूट व अंदाजपत्रकीय तूट यामधील बदल अभ्यासले आहेत. महाराष्ट्र राज्याच्या कर उत्पन्नात विक्री कराचा वाटा जास्त असल्याचे नमूद केले आहे. डॉ.पी.एस.कांबळे,

कोल्हापूर यांनी महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पातील कर महसूल व खर्चाच्या विविध प्रवृत्ती अभ्यासल्या आहेत. श्री.मकरंद चिकोडीकर यांनी महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पातील महसूली खात्याचे विश्लेषण केले आहे.मूल्यवर्धित करामुळे राज्याचा कर महसूल वाढेल असे त्यांनी म्हटले आहे. प्रा.स्वाती गंगाधर आदक, पुणे यांनी आपल्या शोधनिबंधात सन 1990-91 या वर्षाचा महसूली जमा व खर्च, विकास व विकासेत्तर खर्च तसेच भांडवली लेखा, ऋण स्थिती व 1990-91, 1995-96, 2000-2001 व 2008-09 या वर्षातील अर्थसंकल्पाच्या बदलत्या स्वरूपाचा आढावा घेतला व खुल्या आर्थिक धोरणाचा महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पावर परिणाम झाल्याचे नमूद केले. कु.खंदारे के.व्ही.,औरंगाबाद यांनी सन 1990-91 ते 2008-09 या काळातील महाराष्ट्र सरकारच्या उत्पन्न व खर्चातील बदलांचा आढावा घेतला कु.भाग्यश्री पाटील,इस्लामपूर जि.सांगली यांनी सन 2004-05 ते 2007-08 वर्षातील अंदाजपत्रकीय कलांचा आढावा घेतला.

अशा रीतीने विविध अभ्यासकांनी सन 1990-91 ते 2008-09 या 19 वर्षातील महाराष्ट्र राज्याच्या अंदाजपत्रकातील विविध घटकांच्या बदलत्या प्रवृत्तींचा अभ्यास करून त्यामधील चांगल्या बाबी तसेच उणीवांचे विवेचन केले; त्यावर चर्चा होऊन हे सत्र संपन्न झाले.


# मराठी अर्थशास्त्र परिषद

मनुष्याणाम् वृत्तिदर्शः।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

## अर्थसंवाद

### जाहिरातीचे दर

| | | कृष्णधवल (B/W) | रंगीत |
|---|---|---|---|
| 1) | समोरचे आतील पृष्ठ | रू.4,000/- | रू.11,000/- |
| 2) | मागील पृष्ठ (आतील) | रू.4,000/- | रू.11,000/- |
| 3) | मागील शेवटचे पृष्ठ | रू.5,000/- | रू.15,000/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर - डिझाईन - (1/5 = 150 X 210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नांवे काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच तो अंक आपल्याला मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद, कळावे.

**आपले विश्वासू**

**अनिल बाबुराव सूर्यवंशी**
कार्यवाह-खजिनदार
गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ,
शिवाजीनगर,बार्शी-413411 जि.सोलापूर
फोन:(02184)224294
भ्रमणध्वनी:9011339906

**जगन्नाथ शामराव पाटील**
प्रमुख संपादक
शांती प्लाझा, बी-9,880/881, शनिवार पेठ,
सातारा. 415002 फोन : (02162) 233152
भ्रमणध्वनी : 9423261796

# कार्यवाहांचा अहवाल :
# बत्तिसावे वार्षिक अधिवेशन 2007-2008

**अनिल बाबूराव सुर्यवंशी**
कार्यवाह-खजिनदार,मराठी अर्थशास्त्र परिषद,

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे 32 वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन गुरूवार दिनांक 7 नोव्हेंबर ते रविवार दिनांक 9 नोव्हेंबर 2008 या तीन दिवसांच्या कालावधीत भारती विद्यापीठाचे, मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय,कडेगांव, जिल्हा सांगली येथे यशस्वीरित्या संपन्न झाले. डॉ.विनायक भिसे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद हे अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी होते.

## उद्‌घाटन समारंभ :-

उद्‌घाटन समारंभाची सुरूवात भारती विद्यापीठाच्या गीताने झाली. महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे यांनी केले. अधिवेशनाचे उद्‌घाटन मा.ना.डॉ.पतंगराव कदम, संस्थापक कुलपती, भारती विद्यापीठ व सहकार, पुनर्वसन व मदतकार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभ हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून मा.डॉ.माणिकराव साळुंखे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हे उपस्थित होते. व्यासपीठावर परिषदेचे अध्यक्ष विनायक भिसे, कार्याध्यक्ष ज.फा.पाटील, कार्यवाह व खजिनदार अनिल सुर्यवंशी, अर्थसंवादचे प्रमुख संपादक जगन्नाथ पाटील, परिषदेचे गतवर्षाचे अध्यक्ष-प्रकाश कुलकर्णी,अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष श्री.विश्वजीत कदम, कार्यवाह, भारती विद्यापीठ,पुणे, स्थानिक कार्याध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डी.जी.कणसे, स्थानिक कार्यवाह आत्माराम पोळ इत्यादी उपस्थित होते.

अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशनात शेतीवर सांगोपांग चर्चा व्हावी, दुष्काळी भागाचा कायापालट व्हावा यासाठी विचारमंथन गरजेचे आहे. असे प्रतिपादन सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.माणिकराव साळुंखे म्हणाले, शेतकऱ्यांच्या बौध्दिक मालमत्तेचा

अर्थकारणात विचार केला जात नाही. सामाजिक वंचितता व सर्वसमावेशक धोरण या विषयांवर मार्गदर्शन व्हावे. रोजगार हमी योजना योग्य पध्दतीने चालू शकत नाही; तरी ही योजना सुरळीतपणे चालावी, यासाठीही उपाययोजना करण्याची गरज आहे. स्वागताध्यक्ष विश्वजित कदम म्हणाले, जागतिक आर्थिक मंदीचा फटका बसत आहे. काय उपाययोजना करायला हवी, यावर चर्चा होऊन मार्गदर्शन करावे.या परिषदेतून देशाची आर्थिक प्रगती साधण्यासाठी मुद्दे पुढे येतील, त्याचा सर्वांना फायदा होईल.

परिषदेचे अध्यक्ष व्ही.बी.भिसे म्हणाले, हवामान साक्षरता, हवामान बदलाची जाणीव आजच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाच्या आहेत. भारताच्या हवामानातील संभाव्य बदलाचे कृषी क्षेत्रावर होणारे परिणाम, त्यासाठी अनुकूलन व उपशमन योजना नीटपणे समजावून घेणे गरजेचे आहे.

या उद्घाटन सोहळ्यात परिषदेचे कार्यवाह खजिनदार अनिल सुर्यवंशी यांनी परिषदेचे विविध उपक्रम विशद केले. कार्याध्यक्ष जे.एफ.पाटील यांनी आपल्या मनोगतात परिषदेला कार्यालयासाठी पुण्यात जागा मिळवून देण्यासाठी सहकार मंत्र्यांनी सहकार्य करावे असे विचार मांडले. भूतपूर्व अध्यक्ष पी.बी.कुलकर्णी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या उद्घाटन सोहळ्याचे आभार प्रदर्शन स्थानिक कार्यवाह आत्माराम पोळ यांनी केले.

**चर्चासत्रे :-**

अधिवेशनाच्या कालावधीत एकूण 4 चर्चासत्रे संपन्न झाली. शुक्रवार दिनांक 7 नोव्हेंबर रोजी 'सर्वसमावेशक वृध्दीचे सैध्दांतिक विवेचन' हे पहिले चर्चासत्र झाले. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन परिषदेचे विश्वस्त व माजी अध्यक्ष संतोष दास्ताने, पुणे यांनी केले. शनिवार दिनांक 8 नोव्हेंबर रोजी,राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना:स्वरूप, उपयुक्तता आणि भवितव्य आणि 1990 नंतरचे महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाचे बदलते स्वरूप अशी दोन चर्चासत्रे संपन्न झाली. या दोन चर्चासत्रांचे सूत्रसंचालन अनुक्रमे माजी अध्यक्ष सुर्यकांत जगदाळे, प्राचार्य कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी जि.उस्मानाबाद आणि माजी अध्यक्ष मधुकर शिंदे,उरूण इस्लामपूर,सांगली यांनी केले. रविवार दिनांक 9 नोव्हेंबर रोजी सहकारी पतसंस्थेची पुनर्रचना या आयत्या वेळच्या विषयावर चर्चासत्र पार पडले. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन माजी अध्यक्ष व प्राचार्य पी.बी.कुलकर्णी यांनी केले.

**सर्वसाधारण सभा :-**

शनिवार दिनांक 8 नोव्हेंबर रोजी झालेल्या परिषदेच्या सर्वसाधारण सभेस विनायक भिसे, औरंगाबाद अध्यक्षस्थानी होते. सभेच्या प्रारंभी दिवंगत आजीव सदस्य व मान्यवरांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. वार्षिक सर्वसाधारण सभेतील कांही महत्वाचे निर्णय पुढील प्रमाणे :-

**33 वे वार्षिक अधिवेशन :-**

ऑक्टोबर / नोव्हेंबर 2009 मध्ये होणाऱ्या परिषदेच्या 33 व्या वार्षिक अधिवेशनाचे यजमानपद स्वीकारण्यासाठी दोन निमंत्रणे प्राप्त झाली होती. 1) ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे, शारदाबाई पवार महिला महाविद्यालय,शारदानगर, बारामती जि.पुणे. 2) आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे, आदर्श कॉलेज ऑफ आर्टस, बदलापूर जि.ठाणे. कार्यकारी

मंडळाच्या शिफारशीनुसार सर्वसाधारण सभेने शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, बारामती यांचे निमंत्रण एकमताने स्वीकारले.आदर्श कॉलेज ऑफ आर्टस्,बदलापूर यांचे निमंत्रण 2010 सालासाठी विचार करण्याचे ठरले.

33 व्या वार्षिक अधिवेशनासाठी पुढील तीन विषय निश्चित करण्यात आले. 1) आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दांतातील पॉल क्रुगमन यांचे योगदान 2) 21व्या शतकातील भारतीय शेती क्षेत्रासमोरील आव्हाने. 3) महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचे मूल्यमापन.

**निवडणूक :-**

33 व्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी विनायक श्रीधर देशपांडे, प्रपाठक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांची बहुमताने निवड झाली.

2009 ते 2012 या तीन वर्षासाठी माजी कार्यवाह – खजिनदार चारूदत्त गोखले, जळगांव यांची विश्वस्त म्हणून एकमताने निवड झाली. या संदर्भात जे.एफ. पाटील यांनी ठराव मांडला व मोहन चौधरी यांनी अनुमोदन दिले.

2009 ते 2012 या तीन वर्षासाठी कार्यकारी मंडळावर

1) प्राचार्य –डॉ.रामकृष्ण गुंडेराव टाले, खापरखेडा, नागपूर

2) डॉ.विकास विनायकराव सुकाळे, नांदेड

3) डॉ.ज्ञानोबा भिमराव मोरे, औरंगाबाद

या तिघांची बिनविरोध निवड झाली. कार्याध्यक्ष – पदासाठी दिलीप खंडेराव पाटील सांगली यांची 2009-2012 या तीन वर्षासाठी बिनविरोध निवड झाली.

ज.फा.पाटील यांचा कार्याध्यक्ष पदाचा कार्यकाल 31-3-2009 रोजी संपत आहे. त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मिसाळ यांनी मांडला. सभागृहाने उभे राहून टाळ्यांच्या गजरात निरोप दिला. ज.फा.पाटील यांनी यापुढेही परिषदेच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी सहकार्य करेन असे भावपूर्ण मनोगत व्यक्त केले. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा व सर्व उपस्थित माजी अध्यक्षांचा स्मृति चिन्ह देऊन यशोचित सत्कार करण्यात आला. अहवाल वर्षात ज्या सभासदांनी पीएच.डी.पदवी प्राप्त केली व ज्यांना राज्य व राष्ट्रीय स्तरावर विविध पुरस्कार मिळाले अशा सभासदांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

निवडणूक संदर्भात एक महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आला. म.अ.परिषदेचे अध्यक्षपद हे सर्वोच्च पद असल्यामुळे अध्यक्षपदी निवड झालेल्या सभासदाला नंतर परिषदेच्या इतर कोणत्याही पदासाठी निवडणूक लढविता येणार नाही. हा ठराव एस.डब्ल्यू मिसाळ यांनी मांडला. यास सुहास सहस्त्रबुध्दे व एस.एन.कुलकर्णी यांनी अनुमोदन दिले.

**समारोप सोहळा :-**

रविवार दि.9 नोव्हेंबर 2008 रोजी दुपारी 12 वा. 32 व्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या समारोप सोहळ्यास सुरूवात झाली. समारोप सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून मा.डॉ.शिवाजीराव कदम, कुलगुरू, भारती विद्यापीठ,पुणे व सदस्य, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली होते. सध्याच्या जागतिक मंदीच्या परिस्थितीत ग्रामीण औद्योगिकरणावर भर देऊन रोजगार संधी वाढवाव्यात. परिषदेचे विषय ग्रामीण भागाशी निगडीत असावेत. ग्रामीण भागातील 2 (एफ), 12

(बी) नसणाऱ्या महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोगाकडून विकासासाठी अनुदान यापुढे मिळेल अशी आता तरतूद केल्याचे सांगितले. मराठी अर्थशास्त्र परिषदेस पुण्यनगरीत स्ववास्तू मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे मान्य केले. तसेच कार्याध्यक्ष ज.फा.पाटील यांच्या सूचनेनुसार ग्रंथपरिचेणिक कदम कुटुंबाकडून ठेवण्याचे घोषित केले. यासाठी 1 लाख रूपयाचा आर्थिक निधी देण्याचे प्रमुख पाहुण्यांनी जाहीर केले.

परिषदेचे कार्यवाह-खजिनदार अनिल सुर्यवंशी, कार्याध्यक्ष ज.फा.पाटील, अध्यक्ष विनायक भिसे यांनी परिषदेच्या वतीने आपली मनोगते व्यक्त केली. मा.ए.ए.डांगे, संचालक, बी.सी.यू.डी. शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर यांची विशेष उपस्थिती होती. संशोधकांनी सामाजिक कल्याणाची जाणीव ठेवून समाजपयोगी संशोधन करावे. सामाजिक कल्याणासाठी अंदाजपत्रकीय तरतूद करावी असे मनोगत मांडले.

नवनिर्वाचित अध्यक्ष विनायक देशपांडे, नागपूर व कार्याध्यक्ष दिलीप पाटील, सांगली यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या सोहळ्यास व्यासपीठावर परिषदेचे अध्यक्ष विनायक भिसे, कार्याध्यक्ष ज.फा.पाटील, मा.मोहनराव कदम, चेअरमन, सोनहिरा सह.साखर कारखाना लि.,कडेगांव, महाविद्यालयाचे प्राचार्य डी.जी.कणसे, स्थानिक कार्यवाही आत्माराम पोळ, अर्थसंवादचे संपादक जगन्नाथ पाटील, कार्यवाह-खजिनदार अनिल सुर्यवंशी , विश्वस्त संतोष दास्ताने, के.जी.पठाण नवनिर्वाचित अध्यक्ष विनायक देशपांडे व कार्याध्यक्ष दिलीप पाटील, कार्यकारिणी सदस्य मोहन चौधरी, मानाजी गीते आदी उपस्थित होते.

**परिषदेतर्फे विविध पारितोषिकांचे वितरण:-**

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे दिल्या जाणाऱ्या विविध पारितोषिकांचे वितरण या समारोप समारंभात पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उत्कृष्ठ ग्रंथ पारितोषिक रू.501/- (2007-2008)

'भारताचा भविष्यवेध-नव्या अर्थनितीचा शोध-बोध' या प्रा.पी.आर.तथा प्रभाकर रघुनाथ जोशी, मुंबई यांच्या ग्रंथास देण्यात आले.

2) प्रा.मो.स.भावे पारितोषिक - अर्थसंवाद मधील सर्वोत्कृष्ठ लेख रू.251/-

'नंदुरबार जिल्ह्यातील कुपोषण समस्या व उपाय' या प्रा.राजेंद्र के.शिंदे, देवपूर धुळे व डॉ.रा.ना.भालेराव, अंमळनेर, जळगांव यांच्या लेखास देण्यात आले.(जुलै-सप्टेंबर 2007-खंड 31/अंक 2)

3) म.अ.परिषदेचे - पाचवे वार्षिक अधिवेशन पारितोषिक -शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे एम.ए.अर्थशास्त्र विषयात सर्वाधिक गुण मिळालेल्या कु.समीना एस.जामदार, कोल्हापूर (एप्रिल 2008) हिस प्रमाणपत्र देण्यात आले.

4) भाऊसाहेब गेणूजी दरेकर - पाटील स्मृती पारितोषिक - पुणे विद्यापीठात एम.ए.अर्थशास्त्र विषयात प्रथम क्रमांक विद्यार्थ्यास रूपये 251/- पारितोषिक देण्यात आले.

5) डॉ.रविंद्र सबनीस स्मृती पारितोषिक

एम.एच.बाल सुब्रमन्य, बंगलोर यांच्या Development strategies for Indian SMEs:promoting linkages with global transnational corporation या लेखास

देण्यात आले Management Research News Vol.30, No.10.2007 PP762-724 -(M.H.Bala Subrahmanya, Department of Management stuides Indian Institute of Science, Banglore, India).

**अधिवेशन काळातील पारितोषिक :-**

5.1) कै.ग.प्र.पिंपरकर व कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ.अमर्त्य सेन पारितोषिक रू.501/-

प्रा.जयवंत इंगळे, अ.आ.कॉलेज, मंचर यांच्या 'ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील दारिद्र्याची समस्या' या सर्वोत्कृष्ठ शोध निबंधास देण्यात आले.

5.2) डॉ.ज.फा.पाटील पारितोषिक रू.1001/- वार्षिक अधिवेशनात विद्यार्थी सभासदाने सादर केलेल्या सर्वोत्कृष्ठ शोधनिबंधासाठी:-

1) श्री.संदीप सुरेश अंबुरे व देशभूषण खोत आर.आय.टी.वाळवा

2) श्री.अनिल इंगळे व अमोल देवकळते आर.आय.टी.कॉलेज,साखराळे जि.सांगली. याच्या दोन शोधनिबंधांना विभागून देण्यात आले.

5.3)पद्मजा गंधे पारितोषिक रूपये 1001/- वार्षिक अधिवेशनात महिला सदस्याने सादर केलेल्या सर्वोत्कृष्ठ शोधनिबंधासाठी श्रीमती मंजुषा मुसमाडे,पुणे यांच्या 'सर्वसमावेशक वृध्दी अंतर्गत कल्याणकारी राज्य संकल्पना आणि वास्तव' या शोधनिबंधास मिळाले

समारोप सोहळ्याचे प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डी.जी.कणसे यांनी केले. सूत्रसंचालन सौ.एस.डी.कुलकर्णी व एस.जी.सावंत यांनी केले. शेवटी आभार प्रदर्शन आत्माराम पोळ यांनी केले.अशा प्रकारे 32 व्या वार्षिक अधिवेशनाची यशस्वीरित्या सांगता झाली.

# अर्थसंवाद- वार्षिक अहवाल

२००७-२००८ (खंड ३१, अंक १ ते ४)

**विनायक श्रीधर देशपांडे,**

माजी संपादक-नागपूर

अर्थसंवादचा 2007-08 या वर्षाचा 31 व्या खंडाचा वार्षिक अहवाल मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व सदस्यांसमोर सादर करताना मला आनंद होत आहे. माझ्या संपादकीय कारकिर्दीतील हा सहावा आणि अंतिम अहवाल आहे. या वर्षापर्यंत आपल्या सर्वांच्या सहकार्याने एकूण 24 अंक संपादित करून प्रकाशित करू शकलो ही माझ्या दृष्टिने अत्यंत समाधानाची बाब आहे. अर्थसंवादच्या सर्व वाचकांना देणगीदारांना आणि जाहिरातदारांनाही या नियतकालिका संबंधीची यथासांग माहिती व्हावी हा या अहवालामागचा हेतू आहे.

सन 2007-08 या वर्षामध्ये अर्थसंवादचे चारही अंक परिषदेच्या प्रथेप्रमाणे प्रकाशित झाले. विशेष नमूद करण्यासारखी बाब म्हणजे सेझ (विशेष आर्थिक क्षेत्र) वरील विशेषांक. शासनाच्या कायद्यापासून मुक्त असे क्षेत्र निर्माण केल्याने भारताच्या सार्वभौमत्वावर होणारे संभावित परिणाम अभ्यासणे आणि शासनाच्या विविध यंत्रणांच्या निर्णयाचेही चिकित्सक विश्लेषण करणे या अनुषंगाने या अंकाची घाटणी करण्यात आली होती. या अंकाला उत्स्फुर्त प्रतिसाद प्राप्त झाला आणि या अंकाची मागणी महाराष्ट्राच्या विविध भागातून झाली. अर्थात, अंकाच्या प्रती छापतांना या बाबतची पूर्व कल्पना नसल्याने मोठ्या प्रमाणात आलेल्या मागणीची पूर्तता करणे शक्य झाले नाही हे खेदाने नमूद करावेसे वाटते. बार्शी येथे संपन्न झालेल्या 31 व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणाचा विषय प्रकाश कुलकर्णी यांनी विशेष आर्थिक क्षेत्र हाच निवडल्याने विशेषांकात समाविष्ट न झालेल्या बाबींचा परामर्श घेतल्याने अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना एकाच विषयावर पुरेशी माहिती अर्थसंवादाने प्राप्त करून दिली.

या अहवाल वर्षात अर्थसंवादला ISSN क्रमांक प्राप्त झाल्याने अर्थसंवाद जागतिक पातळीवरील नियतकालिकाच्या यादीमध्ये समाविष्ट झाला. अर्थसंवादच्या लेखकांना यामुळे अधिक प्रतिष्ठा प्राप्त होईल यात शंका नाही. अर्थसंवादच्या शिरपेचात हा एक मानाचा तुरा आहे, असे मानणे वावगे

ठरू नये. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ तसेच भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषदेने अनुदानात वाढ केली ही देखील महत्वपूर्ण बाब आहे. अर्थसंवादची जडणघडण आपण ज्या पध्दतीने करीत आहोत त्याला मिळालेली ही लोकमान्यता आहे. आता या वर्षातील चारही अंकाच्या अंतरंगाकडे वळू या !

वर्षभरात एकूण 18 स्वतंत्र लेख 31 व्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणाव्यतिरिक्त आपल्या सदस्यांनी विविध ठिकाणी दिलेली निवडक तीन अधिक व्याख्याने अशी एकूण 4 व्याख्याने, 1 पारितोषिक प्राप्त लेख, 4 ग्रंथपरीक्षणे, 2 पीएच.डी.प्रबंधाचे सारांश, 2 संवादरूपी प्रतिक्रिया (चर्चा) 2 टीपणे, 5 संकीर्ण, 2 संपादकीय, 2 सांख्यिकीय पुरवण्या, 3 अधिवेशन वृत्तांत, 32 व्या अधिवेशनासाठीच्या विषयांची रूपरेषा आणि 2 श्रध्दांजली टिपणे असा विविध प्रकारचा मजकूर प्रकाशित करण्यात आला.यासाठी 44 लेखकांचे योगदान लाभले.चारही अंकांची मिळून 442 पाने झाली. हा आत्तापर्यंतचा उच्चांक आहे. याची नोंद घ्यावी.अर्थसंवादला सातत्याने विकसित करण्याच्या प्रयत्नातला हा एक भाग आहे. लेखकांच्या भरीव सहकार्यानेच आपल्याला इथपावेतो मजल गाठणे शक्य झाले आहे.

या वर्षी अर्थसंवादला 31 वर्षे पूर्ण झाली. 3 दशके उलटली.एवढा काळ हे नियतकालिक सातत्याने आपण चालवू शकलो. एवढेच नव्हे तर त्याला एक प्रतिष्ठा प्राप्त करून देऊ शकलो याचा सार्थ अभिमान वाटतो. ही वाटचाल कशी काय चालली आहे. अर्थसंवाद अधिक लोकप्रिय आणि उपयुक्त होण्याच्या दृष्टीने याचे साक्षेपी परिक्षणही झाले पाहिजे. तसा प्रयत्न पूर्वीच्या संपादकांनी केला आणि पहिले दशक उलटल्यानंतर असा प्रयोग भा.रा.ढेकणे यांनी करून अर्थसंवादचे पहिले दशक असा दीर्घ लेख अर्थसंवाद करिता लिहिला. या रीतीने दुसऱ्या दशकाबद्दल यशवंत रारावीकर यांनी देखील अर्थसंवादचे मूल्यांकन करून लेख प्रकाशित केला. तिसऱ्या दशकाबद्दल देखील अर्थसंवादचे परीक्षण व्हावे असे वाटते आणि हे काम परिषदेच्या पदाधिकारी नसलेल्या जेष्ठ सदस्यांनी केल्यास नि:पक्षपणे मार्गदर्शनपर सूचना प्राप्त होऊ शकतील. अर्थसंवादची गुणवत्ता वाढविण्यास यामुळे नक्कीच मदत होऊ शकेल. या दृष्टीने काही सदस्यांशी संपर्क साधला होता, परंतु माझ्या कार्यकाळात असा लेख प्राप्त होऊ शकला नाही याबद्दल खंत वाटते.

अर्थसंवादचे वितरण कार्य नागपूरहून काही प्रमाणात सुरळीतपणे झाले.तथापि, नेहमीच्याच तीन मुख्य अडचणी भेडसावल्या.महाविद्यालये आपली वार्षिक वर्गणी वर्षभरात केंव्हाही पाठवितात आणि त्यांना पूर्वीचे अंक पाठविण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. वार्षिक वर्गणीची रक्कम अर्थसंवादमध्ये नमूद करण्यात आलेल्या दरानुसार न पाठविता कधी 100 रूपये तर कधी 150 रूपये पाठविण्यात येतात. मनिऑर्डरवर बरेचदा पत्ता देखील दर्शविलेला नसतो.त्यामुळे रक्कम कुणाच्या नांवे जमा करावी अशा संभ्रमात संपादक असतो. तिसरे,आजीव सदस्यांचे पत्ते बदलतात, परंतु त्यांची माहिती कार्यवाहांकडे कळविली जात नाही, त्यामुळे अंक परत येतात.

आता अर्थसंवादच्या आर्थिक व्यवहारांची थोडक्यात माहिती करून घेऊया.(31 व्या वार्षिक अहवालातील खर्च -उत्पन्न पत्रकात दर्शविलेली आकडेवारी आणि तक्त्यातील आकडेवारी जुळणार नाही.जानेवारी-मार्च 2008 च्या उत्पन्न-खर्चाची

माहिती या तक्त्यात समाविष्ट केली आहे याची कृपया नोंद घ्यावी.) महत्वाचा तपशील तक्ता 1 मध्ये मांडला आहे.

**तक्ता–अर्थसंवादची महत्वपूर्ण तौलनिक माहिती**

| क्र. | तपशील | 2005-06 | 2006-07 | 2007-08 |
|---|---|---|---|---|
| 1 | चारही अंकांच्या एकूण प्रती | 6,265 | 5,945 | 6,295 |
| 2 | चारही अंकांची एकूण पृष्ठे | 413 | 425 | 442 |
| 3 | चारही अंकांचा एकूण खर्च(रू) | 1,70,026 | 1,87,003 | 2,04,347.20 |
| 4 | दर नगाचा सरासरी खर्च(रू) | 27.14 | 31.45 | 33.65 |
| 5 | दर पानाचा सरासरी खर्च(रू) | 0.26 | 0.29 | 0.30 |
| 6 | जाहिरातींपासून उत्पन्न (रू) | 46,200 | 52,500 | 81,170 |

अहवाल वर्षात जाहिराती विना एकही पान कोरे राहिले नाही. चारही अंकात 12 जाहिराती आपण प्रकाशित केल्या. अर्थसंवादच्या उत्पन्नाच्या बाबतीत हे वर्ष विक्रमी वर्ष ठरले असे म्हटल्यास वावगे ठरू नये. तक्त्याच्या आधारे पुढील बाबी ध्यानात घेता येतील–

* 2007-08 या वर्षात आपण अर्थसंवादच्या प्रत्येक अंकाच्या जवळपास 1575 प्रती छापल्या. आजीव सदस्य व वार्षिक वर्गणीदार यांची संख्या सातत्याने वृध्दिंगत झाली ही अर्थसंवादची जमेची बाजू मानायला हवी.
* चारही अंकांच्या एकूण पृष्ठ संख्या 2007-2008 यावर्षी पूर्वीच्या 425 वरून 442 पर्यंत पोहचविण्यात आली, ही बाब नमूद करण्यासारखी आहे. याचाच अर्थ या वर्षात प्रत्येक अंकात साधारणपणे सरासरी 110 पानांचा मजकूर वाचकांना उपलब्ध करून देण्यात आला. यामुळे अर्थसंवादला गुणवत्तेसोबतच भौतिक वजन देखील प्राप्त झाले.
* अहवाल वर्षात अर्थसंवादच्या खर्चाने दोन लाखांची मर्यादा ओलांडली हे संकोचानेच नमूद करतो. छपाईचा वाढता खर्च आणि त्यासोबतच वाढता टपाल खर्च यामुळे मुख्यत्वेकरून एकंदर खर्चात भरमसाठ वाढ झाली. खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने अंकाचा आकार कमी करणे हे योग्य होणार नाही असे आवर्जून नमूद करावेसे वाटते. उत्पन्नाच्या स्त्रोतांचा विचार करणे अधिक संयुक्तिक होईल.
* सन 2007-08 या वर्षात अंक छपाई खर्च गतवर्षीच्या तुलनेत 50 टक्क्याहून अधिक वाढला आहे. कागदांचा वाढता खर्च, छपाईच्या सामुग्रीच्या किंमतीत वाढ, अंक बांधणीसाठी लागणाऱ्या खर्चात वाढ या काही घटक किंमतीच्या वाढीमुळे खर्च भरमसाठ वाढल्याचे अनुभवास आले. तर प्रतींची आणि पृष्ठांची संख्या वाढल्याने टपाल खर्च देखील गेल्या काही वर्षापेक्षा रू.5986/– ने वाढला.

अत्यंत समाधानाची बाब म्हणजे अहवाल

वर्षात जाहिरातीपासून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नात आपण लक्षणीय वाढ करू शकलो. दरवर्षीप्रमाणे यंदा देखील चारूदत्त गोखले यांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले. परिषदेचे आजीव सदस्य श्री अजय दरेकर यांनी सातत्याने अर्थसंवादसाठी जाहिराती उपलब्ध करून दिल्याने अंकाचा आकार वाढविण्याची,रंगीत मुखपृष्ठ / जाहिराती प्रकाशित करण्याची योजना कार्यान्वित करता आली. जैन उद्योग समूहाचे उपाध्यक्ष श्री.अशोक जैन, मानराज मोटर्स,जळगावचे महाव्यवस्थापक श्री.अशोक बेदमुथा,श्री.प्रकाश चौबे, जळगांव, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र, मुंबईचे माजी संचालक निरज हातेकर, व्हिसा बुक्सचे विनोद लोकरे आणि इतर जाहिरातदार यांचे परिषदेच्या वतीने मन:पूर्वक आभार मानतो.

श्री.शिवाजी महाविद्यालय,बार्शी येथे झालेल्या एकतिसाव्या अधिवेशनात दिनांक 1 नोव्हेंबर 2007 ला सल्लागार मंडळाची बैठक झाली. विचारांचे आदान प्रदान होऊन सदस्यांनी अर्थसंवादच्या विकासासाठी उपयुक्त मार्गदर्शनपर सूचना केल्या. मंडळाचे सदस्य अवधूत नाडकर्णी, अ.ब.देवगिरीकर, किशोर वाघमारे आणि जयश्री खांबेटे यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

प्रस्तुत अहवाल वर्षाच्या समाप्तीबरोबर माझा प्रमुख संपादक पदाचा 6 वर्षाचा कालखंड पूर्ण झाला. माझ्या दृष्टीने हे संपादन उत्साहवर्धक ठरले. अर्थसंवादचे अंक संपादित करतांना अनेकांची साथ मला लाभली. लेखक, माझे मित्र किशोर महाबळ, प्रपाठक, राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, सहायक संपादक रवीन्द्र जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली, टेक्नो एंटरप्रायजेसचे मनिषा आणि मदन पालोरकर, स्पार्क असोशिएटचे शैलेश देशपांडे, निलेश धोटे या सर्वांचा मी ऋणी आहे.

अर्थसंवादची वर्षभरातील जबाबदारी पार पाडतांना मला परिषदेचे अध्यक्ष पी.बी.कुलकर्णी. कार्याध्यक्ष ज.फा.पाटील, कार्यवाह-खजिनदार चारूदत्त गोखले या सर्वांचे सहकार्य लाभले. या सर्वांचा मी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो. कार्यकारी मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, परिषदेचे सर्व सदस्य यांच्या शुभेच्छा आणि सततच्या प्रोत्साहनामुळेच मी ही जबाबदारी पूर्ण करू शकलो. सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद ! माझ्या पश्चात अर्थसंवादचे प्रमुखपद सांभाळणारे जगन्नाथ पाटील यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा....!

***

# निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रूपरेषा

## 1.आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दान्तातील प्रो.पॉल क्रुगमन यांचे योगदान

**दि.व्यं.जहागिरदार**

माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

मानद संचालक, सेंटर फॉर इकॉनॉमिक ॲन्ड सोशल स्टडीज,अमरावती

**1.प्रास्ताविक :**

आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची महत्त्वाची शाखा असून ती सतत विकसित होत आहे. अर्थशास्त्रातील तत्वे, नवनवीन संकल्पना आणि प्रगत अध्ययनाची साधने इ.चा या शाखेत प्रभावीपणे वापर होत आहे. विशेषत: गेल्या 50 वर्षात याचा वाढत जाणारा व्याप स्तिमीत करणारा आहे. यातील नवनवीन सिध्दान्त,त्यांची अनुभवजन्य चाचणी, पुरस्कृत केलेली धोरणे, त्यांची अंमलबजावणी या सर्वांशी परिचित असणे सहज शक्य नाही. जागतिक स्तरावर सतत होणाऱ्या बदलांच्या संदर्भात हा विषय समजावून घ्यावा लागतो. आंतरराष्ट्रीय अर्थशाशस्त्रात सतत अध्ययन आणि संशोधन करणारे तज्ञच या विषयावर अधिकारवाणीने लिहू/बोलू शकतात.

इ.स.2008 चे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक प्राप्त प्रोफेसर पॉल क्रुगमन हे व्यापार सिध्दान्त, आंतरराष्ट्रीय वित्त आणि आर्थिक भूगोल या क्षेत्रात निष्णात असून व्यापार रचना आणि आर्थिक व्यवहारांच्या स्थानाच्या (Location) मूलभूत विश्लेषणामुळे त्यांना हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दान्तातील त्यांच्या योगदानावर संशोधनपर लिखाण करणे सोपे काम नसले तरी या विषयाबाबत आपण अद्यावत राहणे आवश्यक आहे.

प्रो.पॉल क्रुगमन यांचा जन्म ज्यू कुटुंबात 28 फेब्रुवारी 1953 रोजी झाला. अमेरिकेतील येल विद्यापीठातून त्यांनी इ.स.1974 मध्ये बी.ए.ची पदवी तर एम्.आय.टी.मधून 1977 मध्ये पीएच्.डी. प्राप्त केली. त्यांनी येल विद्यापीठ, बर्कले विद्यापीठ, स्टॅंड फोर्ड येथे अध्यापन, संशोधन कार्य केले.काही काळ ते लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथेही अध्यापन करीत होते. सध्या ते प्रिस्टन विद्यापीठात आंतरराष्ट्रीय घडामोडी या विषयाचे प्राध्यापक आहेत. त्यांनी आतापर्यंत 20 पुस्तके व अंदाजे 200 संशोधन लेख लिहले आहेत. विशेष म्हणजे आर्थिक व राजकीय विषयांवर त्यांनी फॉर्च्युन,दी इकॉनॉमिस्ट

वॉशिंगटन मंथली अशा वृत्तपत्रांमधून ते लिखाण प्रसिध्द करतात. सध्या ते न्यूयॉर्क टाईम्स मधून आठवड्यातून दोनदा लिखाण करतात. अनेकदा ते अशा लिखाणांद्वारे शासन व व्यवस्थेवर प्रखर टीका करतात. यामुळे ते स्वत:ही टीकेचे लक्ष बनतात.

## 2) प्रो.क्रुगमन यांचे योगदान :

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिध्दान्ताचे अध्ययन करणाऱ्या पुढील प्रश्न उभे असतात: विविध देशांमध्ये व्यापार रचना कशी असते आणि त्या व्यापाराचा देशोदेशींच्या अर्थव्यवस्थेवर कोणते परिणाम होतात? अर्थशास्त्रात जरी ॲडम स्मिथ यांनी प्रथमत: निरपेक्ष उत्पादनव्यय खर्चाचा सिध्दान्त मांडला; तरी परंपरागत किंवा सनातनी सिध्दान्त म्हणून रिकार्डोच्या सिध्दांताचा उल्लेख करावा लागतो. पुढील शंभर वर्षात त्या सिध्दांताच्या परिष्करणाचे प्रयत्न झालेत आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचे कारण स्पष्ट करणारा दुसरा सिध्दान्त म्हणून (ज्याला अभ्यास क्रमानुसार लिहणाऱ्या पुस्तकांमधून आधुनिक सिध्दांन्त म्हटले जाते.) हेक्चर-ओहलीन सिध्दान्ताचा निर्देश करावा लागतो. यात घटक अभिदानांची (Endowment) उपलब्धता गृहीत मानून एका वस्तूसाठी दोनही देशांमध्ये समान उत्पादन फलन असल्याचे स्वीकारण्यात आले. साधारणपणे दुसऱ्या महायुध्दापर्यंत आंतरराष्ट्रीय व्यापाराचे जे सिध्दान्त मांडले गेलेत, त्यांना जुने व्यापार सिध्दान्त(Old Trade Theory) म्हटले जाते. हेक्चर-ओहलीन सिध्दान्ताच्या गृहितांमध्ये परिस्थितीनुरूप बदल करून अर्थशास्त्रज्ञांनी नवीन प्रमेये मांडण्याचा प्रयत्न केला. त्यात प्रामुख्याने केसिंग (1966), वेनॅन व ग्रुबेर (1967), हर्ष (1967), क्रेवीस (1976) यांचा उल्लेख करावा लागेल. विशेष म्हणजे 1977 मध्ये ओहलीन यांना त्यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दान्तातील योगदानाबद्दल नोबेल पारितोषिक मिळाले होते.

उपरोक्त अर्थशास्त्रज्ञांनी जे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिध्दान्त मांडलेत; ते आंतर उद्योगातील (Inter-trade) व्यापार स्पष्ट करणारे होते. म्हणजे दोन उद्योगापैकी कोणत्या उद्योगातील वस्तू एखादा देश निर्यात करेल व परदेशातील दुसऱ्या उद्योगातील वस्तू तो आयात करेल याचे त्यात निर्धारण असे. इ.स.1960 च्या दशकात तत्कालीन युरोपियन आर्थिक समुदायाच्या (EEC)स्थापनेनंतर सभासद देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर व्यापार सुरू झाला. व्हर्डून यांना असे दिसले की, या देशांमध्ये विभिन्न वस्तू गटांऐवजी समान-सारख्या वस्तू गटांमध्ये व्यापार होत आहे. तसेच बलासा (1975) यांनीही असे दाखवून दिले की, इ.स.1963-70 या कालखंडात उपरोक्त आर्थिक समुदायातील सभासद राष्ट्रांमधील व्यापार सारख्या वस्तूंचा होता. म्हणजे हा व्यापार उद्योगान्तर्गत (Intra Trade) होता. उद्योगान्तर्गत व्यापार म्हणजे अशी व्यापार स्थिती की ज्यात विविध देश एकाच वेळी सारख्या प्रकारच्या वस्तूंची आयात निर्यात करतात. उदा.ब्रिटन स्वीडनला मोटारींची निर्यात करतो व स्वीडनकडूनच मोटारींचीही आयात करतो. युरोपियन समुदाय अमेरिकेकडून धान्याची आयात करतो आणि तिसऱ्या देशांना धान्याची निर्यात करतो. उद्योगांतर्गत व्यापाराचे स्पष्टीकरण जुन्या व्यापार सिध्दान्ताद्वारे करणे जवळपास अशक्यच आहे. प्रो.क्रूगमन यांचा व्यापार सिध्दान्त उद्योगान्तर्गत व्यापाराचे (Intra Industry Trade) स्पष्टीकरण करतो. ज्यावेळी उद्योगांन्तर्गत व्यापाराचे स्पष्टीकरण करावयाचे असेल

त्यावेळी अपूर्ण स्पर्धा गृहीत धरावी लागते. वस्तू विभेदीकरण, उत्पादनमान, बहुराष्ट्रीय कंपन्यांची कार्यपध्दती इ. विविध बाबींचा अन्तर्भाव केल्याने उद्योगान्तर्गत व्यापाराचे स्पष्टीकरण करणारे विविध प्रारूपे अथवा सिध्दांत मांडल्या गेले आहेत.

उद्योगान्तर्गत हा एकाच उद्योगातील विविध उद्योगसंस्थांमध्ये (Firms) होतो. त्याचे स्पष्टीकरण नव (Neo) हेक्चर-ओहलीन प्रारूप , नव चेंबरलीन प्रारूपे, नव हॉटलींग प्रारूपे या तीन गटांमध्ये केले जाते.(पहा :International Economics-Bo Saderstion And Reed प्रकरण 8) पॉल क्रूगमन यांचा व्यापार विषयक सिध्दान्त(1979) हे नव चेंबरलीन प्रारूपांच्या अंतर्गत येतो. ज्यावेळी उत्पादनात ऱ्हासमान सरासरी व्यय / खर्च असतो. तसेच उत्पादन हे समांतर विभेदीकृत असेल ते उद्योगान्तर्गत व्यापार अस्तित्वात येतो. असा व्यापार सारख्या अर्थव्यवस्थांमध्येही होतो. यामुळे कल्याणातही वाढ होते.या प्रकारच्या विविध प्रारूपांमधील क्रूगमनचे हे विवेचन सर्वसाधारण स्वरूपाचे अंतर्गत येते. इ.स.1979 च्या व्यापार सिध्दान्तात क्रूगमन यांनी एकाधिकारी स्पर्धेच्या विश्लेषणात अविनाश दिक्षीत आणि स्टिगलीटझ् यांनी जी सुधारणा केली तिचा वापर केला आहे. उपभोक्त्यांच्या वर्तनासंबंधातील नव हॉटलिंग प्रारूपांमध्ये लँस्टर (1980) चे प्रारूप महत्वपूर्ण ठरते.

ज्यावेळी उद्योगात उत्पादन संस्था/पेढ्या संख्येने कमी असतात, अशा स्थितीत अल्पाधिकारी प्रारूपे -प्रतिमाने मांडली जातात. अशा स्थितीत उत्पादनसंस्था / पेढी पुरेशी मोठी असून तिला स्वत: केलेल्या निर्णयांच्या अनेक उद्योगसंस्थावरील परिणामांची कल्पना असते. या प्रकारच्या गटातील उद्योगान्तर्गत व्यापाराचे समान वस्तूंचे संदर्भात बँडर आणि क्रूगमन (1983) यांनी विवेचन केले होते. आंशिक संतुलन स्थितीतील हे प्रारूप स्पष्ट करतांना दोनही उद्योगसंस्था / पेढ्यांचे वर्तन हे कुर्नोच्या विवेचनातील वर्तनाप्रमाणे आहे. उद्योगसंस्था स्वत:च्या देशापेक्षा कमी किंमतीला परदेशात आपला माल / वस्तू विकतील. याला मूल्यावपतन किंवा राशीपातन (Dumping) म्हणतात. अर्थातच हे राशीपातन परस्परपूरक (Reciprocal) आहे.

प्रो.क्रुगमन यांनी इ.स.1991 मध्ये जर्नल ऑफ पोलिटीकल इकॉनॉमी मध्ये (Increasing Returns and Economic Geography) हा संशोधनपर लेख प्रसिध्द केला. नव व्यापार सिध्दान्तातून हे ध्वनित होते की उच्च वेतन / मजूरी स्थानांतरणास पोषक असते. मोठ्या आकाराच्या देशात अधिक वेतन तसेच उद्योगसंस्थाही तेथेच आपल्या वस्तूच्या उत्पादनासाठी स्थान निवड करतात. या पार्श्वभूमीवर प्रो.क्रुगमन यांनी विवेचन केले आहे. वेगवेगळ्या देशांच्या परस्पर गतिशीलतेच्या तुलनेत घटक हे एका देशात अधिक गतीशील असतात, तंत्रज्ञान सारखे आहे, श्रम अभिदान, आवड निवड चव, कृषी क्षेत्रात स्थिर उपृत्ती तर उद्योगांमध्ये वर्धी उपृत्ती, एकाधिकारी स्पर्धा इ. बाबी गृहित धरल्या आहेत. अर्थव्यवस्थेतील एका भागातून श्रमिक दुसऱ्या भागात स्थलांतरित होतात. मात्र हे स्थानांतरण कृषी क्षेत्रातील श्रमिकांचे नसून औद्योगिक क्षेत्रातील श्रमिकांचे आहे. श्रमिकांचे एका भागातून (दक्षिण भाग) दुसऱ्या भागात (उत्तर भाग) जे स्थलांतर होते त्याचे, तीन परिणाम स्पष्ट केले आहेत. एका देशात प्रादेशिक ध्रुवीकरण कसे होते (एका भागातून दुसऱ्या भागात श्रमिकांच्या गतीशीलतेमुळे ) हे या

सिध्दांतात मांडले आहे. या विवेचनात गणितीय समीकरणांचा भरपूर वापर (29 समिकरणे) झाला असून या विवेचनातून प्राप्त संभाव्य निकाल हे समीकरणातील विविध घटकांच्या तौलनिक शक्तीवर अवलंबून असतात. पुढे इ.स.1995 मध्ये प्रो.क्रुगमन आणि अँथनी व्हेनबल्स यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवरील ध्रुवीकरण वेगळी गृहिते स्वीकारून स्पष्ट केले आहे. या स्पष्टीकरणात परिवहन खर्च महत्त्वाचा घटक आहे. यात कमी-जास्त बदल झाल्यास त्यांच्या परिणामांचाही विचार झाला आहे. अशा स्वरूपाच्या अध्ययनास नवीन आर्थिक भूगोल म्हटले जाते. या विवेचनाची अनुभवजन्य चाचणी घेतली गेली आहे. भारताच्या संदर्भात चक्रवर्ती आणि लाल (2007) यांनी केलेली चाचणी उपयुक्त आहे.

आर्थिक भूगोलात स्थान निश्चिती, वितरण आणि जागेसंबंधी-अवकाश संबंधी (spatial) संघटन इ. चा अभ्यास होतो. भूगोलाची ही एक उपशाखा आहे. क्रुगमन यांनी यात विशेष लक्ष घालून व्यापार तत्वे मांडलीत जेफरी सांच हे देखील या विषयातील एक अभ्यासक आहेत. आर्थिक भूगोलासंबंधी भूगोल शास्त्रज्ञांचा आणि अर्थशास्त्रज्ञांचा दृष्टिकोन काही बाबतीत भिन्न आहे. आर्थिक भूगोलास भौगोलिक अर्थशास्त्र (Geographical Economics) हे पर्यायी नाव काही तज्ञांनी सुचविले आहे.

क्रुगमन यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्वरूप स्पष्ट करतांना 12-13 वर्षांच्या काळात वेगवेगळ्या प्रकारचे विवेचन केले आहे. पण हे सर्व विवेचन परस्परपूरक असून व्यापार रचना समजण्याच्या दृष्टीने उपयोगी आहे. त्यांनी सैध्दान्तिक दृष्ट्या व्यापाराची जी कारणमीमांसा केली त्याचे आधारावर नवनवीन प्रारूपे-प्रतिमाने समोर येत आहेत. त्यांचा वापर जागतिक व्यापार संघटनेद्वारे पुरस्कृत व्यापार उदारीकरणाच्या कार्यपध्दतीवर कसा होतो याकडे जागतिक बँकेचे लक्ष आहे. पारंपारिक आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिध्दान्त आणि क्रुगमन सहित अन्य तज्ञांनी याच प्रकारचे मांडलेली प्रमेये/सिध्दान्त यांच्यात तुलना करणेही गरजेचे आहे. तसेच या दोन्ही प्रकारच्या व्यापार सिध्दान्तांमधून व्युत्पन्न धोरणांचा अभ्यास केला जात आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या काही अधिवेशनांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापारा संबंधित काही विषय तांत्रिक चर्चासत्रांसाठी निवडले होते. पण केवळ व्यापार सिध्दांताचा विषय टि.म.वि.पुणे येथे(1995)झालेल्या अधिवेशनात चर्चेसाठी होता. 'आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिध्दान्तातील नवे प्रवाह' असा विषय होता. या विषयावर केवळ ४ शोधनिबंध सादर झाले होते. (जिज्ञासूंनी दि.व्यं.जहागिरदार व सौ.मुक्ता जहागिरदार; विजय साठे आणि उमेश राजदेरकर यांचे निबंध पहावेत) यावेळी पुरेशा संख्येत लेख यावेत म्हणून लेखकांसाठी काही विषय सुचवित आहे.

### 3) संबंधित विषयाचे पैलू :

प्रो.क्रुगमन यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दान्तातील योगदानावर लिहतांना ज्या मुद्यांवर भर देऊन लेख लिहायचा आहे, त्याला अनुषंगून योग्य शीर्षक द्यावे. चर्चासत्रासाठी निवडलेले शीर्षक शक्यतो स्वत:च्या लेखाला देणे टाळावे. या विषयावर पुढील प्रकारचे विविध उपविषय लेखकांसाठी सुचवित आहे.(या व्यतिरिक्तही अन्य उपविषय लेखकांना सुचू शकतात.)

1) प्रो.क्रुगमन 1977 च्या संशोधनापर लेखानुसार त्याने केलेल्या आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दान्ताचे विवेचन व विश्लेषण.

2) बँडर आणि क्रुगमन (1983) च्या परस्परपूरक मूल्यावपतन प्रारूपाची चर्चा

3) उद्योगान्तर्गत व्यापाराची जी नव-चेंबरलीन प्रारूपे समजली जातात, त्या प्रारूपांची क्रुगमनच्या विवेचनाशी तुलना.

4) नव हॉटलींग प्रारूपांमधील लँकस्टरच्या प्रारूपाचे स्पष्टीकरण आणि त्याचे क्रुगमनच्या प्रारूपापेक्षा असणारे भिन्नत्व.

5) उद्योगांन्तर्गत व्यापार विस्ताराचे स्वरूप व त्याचे मोजमाप यादृष्टीने गुबेल व लॉईड निर्देशकांचे विवेचन व त्यांचा वापर.

6) प्रो.क्रुगमनच्या आर्थिक भूगोल विवेचनावर 10-15 वर्षापूर्वी चर्चा होत होती; पण त्यांना नोबेल पुरस्कार मिळाल्याने ती चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. जर्नल ऑफ पोलीटीकल इकॉनॉमिच्या (1991) खंड 99 क्र.3 मधील त्यांच्या Increasing Returns and Economic Geography या संशोधन या विषयावर लेख तयार करता येईल (हा लेख इंटरनेटवर सहज उपलब्ध आहे) त्यांच्या लेखातील जी 29 समीकरणे आहेत ती जाणकार लेखकांना स्पष्ट करता येतील.

7) प्रो.क्रुगमन यांच्या व्यापार सिध्दान्ताचा धोरणात्मक दृष्ट्या झालेल्या प्रभावांचीही चर्चा करता येईल. विशेषत: जुन्या व्यापार सिध्दान्तातून व्युत्पन्न धोरणे आणि आंतरउद्योग व्यापार स्पष्ट करणाऱ्या सिध्दांताद्वारे व्युत्पन्न धोरणे यांची तुलनात्मक चर्चा करता येईल. विकसनशील देशांच्या दृष्टीने कोणत्या सिध्दान्तामधून व्युत्पन्न धोरणे अधिक उपयुक्त आहेत याचे विवेचन केले जाऊ शकते. क्रुगमन हे संरक्षणवादा विरूध्द भूमिका घेतात.

लेखकांसाठी काही महत्त्वाची पुस्तके व लेख पुढे दिले आहेत. अर्थात ही यादी मर्यादीत आहे. विषयवस्तूशी सरळ संबंध असणारी पुस्तके-लेख दर्शविले आहेत.


1) Paul Krugman and Maurice Obstfels : International Economics
2) Bo Sadestron and (2003)Geoffrey Reed: Internation Economics
3) Greeway & Milner (1986) : Economics of Intra Industry Trade
4) Krugman Paul (1979) : Increasing, returns, Monopolistic competition and Internation trade, Journal of International Economics.
5) Krugman Paul (1991) : Increcing returns and Economic Geography, J.P.E.
6) Krugman Paul (1995) : Development, Geography and Economic Theory.
7) Brander Jamen & Paul Krugman(1983): A Reciprocal Dumping Model of Intetnational Trade, J.I.E.
8) Panchmukhi V.R. (1994) : Recent development in trade theory & practice, The Indian Eco Journal, Jan-Mar.
9) Panchmukhi V.R. (2008) : Economic Geography, IEJ, Vol-56,No.3
10) Bhattacharya Aitya (2008) : Krugman's Economics : An introduction, EPW,6-12 Dec
11) भानुशाली सु.गो. (2005) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिध्दान्त - एक सिंहावलेकन (लेखांक 2 पूर्वार्ध), अर्थसंवाद ऑक्टो-डिसे. (अर्थसंवादच्या एप्रिल-जून 2005 पासून भानुशाली यांचे आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दान्तावरील 5-6 प्रदीर्घ लेख पहावेत.)
12) दि.व्यं.जहागिरदार आणि मुक्ता जहागिरदार (1995) : आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दान्ताचे नवे प्रवाह आणि विकसित व विकसनशील देश - एक विवेचन, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे १९ वे वार्षिक अधिवेशन, शोधनिबंध संच
13) जहागिरदार दि.व्यं. (2009) : २००८ चे नोबेल पारितोषिक विजेते प्रा.पॉल क्रुगमन, दै.हिंदुस्तान.
14) ककडे विजय (2008) : पॉल क्रुगमन-बहुआयामी अर्थतज्ञ, अर्थसंवाद, ऑक्टो-डिसे.

# २.एकविसाव्या शतकातील भारतीय शेती पुढील आव्हाने

मधुकर शिंदे
इस्लामपूर, जि.सांगली.
भूतपूर्व अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद

भारत हा शेतीप्रधान देश आहे. शेती हा भारताचा परंपरागत मुख्य व्यवसाय आहे. शेती हा भारतीय लोकांचा धंदा किंवा व्यवसाय नसून ती भारतीय लोकांची जीवन पध्दती आहे. आज देखील भारताचा आर्थिक विकास शेती क्षेत्राच्या विकासावर अवलंबून आहे. शेती क्षेत्राचा विकास आणि भारताचा आर्थिक विकास या दोहोत धन-सहसंबंध आहेत. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा 20% आहे, तर देशातील एकूण लोकसंख्येपैकी 70% लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे. 10 व्या योजनेत देशातील एकूण रोजगारापैकी 57% रोजगार शेती क्षेत्राने पुरविला. देशातील अनेक मोठ्या उद्योगांना शेती क्षेत्र कच्च्या मालाचा पुरवठा करते. उदा.साखर, कापड, ज्युट, तेल गिरण्या वगैरे. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक वर्षे देशाच्या एकूण निर्यातीत शेती क्षेत्राचा वाटा 70% इतका होता. आजच्या काळात तो 10.8% इतका आहे. तसेच देशातील 110 कोटी लोकांना अन्न पुरवठा करण्याचे काम शेती क्षेत्र करते. अशा रीतीने भारतात शेती क्षेत्राला अत्यंत महत्वाचे स्थान आहे.

भारतात जुलै 1991 मध्ये जागतिकीकरणाला सुरूवात झाली.जागतिकीकरणाच्या काळात भारतीय शेतीकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे शेती क्षेत्राच्या विकासाची प्रक्रिया मंदावली आहे. आजच्या काळात शेती क्षेत्रासमोर अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. जागतिकीकरणानंतर इतर क्षेत्राप्रमाणेच शेती क्षेत्रात देखील मूलगामी व दीर्घकालीन परिणाम करणारे बदल घडून आले. भारतातील शेती व्यवसाय आजच्या काळात अत्यंत बिकट व नाजूक अवस्थेतून जात आहे. भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने जाहीर केले की, सन 1996 ते 2005 या काळात भारतात 1,66,204 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. केंद्रीय कृषीमंत्री मा. शरद पवार यांनी लोकसभेत सांगितले की,1995 ते 2003 या काळात देशात एकून 1,38,322 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत . या आत्महत्या प्रामुख्याने भारतातील विकसित राज्यात;

महाराष्ट्र,पंजाब,आंध्र प्रदेश, कर्नाटक व केरळ इत्यादीत घडून आल्या आहेत.या आत्महत्या थांबाव्यात म्हणून भारत सरकारने सन 2007-08 या वर्षाच्या अंदाजपत्रकात शेतकऱ्यांसाठी 71000 कोटी रूपयांचे कर्जमाफी पॅकेज जाहीर केले. तरी देखील या आत्महत्या न थांबता त्या वाढतच आहेत. याबाबत हरितक्रांतीचे जनक डॉ. स्वामीनाथन म्हणतात, ''भारतीय कृषी व्यवस्थेत काहीतरी भयंकर चूक होते आहे, व जर कृषी क्षेत्रात चूक होत असेल तर इतर कोणत्याही क्षेत्राचे भले होऊ शकणार नाही.''

भारतीय शेतीच्या दुर्दशेस अनेक घटक कारणीभूत आहेत. भारतात शेती क्षेत्राची दर हेक्टरी उत्पादकता अल्प आहे. तिची जागतिक पातळीवरील सरासरी उत्पादकतेशी तुलना केली असता ती कमी असल्याचे दिसून येते. भात, गहू, मका,तेलबिया, कापूस या पिकांची जागतिक पातळीवरील सरासरी उत्पादकता प्रती हेक्टर 3.96,2.87,3.38,1.86 व 7.33 मे. टन आहे; तर भारतातील उत्पादकता अनुक्रमे 2.9,2.71,1.18,0.86 व 4.64 मे. टन आहे. भारतात शेती उत्पादकता अल्प राहण्यास अनेक घटक कारणीभूत आहेत.

जागतिकीकरणानंतर भारतीय शेती क्षेत्राचा विकास दर घटत आहे. सन 1991-92 मध्ये शेती क्षेत्राच्या वाढीचा दर 3.2 % वरून 1.3 % असा घटत गेला आहे. 11 व्या योजनेत शेती क्षेत्राच्या वाढीचा दर 4% निश्चित करण्यात आला आहे.परंतु तो साध्य होईल की नाही याबाबत शंका आहे.

भारतीय शेतीला मान्सूनचा जुगार म्हटले जाते.आजच्या काळात देखील भारतातील 60% शेती क्षेत्र कोरडवाहू म्हणजे पावसावर अवलंबून आहे . भारतात मान्सूनचा पाऊस लहरी आहे. तो कधी अतिरिक्त तर कधी कमी पडतो. चांगले पाउस पाणी झाल्यास शेती उत्पादनात वाढ होते; तर कमतरतेच्या काळात शेती उत्पादनात घट होते. मान्सूनच्या या लहरीपणामुळे भारतात पूर, अतिवृष्टी,अवर्षण व दुष्काळ पडतो. याचा प्रतिकूल परिणाम शेती उत्पादनावर होऊन शेतकऱ्यांची परिस्थिती हलाखीची बनते. सिंचित क्षेत्रात सदोष व्यवस्थापनामुळे सिंचनाची पर्याप्त शक्ती वापरली जात नाही, सिंचन खर्चात सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे गरीब व लहान शेतकऱ्यांना सिंचन क्षेत्राचा हा खर्च परवडत नाही, त्यामुळे शेती उत्पादन घटते.

आजच्या काळातील हवामानातील बदलांचा परिणाम उत्पादनावर प्रतिकूल होत आहे. 19 व्या शतकापासून पृथ्वीचे तापमान वाढत आहे.पृथ्वीच्या पृष्ठभागावरील तापमानात 0.74 + 0.18 से.ग्रेडने गेल्या 100 वर्षात वाढ झाली आहे. ते 21 व्या शतकात 1.1 ते 6.4 से.ग्रेड ने वाढेल असा अंदाज व्यक्त केला जात आहे. तापमानातील या बदलांमुळे जमीनीची शुष्कता वाढते. पर्जन्यवाढ अथवा घट घडून येते. त्यामुळे पूर,दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्ती उद्भवतात. त्याचा प्रतिकूल परिणाम पिकांच्या उत्पादनावर होतो. भारतात तापमान वाढीमुळे गहू,भात,अन्नधान्ये या पिकांच्या उत्पादनात घट होत आहे. तापमान वाढीची ही क्रिया अशीच चालू राहिली तर 2020 मध्ये भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनात 20% घट होईल असा अंदाज वर्तविण्यात आला.हवामानातील बदलामुळे अनियमित पाऊस, शेती हंगामात बदल, नापीकी,किंमतीमधील चढउतार, पिकांवरील रोगराई, शेती उत्पादनात घट यासारखे परिणाम घडून येत आहेत. त्यामुळे कृषी क्षेत्रातील जोखीम व अस्थिरता (Risk & Unstability) वाढत आहे.

भारतात वाढती लोकसंख्या व वाढत्या बेकारीमुळे शेती क्षेत्रावर अवलंबून राहणाऱ्या लोकांची संख्या वाढत आहे. त्यामुळे भारतात शेतीचे विभाजन व विखंडन घडून येऊन शेतीचे लहान लहान तुकड्यात रूपांतर झाले आहे. परिणामी शेती बिनकिफायतशीर होऊन तिची उत्पादकता घटली आहे.

भारतात जेथे शेतजमीनीला सिंचनासाठी पाणी उपलब्ध आहे; तेथे पाणी व खतांचा अतिरिक्त वापर होत आहे.पाण्याच्या अयोग्य व्यवस्थापनामुळे देशात 329 द.लक्ष हेक्टर जमीनीची प्रत खालावली आहे. भारतातील 43% जमीनीची उत्पादकता खालावली आहे. तर 5% जमीन अनुत्पादक बनली आहे. सन 1995 मध्ये सी ब्रॅन्डन व के.हॉमन यांच्या अभ्यासानुसार, जमीनीची प्रत खालावल्यामुळे 1.9 अब्ज डॉलर्स प्रती वर्षी नुकसान होते. एच.ई.ड्रेब्ज व एन.टी.चाऊ यांच्या अभ्यासानुसार, पाण्याच्या अतिरिक्त वापरामुळे शेती उत्पादनात 20% घट झाली आहे.

भारतात आजच्या काळात कृषी क्षेत्राला मोठ्या प्रमाणात वीजेचा तुटवडा जाणवतो. महाराष्ट्रात ग्रामीण भागात 10 ते 14 तास दर दिवशी भार नियमन केले जाते. परिणामी शेतकऱ्यांना अनियमित व खंडीत वीजपुरवठ्याला तोंड द्यावे लागते. त्याचा प्रतिकूल परिणाम शेती उत्पादनावर होत आहे.

सन 1991 च्या आर्थिक सुधारणांमुळे सरकारने बँकींग व वित्तीय क्षेत्रात देखील सुधारणा केल्या. त्याचा परिणाम शेती क्षेत्राचा पत पुरवठा कमी होण्यात झाला. राष्ट्रीयीकृत बँकांनी 'बेसेल' मानकांचा अवलंब केला, त्यामुळे अनेक राष्ट्रीय कृत बँका धोक्यात आल्या. केंद्रसरकारने त्यांना मदत म्हणून 22000 को.रू. आर्थिक मदत दिली. परंतु शेती क्षेत्राला मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा करणाऱ्या सहकारी बँका राज्य सरकारच्या कक्षेत येत असल्यामुळे त्यांना आर्थिक मदत दिली नाही. पुढे सहकारी पतसंस्थासाठी वैद्यनाथन समिती नेमली तिने सहकारी क्षेत्राला आर्थिक पॅकेज जाहीर केले. जागतिकीकरण काळात सहकारी क्षेत्रातील कृषी पतपुरवठ्याचे सकल देशांतर्गत उत्पादनाशी असणारे प्रमाण 0.093% वरून 0.052% असे घटत गेले; तर सर्व वित्तीय संस्थांनी केलेल्या पतपुरवठ्याचे प्रमाण 0.169% वरून 0.141% असे घटले. परिणामी शेतकऱ्यांना वित्तपुरवठ्याची समस्या जाणवते.

जागतिकीकरणानंतर कृषी आदानांच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्यामुळे उत्पादन खर्च वाढला, परंतु त्या प्रमाणात शेतमालाच्या किंमती वाढल्या नाहीत. परिणामी शेतकऱ्यांचे उत्पन्न घटले. शेती बिनकिफायतशीर बनली. शेतकरी कर्जबाजारी झाले. तसेच शेतमालाच्या 2003-2004 या वर्षी राज्य सरकारांनी सूचविलेल्या किंमती व केंद्र सरकारने घोषित केलेल्या किमान आधार किंमतीत किमान 55%; तर कमाल 69% फरक पडला. या किंमती शेतकऱ्यांना किफायतशीर नव्हत्या. परिणामी शेतकऱ्यांचे उत्पन्न घटले. शेती व्यवसाय तोट्याचा बनला. नॅशनल सॅम्पल सर्व्हेने केलेल्या पाहणीनुसार ''भारतातील 40% शेतकऱ्यांनी शेती व्यवसाय सोडून सरकारी नोकरी मिळावी असे म्हटले'' म्हणजे शेतकऱ्यांनी शेती क्षेत्राबाबतची विश्वासार्हता गमावली आहे.

अलीकडच्या काळात शेती आदानांच्या किंमती व शेत मालाच्या किंमतीत झालेल्या वाढीत

फार मोठा फरक आहे. शेती आदानांच्या किंमती , खते, बी-बियाणे, मजूरीचे दर यामध्ये किमान 31.58% ते कमाल 1011.11% वाढ झाली. त्याबरोबरच शेती क्षेत्रात शेतमजूरांचा फार मोठा तुटवडा भासतो, शेतमजूरांनी रोजंदारी पध्दतीचे काम सोडून ठेकेदारी पध्दतीचा केलेला वापर वगैरेमुळे शेतीचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्या प्रमाणात शेतमालाच्या किंमती वाढल्या नाहीत, शेतमाल खर्च- उत्पादन गुणोत्तर शेतकऱ्यांच्या विरोधी गेले, परिणामी खते , संकरित बियाने, यांचा वापर दर 1980 मध्ये 3.66% होता. तो 1990 मध्ये 0.94% इतका कमी झाला. शेतकऱ्यांचे उत्पन्न घटले व शेतकरी कर्जबाजारी झाले.

भारतात जुलै 1991 मध्ये जागतिकी करणाचे धोरण स्वीकारले. सन 1995 नंतर जागतिक व्यापारावर WTO चे नियंत्रण सुरू झाले, जागतिकीकरणामुळे भारतीय शेती वस्तूंना आंतरराष्ट्रीय बाजारात फार मोठी स्पर्धा निर्माण झाली. विकसित देश आपल्या शेती वस्तूंना प्रचंड अनुदाने देतात, त्यांचे प्रमाण किमान 44% व कमाल 700% इतके आहे. याउलट भारतात फक्त 4% वस्तुविरहीत अनुदाने दिली जातात. तर काही बाबतीत ती ऋण आहेत. तसेच विकसित देशांनी विकसनशील देशांचा शेतमाल आपल्या बाजारात येऊ नये म्हणून मोठ्या प्रमाणात आयात कर लादले आहेत. ते कमी करण्यास ते तयार नाहीत. कापसावरील अनुदानाबाबत न्युयॉर्क टाईम्स म्हणतो, ''अमेरिकेत कापसाला मिळणाऱ्या प्रचंड अनुदानामुळे जागतिक बाजारपेठेत कापसाची मोठी आवक वाढली असून गरीब देशातील शेतकऱ्यांना त्यांच्याशी स्पर्धा करणे अवघड झाले आहे.'' (25 जुलै 2007).विकसित देशातील आयात करांचे प्रमाण किमान 82% व कमाल 388% इतके आहे. याउलट भारताने कापसावरील आयात कर 35% वरून 5% इतके कमी केले. परिणामी भारतात कापसाची आयात वाढून देशांतर्गत बाजारपेठेत कापसाच्या किंमती कमी झाल्या व कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत आला. त्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांत मोठ्या प्रमाणात आत्महत्या होत आहेत. याबाबत नोबेल पारितोषिक विजेते जोसेफ स्टिगलीटझ् म्हणतात, 'विकसनशील देशांनी अमेरिका जोपर्यंत त्यांच्या शेतकऱ्यांची अनुदाने बंद करीत नाही तोपर्यंत अमेरिकन कृषी मालाला मुळीच प्रवेश देऊ नये'(24 ऑगस्ट 2006)

जागतिकीकरणामुळे बौध्दिक संपदा कायद्याची (Patent Act)अंमलबजावणीमुळे शेतकऱ्यांचे बियाणे कंपन्यावरील अवलंबित्व वाढेल, बियाणे उत्पादनावरील नियंत्रण कमी होईल. त्यामुळे भारताची अन्न सुरक्षा धोक्यात येईल.भारतात 80% शेतकरी सीमांत व अल्पभूधारक आहेत. ते गरीब आहेत. ते पेटंटची महागडी बियाणे खरेदी करू शकणार नाहीत. बँकांनी वेळेत कर्जपुरवठा न केल्यास आणखी परिस्थिती गंभीर होईल शेतकऱ्यांना आधुनिक आदाने वापरता येणार नाहीत, त्यामुळे शेती उत्पादन घटेल.

लोकसंख्या वाढीमुळे भारतीय शेती क्षेत्रात सीमांतीकरणाची प्रक्रिया सुरू झाली.लोकसंख्येच्या अतिरिक्त भारामुळे शेतजमीनीचे विभाजन व तुकडीकरण होऊन शेतीचे लहान लहान तुकड्यात रूपांतर होत आहे. त्यामुळे लहान व सीमांत शेतकऱ्यांची संख्या वाढत आहे. आजच्या काळात लहान व सिमांत शेतकऱ्यांची संख्या 80% आहे. सीमांतीकरण प्रक्रियेमुळे लहान व सीमांत शेतकरी

शेती क्षेत्रातून बाहेर फेकला जात आहे. शेतमजुरांची संख्या वाढत आहे. एका अभ्यासानुसार, 'दुष्काळ प्रवण क्षेत्रातील लहान शेतकऱ्यांना निर्वाह उत्पन्न मिळविण्याची संधी फारच कमी आहे.' दुसऱ्या एका अभ्यासात असे दिसून आले की, सिंचन सुविधा,आदानांचा पुरवठा, व्यापारी पिके व विस्तार सेवा, कर्ज व विपणनाच्या सोई उपलब्ध करून दिल्या तरी सीमांत शेतकरी दारिद्र्य रेषेच्या वर येऊ शकत नाही. सन 1999 मध्ये हैद्राबाद येथील एन.आय.आर.डी. या संस्थेत झालेल्या चर्चा सत्रात सीमांतीकरण झालेल्या शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रातून बाहेर पडण्यासाठी प्रोत्साहन द्यावे व त्यासाठी हवे तर कूळ कायद्यात बदल करावेत असा विचार मांडला.

अलीकडच्या काळात शेती क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी करार शेती ही एक उपाययोजना सांगितली जाते. करार शेतीमध्ये भांडवलदार, व्यापारी, उद्योजक, व्यावसायिक,बहुराष्ट्रीय कंपन्या प्रवेश करीत आहेत. या पध्दतीत शेतकऱ्यांची जमीनीची मालकी कायम ठेवून व्यापारी पध्दतीने शेती केली जाते. भांडवल, आदाने,पिकांची लागवड पाणी,खते याबाबतचे सर्व निर्णय भांडवलदार घेतात. करार शेतीमुळे लहान शेतकऱ्यांमधील स्पर्धा वाढेल त्यामुळे कराराच्या किंमती कमी होतील व शेतकऱ्यांचे नुकसान होईल. करारात ठरलेली रक्कम शेतकऱ्यांना अदा करून उर्वरीत नफा भांडवलदारांच्या मालकीचा असेल. भांडवलदार ज्या पिकात जास्त नफा त्याच पिकाची लागवड करतील.भारतीय शेतीत व्यापारी पिकेच घेतली जातील. त्यामुळे अन्नधान्ये, खाद्यान्न वगैरे पिकांकडे दुर्लक्ष होऊन भारताची अन्न सुरक्षा धोक्यात येईल.पंजाब,आंध्रप्रदेश वगैरे राज्यात ही पध्दत सुरू झाली आहे. करार शेतीचा देशाच्या शेती क्षेत्रावर नेमका काय परिणाम होईल? रोजगार व उत्पादकता वाढेल का? ती भारतीय शेती पध्दती व ग्रामीण जीवन यांच्याशी सुसंगत असेल काय? असे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत.एक मात्र निश्चित की, करार शेती ही फक्त नफ्याच्या अपेक्षेने केली जाईल. जेथे नफा तेथे पिळवणूक या उक्ती प्रमाणे भविष्यात भारतीय शेतकऱ्यांची पिळवणूक होईल; तसेच भारताची अन्न सुरक्षा धोक्यात येईल. कालांतराने भांडवलदार सीमांत व अतिसीमांत शेतकऱ्यांच्या जमीनी विकत घेऊन विशिष्ट भांडवलदारांच्या हाती जमीनीचे केंद्रीकरण होईल अशी भिती व्यक्त केली जाते. करार शेती हा निगम शेतीकडे (Corporate Farming)जाण्याचा एक मार्ग आहे. शेतीचे यांत्रिकीकरण, बेरोजगारी, अन्न सुरक्षा,आर्थिक विषमता यासारखे प्रश्न निर्माण होतील. त्यामुळे करार शेती भारतीय शेतकऱ्यांना घातक ठरेल असा आक्षेप घेतला जातो.

वर उल्लेख केल्याप्रमाणे आजच्या काळात भारतीय शेती समोर आव्हाने आहेत. शेती क्षेत्रातील ही परिस्थिती सुधारण्यासाठी भारत सरकारने अनेक उपाय योजले आहेत. कर्जमाफी, सधन शेती कार्यक्रम, वैद्यनाथन समिती पॅकेज, कृषी पूरक व्यवसाय, दुग्ध व्यवसाय, कुक्कटपालन, शेळी मेंढी पालन, रेशीम उद्योग, मत्स्यव्यवसाय, ग्रामीण रोजगार कार्यक्रम, सिंचन वाढ,विशेष कृषी क्षेत्र कार्यक्रम,अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम वगैरे उपाय सरकारने सुरू केले आहेत. ते कितपत यशस्वी झाले आहेत, त्यांचे मूल्यमापन शोधनिबंध लेखकांना करता येईल.

शोधनिबंध लेखकांना खालील मुद्यांवर शोधनिबंध लिहिता येतील.

1) जागतिकीकरण व भारतीय शेती क्षेत्र.
2) शेती क्षेत्र व आर्थिक विकास
3) भारतीय शेतीची उत्पादकता
4) भारतीय शेती व पाणी व्यवस्थापन
5) भारतीय शेती क्षेत्र व हवामानातील बदल
6) भारतीय शेती क्षेत्र व पतपुरवठा
7) जागतिकीकरण काळातील शेती क्षेत्रामधील भांडवल निर्मिती.
8) जागतिक व्यापार संघटना व भारतीय शेती
9) भारतीय शेती व अनुदाने
10) भारतीय शेती व बौध्दिक संपदा कायदा
11) भारतीय शेती व आयात – निर्यात
12) भारतीय शेती क्षेत्रातील खर्च विश्लेषण
13) भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या: कारणे व उपाय
14) शेती क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी योजिलेले उपाय वगैरे

शोधनिबंध लेखकांना उपरोक्त विषयासंबंधी शोध निबंधासाठी प्राथमिक माहिती अथवा दुय्यम माहिती गोळा करता येईल त्या माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढता येतील त्यासाठी (Case-study)पध्दती वापरल्यास शोध निबंधात अधिक वास्तवता व खरेपणा येईल. माहिती शक्यतो अलीकडच्या काळातील असावी संदर्भासाठी कांही पुस्तके, अहवाल व मासिके वगैरे स्रोत पुढील प्रमाणे सांगता येतील.


1) R.Datt, KPM Sundhram' " Indian Economy" S.Chand & Company Ltd.,Delhi.
2) 'Misra,Puri' "Indian Economy" Himalaya Publishing House, New Delhi.
3) Mamoria C.B. : Agricultural Problems in India.
4) National Conference Souvenier - Global Warming & it's Consequences, Published by Sharadabai Pawar Mahila Mahavidyalaya, Baramati, Dist.Pune.
5) Economic Survey of India - Published by GOI.
6) Economic Survey of Maharashtra Published by Govt.of Maharashtra
7) अध्यक्षीय भाषण :– "हवामान बदलाचे भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणाम " मराठी अर्थशास्त्र परिषद, 32 वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय कडेगांव, जि.सांगली.
8) अर्थसंवादचे विविध अंक – मराठी अर्थशास्त्र परिषद
9) प्रबोधन प्रकाशन ज्योतीचे विविध अंक, ऑगस्ट 2005 व सप्टेंबर 2008
10) K.R.Gupta, " GATT Accord and India"
11) Dr. Muley, "Economic Reforms and Growth Some Dimensions"
12) Chand Rayesh , Rasn S. S.,Pandey L.N.- "Growth Crisis in Agriculture,"EPW,June 30,2007
13) Satish P. - Agricultural Credit in Post Reform "EPW, June 30,2007.

# 3 महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचे मूल्यमापन

**के.जी.पठाण, पुणे**
**भ्रमणध्वनी : ९८५००६६०१०**

भारतातील 1991 नंतरचे आर्थिक सुधारणा कार्यक्रम आणि त्या पाठोपाठ येणारे (खा.ऊ.जा.) खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण अंतर्गत परवाना पध्दती रद्द होण्याचे म्हणजेच मुक्त आर्थिक विकास धोरण याचा परिणाम म्हणून आजमितीला औद्योगिक उत्पादन क्षेत्रात (विशेषत: मॅन्युफॅक्चरिंग आणि परदेशी गुंतवणूक) महाराष्ट्र हे देशपरदेशातील उद्योगपतींचे प्रथम पसंतीचे राज्य ठरले आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात (2007-08) नमूद केल्याप्रमाणे,''1991 ते 2007 या कालावधीत 6475 औद्योगिक उद्योजकता सामंजस्य करार होऊन त्यातील नवीन उद्योगांत 1 लाख कोटीहून अधिक गुंतवणूक तर झालीच शिवाय 6 लाखाहून अधिक नवीन रोजगार उपलब्ध झाले.'' आज औद्योगिक उत्पादनवाढीचा सरासरी वार्षिक दर 7.5 इतका आहे. 2006 च्या नव्या औद्योगिक गुंतवणूक व उत्पादन धोरणानुसार 2011 पर्यंत यात सरासरी 11 टक्क्यांपर्यंतची वाढ अपेक्षित आहे. विशेषत: 2000 नंतर औद्योगिक उत्पादन क्षेत्रात महाराष्ट्राने कात टाकली आहे, असेच म्हणावे लागेल.

अशा उद्योगप्रधान महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद व नाशिक या शहरातील मोठ्या व मध्यम खाजगी उद्योगांचा जसा मोलाचा सहभाग आहे; त्याचप्रमाणे ग्रामीण भागात विशेषत: सहकारी पध्दतीच्या साखर, हातमाग, दुग्धोत्पादन, शेती प्रक्रिया (वायनरी), कृषिपूरक ग्रामीण औद्योगिक क्षेत्रासही उत्पादन आणि रोजगार निर्मिती या दृष्टीने अनन्यसाधारण महत्व आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या औद्योगिक विकास धोरणाचा टीकात्मक आढवा घेणे आवश्यक ठरते. विशेषत: आर्थिक सुधारणापूर्वीच्या कालखंडात (1960 ते 2000) भेडसावणारा प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न कसा सोडविण्यात आला. त्याच्या यश, मर्यादित यश किंवा अपयश यांची समग्रलक्षी भूमिका

विश्लेषण केल्यास त्याचा अर्थशास्त्र संशोधकांना उपयोग होईल. अगदी अलीकडे म्हणजे 2006 च्या महाराष्ट्र शासनाच्या औद्योगिक धोरण मसुद्यात असे नमूद केले आहे कि, ''प्रादेशिक समतोल आणि रोजगार निर्मिती यांना विशेष प्राधान्य देऊन वर्धिष्णू (टिकाऊ) आर्थिक विकास हे उद्दिष्ठ्य साध्य करण्यासाठी खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्र - या दोन स्त्रोतातून गुंतवणूक वाढविली पाहिजे'' परिणामत: 2011 पर्यंत औद्योगिक वाढीचा सरासरी वार्षिक दर 11% व्हावा, सेवा क्षेत्रातील वाढ 12% अपेक्षित असून त्यातून नव्याने 20 लाख रोजगार निर्मिती व्हावी.

1960 च्या कायद्यानुसार स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (M.I.D.C.) ही शासनाची मोठी प्रकल्प संस्था आहे. एम.आय.डी.सी. आणि त्याच्या विभागीय शाखांमार्फत उद्योजकांना अत्यावश्यक मूलभूत सुविधा (Infrastructure) आणि सेवा (Services) पुरविल्या जातात. त्यात इंडस्ट्रियल प्लॉटस, रस्ते, पाणी पुरवठा, वीज, दळणवळण इ.चा समावेश होतो. एम.आय.डी.सी.शासनाने आय.टी., इंजिनियरिंग, नॉलेज पार्कस् यांची सुरवात केली आहे. जिल्हा / एखादे शहर (कोल्हापूर, सोलापूर, नांदेड, अमरावती)- येथील औद्योगिक वसाहतीच्या कार्याचे, त्रुटीचे विश्लेषण व मूल्यमापन करणे उचित ठरेल उद्योजकांना येणाऱ्या अडीअडचणी यांचे आर्थिक तांत्रिक विश्लेषण करावे.

मानव संसाधन आणि त्यातून प्रगल्भित होणारी उद्योजकता (Entrepreneurship)ही बाब आजच्या स्पर्धात्मक काळात महत्त्वाचा उत्पादन घटक म्हणून अभ्यासनीय आहे. कोणत्याही उद्योगाची सुरूवात, नियोजन, वृध्दि आणि आर्थिक प्राप्ती यासाठी उद्योजकता हा मूलभूत प्रेरणास्त्रोत ठरतो. महाराष्ट्र शासन आणि मिटकॉन (MITCON) सारख्या खाजगी क्षेत्रातील संस्था अनेक वर्षापासून लघुउद्योजकाना उद्योजकता शिक्षण प्रशिक्षण देत आहेत.या दृष्टीने महाराष्ट्रातील उद्योजकता विकासात महाराष्ट्र सेंटर फॉर इंटरपिनरशिप डेवलपमेंट (MCED) आणि MITCON (Maharashtra Industrial and Technical Consultancy)या संस्थांचे योगदान हाही एक शोधप्रबंधाचा अभ्यास विषय होऊ शकतो.

महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाची धारणी, सद्य:स्थिती आणि मुक्त अर्थव्यवस्थेमुळे निर्माण झालेली आव्हाने विचारात घेता खालील विषयांची यादी देता येईल.

1) महाराष्ट्रातील औद्योगिक विकासाचे प्रश्न व धोरण (1991-2005)- एक मूल्यमापन, विशेषत: खुल्या अर्थव्यवस्थेची चिकित्सा. 2006 चे महाराष्ट्राचे औद्योगिक, गुंतवणूक आणि मूलभूत सुविधा धोरण(Industrial Investment and Infrastructure Policy of Maharashtra,2006)याचे विश्लेषण अपेक्षित आहे.
2) औद्योगिक धोरणाच्या अमलबजावणीत महाराष्ट्र इंडस्ट्रियल डेवलपमेंट कार्पोरेशन (MIDC),MSFC (Maharashtra State Financial Corporation)आणि विविध प्रादेशिक विकास महामंडळे (Regional Development Corporation)याचा समावेश होतो. अशा प्रादेशिक विकास महामंडळांनी प्रादेशिक औद्योगिक विकासाचा समतोल साधला काय? असल्यास कसा ? नसल्यास कारणे? अशा महामंडळांची गरजच काय ? या भूमिकेतून

व्यष्टि अध्ययन पध्दतीने (Case Study Method) शोधनिबंध लिहिता येईल.

3) लघु उद्योजकांच्या प्रगतीसाठी जिल्हा उद्योग केंद्रे (District-Industrial Cetres) उद्योग मित्र यासारख्या योजना - शासकीय पातळीवर कार्यरत आहेत / अर्थशास्त्राचे प्राध्यापक ज्या जिल्ह्यात राहतात, तेथील जिल्हा उद्योग केंद्राच्या योगदानाचा इतर जिल्ह्याच्या तुलनेने कसा लाभ झाला किंवा नाही असाही तौलनिक अभ्यास करून त्याची फलिते काढता येतील. सांगली /कोल्हापूर पुणे यापैकी एखादे प्रगत जिल्हा उद्योग केंद्र आणि विदर्भ, कोकणपैकी एखादे केंद्र घेऊन - तौलनिक अभ्यास करावा.

4) महाराष्ट्रातील प्रमुख औद्योगिक वसाहतींनी इंडस्ट्रीयल प्लॉटस् वाटप, त्यांचा वापर आणि त्याबाबतीत निर्माण होणाऱ्या समस्यामुळे उद्योग विकासावर होणारा परिणाम असाही एखादा अभ्यासाविषय निवडता येईल.

5)कोल्हापूर, पुणे, सोलापूर, रत्नागिरी, नागपूर, नाशिक, औरंगाबाद येथील सहकारी औद्योगिक वसाहतींनी उद्योग विकासात कसे योगदान दिले? तेथील उद्योजकांच्या अडचणी काय आहेत.? या विषयावरील सर्व्हेक्षण करावे.

6) महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रिज या संस्थेकडून पारखे उद्याजेकता पारितोषिक दिले जाते. अशा उद्योजकांच्या काही यशोगाथा (Success Stories) आपणास तयार करता येतील.

# एक आवाहन

**ज.फा.पाटील**
भूतपूर्व अध्यक्ष व भूतपूर्व कार्यकारी अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद

माझा व मराठी अर्थशास्त्र परिषदेचा धुळे येथे झालेल्या अधिवेशनामध्ये प्रथम संबंध आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे तत्कालीन विभाग प्रमुख व राजस्व क्षेत्रातील एक ख्यातनाम तज्ञ प्रा.डॉ. वि.वा.बोरकर हे त्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. व त्यांनी मला महाराष्ट्राच्या कर व्यवस्थेसंबंधी दिशादर्शक शोधनिबंध तयार करून अधिवेशनात सादर करावा असे सूचित केले होते. या अधिवेशनास प्रा.वि.म.दांडेकर, डॉ.नाडकर्णी, डॉ.सबनीस, डॉ.बोरकर व महाराष्ट्रातील अनेक ख्यातनाम अर्थशास्त्राचे प्राध्यापक उपस्थित होते. त्याच परिषदेत सर्वानुमते माझी कार्यकारिणीवर नियुक्तीही झाली होती.

आजीव सदस्य, कार्यकारिणी सदस्य, अध्यक्ष व कार्याध्यक्ष या भूमिकातून मी जवळजवळ 28 वर्षे (नाशिकचे अधिवेशन वगळता) सातत्याने सहभागी झालो.नवीन आजीव सदस्य करणे, वार्षिक सदस्य वाढविणे, संस्थात्मक सदस्य वाढविणे, अर्थसंवादसाठी लिहिणे, अर्थसंवादला जाहीराती मिळवून देणे, अर्थसंवादसाठी इतरांना लिहण्यास प्रवृत्त करणे अशा विविध मार्गांनी मराठी अर्थशास्त्र परिषद समृध्द व गतिमान करण्यासाठी मी माझ्या कुवतीप्रमाणे शिष्टसंमत मर्यादामध्ये राहून जे करता येईल ते केले व आज कोणत्याही पदावर नसतानाही ते करण्याचा प्रयत्न मी करत आहे.

सर्वसामान्य सभासदांच्या व प्रामुख्याने अनेक ज्येष्ठ, जबाबदार सभासदांच्यामुळे परिषद शैक्षणिक निकषावर अधिकाधिक उच्चतर स्तरावर जात राहिली. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नाचे फलित म्हणून अर्थसंवादला महाराष्ट्र फौंडेशनचा पुरस्कार तसेच सिकॉम पुरस्कार मिळाला. भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन संस्था, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ यासारख्या संस्थांच्याकडून वाढत्या प्रमाणात अनुदान मिळविण्यात परिषदेला यश मिळाले. प्रारंभापासून परिषदेच्या आर्थिक व्यवहारांची जबाबदारी घेतलेल्या विश्वस्तांनी आपल्या नि:स्पृह कार्याने विश्वस्त या शब्दाचा अर्थ स्पष्ट केला. आजही ती परंपरा चालू आहे. आज संपूर्ण देशात स्थानिक भाषेच्या माध्यमात राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणारी एक विद्वत परिषद या अर्थाने मराठी अर्थशास्त्र परिषद ख्यातनाम झालेली आहे. परिषदेशी

प्रदीर्घ काळ संबंधित असल्यामुळे पायउतार होणारा कार्याध्यक्ष या नात्याने माझ्या काही भावना व त्या माध्यमातून सर्व सन्माननीय सदस्यांना एक कळकळीचे आवाहन सादर करण्यासाठी हे लेखन.

परिषदेला 33 वर्षे झाली. पण आजही परिषद बेघर आहे.काही वर्षापूर्वी बारामती येथे झालेल्या अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्यांनी निधी संकलनाचा संकल्प सोडला. प्रत्येक आजीव सदस्याने किमान 1000 रू. द्यावेत पदधारकांनी पाच हजार रूपये द्यावेत असे ठरले. प्रत्यक्षात मात्र सभासदांच्याकडून मोठा प्रतिसाद मिळाला नाही. काही सभासदांच्या व्यक्तिगत प्रयत्नांतून समाजाच्या विविध स्तरातून निधी संकलन झाले. परिषदेच्या काही आजीव सदस्यांनी आपल्या ग्रंथाचे मानधन सलग तीन वर्षे पूर्णत: इमारत निधीला दिले. तथापि, ज्या वेगाने हे घडायला पाहिजे होते, त्या वेगाने हे घडू शकले नाही. राजकीय व्यवस्थेतून सूचित केलेल्या पातळीपर्यंत मर्यादित वेळेत संकलन झाले नाही व मधल्या काळात पुण्यासारख्या ठिकाणी वास्तूंच्या किंमती चौपट-पाचपट वाढल्या. संस्थेचा शैक्षणिक लौकिक लक्षात घेता संस्थेला पुण्यासारख्या ठिकाणी कायमस्वरूपी कार्यालय असलेच पाहिजे. त्यासाठी ज्या आजीव सदस्यांनी व पदाधिकाऱ्यांनी इमारत निधी दिलेला नसेल, तो ताबडतोबीने द्यावा ही नम्र विनंती. सभासदांपैकी ज्यांच्या जवळ सुदैवाने राजकीय व्यवस्थेशी संपर्क आहे, त्यांनी त्याचा वापर पुण्यात वास्तू निर्माण करण्यासाठी करावा अशीही नम्र विनंती.

परिषदेचे अर्थसंवाद हे मुखपत्र प्रतिष्ठित आहे. या मुखपत्राचा आर्थिक व्यवहार आतापर्यंत तूटीची भरपाई करून संभाळला गेला. अशी तुटीची भरपाई केल्यामुळे परिषदेचे विकास भांडवल वाढत नाही हे स्पष्ट आहे. परिषद अर्थसंवादच्या रूपाने समाजाच्या सांस्कृतिक इतिहासाचा एक महत्त्वाचा घटक असणार आहे, हे लक्षात घेता अर्थसंवादचे प्रकाशन सातत्यपूर्ण, स्वयंपूर्ण व जाहिरात विरहित करण्यासाठी काही उपाययोजना करण्याची गरज आहे. परिषदेचे बहुसंख्य सभासद प्राध्यापकी व्यवसायातले आहेत. तसे नसलेले बऱ्यापैकी उत्पन्न मिळविणारे इतर व्यवसायातले आहेत. प्रस्तुत लेखकाच्या अंदाजाप्रमाणे सध्याच्या आजीव सदस्याच्या वर्गणीच्या वार्षिक व्याजाची रक्कम लक्षात घेता, दर वर्षी सरासरी येणारी तूट 30,000 रूपये गृहीत धरल्यास व त्यामध्ये पुढील काळात 50,000 रूपयां पर्यंत वाढ होण्याची शक्यता गृहीत धरल्यास अर्थसंवाद तूट भरणा निधी कायमस्वरूपी निर्माण करण्याची गरज आहे. हा निधी किमान 5 लाख रूपयांचा असावा. त्यासाठी प्रत्येक आजीव सदस्याने 500 रू देणगी दिल्यास हा प्रश्न मिटू शकतो. अशा निधीच्या व्याजातून वर्षाला शिल्लक राहणारी रक्कम उपरोक्त निधीमध्येच जमा करावी. म्हणजे दीर्घ काळात हा निधी अधिक मोठा होऊन त्याची तूट भरणा करण्याची क्षमता वाढू शकते.

परिषदेच्या 24 वर्षाच्या प्राथमिक इतिहासात परिषदेचे अधिवेशन अध्यक्ष निवड सामंजस्याने, सर्वानुमते, कार्यकारणीच्या शिफारशीवर व सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने व्हायची. अर्थातच परिषदेची आजीव सदस्य संख्या वाढत गेली, कर्तबगार सदस्यांची संख्या वाढत गेली. महत्वकांक्षी सदस्यांची संख्या वाढत गेली. आजीव सदस्य गठ्ठ्याने वाढवण्याची तंत्रे वाढत गेली. त्याप्रमाणे अध्यक्षाची एवढेच नव्हे तर सर्वच पदाधिकाऱ्यांची निवडणूक होऊ लागली. लोकशाही व्यवस्थेत निवडणूकीला आक्षेप असण्याचे कारण नाही. पण त्यातून परिषदेच्या निरोगी विकासाला किती उपकारक घडते व किती घातक घडते, याचा

अंदाज अजूनही म्हणावा तितका सन्माननीय सदस्यांना आलेला नाही. किमान अधिवेशन अध्यक्षांची निवड ही काही निकषांवर व जबाबदार प्रातिनिधीकतेवर अवलंबून असावी. यासाठी कोणती पर्यायी व्यवस्था निर्माण करता येईल यावर गांभीर्याने फेरविचार व्हावा. यादृष्टीने सर्वांनी विचारमंथन सुरू करावे असे वाटते. याबाबतीत गांभीर्याने व जबाबदारीने फेरविचार न झाल्यास परिषदेची लौकिक अर्थाने वाढ होईल. परंतु, परिषदेच्या अंतर्गत एकात्मकतेला दरवर्षी तडे पडत जातील.

परिषदेच्या कार्याध्यक्षाला त्या संदर्भात घटना दुरूस्तीचा प्रयत्न करून देखील त्याच्या प्रतिष्ठेला शोभेल असे अधिकार परिषदेच्या घटनेत नाहीत. काही राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थांच्या बाबतीत अधिवेशन अध्यक्ष हा अधिवेशनाच्या काळात अंतिम अधिकार असणारा असतो. अर्थात त्याही वेळेस त्यास कार्याध्यक्षांशी सल्लामसलत करणे गरजेचे असते.पण परिषदेच्या उर्वरित वर्षातील कारभारांमध्ये कोणत्याही प्रश्नावर निर्णय घेण्याचा अधिकार हा कार्याध्यक्षाला असला पाहिजे. अधिवेशनाखेरीजच्या कालखंडात विविध सभांच्या अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष असला पाहिजे. रूलींगचे अधिकार त्याला दिले पाहिजेत. याही बाबतीत पुनर्विचार करण्याची गरज आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विकासामध्ये, वाढीमध्ये महिलांचा समावेश व सहभाग वाढला पाहिजे, हे स्पष्ट आहे. त्यादृष्टीने परिषदेच्या कार्यकारिणीत महिलांना किमान काही प्रतिनिधित्व दिले गेले पाहिजे व ते रोटेशन पध्दतीने फिरले पाहिजे. रोटेशन निकष विद्यापीठ किंवा प्रदेश हा असू शकेल.

परंपरा म्हणून काही गोष्टी करण्याची गरज आहे. त्यामध्ये सर्वप्रथम महिला सदस्यांना अध्यक्ष पद मिळण्याच्या दृष्टीने एक संकेत असा पाडला पाहिजे की, जर सलग चार वर्षे पुरूष अध्यक्ष झाले तर पाचव्या वर्षी सर्वानुमते व गरज पडल्यास महिला उमेदावारांच्यामध्ये निवडणूकीने महिला आजीव सदस्यांचीच निवड व्हावी. कार्यकारिणीमध्ये दोन सदस्य स्वीकृत केले जातात. त्यातील एक सदस्य महिला असावी असाही संकेत पाडला जावा.

परिषदेच्या स्थापनेपासून परिषदेने धोरणाच्या पातळीवर प्रचलित आर्थिक प्रश्नावर राजकीय भूमिका घेण्याचे जाणीवपूर्वक टाळले. परंतु देशाचे राजकारण ज्या पध्दतीने बदलत आहे, बहुसंख्य लोकनिर्वाचित लोक प्रतिनिधींची आर्थिक प्रश्नावर समजून उमजून भूमिका घेण्याची शक्यता लक्षात घेतल्यानंतर प्रस्तुत लेखकाला असे मनापासून वाटू लागले आहे की, अशा प्रकारची भूमिका न घेण्यामध्ये मराठी अर्थशास्त्र परिषद आपल्या नैतिक कर्तव्यापासून दूर जात आहे. परिषदेच्या वार्षिक अधिवेशनामध्ये त्या कालखंडातील महत्त्वाच्या किमान एका आर्थिक प्रश्नावर परिषदेच्या सर्वसाधारण सभेने ठराव करावा. तो संबंधित शासनाला सादर करावा व त्याला व्यापक प्रसिध्दी द्यावी. असे केले तरच मराठी अर्थशास्त्र परिषदेने व तिच्या सर्व सदस्यांनी आपले सामाजिक उत्तरदायित्व पार पाडले असे म्हणता येईल.

परिषदेचा एक हितचिंतक, आजीव सदस्य आणि जगातील एका मोठ्या लोकशाही व्यवस्थेचा एक जबाबदार नागरिक व अर्थशास्त्रावर प्रेम करणारा एक विद्यार्थी या भूमिकेतून मी माझ्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्या दिशादर्शक आहेत. बंधनकारक नाहीत. परिषदेचे सर्व सूज्ञ व सन्माननीय सदस्य यावर विचार करतील व परिषदेच्या विकासासाठी आवश्यक ती कृती करतील अशी माझी आशावादी धारणा आहे.

# मराठी अर्थशास्त्र परिषद
# तेहतिसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे तेहतिसावे वार्षिक अधिवेशन शारदाबाई पवार महिला महाविद्यालय (माळेगांव) बारामती, जि.पुणे येथे आक्टोबर–नोव्हेबर 2009 मध्ये आयोजित होणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर येथील व्यवसाय विभागातील प्राध्यापक व विभाग प्रमुख श्री विनायक श्रीधर देशपांडे हे अध्यक्षस्थान भूषवितील व्यवस्थापनातीलअधिवेशनातील चर्चा सत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

1) आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दान्तातील पॉल क्रुगमन यांचे योगदान.

2) 21 व्या शतकातील भारतीय शेती क्षेत्रासमोरील आव्हाने.

3) महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचे मूल्यमापन

या विषयांची रूपरेषा याच अंकात देण्यात आली आहे. चौथा विषय तत्कालिन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष यथावकाश जाहीर करतील. त्या विषयावर निबंध मागविले जात नाहीत.

निबंध लेखकांनी जास्तीत जास्त 2000 शब्दांत विषय मांडावयाचा असून निबंधासोबत 300 शब्दात त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. निबंध श्री लिपी देवरत्न 6.0 मध्ये तयार करून त्याची सॉफ्ट कॉपी (सी.डी.) व दोन हार्ड कॉपीज अध्यक्षांच्याकडे पाठवाव्यात. निबंध लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचा सभासद असलाच पाहिजे.

निबंध मराठीत असावेत. ते पूर्वी कोठेही सादर केलेले किंवा प्रसिध्द केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, महाविद्यालयाचे / विद्यापीठाचे / शैक्षणिक वा अन्य संस्थेचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीत देणे आवश्यक आहे.

प्रत्येक निबंध लेखकाचा केवळ एकच निबंध (स्वतंत्र वा संयुक्तपणे लिहलेला) अधिवेशनासाठी स्वीकारला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या तेहतिसाव्या वार्षिक अधिवेशनात निबंधाच्या उत्तम सादरीकरणास संयोजकाकडून तीन सुवर्णपदके प्रदान करण्यात येणार आहेत. 31 ऑगस्ट 2009 ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख असून त्यानंतर पाठविलेले निबंध स्वीकारले जाणार नाहीत. निबंध लेखकांनी आपले निबंध पुढील पत्यावर पाठवावेत.

**विनायक श्रीधर देशपांडे**
'श्रीकमल' 48 विद्याविहार,
प्रतापनगर, नागपूर 440022
मोबा.:9822737725
दूरध्वनी : (0712)2237042

**अनिल सुर्यवंशी**
**कार्यवाह / खजिनदार**

## निवेदन

खालील आजीव सभासदांचे ऑक्टोंबर-डिसेंबर 2008 चे पाठविलेले अंक प्रमुख संपादकांकडे परत आलेले आहेत. तरी संबंधित आजीव सभासदांनी आपले नवीन पत्ते संपादकांकडे पाठविण्यासंबंधी सहकार्य करावे.त्यानंतर त्या सभासदांना बदललेल्या पत्त्यावर अर्थसंवादचे पुढील अंक पाठविण्यात येतील.

| अ. क्र. | सभासद क्रमांक | आजीव सभासद नांव |
|---|---|---|
| 1 | 6 | श्री.तळवळकर गोविंद |
| 2 | 22 | श्री.गाडगीळ गंगाधर गोपाळ |
| 3 | 25 | श्री.देशपांडे विश्वनाथ विनायक |
| 4 | 35 | श्री.वाकणकर बिंदू माधव |
| 5 | 45 | श्री.दांडेकर अशोक शंकर |
| 6 | 55 | जोगळेकर सुहास रामचंद्र |
| 7 | 56 | प्राचार्य कौण्डिण्य एम्. व्ही. |
| 8 | 73 | सौ.कुलकर्णी विद्या रत्नाकर |
| 9 | 92 | श्री.खुदानपूर गोविंद शिवाजी |
| 10 | 93 | राजर्षी जी.एम. |
| 11 | 132 | प्रा.मानकर विजयकुमार गजानन |
| 12 | 143 | प्रा.जोशी श्रीकांत कालीदास |
| 13 | 147 | मीठाणी दाऊद मोहंमद अली |
| 14 | 153 | प्रा.मोकाशी पु.के. |
| 15 | 176 | प्रा.गिरासे गजेंद्रसिंग ठाणसिंग |
| 16 | 178 | प्रा.उपदेव विनायक वासुदेव |
| 17 | 181 | प्रा.परांजपे रमेश वासुदेव |
| 18 | 185 | प्रा.अष्टेकर शांताराम |
| 19 | 203 | प्रा.शहा रमेश बाबुलाल |
| 20 | 249 | श्रीमती जोशी कालिका दिनानाथ |
| 21 | 279 | प्रा.तराले प्रल्हाद गोविंदराव |
| 22 | 284 | श्रीमती शिरोडकर ज्योत्स्ना ए. |
| 23 | 321 | प्रा.फरील नरेंद्र विश्वनाथ |
| 24 | 339 | सौ.एकबोटे नंदिनी वि. |
| 25 | 366 | प्रा.देशपांडे अतुल रा. |
| 26 | 377 | पाटील आर.बी. |
| 27 | 378 | प्रा.कान्हेरे रंगनाथ भी. |
| 28 | 396 | सौ.दिक्षीत एम. आर. |
| 29 | 414 | प्रा.निजसुरे पदयावती सखाराम |
| 30 | 420 | सौ.प्रयाग माधवी |
| 31 | 498 | प्रा.कस्तूरे आशा |
| 32 | 519 | प्रा.सौ.श्रीवास्तव नलीनी |
| 33 | 543 | डॉ.हिलगे विलास |
| 34 | 571 | श्री.भिलवडे अरविंद श्रीपाल |
| 35 | 593 | श्री.छापरवाल शांतीलाल बिरदीचंद |
| 36 | 606 | डॉ.सी.सावंत मिनाक्षी दि. |
| 37 | 613 | नातू नारायण पुरूषोत्तम |
| 38 | 619 | गौड उर्मिला ए. |
| 39 | 624 | उशीर देवीदास गंगाधर |
| 40 | 639 | सौ.एकबोटे विद्या |
| 41 | 652 | प्रा.देवरे नानाजी वामन |
| 42 | 656 | सौ.दामले वर्षा आनंद |
| 43 | 666 | श्री.ओक जयंत काशिनाथ |
| 44 | 667 | डॉ.सौ.केळकर किर्ती |
| 45 | 698 | प्रा.आठवले पि.यु. |
| 46 | 713 | प्रा.तोडमल आय.ए. |
| 47 | 753 | भटकर सुरेश नामदेव |
| 48 | 754 | प्रा.डॉ.कप्तान संजय |
| 49 | 837 | श्री.मालतुमकर वि.वा. |
| 50 | 843 | श्री.नाखले वा.गो. |
| 51 | 846 | श्री.गोवंडे प्रकाश का. |
| 52 | 860 | प्रा.कोंडेकर उमाकांत भास्करराव |
| 53 | 930 | सौ.मोरे सोनाली प्रभाकर |
| 54 | 934 | श्री.बेलसरे संजय |
| 55 | 1021 | पाटील गिरीष गोविंद |
| 56 | 1026 | प्रा.महातळे आशिष कृ. |
| 57 | 1032 | प्रा.शिंदे सुनिल श्रीपतराव |
| 58 | 1184 | नाईक वैशाली कल्याणराव |
| 59 | 1259 | प्रा.झोटिंग शरद वामन |

**प्रमुख संपादक -जगन्नाथ पाटील**

# झुंज नव - श्रीमंतांशी

**टीप : कंसातील मजकूर अनुवादकाचा/दुसऱ्या स्त्रोतांमधून घेतला आहे.**


**अनुवाद -**

**शि.ना.माने**



**गोषवारा :**

विशेषत: मागील २५-३० वर्षात अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत जे बदल झाले. त्यांपैकी नव-श्रीमंतांचा उदय व अस्त हा एक लक्षणीय बदल आहे. बँकर, व्यापारी, दलाल इत्यादींचा त्या वर्गात समावेश होतो. पूर्वीच्या शुंपीटर यांच्या प्रवर्तकाच्या जागेवर त्यांनी ताबा मिळविला. त्यासाठी केंद्रीय बँक पध्दती, सरकार व राजकारणी यांच्यातील विनियमनात्मक कच्चे दुवे प्रामुख्याने जबाबदार आहेत, हा प्रस्तुत संपादकीयाचा युक्तिवाद आहे. युक्तिवाद नवा, संतुलित व संयुक्तिक आहे. जागतिक पातळीवरही हा बदल होत आहे. परंतु काही बाबतीत तो अमेरिकेतील बदलाशी तंतोतंत जुळणारा नाही व ते अपेक्षितच आहे. उदाहरणार्थ, जागतिक पातळीवर गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी घटत आहे. अमेरिकेत ती वाढण्याच्या प्रवृत्तीची दिसते. ते कसे, त्याचेच विवेचक विश्लेषण प्रस्तुत संपादकीयात करण्यात आले आहे.


**बँकांचे दिवाळे, नगदनारायण बँकर व राजकारणींची दिवाळी :**

बँकांना दिवाळखोरीत लोटून व बँकरांना अभय देऊन राजकारणी स्वत: नगदनारायण झाले. हा त्यांचा व्यवहार स्वत:साठी मोहमाया निर्माण करणारा असला, तरी उर्वरित प्रत्येकासाठी तो धोकादायक असतो. कसे ते पहा. एडिंबर्गमधील निबर व परोपजीवी कंपनी अधिकाऱ्यांची 'कामगार-मालकांकडून धुलाई.' वॉशिंग्टनमधील पूर्वलक्षी प्रभावाने प्रस्तावित ९०% कर दर आणि आता (एप्रिल ०२,२००९) लंडनमधील शिखर परिषदेसाठी जी-२० देशांच्या नेत्यांच्या आगमन प्रसंगी त्यांचे दंगे/निदर्शनाने थंडे स्वागत. राजकारण किंवा जागतिक अर्थव्यवस्थेवर सखोल परिणाम करणाऱ्या सामाजिक प्रवृत्तीतील मोठ्या बदलाचे वारे कोणत्या दिशेत वाहत आहे याची ही एक झलक आहे.

श्रीमंत लोक चालू लौकिक नकारात्मक संतापाची निश्चितपणे एकमेव लक्ष्ये नाहीत. अर्थव्यवस्थेच्या सर्वसाधारण घसरणीने भयभीत लोक राजकारणी केंद्रीय बँकर व नवीन देशांत स्थानांतरित यांच्याविषयी जास्त संतप्त आहेत.

परंतु 'महासंपत्तीचे गुन्हेगार' (किंवा संपत्तीचे विषाक्तीकरण करणारे?) या नवीन श्रीमंतांविरूध्द क्रोधाची लाट व्यक्त होताना दिसते. एका शतकापूर्वी टेडी रूझवेल्टनी बदनामी केलेल्या मूठभर अमेरिकी उमरावांपेक्षा आजचे खलनायक म्हणजे एक जास्त विशाल जागतिक पुंजका आहे; आणि त्यांच्यापैकी बरेच मक्तेदार व लोहमार्गाचे मालक नव्हे, तर बँकर व निधी व्यवस्थापक आहेत. मात्र यापूर्वीच्या प्रदर्शनी युगाच्या अखेरीचे विषय तेच आहेत. वाढती विषमता-१९७९ मध्ये तळातील १० टक्के अमेरिकींच्या उत्पन्नापेक्षा शिखरावरील ०.१ टक्का अमेरिकींचे उत्पन्न २० पट व २००६ मध्ये ते ७७ पट होते - आणि त्याचा एक अर्थ असा की, हावरट श्रीमंतांनी सभ्य श्रमिकांचा त्यांच्या हक्काच्या एकेका पैशातील हिस्सा हिरावून घेतला आहे.

या फसवणूकीचा काही भाग जुन्याच प्रकाराचा राहिला आहे. अनुकूल देवघेवीचा व्यवहार करण्यासाठी पाँझी योजना आखणे व राजकारणींना लाच देणे. (चार्ल्स पाँझी अशा योजनांचा निर्माता होता. १९१९-२० मध्ये अशा योजना तयार करून त्याने प्रचंड संपत्ती गोळा केली. १९४९ मध्ये त्यांचे निधन झाले. आपल्याकडील सत्यम कंप्युटर सर्व्हिसेससारख्या कंपनीच्या आडून काम करणाऱ्या व निव्वळ कागदावर अस्तित्वात असणाऱ्या कंपन्यांच्या माध्यमातून राजकारणींच्या अलिखित संमतीने,कपटाने व ताबडतोब अपरिमित माया गोळा करण्याचा प्रकार हा पाँझी योजनांचाच कित्ता आहे.) जास्त धूसर क्षेत्रांत श्रीमंत त्यांची नगद रोकड दडवितात व त्यांच्या फायद्याचा कर कायदा तयार करवून घेतात खाजगी भाग भांडवलावरील नफ्याविषयीच्या असमर्थनीय वागणूकीचाच तुम्ही विचार करू शकता. परंतु अनेक टीकाकारांच्या दृष्टिकोनात श्रीमंतांचे वर्तन एवढे क्लेशकारक का, या प्रश्नाचे उत्तर असे की त्या श्रीमंतांकडून दोन जास्तीत जास्त मोठे अपराध दिवसा ढवळ्या घडले होते, जसे की ते अपराध या व्यवस्थेचाच एक भाग होता.

**दोन अपराध :**

श्रीमंतांवर पहिला आरोप हा की त्यांनी 'नफ्याचे बक्षीस मला, तोट्याची शिक्षा तुला' ही नव्या चेहऱ्याची भांडवलशाही निर्माण केली. (किंवा नफ्याचे खाजगीकरण व तोट्याचे सामाजिकीकरण तसेच वापरा व फेकून द्या स्वरूपाची भांडवलशाही असे मराठी पर्याय तेवढेच समर्पक आहेत.) दुसऱ्या लोकांच्या पैशावर सट्टा खेळण्यासाठी व्यापारी व निधी व्यवस्थापकांनी मोठी बक्षीसे मिळविली. परंतु ते ज्यावेळी मातृ-पितृ कंपनी, संबंधित ग्राहक व अखेरीस करदाते यांना देणी चुकती करावी लागली. या जोखमीच्या असममितीला (जोखमीच्या ग्राहक व विक्रेते यांच्यातील विषम वितरणाला) पैसाविषयक धोरणाने हातभार लावला. म्हणजे जेव्हा बाजार कोसळले किंवा गचकले तेव्हा नेहमीप्रमाणे केंद्रीय बँकांनी व्याज दरात कपात करून त्यांना सावरले.

दुसरा आरोप असा की बँकर व निधी व्यवस्थापक यांनी कोणतीही उपयुक्त सेवा दिली नाही. मायक्रोसॉफ्ट व गूगल कंपन्यांची स्थापना करणारे श्रीमंत प्रवर्तक ''गुणवंत / लायक'' होते. परंतु श्रीमंत व्यापारी व दलाल गुणवंत / लायक नव्हते. कारण त्यांनी निव्वळ गडबडगुंडी करून स्वतःच्या नफ्याशिवाय दुसऱ्या कोणाचाही विचार केला नाही. त्यांनी जसा खोऱ्याने अधिकाधिक पैसा ओढला तसा सधन देशांच्या अर्थव्यवस्थांतील वित्तीय क्षेत्राचा भ्रमाचा भोपळा अधिकाधिक फुगत गेला आणि त्याने ज्यावेळी शिखर गाठले त्यावेळी

देशांतर्गत अमेरिकी निगम नफ्यातील त्यांचे योगदान ४१ टक्क्यांपर्यंत वाढले. ही वाढ दोन दशकांपूर्वीच्या दराच्या दुपटीहून जास्त होती. वित्त जसे वाढत गेले, तसा कधी नव्हे इतका बँकांचा आकार वाढला-एवढा मोठा की त्या कधीच बुडणार नाहीत, परंतु त्यांचे आसन ज्यावेळी डळमळीत झाले, त्यावेळी त्यांचे ओझे करदात्यांवर पडले. त्यांना ते सहन करणे भाग पडले. आदर्श भांडवलशाहीचे परिपूर्ण उदाहरण निर्माण करण्याऐवजी नालायक श्रीमंतांनी लबाडीने तिचे खराबीकरण केले. खरे तर, धनवानांचा तो समाजवाद होता. (अधिक स्पष्टीकरणासाठी जॉर्ज ऑर्वेल यांच्या ॲनिमल फार्ममधील पुढील दोन आज्ञांचा येथे उल्लेख करण्याचा मोह अनावर होतो: ''सर्व प्राणी समान आहेत.....परंतु काही प्राणी इतरांपेक्षा जास्त समान आहेत.'' हे इतरांपेक्षा जास्त समान असणारे प्राणी म्हणजेच आपले धनवान.)

हे दोन आरोप एकमेकांत गुंतलेले आहेत. परंतु दुसरा आरोप तुलनेने चांगलाच कमी समर्थनीय/सौम्य स्वरूपाचा आहे. वित्तीय संकटातून बँकांना बाहेर काढण्यासाठी जामीनदाराच्या स्वरूपातील वित्तीय मदतीचा खर्च प्रचंड असला तरी त्याला त्या वित्ताचा अंगभूत दोष म्हणता येणार नाही. आणि समजा त्या अवस्थेत बँकांचा दोष असला तरी त्यांनी पुरविलेल्या जास्त तरलतायुक्त बाजारांमुळे अर्थव्यवस्थेतील उर्वरित बँकांचा दोष असला तरी अर्थव्यवस्थेतील उर्वरित क्षेत्रांचे मोठे लाभ झाले आहेत. तुलनेने स्वस्त भांडवलामुळे उद्योगाला गुंतवणूक,नवप्रवर्तन व व्याज तसेच विनिमय दरातील जोखीमेविरूध्द स्वत:चे संरक्षण करणे जास्त सोपे झाले. शिक्षा म्हणून वित्तपुरवठादारांना प्रवर्तकांपेक्षा कमी लेखण्याचा प्रयत्न करणे म्हणजे (कळसूत्री बाहुलीप्रमाणे दुसऱ्यांवर विसंबणाऱ्या व विसंगतीपूर्ण वर्तनाच्या पौराणिक गोष्टीतील) मूर्ख प्रवाशाची कृती करणे होय. शेवटी अशाने तुम्ही दोघांचे नुकसान करत आहात.

नफ्याचे बक्षीस मला, तोटयाची शिक्षा तुला, हा दोहोपैकी एक आरोप पूर्णपणे सिध्द होत नाही. म्हणजे बँक चालकांपैकी ज्यांच्या बँकाचे दिवाळे निघाले, त्या काही लोकांचा जरूर तोटा झाला.परंतु पिंडाने व्यवसायाला अनुकूल असलेल्या या वृत्तपत्राला देखील कबूल करावे लागेल की वित्त व्यवसायातच काही तरी नासले होते. म्हणजे ज्यात अस्सली जोखीम स्वीकारणाऱ्यांना प्रचंड बक्षीसे पटकाविण्याची संधी दिली जाते तो मूलभूत भांडवलशाही सौदाच दुबळा वाटतो (त्या मूलभूत व्यवहारातच कुठे तरी पाणी मुरत असावे), जर त्या सर्वांचा मोठा भुर्दंड करदात्यांना द्यावा लागत असेल म्हणून हा संताप.

## वेळ आहे दुरूस्तीची व तांबूस कागदी पिशव्यांची:

ज्यावेळी विषमतेत वाढ झालेली असते, त्यावेळी एखाद्या गोष्टीच्या अतिरेकाचे कालखंड सुधारण्याच्या युगांचा मार्ग मोकळा करतात. रूझवेल्ट यांनी मक्तेदारीविरोधी कायदा करून तिला मोडीत काढले.नंतर लगेच काँग्रेसने संघीय आय कर सुरू करून सुधारणा युगाकडे (विषमता कमी करण्यासाठी) कूच केले. अंतर्गत फोडतोड व बहिर्गत हल्यांशी जुळवून घेण्याची क्षमता हा भांडवलशाहीच्या चिरंतन चैतन्याचा (स्वत:च्या व त्याबरोबर समाजाच्या पालनपोषणाचा) एक घटक आहे.

खरे तर, व्यवस्थेची स्वयं दुरूस्तीची सुरूवात कधीच झाली आहे. आमचा या सप्ताहाचा विशेष अहवाल दर्शवितो त्याप्रमाणे श्रीमंत पूर्वीइतके

श्रीमंत राहिले नाहीत. धनिकांच्या मत्तांपैकी सुमारे एक चतुर्थांश म्हणजे १० ट्रिलियन डॉलर एवढी हानी झाली आहे. विषमतेत घट होईल. गुंतवणूक बँका व वायदे बाजारातील किंमतीतील चढ-उतार रोखणारे बचाव निधी संकोचत आहेत. खाजगी साधारण भागधारकांचे समूह दुसऱ्या कंपन्यांचा कार्यव्यवहार ताब्यात घेण्याच्या हेतूने वित्तपुरवठा करण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहेत. भपकेबाज/प्रदर्शनी उपभोगात स्वयं दुरूस्तीची प्रक्रिया सुरू आहे. नवनवीन औद्योगिक संकल्पना उदयास येत आहे. नेट-अ-पोर्टर संकेतस्थळ सुरू झाले आहे. ते तांबूस रंगाच्या आकर्षक कागदी पिशव्यांतून कपडे, सुवर्णालंकार, दूरदर्शन सेट, इत्यादी सामग्री त्यांच्या ग्राहकांना घरपोच वितरित करण्याची सेवा देते. (हेतू हा की मागणीत अधिक घट होऊ नये.)

तरी परंतु बाजाराची स्वयं दुरूस्तीची प्रवृत्ती पुरेशी नाही. अखेरीस भारी कर अटळ ठरणार आहेत. कारण बरीच सरकारे मोठ्या वित्तीय तूटीत फशी पडली आहेत. अशा वेळी राजकारणींना काळजीपूर्वक वाटचाल करावी लागेल.तूर्त राजकोषीय उत्तेजनाची गरज असताना सरसकट करवाढी निरूपयोगी ठरू शकतात. सरकारे ज्यावेळी महसूलात वाढ करतील, त्यावेळी आयकरांच्या दरात दंडात्मक पातळ्यांपर्यंत वाढ करण्याऐवजी त्यांना व जातींना राम-राम ठोकावा लागेल, व गुणवत्ताशून्य (जनगुणवादी) उपायांना उलटी गती द्यावी लागेल. फळातून जास्तीत रसाचे निष्करण होईपर्यंतच ज्याप्रमाणे फळ पिळले जाते त्याप्रमाणे श्रीमंतांकडून (करदात्यांकडून नव्हे) जास्तीत जास्त उत्पन्न काढून घ्या; जेणेकरून (अतिरक्त) रसाचे अर्थव्यवस्थेतून नि:सारण होईल. (मांसाला इजा न करता वाढलेली चरबी काढून टाका.)

नफ्याचे बक्षीस मला या भांडवलशाही विषयी म्हणाल तर, असमान / विषम जोखमीचा पूर्वीचा प्रश्न आज मागे पडायला हवा. कारण बदललेल्या परिस्थितीत वित्तीय व्यवस्था जास्त सुरक्षित करण्यासाठी अन्याय्य/ अवैधानिक नफ्याचे पूर्वीचे स्थान आता राहणार नाही. चांगल्या / अनुकूल काळात जास्त राखीव निधी निर्मितीची बँकांवर सक्ती करणाऱ्या प्रति-व्यापारचक्रीय अशा पुरेशा भांडवलाची तीव्रता आता जाणवू लागली. परिणामी बोनसरूपी बक्षीसांवर उधळ-माधळ करण्यासाठी बँकांकडे आता कमी रोकड असणार. विनियमनात्मक व्यवस्थेला तडे गेल्यामुळे गुलाबी नफ्याच्या स्त्रोतांची बरीच भूछत्रे वाढली. (उदाहरणार्थ, सरकार व केंद्रीय बँक यांच्यामधील विनियमनातील त्रुटी किंवा कच्चे दुवे.) आणि आज सरकारे ते तडे बुजवित आहेत. सार्वजनिक उपयोगितेप्रमाणे बुडणार नाही एवढ्या मोठया व रास्त उत्पन्न मिळविणाऱ्या बँक व्यवहाराचा विचार करा.

तेव्हा संपत्तीच्या अतिरेकांना अटकाव हा भांडवलशाहीची वाटचाल जास्त चांगली करण्यासाठी नियोजित विनियमनांचा उपचार-पश्चात परिणाम असेल. असे उपचार/विनियमने(''उठा उठा बांधा कमरा, मारा किंवा लढत मरा'') सारखे क्रांतीकारक, वीरश्रीपूर्ण स्तोत्रांना रसास्वाद पुरविणार नसले, तरी धनवानांच्या उठसूट मागे लागण्यापेक्षा ते चांगले असतील. श्रीमंतांना लक्ष्य करणे एकवेळ सोपे असते. परंतु तुम्ही ज्यावेळी त्यांना बुजविता / धमकाविता त्यावेळी नेहमीप्रमाणे तुम्ही ठोकळेबाज उपायांच्या पलीकडील निरनिराळ्या पर्यायांचा / शक्यतांचा विचार न करण्याची चूक करता आहात.

**दि इकनॉमिस्ट**

**(एप्रिल ४-१०-२००९) च्या सौजन्याने.**

# सन 2008-2009 या वर्षात झालेले आजीव सभासद

| अ.क्र. | नांव | सभासद क्रमांक |
|---|---|---|
| 1 | रणजित आनंदराव शिंदे | 1281 |
| 2 | एम.एस.साठम | 1282 |
| 3 | बी.डी.शिंदे | 1283 |
| 4 | पंढरीनाथ शिवदास पायघन | 1284 |
| 5 | बबनराव जयराम मुसळे | 1285 |
| 6 | विजय मारूती कुंभार | 1286 |
| 7 | पार्वती शामराव जाधव | 1287 |
| 8 | राजुखान मगबुल पठाण | 1288 |
| 9 | सर्जेराव गंगाधर गोलडे | 1289 |
| 10 | रावसाहेब प्रभाकर ढवण | 1290 |
| 11 | संतोष नागनाथ कदम | 1291 |
| 12 | शेषनारायण किसन देशमुख | 1292 |
| 13 | रावसाहेब ग्यानोबाराव जाधव | 1293 |
| 14 | दीपा अरूण मुसळे | 1294 |
| 15 | मारोती विरभद्र तेगमपुरे | 1295 |
| 16 | रमजान फत्तुखान मुजावर | 1296 |
| 17 | अशोक संगप्पा हळ्ळी | 1297 |
| 18 | आत्माराम आकाराम पोळ | 1298 |
| 19 | पी.एम.भागडे | 1299 |
| 20 | हिस्सल वसंत नथ्थू | 1300 |
| 21 | किशोर पांडूरंग कदम | 1301 |
| 22 | जालिंदर गंगाराम साबळे | 1302 |
| 23 | महादेव राजेंद्र क्षीरसागर | 1303 |
| 24 | संपतराव शंकर मदने | 1304 |
| 25 | शामराव गणपती कांबळे | 1305 |
| 26 | ज्ञानेश्वर विष्णू गोटे | 1306 |
| 27 | शिवाजी रामराव काकडे | 1307 |
| 28 | बाळासाहेब ज्ञानदेव अवघडे | 1308 |
| 29 | सुनिल लक्ष्मण मेढे | 1309 |
| 30 | भागवत गणपत यादव | 1310 |
| 31 | महादेव नारायण एकबोटे | 1311 |
| 32 | अशोक बंडू पवार | 1312 |
| 33 | सोपान दामू एरंडे | 1313 |
| 34 | शिवाजीराव सखाराम पाटील | 1314 |
| 35 | दत्तात्रय सिताराम बागडे | 1315 |
| 36 | शशिकांत दिवाण भामरे | 1316 |
| 37 | अजय वासुदेव काटे | 1317 |
| 38 | श्रीकांत शिवराम कांबळे | 1318 |
| 39 | राजशेखर विरपाक्ष वटशेट्टी | 1319 |
| 40 | दादा हरिबा ढेकळे | 1320 |
| 41 | बाळासाहेब तातोबा वाघमारे | 1321 |
| 42 | महेश प्रभाकर देशमुख | 1322 |
| 43 | मनोहर शिवाजीराव बोडके | 1323 |
| 44 | एल.के.पवार | 1324 |
| 45 | एन.एस.पाटील | 1325 |
| 46 | गोकुळ भिका महाजन | 1326 |
| 47 | जगन्नाथ तुकाराम पाटील | 1327 |
| 48 | संगीता किशोर नाडकर्णी | 1328 |
| 49 | छाया जगन्नाथ चव्हाण | 1329 |
| 50 | मल्लु राजाराम खोत | 1330 |
| 51 | एस.एम.पाटील | 1331 |
| 52 | नंदकुमार विश्वनाथ मेटे | 1332 |
| 53 | नवराज गोविंदराव काळदाते | 1333 |
| 54 | स्नेहल निलेश देशमुख | 1334 |
| 55 | गिरीश र.मुळे | 1335 |
| 56 | श्रीकांत जोटींगा होटकर | 1336 |
| 57 | बंडू जयसिंग कदम | 1337 |
| 58 | धर्मा रानबा धेंडे | 1338 |
| 59 | नूतन भालचंद्र विभुते | 1339 |
| 60 | विठ्ठल परसप्पा व्हनबिंदगे | 1340 |
| 61 | दूर्गप्पा तुकाराम पवार | 1341 |
| 62 | पंकज त्र्यंबक निकम | 1342 |
| 63 | राजाराम केरबा पाटील | 1343 |

# निबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

1) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप-विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.

2) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करू नये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.

3) जी माहिती एम्.ए.पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण असू नये; कारण ते सर्वांना माहीत असते. त्या माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.

4) समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय / प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक-सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

5) निबंधात वेगवेगळ्या भागांमध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

6) निबंधात शक्यतो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश' आणि ' शासन व्यवहार कोश' यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

7) निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पध्दतीनुसार असणे आवश्यक आहे.

8) निबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करून वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पध्दतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल. निबंध इतर भाषांतून केवळ भाषांतरित नसावेत.

9) निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा/ संदर्भ सूची प्रमाणित पध्दतीने असावी.

10) निबंधाच्या अखेरीस गोषवारा द्यावा.(300 शब्द)

# अर्थसंवादच्या लेखकांना आवाहन

अर्थसंवादसाठी लेखन करणाऱ्या लेखकांनी आपले लेखन पूर्वमुद्रित नाही, त्यामध्ये कॉपीराईटचा भंग झालेला नाही व संदर्भाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख झाला आहे; या अर्थाच्या विधानाचा आपल्या पत्रामध्ये उल्लेख करावा. लेखकांनी आपल्या शोध निबंधात शक्यतो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश' आणि 'शासन व्यवहार कोश' यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत. निबंधामध्ये वापरल्या जाणाऱ्या तक्त्यांचे शीर्षक मराठीतूनच असावे. निबंधातील आकडेवारी, संदर्भ सूचक, सुस्पष्ट,परिपूर्ण व मान्य पध्दतीनुसार असणे आवश्यक आहे. निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा/ संदर्भ सूची प्रमाणित पध्दतीने असावी.

लेखकांनी आपला शोध निबंध श्री लिपी – देवरत्न ६.० मध्ये तयार करून निबंधाच्या दोन हार्ड कॉपीज व एक सॉफ्ट कॉपी (सी.डी) पाठवावी. अशा स्वरूपात निबंध न पाठविल्यास तो स्वीकारणे अडचणीचे ठरेल. विषयाचा तात्कालिक संदर्भ, आवश्यक ती सैध्दांतिक मांडणी, अद्ययावत सांख्यिकी विश्लेषणातील शास्त्रशुध्दता, भाषाशैली व नेमके संदर्भ या गोष्टींची दखल घेऊन अर्थसंवादमध्ये लेखन छापण्यासंबंधी निर्णय घेतला जाईल. लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य असणे आवश्यक आहे. लेखकांनी आपला आजीव सदस्य क्रमांक कळवावा. अर्थसंवादच्या संबंधात आपल्या मदतीची अपेक्षा आहे. आपल्या सूचनांचा योग्य तो विचार केला जाईल.

**जगन्नाथ शामराव पाटील**
प्रमुख संपादक

# ग्रंथ परीक्षण

# जागतिक मंदी (2008.......) स्वरूप व उपाय

लेखक : प्रा.डॉ.ज.फा.पाटील

प्रकाशक : सकाळ प्रकाशन, 595, बुधवार पेठ, पुणे.

पृष्ठ : 100

किंमत : रू.100/-

संतोष यादव

भारती विद्यापीठ विश्वविद्यालयाचे,

इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, कोल्हापूर.

1930 च्या दरम्यान जगभरात आर्थिक मंदीची भयावह परिस्थिती निर्माण झाली होती. या कालावधीत अमेरिकेत निर्माण झालेली मंदी सर्व जगभर पसरली. तिचे भयानक परिणाम जगभर दिसू लागले होते. 1929 मध्ये आलेल्या महामंदीनंतर त्यावेळचे अध्यक्ष फ्रँकलिन रूझवेल्ट यांनी 1933 मध्ये न्यू डीलचे धोरण स्वीकारले आणि आर्थिक मंदीचे वातावरण निवळू लागले. 1929 नंतर अमेरिकेत आर्थिक मंदी निर्माण झाली. तशाच प्रकारच्या मंदीच्या वातावरणाची प्राथमिक लक्षणे 2006 नंतरच्या काळात अमेरिका आणि युरोपमध्ये दिसू लागली होती. वाढत्या प्रमाणात कर्ज काढून जगण्याची हौस गृहबांधणी क्षेत्रामध्ये झालेली व न पेलणारी गुंतवणूक, क्रेडिट कार्डांचा सुकाळ, तारणावर तारण यासारख्या अनेकविध कारणांमुळे अमेरिकेत मंदीची सुरूवात झाली. 158 वर्षापूर्वी स्थापन झालेल्या लेहमन यासारख्या बड्या वित्तसंस्थेचे दिवाळे निघाले. त्याचबरोबर अमेरिकेतील सर्वात मोठी विमा कंपनी एआयजी (अमेरिकन इंटरनॅशनल ग्रुप) या संस्थेला आपली रोखता, विश्वसनीयता टिकवण्यासाठी प्रयत्न करावे लागले. अमेरिकेत निर्माण झालेल्या वित्तीय संकटाचे प्रतिकूल परिणाम इतर अनेक विकसित आणि विशेषत: विकसनशील देशांना जाणवू लागले. सप्टेंबर 2008 च्या मध्यापासून आर्थिक वित्तीय संकटाचे जसे परिणाम वेगवेगळ्या क्षेत्रावर दिसू लागले, तशी त्याची चर्चा सुरू झाली. 15 ऑक्टोबर 2008 नंतर प्रमुख नियत कालिकांतून आर्थिक मंदीवर लेखन वाचावयास मिळू लागले.परंतु महामंदीचे मूलभूत सिध्दांत,

महामंदीचा विसाव्या शतकातील अनुभव, जगामधील आणि विशेषत: भारतातील सध्याची परिस्थिती; तसेच महामंदीतून बाहेर पडण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संभाव्य उपाययोजना या सर्व गोष्टींचे सोप्या भाषेत, अचूक शब्दात सविस्तर विश्लेषण पुस्तकाच्या स्वरूपात मांडण्याची गरज होती. ही गरज भागविणारे पुस्तक नुकतेच वाचनात आले. प्रा.डॉ.जे.एफ.पाटील यांनी लिहिलेले 'जागतिक मंदी(2008.....) स्वरूप व उपाय' हे पुस्तक सकाळ प्रकाशनने अतिशय योग्य वेळी मार्च 2009 मध्ये प्रकाशित केले आहे. प्रा.डॉ.जे.एफ. पाटील स्वत: विविध आर्थिक प्रश्नावर वृत्तपत्रीय लेखन करून व विविध सामाजिक संस्था, महाविद्यालये, विद्यापीठे, आर्थिक संस्था यामध्ये भाषणे देऊन आर्थिक वित्तीय संकट, त्याचे वास्तव, सरकारचे धोरण व कार्यक्रम, प्रतिबंधात्मक उपाययोजना यासंबंधी समाजाचे प्रबोधन करीत आलेले आहेत.

प्रस्तुत पुस्तकात एकूण सात प्रकरणे आहेत व त्यामध्ये सामान्य वाचकाला समोर ठेवून टप्प्याटप्प्यानेच शक्य तितक्या सोप्या भाषेत, तांत्रिक परिभाषेचा अट्टहास न करता प्रत्येक संकल्पना, सिध्दांत स्पष्ट केलेले आहेत. पहिले प्रकरण 'प्रश्नाचा प्रारंभ' हे आहे. यामध्ये निकृष्ट कर्जांचा प्रश्न म्हणजेच सब-प्राईम (Sub-prime) कसा निर्माण झाला व तो अधिक गंभीर बनत गेला हे स्पष्ट केलेले आहे. 'संकल्पनांचा परिचय' या दुसऱ्या प्रकरणांत व्यापार चक्र किंवा आर्थिक चढ उतार या घटनांशी संबंधित विविध आर्थिक संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'व्यापार चक्राचे सिध्दांत' या तिसऱ्या प्रकरणात व्यापारचक्र म्हणजे काय, ती का निर्माण होतात, तिच्या वेगवेगळ्या अवस्था कशा असतात. त्याची वैशिष्ट्ये कोणती, मंदीच्या गर्तेत सापडलेली अर्थव्यवस्था सुधारणेच्या मार्गावर कशी येते. व्यापारचक्रांची लांबी किती असते, व्यापारचक्राची कक्षा किंवा आंदोलन (Oscillation) किती असते आणि सुधारणेची प्रक्रिया कोणत्या प्रकारची असू शकते. अशा वेगवेगळ्या बाबींशी संबंधित अर्थशास्त्रीय सिध्दांताची चर्चा केली आहे. यामध्ये प्रामुख्याने हॉट्रे, हेक, शुंपीटर, हिक्स,सॅम्युअलसन-हिक्स,तसेच शुल्झ यांचा समावेश होतो.

प्रकरण चार मध्ये व्यापारचक्रांचा इतिहास थोडक्यात चर्चिलेला आहे. सप्टेंबर 2009 नंतर सुरू झालेली महामंदी समजून घेण्यासाठी 1929 मध्ये ज्यामुळे महामंदी आली आणि बराच काळ टिकली, त्यामागची कारणे लक्षात घेणे गरजेचे होते. 'धडे इतिहासाचे' या पाचव्या प्रकरणामध्ये मंदी आणि बेरोजगारी, उपायांची रचना, संस्थात्मक व्यवस्था, घसरण व मंदीच्या संबंधात कारणे, परिणाम आणि उपाययोजना या बाबतीत निष्कर्ष मांडले आहेत.

प्रकरण सहाला 'शतकाचे वित्तीय संकट' असे शीर्षक देऊन त्यांनी एका अर्थाने 21 व्या शतकात पुन्हा मंदी येऊ नये, असे सूचित केले आहे. परंतु पुस्तकाच्या शीर्षकामध्ये कंसात 2008.... असं दाखवून ही मंदी किती दिवस चालू राहणार याचा अंदाज येत नाही हेही सूचित केलेलं आहे. या प्रकरणामध्ये 21 व्या शतकातील पहिल्याच दशकात निर्माण झालेल्या या मंदीबद्दल बारीक सारीक तपशिलाने विवेचन केले आहे.

आर्थिक-राजकीय विचारसारणी, राज्यव्यवस्था आणि तत्वज्ञान या टप्प्यांवर विवेचनाची पातळी नेऊन ओघाने भांडवलशाही, साम्यवाद आणि मिश्र अर्थव्यवस्था यांची चर्चा अर्थकारणाचे तत्वज्ञान या शेवटच्या परंतु अतिशय

महत्त्वपूर्ण प्रकरणात केलेली आहे. केवळ प्रश्नांची चर्चा करून न थांबता मंदीवर मात करण्यासाठी कोणत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवता येतील; त्याचबरोबर जलद, बिनचूक धोरण व कार्यक्षम व्यवस्था विकसित करण्यासाठी आणि कार्यवाहीत आणण्यासाठी शासन व्यवस्था कशी असायला पाहिजे याबद्दलची चर्चा केली आहे.

प्रा.डॉ.जे.एफ. पाटील यांनी पुस्तकाची मांडणी अत्यंत अर्थपूर्ण पध्दतीने केलेली आहे. पुस्तकाची भाषा सहज, सर्वसाधारण व्यवहारी माणसाला समजेल अशी आणि वाचकाला गुंतवून ठेवणारी आहे. पुस्तकाचे कव्हर साधे, नेमके आणि बोलके आहे.तथापि, पुस्तकाच्या मुद्रित शोधनामध्ये थोडा निष्काळजीपणा झालेला आहे. संदर्भाची माहिती प्रचलित शास्त्रीय पध्दतीने देणे अधिक उपयुक्त ठरेल.

मंदीचे भयानक दुष्परिणाम देश आणि विशेषत: समाजातील प्रत्येक घटक अनुभवत असताना डॉ.पाटील यांचे हे पुस्तक अभ्यासक, विद्यार्थी, संशोधक, शेती-उद्योग-व्यापार क्षेत्रातील उद्योजक आणि शासकीय धोरणकर्ते यांच्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. मंदीचे वातावरण निवळल्यानंतर ग्रंथाची सुधारित आवृत्ती छापली गेल्यास अर्थशास्त्रीय साहित्यामध्ये मोलाची भर पडेल.

# अर्थसंवाद

(खंड 32, 2008-09)

**(अ) लेख सूची :**


| स्वतंत्र लेख | | |
|---|---|---|
| 1. | रोजगार (भाग 3) कायम राखता येणारा रोजगार | 16-35 |
| 2. | केंद्र सरकारचा कर महसूल | 136-46 |
| 3. | रूपयाचे अवमूल्यन व ''जे वक्र'' सिध्दांत कल्पना एक तपासणी | 68-77 |
| 4. | अर्थ शब्दांची वाट पाहे | 78-82, 281-283 284-286 |
| 5. | जागतिक मानव विकास अहवाल 2006–भारतापुढील आव्हाने | 93-99 |
| 6. | भारतीय राजस्व–अलीकडील प्रवृत्ती | 100-114 |
| 7. | जागतिकीकरणाने भारतीतील उच्च शिक्षणापुढे निर्माण केलेली आव्हाने आणि संधी | 115-122 |
| 8. | भारताचा सार्वभौम संपत्ती निधी–आवश्यकता की स्वप्न? | 123-131 |
| 9. | स्वयं सहाय्यता गट–ग्रामीण विकास व दारिद्रय निर्मुलन मार्ग | 132-139 |
| 10. | मराठवाड्यातील स्त्री–पुरूष गुणोत्तराची अधोगती | 140-149 |
| 11. | औद्योगिकरण–पर्यावरण समस्या इचलकरंजी शहरातील औद्योगिकरणाचा सूक्ष्म अभ्यास | 150-159 |
| 12. | किनवट तालुक्यातील आदिवासी उप–योजना | 160-170 |
| 13. | अर्थ शब्दांची वाट पाहे | 180 |
| 14. | जागतिकीकरणाचा दलित समाजावरील परिणाम | 195-202 |
| 15. | ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासी समाजातील बालमृत्यूची समस्या | 203-213 |
| 16. | भारतीय सार्वजनिक व्यापारी बँकांमधील ई–बँकिंग सेवांचा विकास | 214-222 |
| 17. | महाराष्ट्रातील तेलबियांची वृध्दी व अस्थिरता | 223-229 |
| 18. | जल–पणन व्यवस्थेतील जल–मूल्य निर्धारण प्रक्रिया | 230-247 |
| 19. | जागतिक अर्थव्यवस्था धोक्यात | 248-254 |
| 20. | पॉल क्रूगमन–बहुआयामी अर्थतज्ञ | 255-257 |
| 21. | ग्रामीण महिला सबलीकरण आणि पंचायतराज | 258-264 |
| 22. | सहकारी संस्था आणि पर्यावरण संरक्षण | 265-269 |
| 23. | अर्थ शब्दांची वाट पाहे | 287 |
| 24. | महाराष्ट्रातील अंदाजपत्रकीय बदलातील कल | 351-359 |
| 25. | झुंज नव – श्रीमंतांशी | 406-409 |
| 26. | एक आवाहन | 401-405 |

| | | |
|---|---|---|
| **भाषणे** | | |
| 1. | आर्थिक पत्रकारिता - एक चिंतन | 4-15 |
| 2. | हवामान बदलाचे भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणाम | 291-315 |
| **पारितोषिक प्राप्त लेख** | | |
| 1. | महाराष्ट्रातील नागरीकरण: प्रवृत्ती,कारणे,परिणाम आणि आव्हाने | 47-67 |
| 2. | ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या दारिद्र्याची समस्या | 316-350 |
| **पीएच्.डी. प्रबंधाचा सारांश** | | |
| 1. | अर्थकारणाचे स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीतील प्रतिबिंब काही निवडक कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास | 171-179 |
| 2. | भारतातील सेवा कर- एक टीकात्मक मूल्यमापन | 270-280 |
| 3. | स्त्रियांच्या आर्थिक विकासात विविध योजनांचे योगदान: अमरावती जिल्ह्याचे संदर्भात विशेष अध्ययन | 360-367 |
| **ग्रंथ परिक्षण** | | |
| 1. | भारताचा भविष्यवेध : नव्या अर्थनीतीचा शोध-बोध | 83-88 |
| 2. | Octroi | 181-183 |
| 3. | अर्थशास्त्राच्या अपसामान्य आकाशवाणीचे भाष्यकार अर्थशास्त्रज्ञ लेविट | 184-192 |
| 4. | आर्थिक संकल्पना (जिज्ञासूंसाठी व्यावहारिक अर्थशास्त्र) | 288-290 |
| 5. | जागतिक मंदी (2008.....) स्वरूप व उपाय | 413-415 |
| **32 व्या अधिवेशनाचा वृत्तांत** | | |
| 1. | सर्वसमावेशक वृध्दीचे सैध्दांन्तिक विवेचन | 368-371 |
| 2. | राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना स्वरूप,उपयुक्तता आणि भवितव्य 372-374 | |
| 3. | अर्थसंकल्पाचे बदलते स्वरूप | 375-377 |
| 4. | बत्तिसावे वार्षिक अधिवेशन 2007-2008 | 378-382 |
| 5. | अर्थसंवाद - वार्षिक अहवाल | 383-386 |
| **विषयांची रूपरेषा** | | |
| 1. | आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दान्तातील प्रो.पॉल क्रुगमन यांचे योगदान | 387-391 |
| 2. | भारतीय शेतीपुढील आव्हाने | 392-397 |
| 3. | महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचे मूल्यमापन | 398-400 |

# अर्थसंवाद

(खंड 32, 2008-09)

## (आ) लेखक सूची :


| | स्वतंत्र लेख | पान नंबर |
|---|---|---|
| 1. | जोशी, शरद शंकर | 16-35 |
| 2. | म्हस्के, भ.सो. | 36-46 |
| 3. | चिकोडीकर,मकरंद | 68-77 |
| 4. | माने शि.ना. | 78-82 |
| | | 281-283 |
| | | 284-286 |
| 5. | कुलकर्णी, सर्वोत्तम न. | 93-99 |
| 6. | पाटील, ज.फा. आणि संतोष यादव | 100-114 |
| 7. | पवार ,जीवन वि. | 115-122 |
| 8. | गोविलकर, विनायक म. | 123-131 |
| 9. | मोरे, जे.बी. आणि बी.एल.महाजन | 132-139 |
| 10. | सोळुंके, रामकृष्ण एस्. आणि दीपक एम्. भारती | 140-149 |
| 11. | पाटील, एस्.एस्. आणि पाटील एस्.बी. | 150-159 |
| 12. | तेगम्पुरे, मारोती वीरभद्र | 160-170 |
| 13. | पाटील, जे.एफ्. | 180 |
| | | 401-405 |
| 14. | दांडगे, रमेश आणि गौतम कांबळे | 195-202 |
| 15. | इंगळे, जे.एस्. | 203-213 |
| 16. | कुंभार, व्ही.एम्. | 214-222 |
| 17. | नरवडे, एस्. एस्. आणि व्ही. बी. भिसे | 223-229 |
| 18. | जुगळे, वसंतराव | 230-247 |
| 19. | जोशी,पी.एन. | 248-254 |
| 20. | ककडे, विजय | 255-257 |
| 21. | कोरे, सिंधुदेवी कृष्णराव | 258-264 |
| 22. | खोत, मल्लू राजाराम | 265-269 |
| 23. | जोशी, प्रभाकर आर. | 287 |
| 24. | कांबळे, प्रकाश आणि बंडू जयसिंग कदम | 351-359 |
| **भाषणे** | | |
| 1. | पाटील, ज.फा . | 4-15 |
| 2. | भिसे, वि. भ. | 291-315 |

| | | |
|---|---|---|
| **पारितोषिक प्राप्त लेख** | | |
| 1. | सोळुंके, रा.सु.आणि ग.बा.गावंडे | 47-67 |
| 2. | इंगळे, जयवंत | 316-350 |
| **पीएच्.डी. प्रबंधाचा सारांश** | | |
| 1. | मुडेकर, तेजस्विनी बी. | 171-179 |
| 2. | यादव, संतोष | 270-280 |
| 3. | काटोले प्रशांत | 360-367 |
| **ग्रंथ परिक्षण** | | |
| 1. | उपाध्ये, जयश्री | 83-88 |
| 2. | मुसमाडे, मंजूषा | 181-183 |
| 3. | माने, शि.ना. | 184-192 |
| 4. | कुलकर्णी, एन्.बी. | 288-290 |
| 5. | यादव, संतोष | 413-415 |
| **32 व्या अधिवेशनाचा वृत्तांत** | | |
| 1. | दास्ताने, संतोष | 368-371 |
| 2. | जगदाळे, सुर्यकांत एच. | 372-374 |
| 3. | शिंदे, मधुकर | 375-377 |
| 4. | सुर्यवंशी, अनिल बाबुराव | 378-382 |
| 5. | देशपांडे, विनायक श्रीधर | 383-386 |
| **विषयांची रूपरेषा** | | |
| 1. | जहागिरदार, दि. व्यं. | 387-391 |
| 2. | शिंदे, मधुकर | 392-397 |
| 3. | पठाण, के. जी. | 398-400 |
| **(इ) अंकांचा तपशील** | | |
| | **अंक तिमाही** | **पृष्ठे** |
| 1. | एप्रिल-जून 2008 | 92 |
| 2. | जुलै - सप्टेंबर 2008 | 100 |
| 3. | ऑक्टोबर-डिसेंबर 2008 | 96 |
| 4. | जानेवारी - मार्च 2009 | 130 |


हे त्रैमासिक अनिल सूर्यवंशी यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता प्रतिमा ऑफसेट,ब्राम्हणपुरी,इस्लामपूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी. 413 411 जिल्हा सोलापूर येथे प्रसिध्द केले.

## अर्थसंवाद या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

## (फॉर्म 4,नियम 8 नुसार)

| | | |
|---|---|---|
| 1. प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.अनिल सूर्यवंशी<br>गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ,<br>शिवाजीनगर, बार्शी– 413411 जि. सोलापूर |
| 2. नियतकाल | : | त्रैमासिक |
| 3. मुद्राकाचे नांव | : | अनिल सूर्यवंशी |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ,<br>शिवाजीनगर, बार्शी 413411<br>जि. सोलापूर |
| 4. मुद्रणस्थळ | : | प्रतिमा ऑफसेट, ब्राह्मणपुरी, इस्लामपूर. |
| 5. प्रकाशनाचे नांव | : | बाब क्र.3 प्रमाणे |
| 6. संपादकाचे नांव | : | जगन्नाथ शामराव पाटील |
| 7. राष्ट्रीयत्व | : | भारतीय. |
| पत्ता | : | शांती प्लाझा, बी–9, 880/881,<br>शनिवार पेठ, सातारा 415 002 |
| 8. मालकाचे नांव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/सेंटर फॉर<br>दि स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन. रॉय<br>ह्यूमन डेव्हलपमेंट कँपस, फ्लॅट 6, ब्लॉक एफ,<br>कार्डिनल ग्रेशियस शाळेजवळ, सरकारी वसाहत<br>इमारत क्र.323 समोर, बांद्रे (पूर्व) मुंबई–400051 |

मी अनिल सूर्यवंशी असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**अनिल सूर्यवंशी**
मुद्रक व प्रकाशक